रजि.नं.: MH./MAR./49675 • स्थापना : १ मे १९८७

सांगोला संपदा

दिपावली व कार्तिक वारी विशेषांक २०२५

- नवीन वर्ष ७ वे
- बुधवार
  दि. २२/१०/२०२५
- किंमत : २०० रु.
- अंक २ रा
- संपादक :
  नागेश जोशी
- कार्य. संपादिका :
  सौ. नम्रता जोशी

वर्ष ३९ १९८७-२०२५

E-mail :
sangolasampada@gmail.com

आमचे असंख्य मित्र परिवार, हितचिंतक व तमाम नागरिकांना दीपावली व नुतन वर्षानिमित्त हार्दिक शुभेच्छा !
जय जिजाऊ
जय शिवराय
सर्वांना
दीपावली च्या
मंगलमय शुभेच्छा !
शुभेच्छुक
VISTACORE™
Raising the bar
Vistacore - A Bal Patil Corporation
I INFRASTRUCTURE I PROJECT MANAGEMENT I LIFESPACES I
I SUGAR I ENERGY I
www.vistacore.co.in
Utkarsh Patil
Harshpratik Patil

सांगोला संपदा

वर्ष ३९ वे

E-mail:- sangolasampada@gmail.com

● **संपादक :**

श्री.नागेश पांडुरंग जोशी

मोबा. ९४२०७०३५५१/ ८३२९५२२१३३

● **कार्य.संपादिका :**

सौ.नम्रता नागेश जोशी

मो.९११२८७२७५५

● मुद्रक :

बाळकृष्ण ऑफसेट, सांगोला.

परफेक्ट प्रिंटर्स, मिरज

अक्षर जुळवणी : समिक्षा ॲडस् सांगोला.

मो. ८८५७९८९०२८

मूल्य २००/- रूपये

हे साप्ताहिक मालक, प्रकाशक, संपादक जोशी नागेश पांडुरंग यांनी मुद्रक माळी अशोक बाळकृष्ण यांच्या बाळकृष्ण ऑफसेट, नेहरू चौक, सांगोला जि.सोलापूर येथे छापून ५३३,देशपांडे गल्ली, सांगोला जि.सोलापूर येथे प्रकाशित केले.

यह साप्ताहिक मालक, प्रकाशक, संपादक जोशी नागेश पांडुरंग इन्होंने मुद्रक माळी अशोक बाळकृष्ण यांच्या बाळकृष्ण ऑफसेट, नेहरू चौक, सांगोला जि.सोलापूर यहाँ छापकर ५३३, देशपांडे गल्ली, सांगोला जि.सोलापूर यहाँ प्रकाशित किया।

This Newspaper published by owener, publisher, Editor Joshi Nagesh Pandurang, & Printeed by Mali Ashok Balkrushna at Balkrushna Offset, Neharu Chowk, Sangola, Dist. Solapur. And Published at 533, Deshpande Galli, Sangola, Dist.Solapur 413 307

या अंकात प्रसिध्द होणाऱ्या विचाराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व विवाद सांगोला कोर्टाच्या कक्षेत.

आमचे असंख्य वाचक, वर्गणीदार, जाहिरातदार, हितचिंतक व तमाम जनतेला दिपावलीच्या हार्दिक शुभेच्छा! तसेच नुतन वर्ष सर्वांनाच सुख समृद्धीचे, स्नेहवृद्धीचे मांगल्याचे, भरभराटीचे जावो या दिपोत्सवाच्या शुभकामना व शुभेच्छा...

श्री. नागेश जोशी

संपादक/माजी नगरसेवक

- संस्थापक/अध्यक्ष : ब्राह्मण सभा, सांगोला
- संस्थापक/अध्यक्ष : ओम साईबाबा सेवा प्रतिष्ठान
- माजी अध्यक्ष : भ्रष्टाचार जन आंदोलन समिती
- कामगार नेते
- सचिव : वन कामगार संघटना, महाराष्ट्र राज्य
- सदस्य : शेतकरी संघटना, सांगोला तालुका
- मा. संचालक : सांगोला बृहत सोसा. लि.सांगोला
- संस्थापक/अध्यक्ष : ठेवीदार संघटना
- संस्थापक : पुरोहित संघटना
- संस्थापक मार्गदर्शक : संघर्ष समिती सांगोला तालुका
- सदस्य : समर्थ ज्येष्ठ नागरीक संघ
- भाजपा जिल्हा कार्यकारणी विशेष निमंत्रीत सदस्य

सौ.नम्रता जोशी

कार्यकारी संपादिका

- संचालिका : शेतकरी महिला सह. वस्त्रनिर्माण सूतगिरणी सांगोला
- उपाध्यक्षा : ब्राह्मणसभा, सांगोला
- सदस्या : ओम साईबाबा सेवा प्रतिष्ठान
- सदस्या : यमाई भजनी मंडळ
- सदस्या : भ्रष्टाचार विरोधी जनआंदोलन समिती सांगोला तालुका
- सदस्या : शेतकरी संघटना सांगोला तालुका

शुभेच्छुक

चि.निरंजन जोशी

B.E. Mechanical Design Engineer

चि.ऋषिकेश जोशी

B.C.S. (Computer)

सांगोला संपदा परिवार

आमचे असंख्य मित्र परिवार, हितचिंतक व तमाम नागरीकांना दिपावली व नुतन वर्षा निमित्त हार्दिक शुभेच्छा !
संचालक साखर कारखाना
माजी सदस्य, पं.समिती
माजी सरपंच शिरभावी
युवक नेते
श्री. शहाजीराव नलवडे
सौ. मंगल नलवडे
श्री. अभिजित नलवडे
श्री. अमोल नलवडे
शुभेच्छुक
साई गणेश मंगल कार्यालय
संगेवाडी (मेथवडे फाटा) ता. सांगोला, मो.: ९७६७८२३७७७/९७३०८७३७७७/९१५३५३१७७७/८६००७४२६९१
HP
HP GAS your friendly gas
एच.पी.गॅसचे
अधिकृत डिलर
हिंदुस्तान पेट्रोलियम कार्पोरेशन लिमिटेड
नविन गॅस कनेक्शन,
तसेच डबल सिलेंडर त्वरीत उपलब्ध
श्री साई गणेश गॅस एजन्सी, सांगोला
पंढरपूर रोड, कृषी उत्पन्न बाजार समिती शॉपिंग सेंटर, सांगोला
प्रोप्रा. अमोल शहाजीराव नलावडे फोन : ०२१८७-२२२०७७
श्री गणेश वे ब्रिज, सांगोला
नलवडे परिवार, शिरभावी, ता सांगोला

आमचे असंख्य मित्र, हितचिंतक व तमाम नागरिकांना ही दिपावली व नूतन वर्ष
सुख समृध्दीचे, भरभराटीचे, आनंदाचे जावो हीच दीपोत्सवाच्या स्नेहपूर्वक शुभकामना व सदिच्छा
डॉ. शितल के. शहा यांचे
शुभेच्छुक
नवजीवन
बाल रुग्णालय
सरगम सिनेमामागे, पंढरपूर मोबा.: ९८२२०८६६९१
उपलब्ध सुविधा :
नवजात शिशू अतिदक्षता विभाग, लहान मुलांसाठी अतिदक्षता विभाग
लॅबोरेटरी फॅसीलीटी, क्ष-किरण तपासणी, अत्याधुनिक ऑपरेशन
थिएटर लहान मुलांच्या ऑपरेशनसाठी, सर्व प्रकारचे आधुनिक लसिकरण
आर्टिफिशीयल व्हेंटीलेटर
शहा परिवार, पंढरपूर, जि. सोलापूर

Cover No. 2

आमचे सर्व खातेदार, ठेवीदार, कर्जदार व हितचिंतक यांस दिपावली व नुतन वर्षा निमित्त

हार्दिक शुभेच्छा !

माजी आमदार भाई जयंत पाटील
चेअरमन

घर बांधायचे आहे ....नविन गाडी खरेदी करायची आहे, शेतीसाठी व मुलांचे शिक्षण पूर्ण करण्यासाठी कर्ज घ्यायचे आहे?

आपले स्वप्न साकार करण्यासाठी सदैव तत्पर....... आपली जिल्हाळ्याची बँक

सहकारनिष्ठ, सहकार भूषण आणि ....
सहकारातील सर्वोच्च असा
सहकारमहर्षी पुरस्कार मिळविणारी
महाराष्ट्रातील एकमेव जिल्हा मध्यवर्ती बँक

रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., अलिबाग

केंद्र कार्यालय : चेंढरे-अलिबाग
फोन : ०२१४१-२२४३१५,२२४३१६
Email - rdccpen@gmail.com Web - www.rdccbank.com

साहित्य (गद्य)

साहित्याचे नांव	साहित्यिक	पृष्ठ क्र.
संपादकीय	---	४
सोज्वळ लावण्य	सौ. भारती सावंत	६
धर्म ही अफुची गोळी आहे कां?	श्री. अनिल गणेश रामदासी	१०
चित्रपटाची मोहमयी दुनिया	ॲड.विद्याधर भोसेकर	१६
ती	सौ. माधुरी महेंद्र चौधरी	२२
वारी	जयश्री दाणी	२४
रूजवात	ॲड. सुजाता त्रिंबककर टिपणीस	३२
अगं अगं म्हशी	मयुरेश अरूण कुलकर्णी	३८
ऋतु लहरी झालाय का ?	डॉ.सौ.राजश्री संजय जाधव	४२
गरज की थोतांड	डॉ.सौ. राजश्री संजय जाधव	४६
आजची युवा पिढी	भूषण सहदेव तांबे	५२
नानांच्या गमती	भूषण सहदेव तांबे	५६
हडळ	शितल बोडे	६०
आपला सन्मान आणि आदर आपाल्यापाशीच	सूर्यकांत घिवारे	६६
शेवटचं प्रेमपत्र	मनिषा निकाळजे-भिसे	७०
सर मला शिकायचंय	बाबु घाडीगांवकर	७२
किशोरवयीन मुलं आणि लैंगिक शिक्षण	सौ. जस्मिन रमजान शेख	७६
नाळ	हेमांगी बोंडे	८०
एक पर्याय	सौ. आशा अरूण पाटील	८८
मनात शिरताना आत्मा आणि मनने केले मला विचारप्रवण	देवेंद्र औटी	९६
त्रिखंडात दुमदुमे नाव ऐसे माझे सोलापूर	देवेंद्र औटी	१०२
सहकारी अर्थव्यवस्था	श्रीकांत मोरे, सोलापूर	११२
ज्ञानदीप लावू जगी	डॉ.वैशाली मोहिते	११४
रक्षितं रमनामाभिः	विद्याधर उर्फ श्रीराम संजय कुलकर्णी	११८
योगसाधना काळाची गरज	प्रशांत मदने	१२२
दैनंदिन जीवनात दासबोध समर्थांना अभिप्रेत वैराग्य योग	मोहनबुवा रामदासी	१२६
श्रीदत्तचरणामृतलहरी	श्री. केदार जोशी	१२८
वरदान	श्रीनिवास विनायक कस्तुरे	१३२
ऐसा हा योगीराजु, तो विठ्ठल मज उजु	डॉ.गो.बं.देगलूरकर	१३८
सौंदर्याची सुंदरता	महानंदा पांडुरंग घोंगडे	१४२
पणती जपून ठेवा....	आनंद देशमुख	१४४
जतचे साने गुरूजी-डॉ.श्रीपाद जोशी	डॉ.कृष्णा इंगोले	१४६
कथा संघटनाची व्यथा गुरूपदाची	समाजभूषण साबळे गुरूजी	१४८
मायेची ओवाळणी	पद्माकर कुलकर्णी	१५२
शांता मावशी- समईतील एक ज्योत	शामला तांबोळी	१६४
पोशिंदाच दुधाच्या शोधात...	आनंद घोडके	१५४
झुलवा	खाजाभाई बागवान	१६२
राशीभविष्य	श्रीकांत गोपाळ देशपांडे(काका)	१८२
व्यंगचित्रे	मिलींद बडवे, पंढरपूर	इतरत्र

कविता

साहित्याचे नांव	कवी/ कवयित्री	पृष्ठ क्र.
बाप	सौ.भारती दिलीप सावंत	१४
मौन	कविता झुंजारराव	१४
लक्षात आलंय....	सौ.संगीता एखंडे	३६
काय म्हणू	मानिनी महाजन	४४
सांग ना रे कान्हा	सौ. प्रज्ञा सचिन देशपांडे	४४
प्राजक्त	सौ.मानिनी महाजन	५०
लवंग लतेचा प्रणय	सिराज करीम शिकलगार	५०
पैशाची कहाणी	दत्तात्रय गणपतराव इंगळे	५०
हिरवा सण	श्री. ना.मा. कांबळे	५०
चारोळ्या	डॉ.सौ.राजश्री संजय जाधव	५२
महिला दिन	कविता झुंजारराव	५४
सुंदर सृष्टी	सौ. भारती दिलीप सावंत	५४
अनुबंध	सूर्यकांत घिवारे	५८
धन्य जिजाऊ	आनंद घोडके	५८
सुख नी दुःख हे असे नेहमी वेगवेगळे	मानिनी महाजन	५८
चारोळी	डॉ.सौ.राजश्री संजय जाधव	५८
राम माझा	आनंद घोडके	६४
शब्दगंध	सूर्यकांत घिवारे	६४
देता	श्री. ना.मा. कांबळे	६८
मी जाणतो	चंद्रशेखर पटवर्धन	६८
वृध्दाश्रम	डॉ.सौ.राजश्री संजय जाधव	७८
संस्कृती	डॉ.सौ.राजश्री संजय जाधव	७८
गावाची वाट	दत्तात्रय गणपतराव इंगळे	८६
मी व्यर्थ केली चिंता जगाची (गझल)	डॉ.सुभाष हरीबा कटकधौंड	८६
स्वतःलाच मी पाहिलं	भूषण सहदेव तांबे	९४
गुरूवंदन	सौ.प्रज्ञा सचिन देशपांडे	९४
माझ्या स्वप्नांचा मांडव	आनंद घोडके	१००
विठ्ठला	आनंद घोडके	१००
मराठी महिने	आनंद घोडके	१००
पुन्हा एकदा	मनिषा रायजादे-पाटील	१००
ओहोटी	मारूती कटकधोंड	१०६
बारमाही वाहणे	मारूती कटकधोंड	१०६
प्रियलोचना	उर्मिला बांदिवडेकर	१०६
झुकणे ना अपकिर्ती	चंद्रशेखर पटवर्धन	१०६
स्त्रीशक्तीचा जागर	सौ.दिप्ती दिलीप यादव	१०८
ह्या निळाईवर	श्री. ना.मा. कांबळे	१३०
तुला मागून घेतले	श्रीनिवास विनायक कस्तुरे	१३०
आईच्या स्पर्शाने	श्रीनिवास विनायक कस्तुरे	१३०
तू नको बदलूस	श्रीनिवास विनायक कस्तुरे	१३०
जाणीव मातृत्वाची	महानंदा पांडुरग घोंगडे	१४४
मला गुरूजी व्हायचं आहे	समाजभूषण साबळे गुरुजी	१५६
दीपोत्सव	डॉ.प्रिया मदनकर	१५६
शुभ दीपावली	कवी देवेंद्र औटी	१५६

आमचे असंख्य मित्र परिवार, हितचिंतक भाजप पदाधिकारी व कार्यकर्ते सभासद व सोलापूर जिल्ह्यातील तमाम नागरीकांना दिपावली व नुतन वर्षा निमित्त हार्दिक शुभेच्छा !
सोलापूर जिल्ह्यातील तमाम जनतेला
दिपावलीच्या
हार्दिक शुभेच्छा
मा.श्री.चेतनसिंह
केदार सावंत
जिल्हाध्यक्ष :-भारतीय जनता पार्टी
सोलापूर ग्रामीण पश्चिम
अध्यक्ष : जोतिर्लिंग प्रतिष्ठान सांगोला

आमचे असंख्य मित्र, हितचिंतक व तमाम नागरिकांना ही दिपावली व नूतन वर्ष सुख समृध्दीचे, भरभराटीचे, आनंदाचे जावो हीच दीपोत्सवाच्या स्नेहपूर्वक शुभकामना व सदिच्छा
शुभेच्छुक
मा. श्री. संतोष कणसे
तहसीलदार, सांगोला
सर्व अधिकारी व कर्मचारी वर्ग
मा. श्री. संतोष कणसे
तहसीलदार
सांगोला तहसील कार्यालय, सांगोला जि. सोलापूर

आमचे असंख्य मित्र, हितचिंतक व तमाम नागरिकांना ही दिपावली व नूतन वर्ष सुख समृध्दीचे,
भरभराटीचे, आनंदाचे जावो हीच दीपोत्सवाच्या स्नेहपूर्वक शुभकामना व सदिच्छा
शुभेच्छुक
श्री. जयंत डोंगरे (सर)
अध्यक्ष, श्री गुरुदत्त बहुद्देशीय शिक्षण संस्था, घेरडी, ता. सांगोला
कै. सरस्वती गणेश डोंगरे बहुद्देशीय शिक्षण संस्था, घेरडी, ता. सांगोला
श्री. उमेशराव आनंतराव डोंगरे
सौ. गितांजली उमेशराव डोंगरे
श्री. धनंजय उमेशराव डोंगरे
सांगोला तालूका शिक्षण प्रसारक मंडळ, लोटेवाडी
श्री. पेट्रोलियम, कुंभारी, ता. जत, जि. सांगली
विद्या पेट्रोलियम, सिंगनहळ्ळी, ता. जत, जि. सांगली
श्री. दत्त शिक्षण प्रसारक मंडळ घेरडी संचालित,
जवाहर विद्यालय घेरडी, ता. सांगोला
डोंगरे परिवार, घेरडी. ता. सांगोला

आमचे असंख्य मित्र, हितचिंतक व तमाम नागरिकांना ही दिपावली व नूतन वर्ष सुख समृध्दीचे,
भरभराटीचे, आनंदाचे जावो हीच दीपोत्सवाच्या स्नेहपूर्वक शुभकामना व सदिच्छा
मंत्रचळेपणा, वारंवार हात धुणे, अती सफाई करणे,
मनात सतत वाईट विचार येणे यासारखी कोणतीही लक्षणे
असल्यास मानसोपचार तज्ञास भेट द्या.
वैद्यकीय मदत घ्या व मन:शांती मिळवा.
डॉ. तेजस भोपटकर
(मानसोपचार तज्ञ)
डॉ. विनयकुमार ग. भोपटकर एम.डी.
भोपटकर क्लिनिक, डॉ. आंबेडकर पुतळ्यासमोर, स्टेशन रोड
पंढरपूर, जि. सोलापूर मोबा.: ८६०५६०५९९७
शुभेच्छुक
स्वानंद क्लिनिक
भोपटकर परिवार, पंढरपूर

Cover no. 3

संपादकीय

दिपोत्सवाचा संदेश

आश्विन कृष्ण पक्ष त्रयोदशीपासून कार्तिक शुध्द पक्ष द्वितीय पर्यंत हिंदुधर्म संस्कृतीत दिपोत्सव दिपावलीचा मंगलमय आनंदाचा सण भारतात मोठ्या प्रमाणात प्रत्येक कुटुंबात साजरा केला जातो. या पाच दिवसाचे पर्वणीस दीपावली किंवा दिवाळी असे म्हटले गेले आहे. विविध सांस्कृतिक आणि ऐतिहासिक संकेत या काळात एकत्र आलेले दिसतात. या मंगलमय आनंदोत्सवात प्रत्येकांनी एकमेकाबद्दल सामंजस्याची भावना जोपासण्याचा मनोमन निर्धार करावा असे आवाहन आम्ही या दिपोत्सव प्रसंगी करीत आहोत.

बाजारपेठेत जागतिक मंदीची लाट दिसून येत आहे. तर जीवनावश्यक वस्तूचे दर वाढल्याने नागरिकांना याचा फटका बसत आहे. फटाक्याचे प्रदुषण टाळण्यासाठी फटाकेमुक्त दिवाळी साजरी करावी असे आवाहन शासनाने केले असले तरी बाजारात फटाक्याचे स्टॉल लागलेले आहेत. बालगोपाल फटाके, फुलबाज्या उडविण्यासाठी आतुर आहे. तयार कपडे खरेदी करण्याकरीता नागरिकांची गर्दी दिसत आहे. एकूणच बाजारात नागरिकांची खररेदीसाठी गर्दी झालेली आहे. या दिपोत्सव सणाला प्रत्येक दिवसाला वेगवेगळे महत्त्व आहे. देव, दानव, मानव यांना आवडणारा हा सण खरोखरच महान आहे. आर्य संस्कृतीचे दीपावली हे अजरामर देणे आहे. प्राचीन लोकामध्ये संघटना सामाजिक राष्ट्रीय ऐक्य, सात्वकत्ता, धार्मिकता, चालीरिती, परस्पर प्रेम, खेळ. अन्न पदार्थाची रेलचेल, नाविण्याची ओढ, ज्ञानाचा उजेड, लोककला लोकगीत, लोकसंगीत लोकभाषा आदि विविध घटकांची अप्रतिम गुंफुण दिपोत्सवात दिसून येते. हा सण मोठ्या दिमाखात साजरा करण्याची हौस प्रत्येकाला असते. परंतु आजची स्थिती पाहिली की जगावर देशावर, राज्यावर. गावावर आलेले कोरोनाचे महासंकट, प्रचंड वाढलेली महागाई, आर्थिक कुचंबणा यामुळे अनेकांचा उत्साह संपुष्टात आलेला आहे. तरीपण पारंपारिक प्रथा आणि लहान मुलांची ओढ यामुळे काही का होईना प्रसंगी कर्जाचा बोजा काढून अनेकजण सण साजरा करतात. दीपावली हा सण मोठ्या खर्चाचा असल्याने दिवाळं काढणारा सण म्हणून म्हटले जात असले तरी कितीही गरीबी परिस्थिती असली तरी प्रत्येकजण आपल्या कुवतीने हा सण साजरा करीतच असतो.

परस्पराबद्दल प्रेमभाव, आपुलकी, स्नेहाची भावना प्रत्येकाने जोपासून राष्ट्रीय ऐक्य अबाधित ठेवून राष्ट्रीय एकात्मता टिकविणे हे आव्हान खऱ्या अर्थाने प्रत्येकापुढे उभा आहे. एकात्मतेची भावना सर्वत्र निर्माण करुन बलशाली भारताचे राष्ट्रीय ऐक्य अबाधित ठेवून सामंजस्याची भावना जोपासण्याचा दृढ निर्धार प्रत्येकांनी या दीपोत्सव प्रसंगी करावा असे आवाहन याप्रसंगी आम्ही करीत आहोत. दीपोत्सवाचा सण म्हणजेच दिवाळीचा महोत्सव या सणामागे मोठा अर्थ दडला आहे. दीपोत्सवाचे निमित्ताने रात्र-दिवस यातील अंतर नाहिसे करणे हेच दिवाळीचे मुख्य अंग आहे. दुःखातून आनंदाकडे, असत्याकडून सत्याकडे, तमाकडून तेजाकडे असा हा माणसांचा जीवनाचा विकासक्रम आहे. दिवाळीचे सणातून तमसोऽमा ज्योतिर्गमय-मृत्सोर्मा अमृत गमय असाच अमृताकडे नेण्याचा मार्ग सुचवावयाचा आहे. माणसाच्या जीवनाचा उत्कर्ष हेच सणवार परंपरा याचे ध्येय आहे. त्याचेच दर्शन दिवाळी उत्सावातून घडते.

नरकासूराच्या वधातून दुष्टांचा संहार आणि सज्जनांचे रक्षण हे ब्रिद दिसते तर माऊली जेतून समाजात सर्वत्र बंधुभाव नांदावा परस्परात कौटुंबिक भावना वृध्दींगत होवून समाजाचे कल्याण व्हावे हाच दृष्टीकोन दिसतो. या सणात गोडधोड पदार्थ खाण्यास करुन मंगलस्नात अभ्यंगस्नान, दिवे ओवाळणे, नातेवाईक ,आप्तेष्ठ सोयरे यांच्या भेटीसाठी यांनाही या सणात अधिक महत्त्व आहे. कारण त्यातूनच परस्परात प्रेम आकर्षण मैत्री याची वाढ होत असते. दीपावली उत्सव शास्त्रीय पौराणीक आणि सामाजिक अशा सर्व दृष्टीनी महत्त्वपूर्ण आहे. या सणाच्या निमित्ताने सामाजिक ऐक्य, सद्भाव, सौहार्द्र प्रेम, मैत्री, श्रधुत यांचे अतरूंत मनोहरी दर्शन घडले. तुकोबांनी संत सहवासाला दिवाळीचे सणासारखे महत्त्व दिले. ते म्हणतात संत भेटी येती घरा तोची दिवाळी दसरा. ज्ञानेश्वरांनी ज्ञानाची दिवाळी अशा शब्दप्रयोग केलेला आहे. अंधारातून प्रकाशाकडे प्रत्येकाला नेणारा हा दीपोत्सव आहे.

अशाप्रसंगी अती अडचणीच्या काळातही सांगोले सारख्या ग्रामीण भागातून सातत्याने दरवर्षी प्रकाशित होणाऱ्या साप्ताहिक सांगोला संपदा चा ३९ वा दिवाळी विशेषांक आम्ही वाचकांचे हाती देत आहोत.

छोटे मोठे उद्योग व्यवसाय अडचणीत असताना सुध्दा भरभरुन जाहिरातदारांनी, हितचिंतकांनी सहकार्य केल्यानेच हा दिवाळी अंक आम्ही प्रकाशित करु शकलो याचा आम्हाला सर्वस्वी आनंद वाटतो. गेली ३८ वर्ष सांगोला संपदास नियमितपणे सहकार्य करणाऱ्या सर्वांचेच याप्रसंगी आम्ही ऋण व्यक्त करुन असेच सहकार्य यापुढील वाटचालीस राहील अशी मनोमन अपेक्षा व्यक्त करुन सर्वांनाच दिवाळी आनंदाची, प्रगतीची, भरभराटीची, उत्कर्षाची जावो अशा सद्भावना मंगलमय दीपोत्सव प्रसंगी व्यक्त करुन आमचे जाहिरातदार, हितचिंतक, लेखक, वाचक व तमाम नागरिकांना नूतन वर्षाच्या शुभेच्छा देत आहोत. ही दीपावली सर्वांनाच यशकिर्तीची, प्रगतीची जावो याच दीपोत्सवाच्या शुभकामना !

मे.पुरुषोत्तम नारायण गाडगीळ
सराफ आणि जव्हेरी
PNG
Since 1832
वैभवशाली परंपरा
सुवर्णमयी शुध्दतेची
महाराष्ट्र - सांगली- सराफ बझार (मुख्य शाखा): ०२३३ - २३२८२२८ / २९ - विश्रामबाग: ०२३३-२६७३२०३ / ०४ - मिरज: ०२३३- २९११८३२
कोल्हापूर - व्हीनस कॉर्नर: ०२३१-२६६८२०६ / ७ - ताराबाई पार्क: ०२३१-२६५१८३२ | इचलकरंजी: ०२३०-२४३१८३१ / ३२
कराड: ०२१६४ २२०२०७ / ८ | रत्नागिरी: ०२३५२-२२७२०२ / ३ | चिपळूण: ०२३५५ २५२२०५ / ६
कर्नाटक - बेळगावी: ०८३१-२४०१८३२ / २४७१८३२ | विजयपूर: ०८३५२-२४१८३२ | जमखंडी: ०८३५३-२२१८३२
हुबळी: ०८३६-२३५१८३२ / ०८३६-२२५१८३२
TOLL FREE 1800-233-1832 (11am to 7pm)
www.pngadgil1832.com
Visit us at
WhatsApp 99220 01832

आमचे असंख्य मित्र परिवार, हितचिंतक शेतकरी बांधव व तमाम नागरीकांना दिपावली व नुतन वर्षा निमित्त
हार्दिक शुभेच्छा !
नव्या सुरुवातीचा सुंदर सण पाडवा, प्रेम, आदर, आणि विश्वास यांची सरिता वाहो! घरात नांदो आनंद आणि शांती, मनात राहो प्रसन्नता आणि भक्ती!
मा. प्रमोद दादा साळुंखे पाटील
हॉटेल लयभारी जवळा | हॉटेल सितारा सांगोला | हॉटेल सितारा सातारा | लयभारी पेट्रोलियम पारे | चेतन वाईन मार्ट सोलापूर| ब्राईट ब्रेवरीज अँड डिसरलीज सोलापूर | वॉटर फिल्ड स्पिरीट्स मोहोळ | SP वाईन शॉप सोलापूर|

आमचे असंख्य मित्र परिवार, हितचिंतक शेतकरी बांधव व
तमाम नागरीकांना दिपावली व नुतन वर्षा निमित्त हार्दिक शुभेच्छा !
डॉ. परेश खंडागळे यांचे
शुभेच्छुक
खंडागळे
मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
• मॅटर्निटी • सर्जिकल • मेडिसिन • अस्थिरोग • नेत्ररोग
• त्वचारोग • बालरोग • कान-नाक-घसा • ट्रमा केअर सेंटर
हॉस्पिटल आता कडलास रोड, सांगोला येथे नव्याने सुरु झाले आहे
उपलब्ध सुविधा
* सुसज्य अतिदक्षता विभाग (ICU) (NICU) (PICU) * स्वतंत्र ओ.पी.डी.
* सुसज्य प्रसुती विभाग * सेंट्रल ऑक्सिजन सिस्टीम * डिजीटल एक्स-रे
* सुसज्य ऑपरेशन थिएटर * दुर्बिणीद्वारे व लेझरद्वारे शस्त्रक्रिया करण्याची सोय
* डोळे तपासणीची अत्याधुनिक मशीन * व्हेन्टीलेटर्स * तज्ञ डॉक्टरांच्या भेटी
* इ.सी.जी. * सिरींज पंप * सी आर्म * कॉल्पोस्कोपी * ॲम्ब्युलन्सची सुविधा
* २४ तास मेडिकल * २४ तास लॅबोरेटरी * २४ अत्यावश्यक सेवा
स्त्रीरोग विभाग
* प्रसुती * बिनटाका गर्भाशय पिशवी काढणे * गर्भ पिशवी काढणे
* सिझेरीयन * कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया * गर्भाशयाची पिशवी साफ करणे
सर्जरी विभाग
* अपेंडिक्स * अल्सर * हर्निया व हायड्रोसील
* कॅन्सर रोग निदान व सल्ला * न्युरोसर्जरी, युरोसर्जरी, प्लास्टिक सर्जरी
* मुत्रविकार, मुतखड्यावर निदान व उपचार * किडनीचे विकार
* टॉन्सिल, नाकातील हाड काढणे * मुळव्याध इंजेक्शन व शस्त्रक्रिया
मेडीसीन विभाग
* दमा * मधुमेह * विषबाधा, सर्पदंश * ह्रदयरोग
* उच्चरक्तदाब * अर्धांगवायू * न्युमोनिया * थायरॉईड
बालरोग विभाग
* कमी दिवसाचे बाळ * कावीळ झाली असल्यास * बाळाला सतत झटके येत असल्यास
* न्युमोनिया * लहान बाळाच्या ऑपरेशनची सोय * जन्मानंतर लहान बाळ रडत नसल्यास
अस्थिरोग विभाग
* अस्थिरोग निदान व उपचार * सर्व प्रकारच्या फ्रॅक्चर केसेस व उपचार
* संधिवात उपचार * सर्व ॲक्सिडेंट केसेस निदान व उपचार
नेत्र विभाग
* मोतीबिंदू शस्त्रक्रिया * काचबिंदू शस्त्रक्रिया * लासरू शस्त्रक्रिया * तिरळेपणा शस्त्रक्रिया
* चष्मा नंबर व कॉन्टॅक्ट लेन्स * नेत्र तपासणी व शस्त्रक्रिया
त्वचा व केस रोग विभाग
कान, नाक व घसा विभाग
२४ तास आम्ही आपल्या सेवेत * आमचा बदललेला पत्ता *
कडलास रोड, सांगोला ४१३३०७
7588506197, 7741807957

आशिर्वाद

स्व.आ.काकासाहेब
साळुंखे-पाटील

आशिर्वाद

हभप.स्व.शारदादेवी
साळुंखे-पाटील (काकी)

तमाम जनतेस दीपावली व
नूतन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा....!



शुभेच्छुक

मा.आ.दिपकआबा साळुंखे-पाटील

माजी विधानपरिषद सदस्य, सोलापूर
अध्यक्ष - विद्या विकास मंडळ, जवळा, ता.सांगोला

साळुंखे-पाटील परिवार, जवळा, ता.सागोला, जि.सोलापूर

आमचे मित्रपरिवार व तमाम नागरीकांना दिपावली व नुतन वर्षा निमित्त
हार्दिक शुभेच्छा !
मा. बाळासाहेब ठाकरे
मा. आनंद दिघे
मा. एकनाथराव शिंदे
उप मुख्यमंत्री
मा. ॲड. शहाजीबापू पाटील
माजी आमदार
मा. रफीक नदाफ
माजी नगराध्यक्ष
मा. आनंदा माने
माजी नगरसेवक
मा. सौ. राणीताई माने
माजी नगराध्यक्षा
मा. प्रशांत धनवजीर
माजी नगरसेवक
मा. ज्ञानेश्वर (माऊली) तेली
माजी नगरसेवक
मा. अस्मीर तांबोळी
माजी नगरसेवक
मा. अरुण पाटील
मा. राजाभाऊ मदने
मा. काशिलींग गावडे
शुभेच्छुक
सौ. छायाताई सुर्यकांत मेटकरी
माजी नगरसेविका, सांगोला नगरपरिषद
अध्यक्ष : शिवसेना सांगोला शहर महिला आघाडी

सोज्वळ लावण्य

पहाटेचा थंडगार वारा
घालवी हा शीण सारा
अंगावर उठला शहारा
समीरण आवर पसारा

प्रभातीच्या निखळ, स्वच्छ समयाला हिरव्यागार निसर्ग सृष्टीचे चैतन्य अंगावर झेलत नवविवाहिता मंदिराच्या वाटे चालली आहे. भास्कराने आपली सोनकिरणे नभांगणात पसरवायला सुरुवात केली आहे. प्रभातीची थंडगार हवा आणि कोवळी उन्हे झेलत ही ललना नऊवारी नेसून हातात तांब्याचे तबक, कलश आणि निरंजन घेऊन नदीकिनाऱ्यावरच्या मंदिराकडे निघाली आहे. पाठीमागून झुळझुळ वाहणारे नदीचे पात्र सुरेल धून वाजवत प्रवाहित झाले आहे. सुवर्ण पिवळ्या नभांगणातून सहस्त्र रश्मी वसुंधरेपर्यंत पोहोचू लागल्या आहेत. सुंदर रेशमी साडी अंगभर लपेटून ही यौवना चुटुचुटू पावले टाकत तुरूतुरू चालत आहे. तिच्या पायातीलनुपूरांची छमछम वातावरणात प्रसन्न गोडवा निर्माण करत आहे.शांत अशा रम्य स्थळी घुंगरांचा आवाज कानांवर पडत आहे.मधुनच एखाद्या पक्ष्याने मारलेली सुरेल तान त्यातच प्रतिध्वनीत होताना ऐकायला येते. भारतीय नारीचे रूप असेच मोहक पण सोज्वळ आणि त्याचे सुंदर प्रतीक रूपक आहे.

महान हा भारत देश
नांदतेय येथे संस्कृती
नको बाधा परकीयांची
पसराया घातक विकृती

सोज्वळ रूपाची भारतीय नारी भारतातच नव्हे तर साऱ्या जगात आज समाज गौरवित आहे. नऊवार किंवा सहावार चापून–चोपून नेसलेली साडीतील तिची प्रतिमा एखाद्या देवी प्रमाणे भासते. माफक प्रमाणातील अलंकार आणि चेहर्यावरील हावभाव पुढच्या व्यक्तीला प्रभावित न करेल तरच नवल! ....

आई आजीने पहाटेच्या प्रहराला लवकर उठून जात्यावर पीठ दळताना म्हटलेली

मंजुळ गीते असूदे की पंचमीचा फेर धरताना खुल्या आवाजात गायिलेली माहेर सासरचा मोठेपणा सांगणारी पंचमीची गाणी, मंगळागौरीची गाणी तसेच गौरी जागरासाठी एकत्र म्हटलेली जागरगीते ,हादग्याची गाणी असे गीतांचे नाना प्रकार ऐकावयास मिळतात. सासुरवाशिणीला माहेरची ओढ लावणारी अशी गाणी ऐकून माहेरची ओढ लावणारी गाणी ऐकून माहेराची सय न येईल तरच नवल!

आपल्या परिवारासाठी, घरासाठी, आप्तेष्टांसाठी खपण्याची तिची वृत्ती जगप्रसिद्ध आहे. स्वतःच्या घरासाठी दिनरात ती राबत असते. आपल्या लेकरांना मायेचा घास भरवित असते. देवधर्म, सणसोहळे या रूढी परंपरा जपत राहते. परमेश्वराकडे आपल्या कुटुंबासाठी पूजाअर्चा करून सुख मागत असते.तिच्या गळ्यातील मंगळसूत्र, पायाच्या बोटातील जोडवी आणि कपाळावरची लाल टिकली तिच्या सौभाग्याच्या, पतीवरच्या प्रेमाच्य प्रतीकात्मकच आहेत.

जगाच्या कानाकोपऱ्यात भारतीय नारीच्या गुणांचे वर्णन ऐकावयास, पहावयास मिळते. आपल्या देशाला फार पूर्वीपासून सांस्कृतिक परंपरा लाभलेली आहे. भारतात अनेक जाती धर्मांचे लोक गुण्यागोविंदाने राहतात. आपले सणसोहळे साजरे करतात. एकमेकांना सहकार्याने आणि अगत्याने घरी बोलावतात. आपल्या मिठास वाणीने आणि स्वभावाने घरी येणाऱ्या पाहुण्यांची ऊठबस करतात. प्रत्येक यशस्वी पुरुषाच्यामागे स्त्रीचा हात असतो हे आपल्या संस्कृतीने दाखवून दिले आहे. राजमाता जिजाबाई, सावित्रीबाई फुले, अहिल्याबाई होळकर झाशीची राणी लक्ष्मीबाई आणि महाराणी ताराबाई ही काही उदाहरणे आहेत.स्त्री सर्वगुणसंपन्न असून संयम, जिव्हाळा, सोशिकपणा अशा गुणांची खाण आहे. त्यामुळे कितीही संकटे आली तरी धीराने ती त्यावर मात करत असते. तिचा देवावर आणि कर्मावर भरवसा असल्याने ती संकटांच्या वेळी डगमगून न जाता आपल्या कुलदैवताला संकटातून मुक्त करण्यासाठी आळवित असते. सुलतानी संकटाच्या वेळी स्त्रियांच्यावर अत्याचार, अन्याय झाले तरीही आपल्या सद्गुणांमुळे ती त्यातून ही तरुन निघाली. स्त्रीला कितीतरी काळ बंदिनीबनवले गेले, तरी तिने आजही आपल्या बुद्धीच्या, स्वभावाच्या आणि चातुर्याच्या जोरावर गगनभरारी घेतली आहे. सामर्थ्यवान बनली आहे.आज ती स्वतःच्या पायावर ती उभी आहे. अशाच एका सुंदर नवविवाहितेचे आज दर्शन घडले. तिच्या दिसणाऱ्या सुसंस्काराचे माझ्या लेखणीतून प्रतीकच उमटले गेले.

हिरव्यागर्द वृक्षाच्याखालून यौवना हलकासा मेकअप करून स्मितमुखाने वाट चालते आहे .वृक्षांवरच्या पाखरांचा गोड किलबिलाट ऐकत निसर्गसृष्टीचा डामडौल डोळ्यांनी भरून घेत ती शांत शिस्तीत पदकमले टाकत चालली आहे. तिला घरी

आमचे असंख्य ग्राहक, हितचिंतक, दस्त लेखनिक व बॉन्ड रायटर संघटना सदस्य व तमाम नागरीकांना दिपावली व नुतन वर्षा निमित्त हार्दिक शुभेच्छा !
।। श्री स्वामी समर्थ महाराज ।।
भिऊ नकोस
मी तुझ्या पाठीशी आहे
आमच्याकडे सर्व प्रकारचे रजिस्टर गहाणखत, खरेदीखत,
साठेखताचे दस्त ऐवज खात्रीशीर करून मिळतील.
शुभेच्छुक
श्री. रामचंद्र उर्फ राजाभाऊ नामदेव
आराध्ये (पाटील)
परवानाधारक दस्त लेखनीक - शहरअध्यक्ष दस्त लेखनीक
व स्टँप व्हेंडर संघटना, पंढरपूर
मार्केटयार्ड शॉपींग सेंटर, तालुका पोलीस स्टेशन मागे,
पंढरपूर तहसिल कार्यालय आवार, पंढरपूर. मोबा.: ९८२२५२६२३१
सौजन्य
श्री. अमोल रामचंद्र पाटसकर
पंढरपूर - मोबा.: ८३२९२८९६५२
आराध्ये (पाटील) परिवार, पंढरपूर, जि. सोलापूर

आमचे असंख्य मित्रपरिवार, हितचिंतक शेतकरी बांधव व तमाम नागरीक बंधु-भगिनींना
दिपावली व नुतन वर्षा निमित्त
हार्दिक शुभेच्छा !
शुभेच्छुक
मा. सी. ए. जुबेर मुजावर
माजी नगरसेवक, सांगोला नगरपरिषद, सांगोला
अलराईन नगर , सांगोला जि. सोलापूर
मुजावर परिवार, सांगोला ९४२०३४३७८६

आमचे असंख्य मित्र परिवार हितचिंतक व तमाम
नागरिकांना दीपावली व नूतन वर्षानिमित्त
हार्दिक शुभेच्छा !

शुभेच्छुक

डॉ.सचिन गवळी
(M.B.B.S., D.Ortho (Mumbai)
अस्थिरोग तज्ञ

दिशा हॉस्पिटल

फ्रॅक्चर, ॲक्सिडेंट ट्रॉमा सर्जिकल

डॉ.सौ.वंदना गवळी
(नेत्र रोग तज्ञ)

संपर्क : 9423276442/02187-222981

कडलास नाका, सांगोला कॉलेज रोड, सांगोला

शासकीय योजना

मुख्यमंत्री साह्यतानिधी योजने अंतर्गत सांधा बदली शस्त्रक्रियासाठी (THR, TKR) शासनाकडून १ लाख रुपये आर्थिक मदत

कॅशलेस सुविधा

- Oriental Insurance Company Ltd
- Star Health & Allied Insurance co.
- Volo Health Insurance TPA Pvt Ltd
- MD India Health Insurance TPA Pvt Ltd
- Medi Assist Insurance TPA Pvt Ltd
- SBI General Insurance Company
- Reliance General Insurance Co.
- Universal Sompo Insurance Co.
- ICICI Lombard Insurance Company

उपलब्ध सुविधा

- मॉड्युलर ऑपरेशन थिएटर
- अत्याधुनिक मशिनद्वारे फ्रॅक्चरचे उपचार
- डिजिटल एक्स रे विभाग
- सी आर्मची सोय
- सेंट्रल ऑक्सिजन सुविधा
- डिलक्स रूम
- स्पेशल रूम
- जनरल वार्ड
- प्रशस्त प्रतिक्षा कक्ष
- स्वतंत्र भौतिक उपचार विभाग
- Vascular Surgery
- Spine Surgery
- ऑर्थोस्कोपी (खांदा, गुडघा निसटणे उपचार)
- Plastic Surgery
- अस्थिव्यंगाचे उपचार व सल्ला
- कृत्रिम सांधेरोपण शस्त्रक्रिया (T.H.R., T.K.R.)
- मणक्याचे सर्व आजारांचे निदान व उपचार
- Maxillofacial Surgery (जबड्याचे)
- General Surgery
- सांधे दुखीचे निदान व उपचार
- स्पोर्ट इंज्युरीज सल्ला व उपचार
- दर महिन्याला मेंदू व मणका तज्ञांची भेट

कॅशलेस सुविधा

- Oriental Insurance Company Limited
- Star Health and Allied Insurance Co.
- EWA TPA PVT LTD.
- MD India Insurance Company
- Medi Assist TPA Network Ltd.
- SBI General Insurance Company
- Reliance General Insurance Company
- Universal Sompo Insurance Co.

उपलब्ध सुविधा (डोळ्याचा विभाग)

- कॉम्प्युटरवर Autorefractometer Grand Seiko
- विना टाक्याची मोतिबिंदू शस्त्रक्रिया
- Slit Lamp मशिनवर डोळ्यांची तपासणी
- सुसज्ज ऑपरेशन थिएटर
- लासरू, डोळ्यांवरील पडदा निदान व उपचार
- मोतिबिंदू निदान व शस्त्रक्रिया
- Applanation Tonometer डोळ्यांचा दाब व तपासणी चष्म्याचा नंबर काढणे
- Carl - Zeiss OPMI 1 FR Microscope - Germany
- Phaco Surgery - Soverign Compact
- तिरळेपणा व पापण्यांचे आजारांचे निदान व शस्त्रक्रिया
- कॉन्टॅक्ट लेन्स (Contact lens) सुविधा
- Oculoplasty Surgeon दर महिन्याला भेट

पोहोचायची अजिबात घाई नाही असे वाटते. हलकासा मेकअप केलेल्या वदनावर नाकातील नथ सौंदर्याला खुलवत आहे.केसांच्या अंबाड्यात फुलांचा गजरा, हातामध्ये काचेची कंकणे, गळ्यांत मंगळसूत्र आणि चापून–चोपून नेसलेली वांगी कलरची नऊवारी साडी तिच्या सौंदर्याची शोभा वाढवित आहे, तिच्या खानदानी लावण्याची साक्षच देत आहेत. गोर्या कपाळावरील कुंकू तिच्या लावण्यात भरच घालत आहे. सोज्वळ रूपातील ही देखणी नारी शुचिर्भूत होऊन मंदिरात जात आहे.

हिरव्या निसर्गाला पहात तिचा पायही उचलत नाही. हा निसर्ग तिला लुभावत आहे. पायाखालची वाट लाल माती आणिहिरवळीने आच्छादुन गेली आहे. मखमाली हिरवळ तळपायाला जणू गुदगुल्याच करीत आहे. हिरवळीने फुललेला नदीचा काठ मनोहारी नि प्रसन्न भासत आहे. तिच्या पायाखालची वाट असून या सृष्टीची अनुभूती घेण्यासाठी तिची पदकमले थबकली आहेत. जणू निसर्ग तिला साद घालत आहे. वृक्षाच्या हिरव्यागर्द फांद्यावरील पक्ष्यांचा कलरव तिच्या कानावर पडला की काय! याचाच वेध ती घेत नसेल ना? नऊवारीमधील तिचा सरळ शेलाटा बांधा नि स्मित मुखावरील भाव तिच्या प्रसन्न मनोवृत्तीचे दर्शन घडवित आहेत. सभोवती उमललेल्या फुलांचा दरवळ मनाला मोहित तरी करत नसेल !

झालेय आज मनही बेधुंद
जाते ती मंदिराच्या वाटेवर
निसर्गसृष्टीची पाहता जादू
हरपुनी भान नाही थाऱ्यावर

सौ. भारती सावंत
खारघर, नवी मुंबई
९६५३४४५८३५



आमचे असंख्य हितचिंतक, मित्रपरिवार,
शेतकरी बांधव व तमाम नागरिकांना
दीपावली निमित्त हार्दिक शुभेच्छा!

श्री.बाळासो नारायण चौगुले
मो.९६६५६९८६१७/९७६६४९८६१७

शुभेच्छुक

श्री.बाळासो नारायण चौगुले

आमच्याकडे खरेदीखत, बक्षीसपत्र,
मृत्यूपत्र, कुलमुखत्यारपत्र, गहाणखत
इत्यादी सर्व प्रकारचे दस्तऐवज करुन मिळतील.

तहसिल कार्यालयासमोर, राजमाता ई सेवा केंद्र शेजारी, सांगोला, जि.सोलापूर

चौगुले परिवार

आमचे मित्रपरिवार व तमाम नागरीकांना
दिपावली व नुतन वर्षा निमित्त
हार्दिक शुभेच्छा !
शुभेच्छुक
डॉ. एम. के. इनामदार
अश्विनी हॉस्पिटल
इनामदार परिवार, अकलुज, ता. माळशिरस, जि. सोलापूर
अभय मेडिकल स्टोअर्स
अश्विनी हॉस्पिटल कॅम्पस, संग्रामनगर
माळशिरस रोड, अकलुज ता. माळशिरस, जि. सोलापुर

आमचे असंख्य ग्राहक, हितचिंतक शेतकरी बांधव व तमाम नागरीकांना
दिपावली व नुतन वर्षा निमित्त हार्दिक शुभेच्छा !
M/s. Sayyad Moula Lalskah & Sons
Exclusive Dealers in
Cement, Kerosecens, Castrol, Mahatma
Phule Road, Sangola
प्रोप्रा. ए. के. सय्यद
शुभेच्छुक
मे. शेतकी भवन
कचेरी रोड, सांगोला - ४१३ ३०७
आर.सी.एफ., डी.एम.सी.पी.एल. व बियाणे
औषधांचे अधिकृत विक्रेते

आमचे असंख्य ग्राहक, हितचिंतक, मित्र परिवार व तमाम नागरीकांना
दिपावली व नुतन वर्षा निमित्त हार्दिक शुभेच्छा !
टोबॅको मालाचे
होलसेल व रिटेल व्यापारी
गोळ्या बिस्कीट मालाचे
होलसेल व्यापारी
शुभेच्छुक
मस्के पान शॉप
वज्राबाद पेठ, सांगोला, जि. सोलापूर
प्रोप्रा. श्री. अक्षय अनिल मस्के
८३०८४००४००, ९७६३२२३२९९
श्री. अनिल रामचंद्र मस्के
९८२२८०८१६२
मस्के परिवार, सांगोला


आमचे मित्रपरिवार व तमाम नागरीकांना
दिपावली व नुतन वर्षा निमित्त
हार्दिक शुभेच्छा !
शुभेच्छुक
डॉ. श्री. ऐझार काझी
सेवानिवृत्त वैद्यकीय अधिकारी
जिल्हा परिषद
आरोग्य विभाग सोलापूर
काझी परिवार, सांगोला

शुभदीपावली

आमचे असंख्य मित्रपरिवार, हितचिंतक, शेतकरी बांधव व तमाम
नागरिकांना दीपावली व नुतन वर्षानिमित्त हार्दिक शुभेच्छा!

डोंबे हॉस्पिटल

मेडिकल डायग्नोस्टिक सेंटर

● **उपलब्ध सुविधा :**
हृदयरोग, मधुमेह, रक्तदाब,
लकवा, पोटाचे विकार,
फुफ्फुसाचे विकार,
सांधेदुखी या विकारांचे
योग्य निदान व उपचार

डॉ.शैलेश शंकरराव डोंबे
M.B.B.S.,D.N.B. Family Medicine
(कन्सलटिंग फिजिशियन)
मो. ८४८५०२६४७८,
८२७५२८६२०१, ९७६६५१०८८२

डॉ.जीवनमुक्ती शैलेश डोंबे
B.A.M.S.,M.D. (Ayu.)
(स्वस्थवृत्त व योग)

डोंबे हॉस्पिटल
आयुर्वेदिक चिकित्सालय
व पंचकर्म केंद्र सांगोला

● उपलब्ध सेवा : सर्व आजारांवर आयुर्वेदिक उपचार,सांध्याचे विकार,वंध्यत्व,त्वचा व केसांचे विकार,स्थौल्य, निद्रानाश, डोळ्यांचे विकार इत्यादी आजारांवर आयुर्वेदिक उपचार, निरोगी स्वास्थासाठी मार्गदर्शन व पंचकर्म केले जाईल.

● **उपलब्ध सुविधा : नस्य, बस्ती, जलौका, पिंडस्वेद, कटीबस्ती, शिरधारा, तर्पण, कर्णपुरण**

यशनगर,पोलीस स्टेशनशेजारी, पंढरपूर रोड, सांगोला, जि.सोलापूर

सांगोला विधानसभा मतदार संघातील तमाम नागरीकांना, बंधु-भगिनींना दिपावली व
नुतन वर्षा निमित्त हार्दिक शुभेच्छा !
शिवसेना
मा. बाळासाहेब ठाकरे
मा. आनंद दिघे
मा. एकनाथराव शिंदे
उप मुख्यमंत्री
शुभेच्छुक
मा. ॲड.शहाजीबापू पाटील
माजी आमदार, सांगोला तालुका, जि.सोलापूर
शिवसेना सांगोला तालुका सर्व पदाधिकारी व शिवसैनिक
न्यु दौंडे स्पिकर्स

आमचे असंख्य ग्राहक, हितचिंतक, मित्र परिवार व तमाम नागरीकांना दिपावली व
नुतन वर्षा निमित्त हार्दिक शुभेच्छा !
मार्गदर्शक
खंबीर साथ
खंबीर साथ
खंबीर साथ
मा. साथी एजाज शेख
मा. अतुल (मालक) पवार
माजी जि.प.सदस्य
मा. दादासाहेब घाडगे
लोकनियुक्त सरपंच शिवणे
मा. प्रतापसिंह शिवाजीराव पाटील
शुभेच्छुक
लेबर पार्टी संपर्क कार्यालय
मा. जावेद हिरालाल नदाफ
उपाध्यक्ष लेबर पार्टी सोलापूर जिल्हा - मोबा.: ९८८१३१६५५३
पश्चिम महाराष्ट्र सरचिटणीस जनहित बहुजन कामगार सघटना
बांधकाम कामगार सर्व ऑनलाईन कामे करून मिळतील
मिरज रोड, गौरी पेट्रोल पंपासमोर, फुले हॉस्पिटलच्या शेजारी, सांगोला
ऑफिस फोन : ९५०३०३२५५०, ८८०६६०९१९१

धर्म ही अफुची गोळी आहे कां?

धर्मो धारयती इती धर्मः असे शास्त्र सांगते!

हजारो वर्षापुर्वी सृष्टीची निर्मीती झाली होती!

या निर्मीतीच्यावेळी , प्रचंड मोठा आवाज झाला होता!

या आवाजाचेस्वरुप,स्पंदन आपण ओम म्हणतो, तसे होते, असे शास्त्र सांगते!

मग ब्रह्मांडाची रचना झाली. मग पिडांची रचना झाली.सूर्य, नवग्रह रचना झाली. सूर्य व नवग्रह हे एक निश्र्चीत अशा रचनेत राहु लागले.

सूर्य व नवग्रहांच्या नियमीत गतीतुन कालगणना निर्माण झाली.

सर्व सृष्टीचा धाता, सूर्याची गती वत्याच्यादिनक्रमातुन सृष्टीचेनियम तयार झाले!

सूर्याचा प्रकाश, तेजस्वी प्रभा हे चेतना देतात. सूर्याची अविरत कर्म करण्याची वृत्ती प्रेरक आहे!

समर्थ रामदासस्वामी म्हणतात,

या कारणे सूर्यापुढे। दुसरी साम्यता न घडे। जयाच्या प्रकाशे उजेडे। प्राणीमात्रासी।।

नाना धर्म नाना कर्मे। उत्तमे मध्यमे अधमे।सुगमे दुर्गमे नीत्यनेमे। सृष्टी मध्ये चालती।।

या सूर्यकार्यातुन, नियम म्हणजे, जगातील पहिला धर्म निर्माण झाला!

अविचल, सतत, निःकामपणे,कार्यरत राहणे, हाच तो धर्म!

या सूर्यदेवांच्या कार्यातही ग्रहणासारखी विघ्ने येतात.

संकटं, विघ्नातुन विचलन होणे, हे सूर्यदेव आपल्या धर्मात सांगतात!

म्हणुन, धर्माने चालणारे सूर्यदेव, हे मानवाचे पहिले आदर्श होत!

श्रीरामांचा धर्माधिष्ठीत सूर्यवंश इथुन सुरु होतो!

जगामध्ये नियमाने चालणे म्हणजे धर्म

होय!

भगवतगीतेत भगवंत म्हणतात,

इमं विवस्वते योगं। प्रोक्तवानहमव्ययम् ।
विवस्वानमनवे प्राह।
मनुरिक्ष्वाकवीब्रवीत।।

मी , हा अविनाशी योग (धर्म) सूर्याला सांगीतला होता.

सूर्याने आपला पुत्र मनुला सांगीतला होता.

मनुने तो इश्र्वाकु ला सांगीतला होता.

इश्र्वाकु हे श्रीरामाचे पूर्वज होते!.

या कुलात राजा भागीरथ, राजा दिलीप, राजा रघु, राजा हरिश्र्चंद्र, राजा अज, असे, धर्माधिष्ठीत राज्य करणारे राजे होवुन गेले होते!

राजा हा लोककल्याणासाठी असतो हे आपल्या आचरणातुन, त्यांनीदाखवुन दिले होते.

राजा हरिश्र्चंद्राने स्वप्नात दिलेले वचन पाळण्यासाठी राज्य सोडूले दिले होते. रघुराजानेकौत्साला दान देण्यासाठी स्वर्गावर स्वारी केली होती.

त्यावेळी , कुबेराने सुवर्णमोहरांचा पाऊस पाडला होता.

राजा दिलिप, गोमातेला वाचवण्यासाठी स्वतःचा बळी देण्यास तयार झाला होता.

राजा भगीरथाने , प्रजेच्या कल्याणासाठी, पावन गंगा पृथ्वीवर आणली होती.

राजारामांनी रामराज्य करताना आपल्या पुर्वजांचा धर्माधिष्ठीत राज्य करण्याचा वारसा चालवला होता!

तोच धर्माचा आदर्श त्रेतायुगात द्वापारयुगात, आणी कलीयुगात श्रेष्ठतम मानला जातो!

श्रीरामांचे वैयक्तिक जीवनातील धर्माचरण, श्रीरामांचे सामाजिक जीवनातील धर्माचरण, श्रीरामांचे राजकिय जीवनातील धर्माचरण आज हीसर्व मानवी जीवन जगण्यासाठी आदर्श आहे!

प्रत्येक मानवाचा जन्मापासुन ते मृत्युपर्यंतच्या प्रवासास जीवन म्हणतात!

हे जीवन विशिष्ट नियमात बसवुन जगण्याचा प्रयत्न केला तरत्याला धर्मम्हणतात!

उदा. आपण आपला रोजचा सर्वसाधारण श्र्वासोश्र्वास हा २१६००वेळा करतो. हा साधारण नियम आहे. जेव्हा यात बदल होतो, तेव्हा शरिरिक व्यवस्थेत बिघाड झालेला असतो.

जसे शरिर ठराविक नियमाने चालते ,तसे आपल्या मनालासुध्दा नियमात बसवणे, हा धर्म होय!

म्हणुन शास्त्र म्हणते, आचारो परमो धर्माः।।

आचार सांगताना शास्त्र सांगते.

चार आश्रम, चार स्थीती,चार पुरुषार्थ.

ब्रह्मचर्य, गृहस्थाश्रम, वानप्रस्थाश्रम, संन्यासाश्रम.

या चार आश्रमातील धर्म वेगळे आहेत, म्हणजेच नियम वेगळे आहेत!

बालपण, तारुण्य, प्रौढवस्था, वार्धक्य, या चार स्थीती आहेत.

या चारही स्थीतीत वेगळे धर्म आहेत.

अर्थ, काम, धर्म, मोक्ष हे चारपुरुषार्थ आहेत.

या चार पुरुषार्थातुन आपण आपले जीवन विकसीत करायचे असते!

SAP Semi
SAP Parts
परिवाराकडून आपणा सर्वांना
दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा !
प्रकाशाचा हा सण तुमच्या आयुष्यात
उत्तम आरोग्य, शांती आणि वैभव घेऊन येवो
ही सदिच्छा..!
Happy Diwali
Manufacturers of Special Metal Face Seals,
Precision Components & Sintered Parts
SAP Parts Pvt. Ltd.
1087/04, Pune-Nagar-Pimple Jagtap Road, Sanaswadi, Pune - 412208
SAP Semi Pvt. Ltd.
Gat No. 20/1, 20/3, 20/4, Kagasht, mangalwedha, Solapur - 413319
www.sapparts.com

आमचे असंख्य मित्रपरिवार, हितचिंतक शेतकरी बांधव व तमाम नागरीक बंधु-भगिनींना
दिपावली व नुतन वर्षा निमित्त हार्दिक शुभेच्छा !
नाथबाबा कन्स्ट्रक्शन
ॲण्ड स्टोन क्रशर
अकोला, ता. सांगोला, जि. सोलापूर
आमच्याकडे जेसीबी टिपर योग्य दरात मिळेल
तसेच खडी, मुरूम व हॉट मिक्सची कामे केली जातील.
मा. बाळासाहेब आसबे
मा. आनंद खटकाळे
न्यू इंग्लिश स्कूल समोर, माने कॉम्प्लेक्स, सांगोला - मो. 9011192323, 9011142323, 9763394651

जीवन जगण्यासाठी अर्थ म्हणजे धन आवश्यक असते.

पण हे धनधर्माने कमावणे आवश्यक आहे.

इथे धन स्वकष्टातुन, स्वज्ञानातुन, अन्याय न करता कमावणे हा धर्म आहे.

संत तुकाराम आपल्या अभंगात सांगतात, जोडोनीया धन उत्तम व्यवहारे। उदास विचारे वेच करी।।

धर्माने अर्थ कसे करावे हे संत तुकाराम सहज सांगत आहेत!

काम म्हणजे इच्छा, गरजा.!

अर्थार्जन केले कि, त्याचा विनियोग, गरजा भागवण्यासाठी करणे हे क्रमप्राप्तच असते.

पण या गरजा सिमीत असाव्यात. या गरजांमुळे इतरांना त्रास होणार नाही.या गरजांचे स्वरुप स्वतःच्या व समाजाच्या कल्याणाचे असावे!

असा धर्माने भोगलेल्या गरजा, इच्छा याला पुरुषार्थ म्हणतात!

या चार पुरुषार्थात धर्म हा अर्थ मध्ये आवश्यक आहे. धर्म कामात आवश्यक आहे. मोक्षासाठी पण धर्म आवश्यक आहे!

म्हणुन तीनही पुरुषार्थ हे, धर्माच्या माध्यमातुन करणे हा उत्तम पुरुषार्थ होय!

मोक्ष हा वैयक्तिक भाग आहे. गुरुकृपा आणी धर्माचरणातुन मोक्ष प्राप्त होतो.

म्हणुन या चार स्थीती, चार आश्रम, चार पुरुषार्थ नियमाने, संयमीत , आचरल्याने धर्माचे पालन होते, असे शास्त्र सांगते!

समर्थ रामदासस्वामी असे धर्माचरण करणार्या श्रीरामांना पुरुषोत्तम म्हणतात, तर छ.शिवाजी महाराजांना उत्तम पुरुष म्हणतात!

भगवतगीतेत पंधरावा अध्याय भगवान श्रीकृष्णांनी अर्जुनाला सांगीतला. त्या पंधराव्या अध्यायाला पुरुषोत्तम योग म्हणले आहे!

मानवी जीवनात जगताना, परस्पर संबंधांचे नियम आहेत, त्याला आपण धर्म म्हणतो.

आई आपल्या मुलाला स्वतःलाविसरुन , कष्ट सोसुन जोपासते, संस्कार देते, हा मातृ धर्म होय!

पिता मुलाला वाढविण्याची जबाबदारी स्विकारतो, तो पितृ धर्म होय.

पतीपत्नी जेव्हा विवाहातुन एचत्र येतात तेव्हा प्रतीज्ञा करतात, धर्मेच, अर्थेच, कामेच, नाती चरामी।

हा नियम पाळणे स्वधर्म होय!

समाजात वावरताना सामाजिक नियम पाळणे ,हा सामाजिक धर्म आहे. जसे रस्त्याने जाताना, रहदारीचे नियम पाळणे. रेल्वे, बस, विमान, या सेवा नियम पाळुन घेणे, हा धर्म आहे!

आपले अस्तित्व, जरदेश, राष्ट्र अस्तित्वात असेल तर टिकुन राहते!

देशसेवा करणे , देशातर्गंत नियम पाळणे, देशाची सार्वजनिक मालमत्तेचा नाश न करणे!

राष्ट्रगीत, राष्ट्रध्वज, याचा सम्मान राखणे, हा राष्ट्रधर्म आहे!

हा राष्ट्रधर्म अग्रक्रमाने पाळणे आवश्यक आहे!

ज्या ज्या वेळी, आपण भारतीयांनी हा राष्ट्रधर्म पाळला नाही, तेव्हा तेव्हा राष्ट्र पारतंत्र्यात गेलेले आपण पाहिले आहे!

हे वैयक्तिकनियम पाळणे,

हा स्वधर्म आहे!

ज्ञानेश्र्वर माऊली म्हणतात,

अगा स्वधर्म जो आपुला। जरी कां कठिणु झाला। तरी हाची अनुष्ठीला। भला देखें।।

वरिल आचार धर्म आपण, जरी कठिण असला तरी स्वधर्म समजुन, आचरला पाहिजे.

समर्थ रामदासस्वामी म्हणतात,

स्वधर्मेची चाले सदा उत्तमाचा। जगी धन्य तो दास सर्वोत्तमाचा।।

जो नीत्य स्वधर्माचे आचरण करतो, तोच खरा सर्वोत्तमाचा (श्रीरामाचा) दास असेल!

समाजात, नियम न पाळणारेही असतात. अशांना ,समाजाची घडी व्यवस्थीत बसवण्यासाठी, कडक शासन करणे आवश्यक असते!

महाभारतात, अर्जुन रणांगणावर समोर आपले गुरु, पितामह, इ. समोर शत्रु गोटात पाहुन गळुन जातो.या अवस्थेत तो युध्द न करण्याचा निर्णय घेतो.

तेव्हा श्रीकृष्ण म्हणतात,हे पार्थ तु क्षत्रीय असुन , युध्दन करणे स्वधर्माविरुध्द आहे. अन्यायाविरुध्द लढताना समोर गुरु, पीतामह, स्वजन पाहुन शस्त्रन चालवणे हा अधर्म आहे.!

आणी असे तु केलेस तर तुझी अपकिर्ति होईल.

म्हणजे धर्म किती तरल आहे? पहा.

आपले सख्खे अजोबा, गुरु हे जर अन्यायाच्या बाजुने उभे असतील तर त्यांनाही शासन केले पाहिजे, असे श्रीकृष्ण सांगत आहेत.

महाभारतानंतर आपल्या इतीहासात आपण याच चुका केल्या आहेत!

खरा धर्म समजुन न घेताअधर्माला जवळ केले होते.

बाहेरुन येणारा पाहुणा चार दिवसाचा असतो. हा नियम न लक्षात घेता आलेल्या परकियांना हुसकावुन दिले नाही, हा अधर्म होता!

सतरा वेळा महंमद घोरीला पृथ्वीराज चौहान यांनी माफ केले, हा अधर्म होता!

तुरुंगात असलेले अतीरेकी, विमानातील प्रवासी ओलीस ठेवल्यामुळेत्या क्रुर अतीरेक्यांना सोडणे , हा अधर्म होता!

अर्जुनाला धर्म समजावुन सांगताना श्रीकृष्ण म्हणतात, धर्माच्या विरुध्द जरी पीतामह, गुरु, वडिल असतील तरी त्यांनाही शासन केले पाहिजे. हे करताना जरी तुला मरण आले तरी तु स्वर्गात जाशील आणी तु युध्द जिंकलेस तरपृथ्वीचे राज्य उपभोगशील!

भगवतगीता वाचताना लक्षात येते कि, श्रीकृष्ण अद्वेष्टा सर्व भूतांनाम। असे, वैयक्तिक धर्माचे सखोल तत्वज्ञान अर्जुनाला जरी सांगत होते, तरी ही युध्द करण्यासाठी अर्जुनाला, वारंवार धनुष्य उचल , असे सांगत होते.

कारण तोच अर्जुनाचा धर्म होता!

आपण गीता अभ्यासताना या गोष्टीकडे दुर्लक्ष करतो.

आध्यात्मात परमेश्र्वराचा साक्षात्कार जरी करुन घ्यायचा असला तरी, हे शरिर



आमच्या असंख्य ग्राहकांना
दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा!
सोनेतारण कर्ज
प्रति तोळा-
100000
संस्थापक :
अनिलभाऊ इंगवले
वार्षिक व्याजदर- 12%
100 दिवसाच्या ठेवीवर 10%
दाम दुप्पट ठेव- 06 वर्ष
मुदत ठेव योजना
30 दिवस ते 45 दिवस : 6% व्याजदर
46 दिवस ते 90 दिवस : 7% व्याजदर
91 दिवस ते 180 दिवस : 8% व्याजदर
180 दिवस ते 364 दिवस : 10% व्याजदर
13 महिने ते 24 महिने : 12% व्याजदर
·व्यावसायिक कर्ज ·सोनेतारण कर्ज ·सरकारी नोकरदार कर्ज योजना ·दूध समृद्धी कर्ज ·5 लाखापर्यंत मॉर्गेज लोन
सूर्योदय अर्बन
को-ऑप. क्रेडिट सोसा.लि. सांगोला
पाटील कॉम्प्लेक्स,वाढेगांव नाका, सांगोला मो-9130795387
सूर्योदय अर्बन
महिला को-ऑप. क्रेडिट सोसा.लि. सांगोला
महात्मा फुले चौक,सांगोला मो-7711882002
एल के पी मल्टीस्टेट
को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसा.लि. सोलापूर
खरेदी-विक्री संघ कार्यालयाजवळ नेहरू चौक,सांगोला मो-7875722002

आमचे असंख्य ग्राहक, मित्र परिवार, हितचिंतक व तमाम नागरिकांना
ही दिपावली व नूतन वर्ष सुख समृध्दीचे, भरभराटीचे, आनंदाचे जावो हीच
दीपोत्सवाच्या स्नेहपूर्वक शुभकामना व सदिच्छा
शुभेच्छुक
श्री. सुदर्शन (दादा) शंकर जाधव
अध्यक्ष : परीट समाज सेवा संघ, सांगोला तालुका
सुदर्शन जाधव मित्र परिवार , सांगोला तालुका
संपर्क : नगरपरिषद शॉपींग सेंटर, तहसील कार्यालया समोर, सांगोला, मोबा : ९८२२३०९१६९
योग्य दरात जमिनीची खरेदी विक्री व्यवहार करून मिळतील तसेच योग्य वेळेत खरेदीखत, मॉरगेज, हक्कसोड इत्यादी करून मिळतील.
जाधव परिवार, चिंचोली, ता. सांगोला

त्यासाठी आवश्यक असते!

आपले अस्तीत्व आवश्यक असते.

आपले अस्तीत्व आपणधर्माच्या शत्रुंचा निःपात केला तरच टिकुन राहते!

देव देश धर्म जपणे हि जागरुकता आहे!

समर्थ म्हणतात,

देव मस्तकी धरावा। अवघा हलकल्लोळ करावा। मुलुख बडवावा बुडवावा। धर्म संस्थापनेसाठी।।

छ.शिवाजी महाराजांनी हे धर्म संस्थापनेचे कार्य केले होते!

म्हणुन समर्थ म्हणतात,

या भूमंडळाचे ठायी। धर्म रक्षी ऐसा नाही। महाराष्ट्र धर्मराहिला काही। तुम्हा कारणे।।

आपण भारतीयांनी सध्या धर्माधिष्ठीत राज्य स्थापण्यासाठी शिवाजी महाराजांचाआदर्श ठेवला पाहिजे!

धर्मासाठी लढु या। धर्मासाठी जगुया।।

धर्म अफुची गोळी नसुन, धर्म हि आचरणाची नियमावली आहे!

धर्मासाठी छ.संभाजीराजांनी बलीदान दिले होते!

त्याच धर्माचे पाईक असल्याचे जाणवेल, असे वागुया।।

धर्माची नियमावली धुडकावुन, पैशाच्या, सत्तेच्या, धर्मांधतेच्या बळाने अतीरेकी हल्ले करणार्यासाठी हि अफुची झिंग आणणारी गोळी असेल, पण धर्माधिष्ठीत राज्य करणार्यांनी असे अतीरेक्यांचा निःपात करणे हा योग्य धर्म असेल!

कारण त्यामुळे सज्ञनांना, संतांना अभय मीळेल!

भगवंत पृथ्वीवर अवतार घेण्याची वाट न पहता, आपल्यात भगवंतांच्या तत्वज्ञानाचा प्रकाश पडेल, हे पहावे!

आपण धर्मसंस्थापनाच्याकार्य सुरु केले कि, भगवंतांचा स्वभाव आहे, तो धावुन येईल!

धर्माचा विजय होवो।

अधर्माचा नाश होवो।।

श्री.अनिल गणेश रामदासी.
०८/०८/ २०२५,
बाणेर , पुणे.

बाप

सगळेच लिहितात पहा आईवर
बाबांच्यावर कोणी नाही लिहित
बाप संरक्षणाचं मजबूत कवच
लेकीलाच बाप चांगला माहित

जन्मल्यापासून लेकीच्यासाठी
रात्रं-दिवस राहतो बाप पाठीशी
भविष्याचे स्वप्न बाळगुन मनात
आला जरी आता तोच साठीशी

तळपत्या उन्हांतही बाप तिचा
वाऱ्याची हलकी झुळूक आहे
परक्याघरी पाठवणी करताना
डोळ्यांतून गंगा जमूनाच वाहे

दाखवत नाही माया आईवाणी
तरी ह्रदयात प्रेमाची ज्योत वाही
बाप घरात नसताना त्याची खरी
किंमत तेव्हा सर्वांना कळत राही

लेकीला शिकवून मोठं करण्यास
राबतो खपतो हा बापच दिनरात
ऋण काढून लग्न करतो थाटात
घामाचे मोती पिकवून शिवारात

बाहेरून कडक बाप फणसापरी
आतून असतो रसाळ गऱ्यावाणी
लेकीची सासरी पाठवणी करता
डोळ्यांतून वाहिल त्याच्या पाणी
अंतरीच्या वेदना साहतोच मुकाट
सोशिकतेची ती महान अशी मूर्ती
समजून घ्यावे बापाला साऱ्यांनी
देई लेकरांना तो बळ आणि पूर्ती

आई नदीवाणी वाहती झुळुझुळू
बाप सागराची असेल मोठी लाट
खळाळ फेसाळते साऱ्या जीवनी
प्रसंगात दाखवतो तोच खरी वाट

आईचे ह्रदयात स्थान असे असता
ठेवा एखादा कोपरा या बापासाठी
सुखाची लहर वाहीलच आयुष्यात
वृद्धपणी त्याच्या बना तुम्ही काठी

सौ. भारती सावंत
खारघर, नवी मुंबई
९६५३४४५८३५

मौन

तुझ्या मौनाचा गाभारा
सल माझ्याही मनात
सावलीचे रूतलेले
डंख उरले उन्हात

आठवणी उठलेल्या
जणू मोहोळाचे रान
तरू निष्पर्ण तरीही
कुठे फुटलेले पान

नोंदी उन्हाच्या ठेविते
कोठे सावली धरून
कशी करपून गेली
पानगळ मनातून

कुठे कंठात थिजले
भैरवीचे सूर आता
कुठे विवाद संवाद
परतूनी तूच जाता

तरी घालीते रे साद
जरी गाभारा मौनाचा
जरा आवरूनी जारे
परिमळ आठवांचा

कविता झुंजारराव
फोन नं. ९८१९७७६४१४
kavita.zunjarraogmail.com

आमचे असंख्य मित्र परिवार, हितचिंतक व तमाम नागरिकांना दीपावली व नुतन वर्षानिमित्त
हार्दिक शुभेच्छा!
श्री विठ्ठल मल्टीस्टेट
को-ऑप क्रेडिट सोसायटी लिमिटेड
सोने तारण कर्ज - प्रति तोळा : ९४००१/-
श्री विठ्ठल दामदुप्पट योजना - ५ वर्षे ११ महिने
ठेवीवर वार्षिक १२% व्याजदर
श्री. दीपक दत्तात्रय बंदरे
चेअरमन, श्री विठ्ठल मल्टिस्टेट
कार्पोरेट ऑफिस : पार्वती निवास, रेल्वेस्टेशन समोर, मेन रोड, ता. सांगोला, जि. सोलापूर
Mob.: 9623034001, Email : shrivitthalmulti4001@gmail.com, Web.: www.vitthalmultistate.com
आमच्या शाखा
सांगोला, आटपाडी, मंगळवेढा, सोलापूर, मोहोळ, कुरंदवाड, इंदापूर, टेंभुर्णी, शिरढोण, सांगली, मोडनिंब, भिगवण
उरळीकांचन, पेनूर, भाळवणी, वैराग, उगार, पंढरपूर, माधवनगर, पुळूज, गादेगाव, घेरडी, जूनोनी, वाढेगाव

आमचे असंख्य मित्र परिवार, हितचिंतक व तमाम नागरिकांना दीपावली व नुतन वर्षानिमित्त
हार्दिक शुभेच्छा!
आशिर्वाद
स्व. प्रतापसिंह मोहीते-पाटील
माजी सहकार राज्य मंत्री
मार्गदर्शक व धाडसी नेत्या
श्रीमती पद्मजादेवी
प्रतापसिंह मोहिते-पाटील
माजी जि.प. सदस्या, अकलूज
आमचे नेते
डॉ. धवलसिंह (दादा)
मोहिते-पाटील
माजी जिल्हा परिषद सदस्य
शुभेच्छुक
ज. असगर पठाण
अध्यक्ष जनसेवा संघटना सांगोला तालूका
आझाद ग्रुप, सांगोला, जि. सोलापूर


आमचे असंख्य ग्राहक, हितचिंतक, मित्र परिवार व
तमाम नागरीकांना दिपावली व नुतन वर्षा निमित्त हार्दिक शुभेच्छा !
दिपावलीच्या शुभेच्छा
शुभेच्छुक
श्री. ए. एन. मुलगीर
उप अभियंता
सार्वजनिक बांधकाम उपविभाग, सांगोला
सर्व शाखा अभियंता
अधिकारी व कर्मचारी वर्ग
सार्वजनिक बांधकाम उपविभाग, सांगोला जि. सोलापूर

आमचे असंख्य ग्राहक, हितचिंतक, मित्र परिवार व तमाम नागरीकांना दिपावली व
नुतन वर्षा निमित्त हार्दिक शुभेच्छा !
शुभेच्छुक
सचिन ज्वेलर्स
आणि सन्स
सुवर्ण परंपरा, विश्वास
आणि नाविन्याची
स्थापना १९९६
श्री. रामचंद्र रंगनाथ मिसाळ
(पाचेगांवकर)
श्री. सुभाष रामचंद्र मिसाळ
(पाचेगांवकर)
महात्मा फुले चौक, सांगोला जि. सोलापूर
मोबा.: ९४२०६६२३६२, ९७६६७४९८९०

आमचे असंख्य ग्राहक, हितचिंतक, मित्र परिवार व तमाम नागरीकांना दिपावली व नुतन वर्षा निमित्त हार्दिक शुभेच्छा !
दिपावली
शुभेच्छा
मा. गिरीष नष्टे
चेअरमन, अजिंक्यतारा नागरी सह.
पतसंस्था मर्या.
सांगोला
श्री. निलेश नष्टे
डॉ. अजिंक्य नष्टे
शुभेच्छुक
अजिंक्यतारा मल्टीकेअर हॉस्पिटल
अजिंक्य लॉज
अजिंक्य टायर्स
प्रोप्रा : निलेश नष्टे
नष्टे परिवार, सांगोला
MRF
अजिंक्य प्लाझा, एस.टी.स्टँड समोर, वासुद चौक, सांगोला
मोबा.: ८८८८५७०२३४

चित्रपटाची मोहमयी दुनिया

मल्टिप्लेक्स थिएटरचा जमाना येण्यापूर्वी सिंगल स्क्रीन थिएटर्सने अनेक वर्षे सिनेरसिकांच्या पिढ्या घडविल्या. आता काळानुरूप बदल होऊन चकाचक मल्टिप्लेक्स थिएटर्स झाली आहेत. एसीच्या थंडाव्यात उत्तम दर्जाचे सिनेमे पाहायला मिळतात. पण मल्टिप्लेक्स चा जमाना येण्यापूर्वी थिएटर मध्ये नवीन सिनेमा पाहण्यासाठी येणाऱ्या सिनेरसिकांना तिकिटांच्या रांगेत उभे राहून तिकिटे मिळाल्यावर एखाद राज्य मिळाल्याचा होणारा आनंद, प्रेक्षकांच्या टाळ्या, शिट्ट्या, इंटरवल, शाब्बासकी, गरम खाऱ्या शेंगदाण्यांचा पुडके,पॉपकॉर्न याचा होणारा आवाज फिल्म मध्येच तुटली तर मशीन ऑपरेटरच्या नावाने घातल्या जाणाऱ्या शिव्या. इत्यादी तसेच पाच का दस असं हलक्या आवाजात ब्लॅक ची तिकीट विकणारे इसम या सर्व गोष्टी अनुभवता आल्या. आता कालानुरूप अशा अनेक गोष्टी हरवून गेल्याची हुरहुर कायम मनात असते.

सिंगल स्क्रीनचे फिरते टूरिंग टॉकीज सन १९५० चे सुमारास सोलापूर जिल्ह्यातील सांगोला या ठिकाणी खेडे वजा गावात सुरू झाले. या फिरत्या टू रिंगटोन मध्ये एकच प्रोजेक्टर मशीन वर सिनेमा दाखवला जात असे. संपूर्ण चित्रपटाचे तीन-तीन इंटरवल व्हायचे. मध्येच फिल्म तुटली तरी सिनेमा पाहण्याची गोडी कमी होत नसे. सिनेमा पाहणे हे एकमेव करमणुकीचे साधन त्या ठिकाणी होते. हिंदी सिनेमे पाहण्यासाठी टुरिंग टॉकीजवर गर्दी होत असे. यात फिरत्या टू रिंग टॉकीज ची दुनिया काही औरच. सिनेमाचा फक्त एकच खेळ होत असे. सिनेमा सुरू होण्यापूर्वी टुरिंग टॉकीज मध्ये हिंदी मराठी चित्रपटातील सुमधुर आणि मोठ्या आवाजात लाऊड स्पीकरवर नॉनस्टॉप जवळजवळ दोन ते तीन तास लावली जात असत. मधून चालू सिनेमाची जाहिरात, चित्रपट सुरू होण्यापूर्वी जुन्या नगीना चित्रपटातील पुंगी वरील धून. केव्हा केव्हा कम सप्टेंबर ची धून लावली जात असे. ते ऐकून गावातील सिने रसिक धावत पळत सिनेमा पाहण्यासाठी टू रिंग टॉकीज गाठत असत तो जुन्या काळातील टू रिंग माहोल अ वर्णनीय असा आहे. तो काळानुरूप लुप्त झाला आहे.

पुढे पुढे कॉलेजच्या दिवसांमध्ये तरुण मुले मुलींना सिनेमाचा नादच लागला. सिनेमा थिएटर्स हे तरुण पिढीची विसाव्याची ठिकाणी बनली. या सिनेमा थिएटर्स पैकी भारतातील पहिले मल्टिप्लेक्स असणाऱ्या सोलापुरातील भागवत थिएटर्स पैकी प्रसिद्ध असलेले उमा मंदिर हे थेटर अतिशय कलात्मक रीतीने बांधलेले याची एक क्षण होती व आहे. उमा मंदिर च्या कॅरी डोअर मध्ये लावलेले इंग्लिश नट नट्यांचे भव्य फोटो तसेच थिएटरचा पहिला जिना चढून गेल्यावर दर्शनी भागात समोरच लावलेले संगम या सिनेमातील राजेंद्रकुमार राज कपूर यांचा भव्य फोटो असे हे नावाजलेले थेटर यामध्ये सिनेमा पाहण्यासाठी सीट नंबर नसणाऱ्या काळात तीन-चार मजले पळत जाऊन रांगेत उभे राहणे व आत गेल्यावर पंखा बघून जागा पटकावण्याची दिवसातला पहिला शो असेल तर तो स्क्रीनच्या पुढील बाजूस असलेला लाट लाटा चा पडदा वर जाताना पाहायला मिळायचा आणि मग स्वामी अडवर्टाइजिंगच्या स्वामीची स्लाईट दिसली की आता सिनेमा सुरू होणार या उत्सुकतेने प्रेक्षक सावरून बसायचे आणि सुरू व्हायची एक मोहमयी दुनियाची रंगीबेरंगी सफर

ही सफर अधिक रस भरीत बनवायची यल्लादासी च्या अफलातून पोस्टर्स ने या पोस्टर मधून अभिनेत्यांचे किंवा अभिनेत्रीची विलक्षण जिवंत रूप आपण पाहत आहोत असे जाणवायचे या पोस्टर्स पैकी दिवार चित्रपटातील अमिताभच्या रांगड्या रुपातलं

शर्टाची गाठ मारलेल्या पोजमध्ये पोस्टर्स तसेच अंदाज चित्रपटातील मोटरसायकल वरील राजेश खन्ना हेमामालिनी यांचे गॉगल घातलेले फोटो पोस्टर्स शोले या सुपरहिट चित्रपटातील धर्मेंद्र अमिताभचे पोस्टर्स ही सर्व पोस्टर्स जिवंत रूपात आपण पाहत आहोत असे सिने रसिकांना वाटत असे.

हिंदी चित्रपटाचे ग्लॅमर लोकप्रियता त्याकाळी कमालीची होती उदाहरण द्यायचे झाले तर दिवार सिनेमा पहिल्या दिवशीचा पहिला शो बाल्कनीत बसून बघणाऱ्या प्रेक्षकांना चित्रपटातल्या प्रेक्षकांचे शिट्ट्या चिल्लरणांनी उधळणे जोरजोरात ओरडणे हे अनुभवता आले नाही तरी उत्स्फूर्त पाहता येत होत्या याचा अनुभव घेण्यासाठी तरुण मित्रमंडळी मग दुसऱ्यांदा खाली पहिल्या दुसऱ्या रांगेत बसून तोच सिनेमा पाहत असत आणि आजूबाजूच्या लोकांना रसरशीत प्रतिक्रिया अनुभवत असत. थिएटरच्या खाली एका काचेच्या खिडकीत चालू सिनेमाच्या दृश्यांची छोटे-छोटे फोटो लावलेले असायचे व ते फोटो पहात काही मुले उभी असायची. त्यातल्या एकाने तो सिनेमा पाहिलेला असायचा मग तो एक एक फोटो दाखवत सिनेमाची स्टोरी सांगत असायचा. ती स्टोरी ऐकत इतर मुले त्याचा आस्वाद घ्यायचे. ही गोष्ट आता अजून वेळ झाली आहे. सिंगल स्क्रीन थिएटर्सच्या जमान्यात त्या त्या काळातली सिनेमे पाहण्याचे आकर्षण प्रेक्षकांना असे देवानंद यांचा गाजलेला गाईड हा गोल्डन जुबली चित्रपटाची लोकप्रियता इतकी होती की त्याकाळी चित्रपट शोच्या अगोदर तिकीट मिळविण्यासाठी बॉक्स ऑफिसवर प्रेक्षकांच्या रांगा लागत असत. तिकिटे न मिळाल्यास ब्लॅक ची तिकिटे काढून का होईना सिनेमा पहायचाच हा निश्चय. पूर्वीच्या काळात सिनेमाचे सिल्वर जुबली गोल्डन जुबली साठी सिनेमाचे ॲक्टर दिग्दर्शक येत असत. त्यावेळी सिनेमाच्या हिरो हिरोइन च्या पोस्टरला फुलांचे हार, नोटांचे हार घालत असत. हाच सिलसिला पुढे अनेक गाजलेले चित्रपटांपैकी मिलन, संगम, गाईड, गंगा जमुना, ज्वेल थीप, आराधना, आनंद पासून ते बॉबी, एक दुजे के लिए, जंजीर, मैने प्यार किया, हम आपके है कौन, दिलवाले दुल्हनिया पर्यंत चालू राहिला व चित्रपटांना लोकप्रियता रसिक प्रेक्षकांकडून लाभली.

ब्लॅक अँड व्हाईट पासून ते कलर सिनेमाच्या काळात ही सिनेमे लोकप्रिय होण्यात व त्यातील गाणे प्रेक्षकांच्या मनावर राज्य करण्यात बिनाका गीतमाला या लोकप्रिय कार्यक्रमाचे मोठे योगदान आहे त्याकाळी मनोरंजनाचे साधन असलेले रेडिओ व त्यातल्या त्यात रेडिओ सिलोन वरील सादर होत असलेल्या बिनाका गीतमाला हा कार्यक्रम सन १९५२ पासून अखंडपणे सादर करणारे नामवंत निवेदक अमीन सयानी यांच्या जादुई आवाजांनी श्रोते मंत्रमुग्ध होत असत सन १९५२ पासून प्रत्येक वर्षीच्या टॉप नंबर वन वर असलेल्या गीतांची लोकप्रियता रसिकांच्या अभूतपूर्व प्रतिसादावर असे सिनेमाच्या सुवर्ण युगातला हा रेडीओ सिलोन वरील लोकप्रिय हिंदी चित्रगीतांच्या अनमोल खजिना होता गाणी ऐकण्यासाठी त्याकाळी चौकाचौकात हॉटेल पान टपऱ्या व घराघरात गर्दी होत असे खऱ्या अर्थाने चित्रपटांची मोहमयी दुनिया काय असते हे बिनाका गीतमाला या कार्यक्रमाच्या लोकप्रियते वरून दिसून येत असे हिंदी मराठी सिनेसृष्टीत बोल पटा पसून ते आज पर्यंत ट्रस्टमन कलर चित्रपटांपर्यंत बरीच स्थित्यंतरे झालेली आहेत मॉडर्न टेक्नॉलॉजी मुळे सिनेमे अधिक प्रगत झाले आहेत ब्लॅक अँड व्हाईट च्या जमान्यातली सिनेमे उत्तम दर्जाची होत आहेत परंतु टेक्निक प्रगत नव्हते त्यामुळे सिनेमे प्रदर्शित होण्यास अवधी लागत असे जरी असले तरी हिंदी मराठी चित्रपटांची सुवर्ण युगाचा पाया त्यावेळीच रचला गेला उत्तम कथा दिग्दर्शन श्रवणीय गाणी सुमधुर संगीत यामुळे त्याचा इम्पॅक्ट लोक मनावर आजपर्यंत कायम आहे

चित्रपटाच्या मोहमयी दुनियेचा अंमल रसिक प्रेक्षक राखण्यात सिनेमाचा दिग्दर्शक हा मोठा घटक आहे ब्लॅक अँड व्हाईट सिनेमाच्या काळातील मुख्यत्वे नावाजलेल्या दिग्दर्शकाच्या सिनेमापैकी बैजू बावरा ताजमहल मुगले आजम मदर इंडिया सीआयडी बीस साल बाद चलती का नाम गाडी गंगा जमुना इत्यादी महत्त्वपूर्ण सिनेमांचा उल्लेख करणे क्रमप्राप्त आहे या काळातील प्रसिद्ध दिग्दर्शक सत्यजित रे शशिधर मुखर्जी के आसिफ मेहबूब खान फी शांताराम इत्यादी ख्यातनाम दिग्दर्शकांनी तो काळ गाजविला.

व्ही शांताराम यांचे योगदान मराठी व हिंदी या दोन्ही सिनेसृष्टीत महत्त्वाचे आहे प्रभात फिल्म कंपनीतील त्यांचे काही अस्मरणीय चित्रपट जसे की शेजारी, सावकारी पाश, अमर भूपाळी, कुंकू त्याचबरोबर हिंदीतले दो आखे बरह हाथ,नवरंग, डॉ कोटणीस की अमर कहानी मराठी हिंदी मधील पिंजरा इत्यादी द ग्रेट शो मॅन राज कपूर यांचे चित्रपटांपैकी आग आहे. चोरी चोरी, श्री ४२०, बरसात, जिस देश मे गंगा बहती है व कलर चित्रपटापैकी संगम, मेरा नाम जोकर, बॉबी, प्रेम रोग, सत्यम शिवम सुंदरम इत्यादी तसेच ऋषिकेश मुखर्जी हे हिंदी चित्रपट सृष्टीतील खतनाम दिग्दर्शक त्यांच्या काही उत्तम कलाकृतीमध्ये आराधना आनंद अमरप्रेम यांचा उल्लेख करावासा वाटतो. त्याच पठडीतील दिग्दर्शक बसू चटर्जीचे छोटीशी बात, रजनीगंधा इत्यादी बी. आर. चोप्रा यांचे दिग्दर्शित कानून, धूल का फुल, वक्त, हमराज इत्यादी. त्यानंतरच्या काळात तील १९७० च्या दशकातील काही अनेक यशस्वी दिग्दर्शकांपैकी यश चोप्रा सुभाष घई, जे ओम प्रकाश, मनमोहन देसाई व संजय लीला भन्साली यांचे काही नावाजलेले चित्रपटां पैकी दुसरा आदमी, कभी कभी, चांदनी, कालीचरण, राम लखन, कर्ज, सौदागर, सुहाग, नसीब, अमर अकबर अँथनी ते अगदी अलीकडील चित्रपट बाजीराव मस्तानी इत्यादी पर्यंतचा प्रवास सिने रसिकांच्या मनाला भुरळ घालणारा आहे.

सिनेमाच्या सुवर्ण युगामध्ये रसिक प्रेक्षकांच्या मनावर गेली कित्येक दशके

आमचे असंख्य मित्र, हितचिंतक व तमाम नागरिकांना
ही दिपावली व नूतन वर्ष सुख समृध्दीचे, भरभराटीचे, आनंदाचे जावो हीच
दीपोत्सवाच्या स्नेहपूर्वक शुभकामना व सदिच्छा

शुभेच्छुक

आर्यन कन्स्ट्रक्शन्स्

गव्हर्मेन्ट कॉन्ट्रॅक्टर भीमनगर, सांगोला, जि. सोलापूर

९७६४९०११२५
७७२००४१६०६

अजय आण्णा कांबळे

सिव्हील इंजिनिअर

कांबळे परिवार, सांगोला, जि. सोलापूर

आमचे असंख्य मित्र परिवार, हितचिंतक व तमाम नागरिकांना ही दिपावली व नूतन वर्ष सुख समृध्दीचे,
भरभराटीचे, आनंदाचे जावो हीच दीपोत्सवाच्या स्नेहपूर्वक शुभकामना व सदिच्छा

स्थापना ०६/१०/२०१९

धनश्री

रजि.नं. MSCS/CR/417/2011

मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लिमिटेड
मंगळवेढा

संस्थापक
मा.प्रा.श्री.शिवाजीराव काळुंगे(सर)
धनश्री परिवार

कन्यारत्न ठेव योजना

(मुली व महिलांसाठी)

दरमहा ६७५/- भरा व
८ वर्षांनी १,००,०००/- मिळवा

दरमहा १०६०/- भरा व
१० वर्षांनी २,२०,०००/- मिळवा

दरमहा १३५०/- भरा व
८ वर्षांनी २,००,०००/- मिळवा

**दामदुप्पट
ठेव योजना ७ वर्ष
सर्वांसाठी**

संस्थेची खास वैशिष्ठ्ये.....

- भारत सरकार द्वारा संचालित.
- केंद्रीय कृषी व केंद्र सहकार खाते अंतर्गत नियंत्रित.
- १४ वर्षात १५०० कोटी ठेवीकडे वाटचाल.
- कोअर बँकिंग प्रणाली. (कोणत्याही शाखेतून व्यवहार करता येतात)
- संस्थेचा IFSC कोड ICIC0000104
- सर्व प्रकारचे बँकिंग व्यवहार.
- हेड ऑफिससह ३५ शाखांचा गुणात्मक विस्तार.
- सर्व शाखा संगणकिकृत.
- शिक्षित व प्रशिक्षित कर्मचारी वर्ग.
- सहज सुलभ कर्ज पुरवठा. • पारदर्शक व्यवहार.
- विनम्र व तत्पर सेवा. • IMPS
- ग्राहकांसाठी प्रत्येक व्यवहारानंतर SMS ची सुविधा.

लखपती मुदत ठेव योजना

रु.२३,५०० एक रकमी भरा १४.५ वर्षांनी
१ लाख रुपये मिळवा

रु.३८,००० एक रकमी भरा ९.८ वर्षांनी
१ लाख रुपये मिळवा

रु.५७,००० एक रकमी भरा ५.८ वर्षांनी
१ लाख रुपये मिळवा

आपल्या सेवेसाठी उपलब्ध सुविधा RTGS, NEFT मोबाईल बँकिंग, बँकिंग संदर्भातील सर्व सुविधा.

आमचे असंख्य ग्राहक, हितचिंतक, मित्र परिवार व तमाम नागरीकांना दिपावली व नुतन वर्षा निमित्त हार्दिक शुभेच्छा !
शुभेच्छुक
सर्वांची एकच पसंत....
हर्षदा लॉन्स अॅण्ड मल्टीपर्पज हॉल
आमची वैशिष्ठ्ये
प्रशस्त हॉल • रहाण्याची उत्तम सोय • नवरा-नवरीच्या ए/सी रुम • एकावेळी ५०० लोकांचा भोजन हॉल
• गरम पाण्याची सोय • प्रशस्त पार्किंग • मिटींग ए/सी हॉल
सर्व शुभ कार्यासाठी उपयुक्त तसेच सर्वपक्षीय मिटींग व मेळाव्यासाठी सुसज्ज हॉल
• लग्न समारंभ • साखरपुडा • वाढदिवस • बारसे • डोहाळे जेवण • रिसेप्शन
• मुंज • सत्कार समारंभ कॉन्फरन्स
जुना सांगोला-मिरज रोड, सांगोला, जि. सोलापूर
मोबा.: ९६७३९२९९९५, ९४२१०१३४४९, ९९२२१६०००२
हॉटेल यशश्री
परमिट रूम, बिअर बार अॅण्ड लॉज
एस.टी.स्टँड समोर, वासुद चौक, सांगोला
प्रोप्रा. सिध्देश्वर उर्फ नाथा जाधव
(माजी नगरसेवक)

आमचे असंख्य हितचिंतक, मित्र परिवार व तमाम नागरीकांना
दिपावली व नुतन वर्षा निमित्त हार्दिक शुभेच्छा !
शुभेच्छुक
मा. बाबुरावजी रामचंद्र गायकवाड
अध्यक्ष, रामकृष्ण टेक्नीकल एज्युकेशन सोसायटी
अध्यक्ष, सांगोला तालुका उच्च शिक्षण मंडळ
चेअरमन, अंबिकादेवी नागरी सह. पतसंस्था मर्या. सांगोला
यशोदिप कन्स्ट्रक्शन
सांगोला

आमचे असंख्य हितचिंतक, मित्र परिवार व तमाम नागरीकांना
दिपावली व नुतन वर्षा निमित्त हार्दिक शुभेच्छा !
डॉ. डी. बी. इंगोले यांचे
श्री दत्त हॉस्पिटल
यल्लम्मादेवी मंदिरासमोर, कडलास रोड, सांगोला
श्री गुरुदत्त
मेडिकल स्टोअर्स
कडलास रोड, सांगोला
इंगोले परिवार
सांगोला
डॉ. दत्तात्रय भगवान इंगोले
B.A.M.S.
Mob. 9822115969

शुभदिपावली

आमचे असंख्य ग्राहक, मित्रपरिवार, हितचिंतक व तमाम
नागरिकांना दीपावली व नुतन वर्षानिमित्त हार्दिक शुभेच्छा!

शुभेच्छुक

(राजस्थानी मिठाईयाँ)

श्री गणेश स्वीट मार्ट

आमचेकडे मिठाईचे सर्व पदार्थ
योग्य दरात मिळतील.

प्रोप्रा.चौधरी बंधू

सर्व प्रकारच्या ताज्या
व दर्जेदार मिठाई मिळतील

एस.टी.स्टँड समोर, पंढरपूर-मिरज रोड, सांगोला (मो.७०८३२९१३०६)

शुभ दीपावली.. !

संस्थेचे सर्व सभासद , हितचिंतक, ठेवीदार व तमाम नागरिकांना दीपावली व नूतन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा... !

श्री लक्ष्मी महिला सहकारी पतसंस्था मर्या ; मंगळवेढा

मुख्य कार्यालय फोन नं : ९३५६११६२०७

सभासदांच्या प्रगतीसाठी कटिबध्द असणारी व अल्पावधीतच प्रगतीकडे झेप घेणारी, महिलांच्या उद्योगास चालना देणारी अग्रगण्य संस्था

सभासदांना लाभांश वाटप करणारी संस्था

सौ.शुभदा भालचंद्र पटवर्धन
संस्थापक, अध्यक्षा/चेअरमन

श्रीमती उषा हर्षराज जावळे
(व्हा.चेअरमन)

सचिव, सर्व संचालिका, सभासद, कर्मचारी व पिग्मी एजंट

शुभ दीपावली

आमचे असंख्य हितचिंतक, शेतकरी बांधव व तमाम नागरिकांना दीपावली व नुतन वर्षानिमित्त हार्दिक शुभेच्छा!

शुभेच्छुक

ग्रामपंचायत सोनंद, ता.सांगोला

प्रशासक : श्री.अमोल उत्तम तोडकरी
विस्तार अधिकारी, पं.स.सांगोला

ग्रामविकास अधिकारी : श्री.किसन ज्ञानू कदम

सर्व कर्मचारी वृंद व ग्रामस्थ,
ग्रा.पं.सोनंद, ता.सांगोला

शुभदिपावली

आमचे असंख्य हितचिंतक, शेतकरी बांधव व तमाम नागरिकांना दीपावली व नुतन वर्षानिमित्त हार्दिक शुभेच्छा!

शुभेच्छुक

ग्रामपंचायत वासुद, ता.सांगोला

सरपंच- सौ. विठाबाई शिवाजी चव्हाण

उपसरपंच - श्री. अनिल जगन्नाथ केदार

ग्रामपंचायत अधिकारी- श्री.विनोद दिलीप काटकर

सर्व सदस्य, कर्मचारी वर्ग व ग्रामस्थ, ग्रामपंचायत वासुद ता. सांगोला.

शुभदिपावली

आमचे असंख्य हितचिंतक, शेतकरी बांधव व तमाम नागरिकांना दीपावली व नुतन वर्षानिमित्त हार्दिक शुभेच्छा!

शुभेच्छुक

ग्रामपंचायत वाणीचिंचाळे, ता.सांगोला

सरपंच- सौ. प्रियांका जितेंद्र गडहिरे

उपसरपंच - श्री. तातोबा सदा टेकनर

ग्रामपंचायत अधिकारी- श्री.ओ. ए. कर्चे

सर्व सदस्य, कर्मचारी वर्ग व ग्रामस्थ, ग्रामपंचायत वाणीचिंचाळे ता. सांगोला.

स्व.जयवंतराव(पिंटूआप्पा) पाटील

आमचे असंख्य मित्रपरिवार, हितचिंतक,
शेतकरी बांधव तसेच तमाम नागरिकांना
दीपावलीच्या

हार्दिक शुभेच्छा

आमचे नेते

मा.आ.दिपकआबा साळुंखे-पाटील

उत्सव प्रकाशाचा अवतरला,
नवा साज लेऊनी....
आता द्या नी घ्या, प्रेमच प्रेम भरभरूनी....
दिवाळीच्या प्रकाशमय शुभेच्छा

शुभ दिवाळी

श्री. धनंजय शिवाजीराव पाटील

गव्हर्न्मेंट रजिस्टर कॉन्ट्रॅक्टर

चेअरमन, कै.जयवंतराव पाटील ग्रामीण बिगरशेती
सह.पतसंस्था, मर्या.महूद बु।।, ता.सांगोला

पाटील परिवार, महूद बु।।, ता.सांगोला

अधिराज्य गाजवलेले गायक गायिकांचाही मोठा वाटा आहे. सर्वात अधिक काळ म्हणजे गेले ७० ते ८० वर्षे सिनेसृष्टीत आपल्या स्वराने मंत्रमुग्ध करणारे आपल्या गायनाचा ठसा अविरतपणे मनावर कोरलेले नाव म्हणजे मा सरस्वती गाणकोकिळा भारतरत्न कैलासवासी लता मंगेशकर. आपल्या सर्वांच्या दीदी. दीदींनी पार्श्वगायनास १९४२ पासून सुरुवात केली. त्यावेळी दीदींच्या अगोदरच्या काळातील ख्यातनाम गायक गायिका नुरजहा, शमशाद बेगम, गीता दत्त, के एल सेगल, तपन मेहमूद यांचा दबदबा होता. दीदींना प्रथम लोकप्रियता मिळाली तो चित्रपट म्हणजे मेहेक. या चित्रपटातील पार्श्वगायनामुळे लता मंगेशकर यांचे नाव झाले. दीदींच्या बरोबरीचे गायक मोहम्मद रफी, हेमंत कुमार, मन्ना डे, मुकेश, किशोर कुमार यांच्याबरोबर सिनेमाची लोकप्रियता वाढली.

सन १९५० च्या दशकात सिनेसृष्टीत खऱ्या अर्थाने सुवर्णयोग सुरू झाले त्या दशकातील नामवंत संगीतकारांमध्ये अनिल विश्वास, सज्जाद हुसेन, नौशाद, दत्ता डावजेकर, वसंत देसाई, सलील चौधरी, सुधीर फडके, हंसराज बहल, चित्रगुप्त, हेमंत कुमार, मदनमोहन रवी रोशन

सिने अभिनेत्री मीनाकुमारी यांच्यावर चित्रित केलेले गाणे तसेच सन १९६१ मधील संगीतकार जयदेव यांचे व लतादीदींच्या स्वरातील अल्ला तेरो नाम हे भजन आजही मन प्रसन्न करते सन १९६२ मधील बीस साल बाद या सिनेमातील कही दीप जले कही दिल हे लतादीदींच्या चोर लाभलेले व हेमंत कुमार यांचे संगीत लाभलेले गीतास व लतादीदींच्या आवाजातील पार्श्वगायनास त्यांच्या कारकीर्दीतील दुसरे फिल्मफेअर अवॉर्ड मिळाले होते तसेच कवी प्रदीप लिखित व श्री रामचंद्र यांनी संगीतबद्ध केलेले अजरामर असलेले लतादीदी व अन्य सह गायक गायिकांच्या आवाजातील ए मेरे वतन के लोगो हे देशभक्तीपर गीत भारताचे पहिले पंतप्रधान पंडित नेहरूंच्या उपस्थितीत गायलेले हे गाणे ऐकून पंडितजींच्या डोळ्यात अश्रू आले होते सन १९६५ मधील एसडी बर्मन त्यांच्या संगीत दिग्दर्शनाखाली सुपरहिट गाईड मधील सर्व गाणी हिट झाली होती या गाण्यांपैकी आज फिर जीने की तमन्ना है हे वहिदा रहमान यांच्यावर चित्रित केलेले गाणे किशोर कुमार लता यांच्या सुमधुर स्वरातील गीत त्याचप्रमाणे सन १९६७ च्या विजय आनंद दिग्दर्शित यामधील सिने अभिनेत्री वैजयंतीमालांवर चित्रित केलेले व एसडी बर्मंदा यांचे संगीत असलेले होटो पे ऐसी बात दबा के चली आई वरील सर्व गाणी सिने रसिकांना आज ही मंत्रमुग्ध करतात १९६० च्या दशकातील संगीतकार मदन मोहन यांच्या काही अस्मरणीय संगीत रचनांपैकी अनपढ मधील आपकी नजरो से समजा वह कौन थी मधील लग जा गले व नयना बरसे तसेच मेरा साया व बहार बनके वो मुस्कुराये हमारे गुलशन मे हे मला सिंहावर चित्रित लतादीदींच्या सुमधुर आवाजातील आपण अपने हुए पराये हा चित्रपट वरील सर्व गाणी आज ही रसिकांना मंत्रमुग्ध करतात सन १९६० च्या दशकातील नवोदित संगीतकार लक्ष्मीकांत प्यारेलाल यांच्या पहिल्याच पारसमणी चित्रपटातील लतादीदींचा स्वर लाभलेले हसता हुआ नूरानी चेहरा हे सुपरहिट गाणे ठरले होत

सन १९७० ते ८० च्या दशकातील एस डी बर्मन लक्ष्मीकांत प्यारेलाल कल्याणजी आनंदजी आर डी बर्मन खैयाम यांची संगीत असलेले अनेक चित्रपटांपैकी राजेश खन्नाच्या काळातील आराधना अमरप्रेम दो रास्ते कटी पतंग या चित्रपटातील लता किशोर कुमार यांचे गाणी लोकप्रियतेच्या शिखरावर होती अभिनेता जितेंद्र यांच्या चित्रपटांपैकी वारस जीने की राह कारवा ही काही सिल्वर गोल्डन जुबली चित्रपट राजेंद्र कुमार यांचे झुक गया आसमा राजकुमार दिल एक मंदिर सुरज इत्यादी चित्रपट तसेच अँग्री अँड मॅन अमिताभ बच्चन यांची सुपरहिट चित्रपटांपैकी जंजीर दिवार शोले शक्ती नमक हलाल व शराबी इत्यादी वरील नायकांच्या चित्रपटांची संख्या न संपणारे आहे सन १९८० ते १९९० चा प्रवेश झाला ॲक्शन पॅक सिनेमाची चलती सुरू झाली व सिनेमाचा ट्रेंड बदलला अनिल कपूर मिथुन चक्रवर्ती संजय दत्त अजय देवगन अक्षय कुमार शाहरुख खान सलमान खान आमिर खान यांचे काही चित्रपटांपैकी ९० च्या दशकातील राम-लक्ष्मण यांचे संगीत लाभलेले मैने प्यार किया हम आपके है कौन चित्रपट बप्पी लहरीचे संगीत लाभलेले डिस्को डान्सर खलनायक नमक हलाल चित्रपटातील गाणी चित्रपट रसिकांना पसंतीस पडली होती संगीतकार ए आर रहमान यांच्या काही गाजलेले चित्रपट संगीतांमध्ये सत्या याचा उल्लेख करावा लागेल अलीकडील नवीन संगीतकार अजय अतुल यांच्या संगीतामुळे प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले काळानुरूप हिंदी व मराठी सिनेमांमध्ये मॉडर्न टेक्निक चा वापर जगमगाठ करणारी दृश्य यामुळे हिंदी मराठी सिनेमांमध्ये क्रांती झाली असली तरी सिने रसिकांचे चित्रपटावरील प्रेम कमी झालेले नाही याचे ज्वलंत वाचव म्हणजे कोविड महामारीच्या दोन वर्षाच्या काळामध्ये कालावधीमध्ये ठप्प झालेली चित्र परत सृष्टी व चित्रपट गृहे यामुळे रसिकांचे मनोरंजन काही प्रमाणात ओटीपी प्लॅटफॉर्मवरून चित्रपट प्रदर्शित करण्यात येत होते परंतु चित्रपट गृहातील भावना व मोहन नव्हता असे असले तरीसुद्धा कोविडचा अंमल कमी झाल्यावर सिने रसिकांचा प्रतिसाद पुन्हा त्याच उत्साहाने व गर्दीत चित्रपटगृहे पुन्हा हाउसफुल होऊ लागली याचे एकमेव कारण चित्रपटाची मोहमयी दुनिया हे होय.

ॲड. विद्याधर भोसेकर
सांगोला

॥ शुभ दीपावली ॥

आमचे हितचिंतक, ग्राहक, शेतकरी बांधव व तालुक्यातील तमाम नागरिकांना दीपावली व नुतन वर्षानिमित्त हार्दिक शुभेच्छा !

शुभेच्छुक

गायत्री मार्ट

आता नव्या रूपात ....

नव्या स्वरूपात ...

खास वैशिष्ठ्ये -

* किराणा ऑल प्रॉडक्टस
* लहान मुला-मुलींचे कपडे.
* फुटवेअर, लेडिज-जेंटस गारमेंटस्.
* होम ऑल इलेक्ट्रिकल अप्लायन्सेस

मिरज-पंढरपूर रोड, हर्षदा लॉन्ससमोर, सांगोला, जि.सोलापूर

मो. ७७५६९७०२६६, ८३०८४००६०६, ९६६५६४२१८७

प्रोप्रा.महादेव गुंडिबा वाघमारे (मो.९६६५६४२१८७, ९०९६६१३४८९)

सांगोला तालुक्यातील तमाम नागरिकांना

दीपावली व नूतन वर्षानिमित्त

शुभेच्छुक

मा.सौ.पुनम आण्णासो सलगर (सरपंच)

मा.श्री.विठ्ठल राऊत (उपसरपंच)

श्री.मारूती पांडुरंग जुंदळे (ग्रामपंचायत अधिकारी)

सर्व ग्रामपंचायत सदस्य, कर्मचारी वर्ग व ग्रामस्थ

आलेगांव ग्रामपंचायत, ता.सांगोला

शुभदीपावली

आमचे असंख्य हितचिंतक, शेतकरी बांधव व तमाम नागरिकांना दीपावली व नुतन वर्षानिमित्त हार्दिक शुभेच्छा!

शुभेच्छुक

ग्रामपंचायत देवळे, ता.सांगोला

सरपंच– सौ. संगीता उद्धव खांडेकर

उपसरपंच – श्री. शिवाजी मारुती माळी

ग्रामपंचायत अधिकारी– सौ.सुरेखा सदाशिव लिगाडे

सर्व सदस्य, कर्मचारी वर्ग व ग्रामस्थ, ग्रामपंचायत देवळे ता. सांगोला.

सर्व ग्रामस्थ, शेतकरी बांधव व तमाम नागरिकांना दीपावली व नुतन वर्षानिमित्त हार्दिक शुभेच्छा !

लोकनियुक्त सरपंच

श्री.दादासाहेब जनार्दन घाडगे

उपसरपंच

सौ.प्रियांका सागर शेळके

: शुभेच्छुक :

श्री. पांडुरंग महादेव एखतपुरे
ग्रामपंचायत अधिकारी

सर्व सदस्य ग्रामस्थ व कर्मचारी वर्ग

ग्रामपंचायत शिवणे, ता.सांगोला

ती

विशाखा धावत पळतच रेल्वेस्थानकात घुसली. घरातुन निघतांना घाईघाईने खांद्यावर टाकलेली ओढणी एका बाजूने पार लोंबकळत होती.पास असल्यामुळे तिकीट काढायचा प्रश्नच नव्हता.येताबरोबर समोरच तिला लोकल दिसली. अगदी दरवाजांपर्यंत गच्च भरलेली. लेडीज डब्यापर्यंत जावे तर लोकल निघून गेली असती मग पुन्हां अर्धा तास लेट झाले असते. कसेतरी तिने स्वतःला समोरच्या डब्यात कोंबले अन सुटकेचा श्वास सोडला.कालपासून तिची मानसिक व शारीरिक ओढाताण होत होती.पण पर्याय नव्हता. काल तिच्या सास–यांचे वर्षश्राध्द होते.सासूबाईंनी जेवणासाठी पंचविशेक लोक बोलावले होते. नेहमीप्रमाणे शोधुनही स्वयंपाकासाठी बाई मिळाली नाही. त्यात धार्मिक कार्यात अडचण नको म्हणून मासिक धर्म लांबवण्यासाठी ती गोळ्या घेत होती.त्यामुळे तिचे शरीर जड झाले होते.एक दोन स्टेशन गेल्यावर कुठे तिला बसायला जागा मिळाली. अजून पाऊण तास होता तिचे स्टेशन यायला.तिने गच्च डोळेमिटून घेतले अन तिला लगेच झोपही लागली.पाचच मिनिटे झाली असतील की पुढचे स्टेशन आले.एकच गोंधळ उडाला अन् विशाखाची झोप उडाली.मग मात्र तिला झोप काही लागली नाही. डोक्यात ऑफिसच्या कामाचे वेध लागले होते.परवाचे प्रसंग तिच्याडोळ्यासमोर चित्रपटासारखे पुन्हा पुन्हा रूंजी घालूलागले.

काल तिच्या ऑफिसमध्ये तिचे एक प्रेझेंटेशन होते.तिची सगळी तयारीही झाली होती.पण नेमके त्याच दिवशी तिच्या सास–यांचे श्राद्ध होते.ती सुटीसाठी मिस्टर शहाणेंच्या केबिनमध्ये गेली.

सर मी आत येऊ का?

ये की विशाखा अग तुला परवानगीची काय गरज.

शहाणे डोळे मिचकावत बोलले.असे ऐकेरी नावाने तिला कुणी बोलावलेले तिला मुळीच आवडत नव्हते.पण बॉस समोर ती काहीच बोलली नाही.

सर उद्या माझ्याकडे श्राद्ध आहे.मला सुटी हवी होती.

अग पण उद्या तुझे प्रेझेंटेशन आहे ना ? आणि त्यावरच तुमचे प्रमोशन ठरवले जाईल .मग तुला प्रमोशन कसे मिळणार ,

सॉरी सर मला माहीत आहे हे सगळे पण खरेच मला शक्य नाही.मी माझे प्रेझेंटेशन

मिस्टर कुलकर्णींना दिले आहे.तीनमहिन्यांपासून मी तयारी करतेय पण वेळ मॅच होत नाही सर.मी तुम्हाला विनंतीही केली होती एक दिवस पुढेमागे करा पण....

तुम्हाला काय म्हणायचे ? मी ऑफिस तुमच्या सोयीनुसार चालवायचे का? प्रमोशन हवे मग कष्ट नको? बरे तुला दुसरा पर्यायही दिला आहे.माझी ईच्छा पुर्ण कर मग तुला कसलीच अडचण येणार नाही

सर मी हे कधीही मान्य करणार नाही.मी मेहनत घेतेय.माझी सर्व कामे चोख असतात मग मी का असा चुकीचा मार्ग स्वीकारावा?

असे बोलून विशाखा केबिनच्या बाहेर पडली होती.

लोकलमध्ये बसल्या बसल्या डोळे मिटून विशाखाला सगळे आठवत होते.आजकाल शहाणे जरा जास्तच दिडशहाणे झाले होते.

प्रत्येक स्त्री कडे ते एकाच चष्म्यातून बघायचे.आजकाल त्यांच्याबद्दल काय काय ऐकायला यायचे ऑफिसमधुन.त्यात तथ्यही होतेच की. तसा अनुभवही घेतला होता विशाखाने.ऑफिस पिकनिकच्यावेळी विशाखाला एकटी गाठून काय काय आमिष दाखवले होते त्यांनी.नको तेच विशाखाला आठवत होते.

मॅडम एकट्याच बसलात

हो वातावरण छान आहे म्हणून .

मीही तेच म्हणतोय.वातावरण छान आहे मग एकट्या का?तसे मी पण एकटाच आहे म्हणा.

हम

नाही तुमची हरकत नसेल तर आपण साथ देऊ शकतो एकमेकांना आजची रात्र

विशाखा थोडी घाबरली होती पण काहीही न बोलता तिथून निघून गेली.त्या दिवसापासून विशाखा मात्र अंतर ठेऊनच वागत होती.

जेव्हापासून ऑफिसमध्ये प्रमोशनचे वारे सुरू झाले तसे शहाणे साहेबांनी एकदोन वेळा पुन्हा प्रयत्नकरून पाहीला होता. त्यामुळे विशाखाची मानसिक ओढाताण होत होती. घरी नव–याला सांगून उपयोग नव्हता कारण त्याच्यासाठी ती फक्त पैशांची मशीन होती. पगाराची अधिकारी ती फक्त कागदोपत्री. तिचे प्रमोशन शक्यच नव्हते.संपूर्ण परिस्थिती तिच्या विरोधात होती. विचारांच्या तंद्रितच ती ऑफिसमध्ये आली.तिला थोडा उशीरच झाला होता.आत शिरता बरोबर तिला कुलकर्णी दिसले.

मॅडम पेढा घ्या पेढा ...

अरे वा ..कसला पण ?

माझे प्रमोशन झाले. काल मी केलेले प्रेझेंटेशन सर्वांनाआवडले.

पण ते तर माझे प्रेझेंटेशन होते ना?

साहेबमध्येच केबिनमधून येत बोलले.

तुम्ही घ्या रजा ... हवी तर कायमचीच देतो रजा चालेल का?

सर पण मी सांगितले होते तुम्हाला.

हो हो मोठे उपकारच केलेत की. तुम्हाला प्रेझेंटेशन ही नाही करायचे आणि सहकार्यही नाही करायचे.वरून प्रमोशन हवे... प्रमोशन म्हणजे काय गणपतीचा प्रसाद वाटला होय मागेल त्याला वाटायला?

सर पण मी मेहनत केली होती ना?

विशाखाच्या बोलण्यावर शहाणे आणि कुलकर्णी फक्त जोरजोरात हसून निघून गेले.विशाखा तिच्या जागेवर येऊन फक्त बसून राहीली.प्रमोशन का झाले नाही या प्रश्नाचे उत्तर घरी काय सांगायचे हा विचार मात्र तिच्या डोक्यातथैमान घालत होता......

सौ.माधुरी महेंद्र चौधरी
९४२११८६०८७३
madhurimchaudharigmail.com

आमचे असंख्य ग्राहक, हितचिंतक, मित्र परिवार व तमाम नागरिकांना दीपावली व नूतन वर्षानिमित्त

हार्दिक शुभेच्छा

निवारा इन्फ्रास्ट्रक्चर सांगोला

Quality is our Business Plan

सर्व प्रकारचे बांधकाम व इंटेरिअर करून मिळेल.

शुभेच्छुक

इंजि. आकाश म्हेत्रे ९६६५९३४९००

इंजि.सागर आवताडे ९७३०८७८८१६

कर्मवीर नगर रोड नं. ३, वासुद रोड, सांगोला

niwarainfrastructure999@gmail.com

|| शुभ दीपावली ||

आमचे असंख्य ग्राहक, हितचिंतक, मित्र परिवार तसेच तमाम नागरिकांना दीपावली व नुतन वर्षानिमित्त हार्दिक शुभेच्छा !

वास्तु सुंदर व मजबूत असावीच पण शांत व समाधानी असणं महत्त्वाचं... अन् त्यासाठी भारतीय वास्तुशास्त्र महत्वाचं. वास्तुशास्त्र सल्ल्यासाठी आम्ही आपणास भेटण्यास आतूर आहोत...

इंजिनिअर संतोष भोसले

शुभेच्छुक

ॐ कन्स्ट्रक्शन्स्

इमारतीचे प्लॅन, इस्टिमेट, डिझाईन, सुपरव्हिजन व पाईप लाईन इस्टिमेट यासाठी भेटा.

ऑफिस : नगरपरिषद शॉपींग सेंटर, गाळा नं.२०, वरचा मजला, नगरपरिषदेजवळ, सांगोला

फोन (०२१८७) २२१०२३/९४२३३३३७७९/९७६४९५०९५०

आमचे असंख्य ग्राहक, हितचिंतक, मित्र परिवार व तमाम नागरिकांना दीपावली व नूतन वर्षानिमित्त

।। श्री सिताराम महाराज प्रसन्न ।।

हार्दिक शुभेच्छा

श्री.मोहन प्रभाकर कुलकर्णी (गुरूजी)

आमच्याकडे सत्यनारायण पूजा, वास्तुशांत, जननशांत, नवग्रहशांती, लग्न, होमहवन, मूर्तीस्थापना, नवचंडी होम, कालसर्प शांती, अभिषेक व इतर सर्व धार्मिक विधी शास्त्रोक्त पध्दतीने केले जातील.

मु.पो. खर्डी, ता.पंढरपूर, जि.सोलापूर मो. 9860883095, 9272253591

श्री.अमित मोहन कुलकर्णी (ज्योतिषप्रविण)

आमच्याकडे जन्मकुंडली, नवमांश कुंडली, भावचलित कुंडली, षड्वर्ग कुंडली काढून मिळेल

तसेच कॉम्प्युटर जन्मपत्रिका तयार करून मिळेल.

मु.पो. खर्डी, ता.पंढरपूर, जि.सोलापूर मो. 9823073393

वारी

जय हरी विठ्ठल जय जय विठ्ठलचा अखंड नामघोष सुरू होता. ती झपझप पावले टाकत होती. झिमझीम पाऊस येत होता. तास, दोन तासात पाऊस चांगले उग्र रूप घेणार असल्याचे चिन्ह दिसत होते. आकाश मेघांच्या दाटीने काळेशार झाले होते. तरीही सावळ्याला भेटायची उर्मी वारकऱ्यांमध्ये तसूभरही कमी होत नव्हती.

तिने आजूबाजू पाहिले. कपाळी केशरी टिळा, हातात टाळ-चिपळ्या किंवा भगव्या पताका, डोईवर मंजिरी-तुळस, डोळ्यात निरागस श्रद्धा घेऊन मोजताही न येईल इतके अगणित वारकरी तल्लीन होऊन चालत होते. जणू पांढऱ्या शुभ्र वस्त्रातील महासागरच. समुद्रात जशा लाटा उठाव्या अन् अवघ्या आसमंताला चैतन्य बहाल व्हावे तसे घाटाघाटातील अवर्णनीय सोहळ्यादरम्यान वाटत होते.

छोट्या छोट्या परकरी मुलींसह वयस्क बायाबापडेही लाजत मुरकत फुगडी खेळत होते. रामकृष्ण हरीच्या गजरावर टाळ्यांचा नाद उमटत होता. रिमझिम थेंबही ताल धरत होते. अश्वाचे रिंगण, त्या अश्वाला केलेला नमस्कार माऊलीला मिळतोच या अपार भावनेने अश्वाला पूजणारे गावोगावचे रहिवासी, भक्तिरसात फुललेली पालखी ...सगळे कसे अनुपम आनंददायी दृश्य होते.

फुलपाखरासारखे भिरभिरणारे तिचे चित्तही त्या सहजसुंदर अनुभूतीत रमून गेले. आपण वारीत विशिष्ट उद्देशाने आलोय, गेल्या पाच वर्षांपासून त्यासाठीच येतोय याचा तिला अबलख विसर पडून गेला. मोबाईलच्या रिंगने ती किंचित भानावर आली. पावसाने अंग बऱ्यापैकी ओले झाले होते. धर्मशाळा पाच मिनिटात येणारच होती. तिथे पोहचून फोन करावा असा विचार करत तिने फोन तसाच वाजू दिला.

फोन आईचाच असणार याची तिला खात्री होती. दरवर्षी बरोबर दिवेघाट पार केला की तिचा फोन येतो. अगदी नेमाने. 'त्यांची' अन् आईची इथेच तर चुकामुक झाली होती ना? 'त्यांच्या' आठवणीने तिच्या छातीत धडधडले. अनंत विचारांच्या आवर्तनात मन गरगरु लागले. असे कसे विपरीत घडून गेले आपल्या हातून? काय करून बसलो आपण पौंगंडावस्थेत? देवतासमान पित्याला देशोधडीला लावले. भरल्या संसारातून खेचून दूर निघून जायला भाग पाडले. एव्हढे मोठे पाप कसे घडले आपल्याकडून?

भिजलेले कपडे बदलताना जुन्या स्मृतींचा पट तिच्या डोळ्यासमोर झरझर नाचून गेला. त्या स्मृतिचित्रातील इतर सारी पात्रे तर आपापल्या लयीनुसार व्यवस्थित मंडल घेत होती. त्यांच्या शांत हालचालींना जबर दणका देणारा थयथयाट तिचाच सुरू होता. कशी विसरणार होती तीही तो दिवस नि तिच्या अबोध मनाने केलेली गंभीर आगळीक?

तेरा वर्षांची होती ती जेव्हा आईचा पुनर्विवाह करण्याचे आजोबांनी योजले. आई राजीच नव्हती पण आईला हरेक प्रकारे समजवण्यात आले. आईसोबत तिनेही 'त्यांना' पाहिले. मिस्टर दीक्षित. आईपेक्षा पाचसात वर्षांनी मोठे, जरासे स्थूल, पुष्कळ हसरे. निर्मळ. भरभराटीला आलेला छोटासा व्यवसाय होता त्यांचा. सुखवस्तू होते. गावी भरपूर शेती, जमीनजुमला. लहान बहीण भावंडांचे करताना त्यांचे लग्नाचे वय उलटून गेले. आता त्यांनाही कुणीतरी आग्रह धरला नि ही सोयरीक जुळून आली.

तिला नाही पसंत पडले ते. त्यांना भेटून भर पावसात घरी येतांना तिच्या डोळ्यांतले अश्रू इतरांना दिसले नाहीतरी आईला अचूक जाणवले होते. रिक्षात बसल्या बसल्या अनेकदा आई तिचे डोळे पुसत होती. कसे म्हणणार ती त्यांना बाबा? तिचा बाबा केव्हढा स्मार्ट, हँडसम होता. तिला कडे उचलायचा, पापी घ्यायचा. तिचे आवडते सिल्क चॉकलेट द्यायचा. आई बाबा सोबत कसे सुंदर सुंदर दिसायचे. देवाला मात्र हे सुख पाहवले नाही. क्षुल्लकशा आजाराचे निमित्त झाले अन् तिचा बाबा देवाघरी गेला. तेव्हापासून घरात ती आणि आई,दोघीच. तुफानी पावसात उडालेल्या छतानंतर राहिलेल्या ओलसर भिंतीसारख्या एकाकी. मुक्या.

तिची भावना ओळखून आई गप्पच होती

आमचे असंख्य मित्रपरिवार, हितचिंतक, शेतकरी बांधव, शिक्षक बांधव
व तमाम नागरिकांना दीपावली व नुतन वर्षानिमित्त हार्दिक शुभेच्छा!

श्री.धनंजय तुकाराम पाटील

शुभेच्छुक

शुभदिपावली

श्री.धनंजय तुकाराम पाटील (आदर्श शिक्षक)

पाटील परिवार, एखतपूर, ता.सांगोला

आमचे असंख्य हितचिंतक, मित्र परिवार व
तमाम नागरिकांना दीपावली व नूतन वर्षानिमित्त हार्दिक शुभेच्छा

शुभदिपावली

डॉ.शिवराज भोसले (बी.ए.एम.एस.)
जनरल फिजिशियन व सर्जन
Regd No. 1-30133-A1

डॉ.सौ.स्नेहल भोसले (बी.एच.एम.एस.)
स्त्रीरोग व प्रसुती तज्ञ
Regd No. 1-36614

भोसले हॉस्पिटल

- प्रसुतीपूर्व तपासणी व सल्ला
- प्रसुतीपश्चात तपासणी
- सुलभ बाळंतपणाची सोय
- स्त्रीरोग निदान व उपचार
- वंध्यत्व चिकित्सा
- नेब्युलायझेशन (वाफ देणे)
- लॅबोरेटरी
- सिझेरियन व गर्भाशयाचे आूपरेशन
- सर्व प्रकारच्या जनरल सर्जरीची सोय
- सौंदर्य समस्यांवर उपचार
- तज्ञ डॉक्टारांच्या भेटी

न.पा. शॉपिंग कॉम्प्लेक्स, आणाभाऊ साठे पुतळ्याजवळ, सांगोला

शुभ दीपावली.. !

आमचे असंख्य ग्राहक, हितचिंतक, शेतकरी बांधव व तमाम
नागरिकांनादीपावली व नुतन वर्षानिमित्त हार्दिक शुभेच्छा !

श्री.सुरेश विष्णू माळी (आप्पा)

- माजी उपनगराध्यक्ष, सांगोले नगरपरिषद सांगोले
- अध्यक्ष : सांगोला आडत अझचउ असोसिएशन
- संचालक : सांगोला अर्बन बँक, सांगोला (मो.९४२२४६३३७९)

श्री.सुरेश विष्णू माळी उद्योग समुह

- श्री.साई फ्रुट सप्लायर्स ॲण्ड एक्सपोर्टस् कमिशन एजंट APMC मार्केट दुकान नं.३
- महेश फ्रुट कंपनी ॲण्ड कमिशन एजंट दु.नं.४
- नितीन फ्रुट ॲण्ड व्हिजिटेबल कमिशन एजंट आठवडा मार्केट बाजार दुकान नं.७
- श्री.सुरेश विष्णू माळी फ्रुट ॲण्ड कमिशन एजंट आठवडा मार्केट बाजार दुकान नं.८
- महेश रायपनिंग चेंबर ॲण्ड कोल्ड स्टोअरेज जय भवानी चौक, मो.

सगळ्यांच्या चर्चेत. समस्त कुटुंबियांसमोर आई किती अगतिक आहे हे तिला चांगल्यानेच कळत होते पण तरीही आईने ठामपणे नकार द्यावा हीच तिची एकमेव अपेक्षा होती. तसे झाले नाही. घरात वाजंत्री वाजली. तिची आई मनोरमा पांडे ची मनोरमा वामन दीक्षित झाली. आपल्या फ्लॅटचे एक एक दार बंद करून मिस्टर दीक्षितांच्या घरात जातांना तिच्या मनाला अनंत इंगळ्या डसत होत्या. कसे घर होते त्यांचे विचित्र. मागून पुढून उघडे. इकडून कुणी शिरेल तर, तिकडून कुणी शिरेल तर? तिला भीती वाटायची.

तिच्या बाबाने किती छान रंगवून दिली होती तिची रूम. मस्त बेबी पिंक कलर, त्यात छोटे छोटे पीओपीचे हार्ट, दारावर तिच्या लाडुल्या स्नो व्हाईटचे पोस्टर. आत बंक बेड. वर तिच्या बाहुल्या निजायच्या खाली ती. या लग्नाने अचानकच तिची ती उबदार जागा हिरावल्या गेली. तिचे मन खूप दुखले. इथल्या सपाट पांढऱ्या भिंतीच्या खोलीत तिचे मन रमेना. त्यात आई रात्री 'त्यांच्या' खोलीत शिरतांना दिसली की तिच्या अंगाचा तीळपापडच उडे. रात्र रात्र जागी राहून ती खिडकीतून दिसणाऱ्या चांदण्या पहात राही.

इथे काहीच आपलं वाटेना तिला. मग वरच्या काळ्या आकाशात विविध आकार शोधत राही. नभाच्या पुंजक्यात आपला बाबा दिसतो का म्हणून निक्षून पाही. कोऱ्या करकरीत काळोख्या अवकाशाशिवाय आसपास, वरखाली काहीच नसे. ती रडकुंडीला येई. हळूच 'त्यांच्या' खोलीला कान लावी. तिची अवस्था माहिती असल्यासारखे शंभर वेळा आई खोलीच्या बाहेर येई. काळजीने तिच्या पाठीवर हात फिरवी. तिला नको वाटे तो स्पर्श आताशा. आईच्या त्या स्पर्शाला मिस्टर दीक्षितांच्या शरीरासारखा वास येई.

कपाळावर अष्टगंध लावलेल्या मिस्टर दीक्षितांच्या सदऱ्याच्या खिशात नेहमीकापराची एक छोटी वडी असे. ते जवळून गेले की नाकाजवळ तो वास हुळहुळे. त्यांची देवपूजा, आरती-स्तोत्र म्हणतानाचा स्निग्ध चेहरा नकोच वाटे तिला बघायला. ज्या बाप्पाने तिच्या बाबाला नेले त्या देवाचा तर ती काळासारखा राग राग करी. मिस्टर दिक्षितांनी तिच्या हातावर प्रसादाची खडीसाखर ठेवली तर लगेच ती फेकून देई.

तिच्या रागावर, संतापावर ते काहीच बोलत नसे. खालमानेने निघून जात. एकदा तिरमिरीत तिने आईला सांगितलेच, मी नाही रहात या घाणेरड्या घरात, मी आपल्या फ्लॅटमध्ये चालली रहायला. चौदा वर्षाच्या तिच्या कोरड्या अविर्भावापुढे आई गारच पडली. बाबापुता करू लागली. तिला ठाऊक होते आई तिच्याशिवाय कदापिही राहणार नाही. ती हेकेखोरी करू लागली. निघून जायच्या धमक्या देऊ लागली. शेवटी आईने तिच्या पायावर लोटांगणच घातले तेव्हा मात्र तिचा जीव कळवळला.

का नाही सोडत तू त्या माणसाला? जोरात खेकसून ती आत चालली गेली. आईने कितीही लपविले तरी तिची भयंकर नाराजी 'त्यांच्या' नजरेतून सुटली नव्हती. ते खूप प्रयत्न करायचे तिच्याशी नाते जुळवायचा, सामोपचाराचा.पण ती अतिशय कटूपणे पुढयातून उठून जायची. त्यांना एकही शब्द बोलू द्यायची नाही. संवादाचा हा पूल कसा सांधावा हेच त्यांना कळेना. त्यांची हतबलता बघून तिला समाधान वाटायचे. माझ्या बाबाची जागा घेतो नाही का मग भोग शिक्षा ती मनोमन पुटपुटायची.

दीड दोन वर्ष असेच गेले. घरातले दिनमान खराब झाले. मोकळेचाकळे हसणे बोलणे हरवून गेले. सतत मळभ आल्यासारखे तिघेही कानकोंडले राहू लागले. जुलै महिन्यात जेव्हा पावसाच्या अखंड धारा कोसळू लागल्या नि ते वारीला जायला निघाले तेव्हा आपणही जाऊयात का वारीला असे आईने तिला विचारले. आईला आषाढवारीला जायची खूप इच्छा असते हे ती जाणत होती. कारण दरवर्षी जेव्हा आषाढीचे वेध लागत तेव्हा आई टीव्हीवर दाखवणाऱ्या वारकऱ्यांना, विठ्ठलाच्या मंदिराला आसुसून पहात असे. मनोभावे वारी करायचे आईच्या प्रचंड मनात होते. बाबा असताना आईचे हे सर्व मनसुबे तिला खूप आवडत. तिने आणि बाबाने ठरवलेही होते ती जरा मोठी झाली की वारीला जायचे. त्या गंधभारल्या कल्पनेने ती आषाढाच्या पावसात मनसोक्त थिरकायची. पण बाबा गेला सारी सारी स्वप्न मिटली. त्या तिघांनी पाहिलेली स्वप्न या या मिस्टर दिक्षितांसोबत पूर्ण करायची? छट, कोण हे आपले?

तू जा नं, मी राहीन आजीकडे आपल्या उत्तराच्या प्रतीक्षेत थबकलेल्या आईला ती म्हणाली.

तूही चल, वेगळा सुंदर अनुभव मिळेल, आईने तिला आग्रह केला. आईला दुजोरा द्यायला म्हणून मिस्टर दिक्षितही आईमागे येऊन उभे राहिले. त्यांना पाहिल्यावर तिच्या मस्तकाची आगच झाली.

मी काय करू तुमच्या हनिमूनमध्ये येऊन? ती उध्दटपणे उद्गारली. आईने तर हातच उगारला तिच्यावर पण मिस्टर दिक्षितांच्याही चेहऱ्यावर अतीव वेदनेची ठळक रेषा चमकली.

आई खूप दुखावल्या गेली तिच्या बोलण्याने. कधी नव्हे ते तिला आजीजवळ सोडून मिस्टर दिक्षितांसोबत वारीला चालली गेली. तिला बरेच वाटले. त्या रात्री मिस्टर दीक्षितांच्या खोलीत जाऊन त्यांच्या सामानाची नासधूस करायचेच ठरवले तिने. त्यांची जपमाळ तर कधीचीच तोडायची होती तिला. त्या उद्देशाने गेलीही ती खोलीत पण आत दरवळत असणाऱ्या सौम्य कर्पूर गंधाने आपसूकच तिचे मन निवळायला लागले. पलंगावरची पांढरी शुभ्र चादर, फुलदाणीत खोचलेली काही फुले, भिंतीवरची विठ्ठल रुखमाईची तसबीर, त्यातून येणारा चंदनाचा सुवास तिला शांतवत गेला. चिरफाडलेल्या मनासह ती कितीतरी वेळ तिथे निमूट बसून राहिली.

जाग आली तेव्हा तिच्या डोक्यावरमायेचा हळुवार हात फिरल्यासारखे वाटले. रोजच या हाताच्या

॥ शुभ दीपावली ॥

आमचे असंख्य ग्राहक, हितचिंतक, मित्रपरिवार, आप्तेष्ट नातेवाईक
व तमाम नागरीकांना दीपावली व नूतन वर्षानिमित्त हार्दिक शुभेच्छा!

दत्तदर्शन दस्तऐवज

श्री.मनोज पांडुरंग भोसले

मुद्रांक व्रिकेता सांगोला (मो.९२२६१७४०२३)

आमचेकडे सर्व प्रकारचे दस्त खरेदीखत, बक्षिसपत्र, गहाणखत करुन मिळतील.

नगरपरिषद शॉपिंग सेंटर, तहसिल कार्यालय समोर, वरचा मजला,सांगोला

माजी जिल्हाध्यक्ष, शेतकरी आघाडी

आमचे असंख्य हितचिंतक, मित्रपरिवार, व्यापारी वर्ग,
शेतकरी बांधव व सोलापूर जिल्ह्यातील तमाम नागरीकांना
ही दिपावली आनंदाची, प्रगतीची मांगल्याची व
भरभराटीची जावो याच हार्दिक शुभेच्छा !

शुभेच्छुक

श्री.शिवाजीराव गायकवाड

माजी अध्यक्ष, सो.जि.शेतकरी आघाडी, भारतीय जनता पार्टी

सदस्य, लाडकी बहिण योजना समिती सांगोला तालुका

गायकवाड परिवार, कडलास, ता.सांगोला,जि.सोलापूर

आमचे असंख्य ग्राहक, हितचिंतक, मित्रपरिवार व तमाम नागरिकांना दीपावली व नूतन वर्षानिमित्त हार्दिक शुभेच्छा!

शुभेच्छुक

श्री.गणेश गंगाधर देशपांडे

स्टँप व्हेंडर व बॉण्ड रायटर

राजमाता मोबाईल शॉपी, कचेरी रोड, सांगोला जि सोलापूर

मो.९९२३१६६६०१

गणेश फोटो स्टुडिओ

(प्रोप्रा.गंगाधर शंकर देशपांडे) चिंचोली, ता.सांगोला

देशपांडे परिवार
चिंचोली, ता.सांगोला

मायाळू स्पर्शाचे तिला झोपेत प्रकट भास व्हायचे. आपला बाबा येऊन गेला असेल असे ती स्वतःची समजूत काढायची. ते आज चर्रकन तिला जाणवले की तो हात मिस्टर दिक्षितांचा असायचा. याचा अर्थ तिला गाढ झोप लागली की ते तिच्याजवळ येऊन बसत. तिला प्रेमळपणे थोपटत. कारण जागेपणी तर ती त्यांच्या वाऱ्यालाही उभी रहात नसे.

ती जसजशी खोल्याखोल्यांतून फिरायला लागली तसतशी तिला त्या दोघांची खूप आठवण यायला लागली. खरं सांगायचे तर मिस्टर दिक्षितांचीच जास्त. आपण त्यांच्यासोबत, त्यांच्यामुळे आईसोबत किती वाईट वागलो ही भावना तिला कुरतडायला लागली. नाही म्हंटले तरी मिस्टर दीक्षित त्यांच्या साध्या सरळ वागणुकीने आपल्या मनाचा नव्हे निर्विवादपणे आपल्या आयुष्याचा भाग झालेय हे तिचे तिलाच उमजले. त्यांना त्रास द्यायचा नाही, त्यांच्यावरून आईला उलटेसुलटे बोलायचे नाही, त्यांचे नाते समजून घेऊन आपणही त्या उत्तम संबंधाचा एक बहरलेला भाग व्हायचे तिने निश्चित केले. ती नकळतपणे त्या दोघांची वाट बघू लागली.

आषाढी एकादशीनंतर जेव्हा आजी म्हणाली, आज येईल गं ते, तेव्हा तिने त्यांची खोली स्वतः साफ केली. ते खोवत तसे फुलदाणीत फुले रचली. पलंगावरची चादर नीट लावली. दारात छानशी रांगोळी काढली. आजीसोबत दोघांच्या येण्याची आतुरतेने वाट बघत बसली.

एखादे ताठ झाड धप्पकन कोसळावे व सारा पालापाचोळा अवतीभवती पसरावा तशी आई एकदम घरात शिरताच ती घाबरूनच गेली. अस्ताव्यस्त पिंजारलेले केस, मळकट साडी अन् भान हरपलेला आईचा चेहरा पाहून आजूबाजूचे शेजारीही गोळा झाले. काय झाले हो, काय झाले हो? यजमान कुठे आहेत? जो तो विचारू लागला. काय माहिती काय माहिती या अर्थाचे आई नुसते हातवारे करत होती. तिच्या तोंडून शब्दही फुटत नव्हता.

दिवेघाटात भाऊंची आणि वहिनीची चुकामुक झाली, खूप शोधले त्यांना. पोलीस, वारकरी, पंढरपुरातील रहिवासी, दुकानदार, पुजारी सगळ्यांना विचारले, मंदिराचा चप्पाचप्पा छानला पण दीक्षित भाऊ काही मिळाले नाही. चंद्रभागेत बुडालेल्यांचीही यादी पाहिली, घाटात जीव गेला ते देहही तपासले पण भाऊंचा कुठेच पत्ता लागला नाही. कुठे गडप झाले कुणास ठाऊक? सोबतीचा वारकरी सांगत होता. तिच्या तर हृदयावर मोठा दगड पडल्यासारखेच झाले. आईच्या नजरेला नजरही देववेना. त्यांच्या परत न येण्याला कुठेतरी आपणच जबाबदार आहोत का ही शंका तिला टोचू लागली. तीही त्या गर्दीत मुकाट होऊन बसली.

सत्पुरुष होता कुठे लुप्त झाला कोण जाणे? आपापल्या घरी जाता जाता सारे हळहळले. बाबा गेल्यानंतर तिला हा दुसरा जोराचा मानसिक धक्का बसला.

ती सकाळी उठली तेव्हा आई चहाचे आधण ठेवत होती. तिने थोडी चुळबुळ चुळबुळ केली पण आईचे तिच्याकडे लक्षच नव्हते. ती थोडी खाकरली. विचारावे तर लागेल ना कसे हरवले ते? इथेही पोलिस ठाण्यात कम्प्लेन्ट देऊन त्यांना शोधायला सांगावे लागेल.

आई..

काय गं?

उठलीस, कॉफी देऊ?

बैस! तिच्याकडे न पाहताच आई म्हणाली. तिच्या काळजात खूप तटतटले. काही क्षण ती स्तब्ध उभी राहिली. पण तिला विचारल्याशिवाय रहावेना.

आई, कसे हरवलेत गं बाबा?

तिचा प्रश्नही पुरा झाला नव्हता तोच आई विजेसारखी कडाडली, बाबा नाही मिस्टर दीक्षित.

ती गर्भगळीतच झाली. मागे सरकली. त्वेषाने आई तिच्या अंगावर धावून आली, असाच, असाच उल्लेख करायचीस ना त्यांचा, तो मिस्टर दीक्षित, तो मिस्टर दीक्षित, अरे कितीवेळा सांगितले ते ऐकतात बरं, त्यांना वाईट वाटेल पण ऐकायचे नाव नाही, शिंग फुटले होते ना वयाला. गेले ते सर्व कटकटींना कंटाळून निघून. नाही यायचेत परत. त्यांना वाटायचे त्यांच्यामुळे आपल्यात दुरावा निर्माण होतोय. मायलेकी एकमेकींपासून तुटत आहे. हळव्या हृदयाचा,माणुसकी, नातेसंबंध जपणारा पुरुष होता तो. चालले गेले आपल्यापासून दूर न सांगता. एका दमात आई बोलून गेली.

त्यानंतर दोघीही अंतर्मुख झाल्यात. आईने पुन्हा कधी तुझ्यामुळे ते निघून गेलेत असा चुकूनही आरोप केला नाही. त्यांच्या नातलगांनी, आईच्या लोकांनी खूप शोध घेतला त्यांचा. वारंवार पंढरीला जाऊन पाहिले पण प्रत्येकवेळी हाती शून्यच आले. जेव्हा त्यांच्या सर्व इस्टेटीचे तिच्या नि आईच्या नावे असलेले कागदपत्र त्यांच्या हाती पडले तेव्हा ते मनाशी पक्के ठरवूनच घरापासन दूर झाल्याचे दोघींच्या लक्षात आले.

ओळखीची मंडळी विचारपूस करायला यायची. संसारी माणसाला आईवडील अथवा पत्नीची परवानगी न घेता असा गृहस्थाश्रम त्यागता येत नाही म्हणायची, कारणमीमांसा करायची किंवा एखादा अकस्मातच ते पंढरपुरात दिसल्याचे सांगायचा तेव्हा त्यांच्या आशा पल्लवित व्हायच्या. नव्या जोमाने ते धुंडाळायला जायचे पण पदरी निराशाच पडायची. तरी प्रत्येक वारी दरम्यान ते गर्दीत दिसले, विठ्ठल मंदिरात दिसले, महाप्रसादात दिसले, नामदेव पायरीजवळ झळकले, चंद्रभागेकाठी उभे होते अशी काही ना काही वार्ता यायची आणि अवकाळी पाऊस यावा तसे आईचे डोळे झरायचे. तिने मात्र अपराध्यापोटी मनातला दुःखभार कधीच डोळ्यांतून धो धो वाहू दिला नाही.

दिवस वाऱ्याच्या वेगाने पळत होते. पाहता, पाहता ती इंजिनिअर झाली. बंगलोरच्या नामांकित कंपनीत नोकरीला लागली. चांगला घसघशीत पाच आकडी पगार मिळू लागला. यथावकाश लग्न झाले.

आमचे असंख्य मित्र परिवार, विविध संस्थांचे पदाधिकारी, हितचिंतक व तमाम नागरिकांना दीपावली निमित्त हार्दिक शुभेच्छा !

शुभेच्छुक

सीए उत्तम डी.बनकर ॲण्ड कंपनी

सीए. उत्तम बनकर
(एम.कॉम), एफ.सी.ए.

चार्टर्ड अकौंटंट

ऑफिस : उत्कर्ष, १६५९, देशपांडे प्लॉट, एस.टी.स्टँड समोर, सांगोला– ४१३ ३०७, जि.सोलापूर
फोन : (ऑ)०२१८७/२२१०५३, (घ) २२१३७७, मो.९४२२४ ५८४९३, ९५२७०४७४९३
Email- uttamca@rediffmail.com

शुभदीपावली

शुभेच्छुक

आमचे असंख्य मित्रपरिवार, हितचिंतक, व तमाम नागरीकांना दीपावली व नूतन वर्षानिमित्त हार्दिक शुभेच्छा!



यशोदा हॉस्पीटल

२५ वर्षांचा प्रदीर्घ अनुभव

- मॅटर्निटी
- गायनॅक
- सर्जिकल
- सोनोग्राफी

वेळ : सकाळी १० ते दु. ३, सायं. ६ ते ८

अत्यावश्यक सेवा २४ तास

उपलब्ध सुविधा : स्त्रीरोग चिकित्स, प्रसुतिगृह, शस्त्रक्रिया विभाग, अल्ट्रा सोनोग्राफी (सरकारमान्य), वंधत्व चिकित्सा, लेप्रोस्कोपी, कॅन्सर निदान व उपचार, फॅमिली फिजीशियन, सरकारमान्य गर्भपात व कुटुंब नियोजन केंद्र आय.यु.आय. लॅब, हिस्ट्रेस्कोपी

डॉ.विजय एस.बंडगर

एम.बी.बी.एस., डी.जी.ओ.(वंधत्व तज्ञ)
स्त्रीरोग, प्रसुती व सोनोग्राफीतज्ञ
संचालक : पंढरपूर आय.व्ही.एफ. सेंटर
समृध्दी अर्बन को ऑप.बँक, सांगोला

वाढेगांव नाक्याजवळ, सांगोला फोन ०२१८७-२२०४८४

नवराही बड्या पोस्टवर. मूल झाले, पाच वर्ष उलटले. जीवनात ती बरीच स्थिर झाली. पण आतल्या आत तिचे मन तिला सदैव खात रहायचे. 'त्यांच्या' संसारातून निघून जाण्याला ती स्वतःला कारणीभूत ठरवायची. एक दिवस तिने या साऱ्या गोष्टी जोडीदाराला सांगितल्या. तोही खूप हेलावला.

मी दरवर्षी वारीला जात जाईल तुषार, त्यांचा कसून शोध घेईल, मला त्यांना परत आणायचेच आहे, तिने आपला निश्चय जाहीर केला. नवऱ्यानेही पाठींबा दिला. तेव्हापासून ती दरवर्षी न चुकता वारी करते. रात्रंदिवस डोळे उघडे ठेवून त्यांना शोधते.

तसा आईचा फोन सतत येतच असतो तिला पण वारीत विशेष आशेने येतो. ज्या घाटात ते आईचा डोळा चुकवून गायब झालेत तिथे ती पोहोचली की चारचारदा येतो. त्यावेळी आई खूप अवांतर बोलत राहते. शब्दानेही विचारत नाही ते दिसले का? त्यांच्याबद्दल काही कळले का?तिला माहिती असतं आईला निदान त्यांची खुशाली तरी कळावी एव्हढीच माफक इच्छा आहे. पण ते दिसतच नसल्याने ती तरी काय सांगणार आईला त्यांच्याबद्दल?

आताही आईशी जुजबी बोलून तिने फोन ठेवला. दुःखातिरेकाने तिचे मन भरून आले होते. विखरू पाहणाऱ्या आशा जमा करत ती पुन्हा वारीत चालू लागली. ऊन वारा पाऊस सोसत भोळ्या वारकऱ्यांची दिंडी पंढरपुरात येऊन धडकली. दुरूनच कळस दिसताच तिचाही पूर्ण शिणवटा गेला. पंढरीराया, सावळ्या देवा या खेपेला तरी त्यांची भेट घडू दे रे. मला त्या भल्या माणसाच्या पाया पडून मनापासून माफी मागायची आहे. त्यांना बाबा म्हणून हाक मारायची आहे. आईसाठी घरी चलायचा आग्रह करायचा आहे. असंख्य विचार तिच्या डोक्यात येत होते जात होते. पायरीशी तळ ठोकून ती वेड्यासारखे प्रत्येक भाविकाला आपादमस्तक निरखत होती. सालस भाबडा चेहरा दिसला की मिस्टर दीक्षित म्हणत उचंबळून उठत होती. विठ्ठलाचेही दर्शन घेतांना तिचे डोळे त्यांचाच शोध घेत होते. कुठे लपवले रे त्यांना ती चिडून विठ्ठलाला विचारी.

यावेळीही दर्शन, मुखदर्शन, महाप्रसादाची बारी, दिंडी-पालख्या, परिसरातील रंगीत दुकाने, आसपासच्या सर्व धर्मशाळा, पोलिसचौकी, घरं असे सगळीकडे शोधले तिने त्यांना. पण व्यर्थ. त्यांच्याबद्दल कुठेच काहीच कळले नाही. शेवटी मलूलपणे रेती तुडवत ती चंद्रभागेजवळ आली. तू तरी सांग त्यांचा पत्ता तिच्या मनाने आर्जव केले.

निळ्या जांभळ्या गर्द घनदाट ढगांखाली झडीचा पाऊस झेलत चंद्रभागा मात्र कसलीही खळखळ न करता निमूट वहात होती.

जयश्री दाणी
मो. ७६२०६९०११७

****

शुभ दीपावली.. !

आमचे मित्र परिवार, असंख्य हितचिंतक, शेतकरी बांधव व तमाम नागरिकांना दीपावली व नुतन वर्षानिमित्त हार्दिक शुभेच्छा !

शुभेच्छुक

डॉ.पिसे डायग्नोस्टिक सेंटर व बालरुग्णालय

पत्ता : सर्व्हे नं.१७६/६, टाईल स्टुडिओ शेजारी, डॉ.माने-देशमुख यांच्या आधार हॉस्पिटल मागे, कडलास रोड, सांगोला, जि.सोलापूर
(मो.८८०५०३१४१५) Email Id- drsantoshpise@yahoo.com

डॉ.सौ.संगिता पिसे
M.B.B.S.DCH
Reg.No. 2005010540
(बालरोग तज्ज्ञ)

डॉ.संतोष पिसे
M.B.B.S.DMRD, DNB (RD)
Reg.No. 2004020589
(सोनोग्राफी व क्ष-किरण तज्ज्ञ)

आमचे असंख्य ग्राहक, हितचिंतक, मित्र परिवार व तमाम जनतेस दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा...!

श्री.बाळू आनंदा गावडे
9921901910, 9860678545

शुध्दता व मात्रासाठी वचनबध्द

हिन्दुस्तान पेट्रोलियम HP

गावडे पेट्रोलियम
HPCL डिलर

सांगोला-पंढरपूर रोड, जलशुध्दीकरण केंद्रासमोर,
सांगोला, जि.सोलापूर.

श्री.बाळू आनंदा गावडे

शुध्द शाकाहारी व मांसाहारी जेवणाची उत्तम सोय

चवदार व स्वादिष्ट जेवणासाठी एकवेळ अवश्य भेट द्या....
एकदा याल तर परत परत याल...

हॉटेल प्रशांत
परमीट रूम अॅण्ड बिअरबार

फॅमिलीसाठी स्वतंत्र बैठक व्यवस्था

स्वच्छ व हवेशीर ठिकाण

प्रोप्रा : प्रविण बाळासाहेब गावडे
9860678545, 8975242513
9700008533



सांगोला-पंढरपूर रोडवर, जलशुध्दीकरण केंद्रासमोर, गावडे पेट्रोलियम शेजारी सांगोला

गावडे अॅग्रो इंडस्ट्रिज

फळे पॅकिंगसाठी १० कि.ग्रॅ./ २० कि.ग्रॅ.
कॅरेट होलसेल दरात मिळतील.

श्री.प्रशांत बाळासाहेब गावडे
9921901910, 9860678545

सांगोला-पंढरपूर रोडवर, जलशुध्दीकरण केंद्रासमोर,
गावडे पेट्रोलियमच्या मागे, सांगोला

रुजवात

गणपतीचे आगमन झाल्यामुळे सर्वत्र पवित्र वातावरण होते. वान्द्रे येथील कौटुंबिक न्यायालयातील गणेश दर्शनास आवर्जून येण्यासाठी वकील मैत्रिणींचे फोन, मेसेज आले होते. ठरल्याप्रमाणे अनेक वर्षांनी मी कोर्टात पोहोचले. सुंदर, सुबक अशा गणरायाचे दर्शन घेऊन मी माझ्या वकील मित्र- मंडळींना भेटले. सर्वांना भेटून खूप आनंद झाला. ख्यालीखुशाली विचारल्यावर, त्यांचा निरोप घेतल्यानंतर, मी कोर्टाच्या आवारात फिरुन आले.

मला साधारण १८-१९ वर्षांपूर्वीचे माझ्या प्रॅक्टिसचे दिवस आठवले. कोर्टाच्या तारखांचे, जोडप्यांचे समुपदेशन करण्याचे, त्यांचे विवाह वाचवण्यासाठी केलेल्या प्रयत्नांचे! घटस्फोट घेण्याच्या विचाराने आलेल्या, तणावग्रस्त झालेल्या ह्या पती-पत्नींचे विवाह वाचवण्यात मला काही अंशी यश आले. सहा महिन्यांच्या कालावधीत त्यांच्या विचारात हळूहळू होणारा बदल, हा कुटुंब वाचवणारा होता. परंतु, कोर्टात दाखल प्रकरणांत घटस्फोटाची संख्या वाढत होती; विवाह वाचण्याचे प्रमाण कमी होते.

समाजात कोलमडलेल्या कुटुंब संस्थेचे हे चित्र बदलावे असे मला मनापासून वाटत होते. त्यानंतर पूर्वनियोजन केल्याप्रमाणे मी कोकणातील आमच्या त्रिंबक गावच्या घरच्या गणपती दर्शनासाठी निघाले. गावी जाण्याची भावनिक ओढ कायम असायची. रेल्वे प्रवासात मी उपजतच असणारी वाचन, लेखनाची आवड निवांतपणे पूर्ण करू शकते. खिडकीबाहेर वेगाने सरणारी झाडे, हिरवे गवत, गार वारा मनाला सुखावणारा होता. पाहता पाहता,लाल मातीचे रस्ते, उंच माड, फणसाची झाडे, कौलारू घरे, अशा गाव जवळ आल्याच्या खुणा दिसू लागल्या.

घरी आमचे काका-काकी, सर्व चुलत भावंडे, त्यांची बच्चे कंपनी वाट बघत होते. वर्षानुवर्षे, त्यांनी जपलेला मायेचा ओलावा, आपुलकी, प्रेम यामुळे मी भारावून जाते. सर्वांना कडकडून मिठी मारल्यावर, थोडं विसावल्यावर मी घरच्या मनमोहक गणेशाचे दर्शन घेतले. मन प्रसन्न करणारे वातावरण पाहून मी हरखून गेले.

आमच्या घरी सर्व लहान थोर मंडळीनी जपलेली केवळ गणपतीची परंपराच नाही तर शेती, किराणा दुकान, गिरणी, कुक्कुटपालन ह्यासारखे उद्योग व्यवस्थापन सांभाळून कामांचे सुयोग्य नियोजन केले आहे.

एकत्र कुटुंब पद्धतीमुळे श्रमविभागणी तर होतेच, परंतु घरातील ज्येष्ठांचे मुलांवर होणारे संस्कार, चालीरिती, कुळाचार, परंपरा, संस्कृती ह्यादेखील पुढील पिढीकडे संक्रमित होतात. संस्कारातून प्रतिबिंबित होते ती संस्कृती. पालकांनी, ज्येष्ठ सदस्यांनी अंगीकारलेले, आपल्या मुलांवर,नातवंडांवर बिंबवलेले संस्कृतीचे, सहजीवनाचे महत्त्व ते जाणतात. घरातील स्त्री - पुरुषांनी पूर्वापार चालवलेली परंपरा, संस्कृती ही पुढील पिढीतील तरुण मंडळी देखील जपतात. जसे देवाची आरती, नवरात्रातील देवीची पूजा, खास सणावारी बनवले जाणारे खाद्य पदार्थ हे सर्व करण्यात स्त्री - पुरुषांचा सहभाग असतो. म्हणूनच, हे दोघेही संस्कृतीचे चालक व वाहक आहेत. लक्ष्मी - नारायणासारखे स्नेहभाव जपणारे पती-पत्नी नांदत असतील, सर्व सदस्य गुण्यागोविंदाने, समाधानाने राहात असतील, ते घर म्हणजे मंदीर होय. शांत घरात सौख्य व समृद्धी वसते.

कोकणातील ८-९ दिवसांच्या वास्तव्यात

शुभदिपावली

आमचे असंख्य ग्राहक, व तमाम नागरिकांना ही दिपावली व
नूतन वर्ष सुख समृध्दीचे, भरभराटीचे
जावो ह्याच शुभेच्छा!

शुभेच्छुक

गुलाबराव आप्पासो. पाटील

दत्तात्रय आप्पासो. पाटील

ग्रंथमित्र गुलाबराव आप्पासो पाटील

अध्यक्ष, सोलापूर जिल्हा ग्रंथालय संघ
निमंत्रित सदस्य, महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघ
संचालक, सोलापूर जिल्हा प्राथमिक शिक्षक सोसायटी
संस्थापक चेअरमन, दिपकआबा साळुंखे पाटील प्राथ. शिक्षक सह. पतसंस्था म. सांगोला.

पाटील परिवार, आलेगांव

संस्कार बुक डिलर

शरदचंद्रजी पवार साहेब व्यापारी संकुल, पहिला मजला,
गाळा नं. १८ व १९ सांगोला, जि.सोलापूर

प्रोप्रा.दत्तात्रय आप्पासो पाटील

मो. : ९४२०६६५२०९, ९४२३३३४५१२, ९४०५७७४८६५

योग्य दरात मराठी कथा, कादंबऱ्या, बाल वाड:मय ऐतिहासिक, सामाजिक व राजकीय पुस्तके, स्पर्धा परीक्षा व धार्मिक ग्रंथ मिळण्याचे एकमेव ठिकाण.

हवे ते पुस्तक/ग्रंथ मिळण्याचे एकमेव ठिकाण.

आमचे असंख्य ग्राहक, मित्रपरिवार, हितचिंतक व तमाम
नागरिकांना दीपावली व नुतन वर्षानिमित्त हार्दिक शुभेच्छा!

शुभेच्छुक

दिलावर सॉ मिल

मिरज रोड, सांगोला, जि.सोलापूर

प्रोप्रा : ॲड.साजित दिलावर तांबोळी

मो. ८८८८१०९१०९

ॲड.साजित दिलावर तांबोळी

तांबोळी परिवार, सांगोला

गावात फेरफटका मारताना, सभोवतालच्या रम्य निसर्गाकडे डोळसपणे पाहताना मला काही गोष्टी उमजू लागल्या. कुरणातील चरणाऱ्या गाई-गुरांचा, मेंढ्यांचा एकत्रित कळप पाहताना, समुद्राची गाज, पक्ष्यांचा किलबिलाट, पानांची सळसळ ऐकताना माझ्या मनात काही प्रश्न उद्भवले. ह्या निसर्गात देखील सहजीवन आहे ना? ह्यांच्या विश्वात एकी, एकजूट आहे, कुठेही तंटे -बखेडे नाहीत. मग, आपण माणसे बुध्दी, वाचा, विवेक असूनही आपण आपले संसार, कुटुंब एकजुटीने का टिकवूशकत नाही? आपले सहजीवन असे का फुलत नाही?

बघा, बोलता-बोलता आपण निसर्गाकडे येऊन ठेपलो. निसर्गाचे कार्य शांतपणे, सुनियंत्रितपणे चाललेले आहे. कुठेही गोंधळ, गडबड नाही. मानवी जीवनात जेथे वैचारिक गोंधळ, तापलेले वातावरण, वाद- विवाद आहेत, तेथे उपाय/ तोडगा सापडत नाही. मला वाटते, हा निसर्ग आपल्याला नकळतपणे काही संदेश देतो, पण आपल्याला ते कळत नाही.

आमच्या घरी, तसेच गावाच्या चावडीवर सहज गप्पा मारता मारता, भावकीतली मंडळी एखाद्या प्रश्नावर काही उपाय सुचवतात. घरी एकत्र कुटुंब पद्धती असली, आणि आपापसात होणाऱ्या कुरबुरी, भांडणे झाली तरी मनात अढी न ठेवता काही वेळात ती विसरुन माणसे एकमेकांशी बोलू लागतात. पती-पत्नींनी लग्नानंतर उद्भवणारे कोणतेही प्रश्न, समस्या ह्या कुटुंबातील सदस्यांशी, ज्येष्ठ व्यक्तींशी चर्चा करुन सोडवण्याचा प्रयत्न करावा. ह्या एकत्रित चर्चेत तोडगा सापडला नाही तर समुपदेशक, कायदेविषयक सल्लागार, व्यसनमुक्ती केंद्र यांची मदत घ्यावी. समजुतीने, सामंजस्याने घेतलेले निर्णय हे विवाह वाचवू शकतात. स्वतःचा स्वार्थ जपण्यासाठी नातं तोडणे योग्य होणार नाही. परिस्थिती सुधारण्यासाठी, माणसांना समजून घेण्यासाठी, त्यांच्यात सुधारणा घडण्यासाठी काही अवधी जावा लागतो. त्यासाठी संयम पाळणे जरूरी आहे.

अविचारी माणसे आपली उर्जा वायफळ गोष्टींवर चर्चा करण्यात, दुसऱ्यांवर टिका करण्यात, दुसऱ्यांचे दोष दाखवण्यात, वाद-विवादात व्यर्थ घालवतात. वैवाहिक जीवनात जोडीदारांनी आपले 'इगो' जपण्यासाठी टोकाची भूमिका घेतल्यामुळे कौटुंबिक घडी विस्कळीत झाली आहे.

गंमत म्हणजे मूक पशू-पक्ष्यांच्या विश्वात केवळ चोच,पंख व पायांच्या बळावर, नैसर्गिक साधनसंपत्तीच्या आधारे त्यांचेनित्य आहार-विहार पैशाशिवाय सुरळीत चालू असतात. ते आनंदाने जगाला प्रसन्नता, सुंदरता बहाल करत असतात आणि विशेष म्हणजे त्यांच्या जगात कोणतेही 'घोटाळे' न करता ! म्हणूनच की काय, आपल्याला कोणताही प्राणी, पक्षी, फुले-पाने सजीव असूनही माणसांप्रमाणे दुःखी व तणावग्रस्त दिसत नाही. चिखलात राहूनही न कुरकुरता कमळ सौंदर्याने खुलते. काट्यांमध्ये राहूनही गुलाब प्रसन्नतेने फुलतो. आपण माणसे मात्र आपल्या दुःखांचा केवढा बाऊ करतो. दुसऱ्याकडून अवाजवी अपेक्षा ठेवल्यामुळे दुःखालाच कवटाळून बसतो. म्हणूनच, आपल्याला सुख जवाएवढे व दुःख पर्वताएवढे दिसते.

पती-पत्नीने एकमेकांसमवेत घालवलेले आनंदाचे क्षण, चांगल्या आठवणी, परस्परांमधील चांगले गुण यांची जाण ठेवून सहजीवन फुलवावे. एकमेकांना दोष न देता, एकमेकांची शक्ती बनून पुढे वाटचाल करत राहणे यातच सहजीवनाचे मर्म दडलेले आहे. मुलांपुढे आपले आईवडील हेच आदर्शअसतात. ही मुलेही पुढे सहजीवन जगणार असतात. त्यांच्यासमोर 'आदर्श' वाटतील असे आई-वडील, आजी-आजोबा असतील तर कुटुंब संस्था टिकून राहिल. जेव्हाआई-वडील आपल्या मुलांना दोन्ही घरातील आजी-आजोबांचा सहवास, कुटुंबातील इतर नात्यांची ओळख देतील, त्या नात्यांचा मान व आदर राखतील तेव्हाच कुटुंब संस्था अबाधित राहील.

आयुष्यात स्थैर्य, सुरक्षितता, वैवाहिक आनंद व कौटुंबिक समाधान मिळण्यासाठी विवाह केला जातो. परंतु, विभक्त होण्याच्या एका निर्णयामुळे हे स्थैर्य गमवावे लागते; आणि असुरक्षिततेची भावना निर्माण होते. शेवटी, कोणतीही व्यक्ती, मग ती स्त्री असो वा पुरुष, ही गुणदोषांचे एक 'पॅकेज' असते. त्यासह त्या व्यक्तीला स्वीकारणं व कोणतीही तक्रार, कुरबुर न करता हे नातं निभावणं ह्यातच सहजीवनाचे सार सामावलेले आहे.

आजच्या 'युज अँड थ्रो' च्या युगात नातं किती सहजपणे नाकारले, धिक्कारले जाते. जिथे वाईट आहे तिथे चांगले देखील आहे. 'रिसायकल आणि रियुज' सुध्दा आहे. जर आपण असा विचार केला की, ळपींशरव`ष सशीींळपस ीळव`ष ींहश शिीीप, ुहू पीं ीं ीशर्लीळश्रव ींहश ीशश्ररींळेपीहळ. ईीशरज्ञ-ीीं, ीश्रिळीं, वळीीश्रींीळेप, वळीीलश ह्या शब्दांशी फारकत घेऊन त्याऐवजी, ीशलेपीळवशी, ीशलेपलळश्रश रपव ीर्शीपळेप, ह्या कृतींचा अवलंब केला तर विवाह वाचू शकतात. घटस्फोट हा अंतिम निर्णय नसावा. त्याबाबत फेरविचार करावा. कोणत्याही जोडीदाराचा इगो आड येत नाही ना, हे तपासून दोघांनीही सामोपचाराने निर्णय घेतला तर सारं सुरळीत होईल.

पशु-पक्ष्यांप्रमाणेच आपण माणसं देखील ह्या सृष्टीचा भाग आहोत. सर्व प्राणीमात्रांपेक्षा श्रेष्ठ बुद्धीमत्ता देवानेमाणसाला बहाल केली आहे; तरीही आपण माणसं, आपल्या परस्परांतील नातं टिकवण्यासाठी, त्या नात्याला नव्यानं खतपाणी घालून त्याचं संवर्धन करण्यासाठी काही प्रयत्न करतो का ? कोणत्याही नात्याला नवसंजीवनी मिळते ती सकारात्मक विचाराने, सद्भावनेच्या चिंतनाने, प्रेमपूर्वक स्वीकार केल्याने आणि सुसंवाद साधल्याने. आपण डोळसपणे ह्या सृष्टीकडे पाहिले तर उमजेल की, आपण बुद्धी असूनही विचारपूर्वक न वागता नात्याला दुरावतोय. माणसा- माणसातलं माणूसकीचं, प्रेमाचं, विश्वासाचं नातंच आज निखळू लागले आहे. आपण आपल्या आई-वडिलांशी, बहिण भावंडांशी, मित्र-मैत्रिणींशी, कार्यालयातील सहकार्यांशी जुळवून घेत असतो, नाही कां? खरंच, सद्भावना, आदर, स्नेह, मानवता यासारख्या सद्गुणांनीच कोणत्याही नात्यातला गोडवा टिकतो. फक्त, हे त्या व्यक्तीवर अवलंबून असते की, हा नात्यातला गोडवा

आमचे असंख्य हितचिंतक, मित्र परिवार व
तमाम नागरिकांना दीपावली व नूतन वर्षानिमित्त हार्दिक शुभेच्छा

अंकुर बालरूग्णालय

- २४ तास अत्यावश्यक सेवा
- सुसज्ज बाह्यरूग्ण व आंतररूग्ण विभाग
- NICU
- एक्सरे मशीन
- ऑक्सिजनची सोय, नेब्युलायझर
- सर्व प्रकारचे रोग प्रतिबंधक लसीकरण पल्स ऑक्सिमीटर
- सर्वो कंट्रोल वॉर्मर
- फोटोथेरपी युनिट (सिंगल व डबल सरफेस)
- कमी दिवसाच्या, कमी वजनाच्या व कावीळ झालेल्या बालकांचे उपचार
- सदृढ बालक सल्ला केंद्र
- झटका/फिट येणाऱ्या बालकांची तपासणी व उपचार

डॉ.सुहास नागणे
M.B.B.S., D.C.H. (Mumbai)
Ex-Registraion Sion-Hospital Mumbai
Ex-Registra Hindurao Hospital New Delhi
नवजात शिशु व बालरोगतज्ञ

डॉ.सौ.निलम नागणे
B.A.M.S. P.G.F.C.P

ओपीडी वेळ
सकाळी १०.३० ते २.०० सायं. ५.३० ते ७.३०
शुक्रवारी सकाळी १०.३० ते दुपारी २.०० पर्यंत

दर सोमवारी बीसीजी लस दिली जाईल
दररोज इतर सर्व लसी दिल्या जातील.

कडलास रोड, कडला नाका, दिशा (गवळी) हॉस्पिटलजवळ, सांगोला

आमचे असंख्य हितचिंतक, मित्र परिवार व तमाम
नागरिकांना दीपावली व नूतन वर्षानिमित्त हार्दिक शुभेच्छा

अध्यक्ष ग्रामसेवक युनियन डी.एन.ई.
१३६ तालुका शाखा सांगोला

शुभ दिवाळी

मा.श्री.शहाजी महादेव इंगोले

शुभेच्छुक

मा.श्री.शहाजी महादेव इंगोले

अध्यक्ष, ग्रामसेवक युनियन डी.एन.ई. १३६
तालुका शाखा सांगोला, जि.सोलापूर
अध्यक्ष, मराठा सेवा संघ शाखा सांगोला
संचालक, सोलापूर जिल्हा ग्रामसेवक पतसंस्था
मर्या.पंढरपूर, जि.सोलापूर

टिकवायचा की संपवायचा? खरं तर, एकमेकांना साथ देऊन, कुटुंबाशी संबंधित नात्यांना धरून एकोप्याने वाटचाल करण्यानेच माणूस समृध्द होत असतो.

तडजोड केल्याने कुटुंब सांधली जातात. जिथे 'तडा' जाईल, तिथे 'जोड' देता आली की, कुठलंच नुकसान होत नाही. तडजोड म्हणजे शरणागती नव्हे तर, चार पावलं मागे आल्यानं कोणाचीही हार होत नसते. तात्पुरती माघार घेतली तरी आयुष्यभरासाठी जीत असते. कौटुंबिक सौख्यासाठी नात्यात सलोखा, मोकळा संवाद याबरोबरच प्रेम आणि विश्वास असणे आवश्यक आहे.

आर्थिक दृष्ट्या स्वतंत्र असलेल्या आजच्या करिअरिस्टस्त्रियांना निर्णय स्वातंत्र्य प्राप्त झाल्यामुळे, लग्नानंतरही त्यांना पक्ष्याप्रमाणे 'मुक्त' व 'स्वच्छंदी' जीवन जगावेसे वाटते. स्वातंत्र्य म्हणजे फक्त स्वतःच्या बेड्यांतून मुक्तता नव्हे तर इतरांच्या स्वातंत्र्याचा आदर करणे. परंतु, हा पक्षीही निसर्ग नियमानुसार आपल्या पंखातील क्षमतेप्रमाणे विहार करुन पुन्हा आपल्या घरट्यात येतो. कारण, घरट्यात वाट बघणारी पिल्ले असतात. ह्या चिमुकल्या पिलांसाठीच दाणे-चारा शोधण्यासाठी पक्षी बाहेर पडतात, ते पुन्हा घरट्यात येण्याच्या ओढीने. पक्षी ' काडी-काडी' जमवून आपले घरटे बनवतात पण त्यांच्यात ' काडीमोड' नसतो. ह्या पक्षांकडून, निसर्गाकडून मानवाला खूप शिकण्यासारखे आहे.

मला मात्र, निसर्ग प्रेमी म्हणून ह्या निसर्गाचे सहज निरीक्षण करताना नवा सूर सापडला. समाजातील ह्या गंभीर सामाजिक प्रश्नाला निसर्गाची जोड देऊन 'निसर्ग आणि सहजीवन' हा उपक्रम समाजापर्यंत पोहोचवण्यासाठी मी लिहीती, बोलती झाले. लेख आणि सादरीकरणातून सामाजिक प्रबोधन घडू लागले.

वर्षानुवर्षे सवड मिळेल तेव्हा मी गावी जात असते. घरातील, गावातील जीवा-भावाच्या माणसांची, निसर्गाची कायम ओढ राहते. मुंबईला परत निघताना, सर्वांचा निरोप घेताना डोळे भरून येतात.

कौटुंबिक न्यायालयातील माझ्या मैत्रिणीने मला पाठीवर हलकेच हात ठेवत विचारले, अगं, कुठल्या विचारात गुंतलीस? तू निघणार होतीस नां? मी तिला 'हो', म्हटले आणि भानावर आले. तिला सांगितले, काही नाही, जुने दिवस आठवले. तिने माझा निरोप घेतला.

ज्योती - ज्योतीने दिप उजळतो,
माणसा-माणसाने समाज जोडला जातो,
त्याचप्रमाणे कुटुंब जोडण्याचा संस्कार जोपासण्याची रुजवात करुया.

ॲड. सुजाता त्रिंबककर टिपणीस
वसई - ९८७०३२४९६५

लक्षात आलंय...

ठरवलं यावर्षी फक्त कोसळायचं
कोणावर कशासाठी भान याचं विसरायचं
ठेवलेली सहनशक्ती आता संपवायची
बेताल जलन्यासाने सर्वांना भिजवायचं
लहान मोठे वृध्द गरीब नाही बघायचं
पाहिजे तेव्हा हजर आता नाही ऐकायचं
माझंही अस्तित्व आहे दाखवून द्यायचं
यासाठीच ठरवलं होतं ना फक्त कोसळायचं

ठरवल्या प्रमाणे कोसळून झालंय तुझं
शांत होऊन जाशील आता परत
पण जाताना ऐकून घेशील जरा
किती हैराण केलेस सर्वांना
घरे दारे आयुष्ये उध्वस्त झाली
सांत्वन करायला नाही राहिला कोणी वाली
तुझ्या भरवशाच्या संसारवेली
चिखल मातीने वाहून नेली

नदीनाले डोंगर द-या तुझेच सगेसोयरे
दोघांनीही एकत्रित ठरवले होते सारे
त्यांनी ही तुझ्या सोबत धरले रौद्र रूप उरी
बांध घातले कुणी आणि फुटले
कोणावरी

लक्षात ठेव...
कल्पनेपलीकडची संकटे ठेवून
चालला आहेस माघारी परतूनी
खोटा ठरविलास एक नियम तूही
जाताना मात्र जावे म्हणे हसवूनी
नियम मोडला दोष देत नाही तुला
उल्लंघनाची ही शिक्षा आहे कळेल
का कोणाला

सौ.संगीता एखंडे
संपर्क - ९४२३५८८३६८

आमचे असंख्य ग्राहक, मित्रपरिवार, हितचिंतक
व तमाम नागरिकांना दीपावली व नुतन
वर्षानिमित्त हार्दिक शुभेच्छा!

शुभेच्छुक

मदने मेडिकल ॲण्ड जनरल स्टोअर्स

कचेरी रोड, सांगोला

प्रोप्रा.विशाल मदने (मो.८५३०५०७६७३)

आमचेकडे सर्व प्रकारची देशी-विदेशी माणसांची
व जनावरांची औषधे योग्य दरात मिळतील.

सौ. सुरेखा संजय मदने

संचालिका, शेतकरी महिला सहकारी वस्त्रनिर्माण सूतगिरणी मर्या.सांगोला

सौ.सुरेखा संजय मदने

मदने परिवार, सांगोला, जि.सोलापूर

॥ शुभ दीपावली ॥

आमचे असंख्य, ग्राहक, हितचिंतक, शेतकरी बांधव व
तमाम नागरिकांना दीपावली निमित्त हार्दिक शुभेच्छा!

शुभेच्छुक



समर्थ इलेक्ट्रिकल्स

विजापूर-पंढरपूर रोड, दामाजी मंदिराजवळ, मंगळवेढा, जि.सोलापूर फोन २२०९०१

● अधिकृत विक्रेते ● सी.आर.आय.,शक्ती पंपाचे जिल्ह्याचे सर्व्हिस स्टेशन

सुर्या व ट्रबोर पीव्हीसी पाईप सबमर्सिबल स्पेअर स्टार्टर केबल, पंप, रिवायडींग, विक्री व दुरूस्ती

मोबा.: ९४२३५८७२०२, अवि : ९४२३५८७२०३, नागेश: ९४२०३६०९०६,
९८८१६११५५५, ५११५५५, ९११५५५

**प्रोप्रा.अनंत चिंतामणी कुलकर्णी, अवधुत चिंतामणी कुलकर्णी
नागेश कुलकर्णी मंगळवेढा जि. सोलापूर.**

अगं अगं म्हशी



भावजी नुकताच मिलिट्रीतून रिटायर होऊन गावात आला होता.नाही म्हणायला थोडेफार पैसे बॅंकेत शिल्लक होते.आता जरा शेतीभातीत लक्ष द्यावे, असा विचार चालू होता. एके दिवशी सकाळपारी भावजी आपल्या घराच्या कट्ट्यावर दाढी करत बसला असताना, गावातील लिंबा घराजवळून जात होता. लिंबाने भावजींना पाहताच जोराने रामराम घातला.मग भावजीही म्हणाले की,

रामराम काय लिंबा आज सकाळी हिकंडं कुणीकंडं ?

तात्याकडं खाली गेल्तू जरा.लिंबा म्हणाला.

काय काम काढंलं म्हणायचं तात्याकडं

भावजींनी विचारताच लिंबा कट्ट्याकडं सरकला. हळू आवाजात सांगू लागला की,मागल्या बाजारात त्यांची गाय बाजारात इकली होती. त्याचं गाडीभाडं घ्यायला आलो होतो.

बस जरा चहा घेऊ.आपल्या दाढीवरून शेवटचा हात फिरवत भावजी लिंबाला म्हणाले. लिंबा मग तिथंच दोन पायांवर टेकत भावजींच्या दाढीचे निरीक्षण करू लागला. भावजींनी दाढीचे सामान ठेवायला एक स्टीलचा चौकोनी डबा केला होता. त्यात दाढीचा ब्रश, गोल साबणाची वडी, स्टीलचा खोऱ्या,ब्लेडचे पाकिट, दाढी झाल्यावर तोंडावरून फिरवायला तुरटीचा खडा सर्व काही किती व्यवस्थित ठेवले होते. एकंदरीत भावजी मोठेच शिस्तप्रिय जवान होते तर. इतक्यात भावजींनी दाढी उरकली. घरातून चहा आला. दोघेही चहा घेत एकडल्या तिकडल्या गप्पा मारू लागले. लिंबा म्हणाला, भावजी आता एक चांगली दुधाची म्हैस घ्या म्हणजे घरचं दूध, तूप होईल पोरांना. पायजे तर आपुन बघून देतो म्हैस.

चहा पिऊन होताच कपबशी खाली ठेवत लिंबा रामराम ठोकून पुढील कामाला निघून गेला. लिंबा गेला खरा पण, म्हशीचा चेंडू भावजीच्या गळयात टाकून गेला. भावजींनाही कामाची खूप सवय होती. आता रिटायर झाल्यावर दिवस कटत नव्हता. काहीतरी काम करावे, असे सारखे वाटत होतेच. म्हैस खरेदीची कल्पना त्यांना आवडली. घरचे दूध, तूप होईल आणि म्हशीला चारा,वैरण ,पाण्यात आपला दिवसही जाईल शिवाय, जादाचे दूध विकून चार पैसे संसाराला मिळतील, असा विचार भावजी करू लागले.मग भावजींनी आपला हा विचार आपल्या पत्नीला बोलून दाखवला. तिलाही म्हैस खरेदीची कल्पना एकदम पटली. पुढील आठवड्यात त्यांनी बॅकेतून पैसे काढून ठेवले. मग एका रविवारी लिंबाला घेऊन सासरे व भावजी तालुक्याच्या गावाला म्हैस आणायला गेले.

तालुक्याच्या गावाला जनावरांचा मोठा बाजार भरे. सकाळच्या पहिल्या एस.टी. ने तिघेजण बाजारात दाखल झाले. जिकडं भघावं तिकडं जनवारचं जनवारं दिसत होती. गायी, म्हशी ,बैलं, गाढवं, घोडी, शेळ्या, मेंढ्या यांनी बाजार नुसता फुलला होता. दोरखंड, काठ्या, चपला, माळा, झुली, आरसे,गोंडे विकणारी अनेक दुकाने थाटली होती. बैलगाडीतून, लहान लहान वाहनातून जनावरे ये जा करत होती. प्रथम बाजारात आल्या आल्या तीन प्लेट भजी आणि च्यावर तिघांनी ताव मारला. मग संपूर्ण बाजारात एक फेरफटका मारून झाल्यावर लिंबा एका कोपर्यात जाऊन उभारला आणि एका काडीने आपली मान खाजवत म्हणाला,

आपल्याला नेमकी म्हैस किती पर्यंत

सर्व ग्रामस्थ, शेतकरी बांधव व तमाम नागरिकांना दीपावली व नुतन वर्षानिमित्त हार्दिक शुभेच्छा !

शुभेच्छुक

प्रशासक : श्री. अभिजीत हरीदास पवार

ग्रामपंचायत अधिकारी : श्री. शंकर राजाराम मोहिते

कर्मचारी वर्ग व ग्रामस्थ

ग्रामपंचायत राजापूर, ता.सांगोला

आमचे असंख्य हितचिंतक, मित्र परिवार व तमाम नागरिकांना दीपावली व नुतन वर्षानिमित्त हार्दिक शुभेच्छा!

शुभेच्छुक

श्री.संतोष रामचंद्र सुरवसे

प्रगतशील बागायतदार

मंडल अधिकारी पुळुज, ता.पंढरपूर

सुरवसे परिवार

सर्व ग्रामस्थ, शेतकरी बांधव व तमाम नागरिकांना दीपावली व नुतन वर्षानिमित्त हार्दिक शुभेच्छा !

शुभेच्छुक

ग्रामपंचायत हंगिरगे, ता.सांगोला

सरपंच : सौ. द्रौपदी अशोक गावडे

उपसरपंच : सौ.सुगंधा राजाराम साबळे

ग्रामपंचायत अधिकारी : श्री. बाबासाहेब यशवंत कोळी

सर्व सदस्य, ग्रामस्थ व कर्मचारी वर्ग, ग्रामपंचायत हंगिरगे, ता.सांगोला

घ्यायची म्हणायचं...

आता या प्रश्नावर भावजी आणि त्यांचे सासरे दोघेही गांगरले. कारण, सबंध आयुष्यात ते पहिल्यांदाच जनावरांच्या बाजारात आले होते. याआधी त्यांनी कधीही कोणत्याही प्रकारचे जनावर खरेदी केले नव्हते. सासरे म्हणाले,

लिंबा तुच एखादी दुभती म्हैस ठरव. पैसे काय लागतील ते लागू दे.

हे ऐकून लिंबा काय समजायचे ते समजला. पाच सहा ठिकाणी म्हशी बघून झाल्यावर एक म्हैस लिंबाला पसंद पडली. तिची शिंगे चांगली जाडजूड होती. जबडा रूंद, कास मोठी दुधाची होती. सोबत एक लहानसे रेडकू होते.

कितीक रूपये द्यायचं? लिंबा म्हशीच्या मालकाला विचारू लागला.

बोलाकी कायतरी हिशोबानंमालक म्हणाला.

साडेतीन देतोलिंबा म्हणाला.

बोकड जातंय राव पाच पर्यंत. म्हैस घेताव का बोकड. हिशोबानं बोला जराम्हैस मालक रागानं म्हणला.

सव्वापाच ठिक आहे.लिंबानं आकडा पुढं टाकला.

रेडी आणि म्हैस आठच्या खाली एक रूपयाही कमी करणार न्हाय. सकाळी तीन लीटर आणि सायंकाळी तीन लीटर दूध देती. आधी दुधाचा भाव काढा आणि मग बोला राव... हे मालकाचे बोलणे ऐकताच भावजी आणि सासऱ्यांना एकदम सौदा पटला. लिंबाला त्यांनी पुढे केले. शेवटी सौदा साडेसात हजारात ठरला. इसार दिला. गुलाल उधळून समदी हॉटेलात राईस प्लेट खायला गेले. जेवण उरकून गाडी ठरवली गेली. म्हैस, रेडकू मागे आणि ड्रायव्हर शेजारी तिघेजण बसले. हळूहळू गाडी आदळत आपटत रात्री आठला गावात आली.

जनावरं उतरून लिंबा घराकडं पांगला. वाड्यात आधीच वहिनींनी चारा वैरण आणली होती. वाड्यात म्हैस, रेडकू बांधून दरवाजाला आडणा लावला. सर्वजण जेवण उरकून निजले.

पहाटं पहाटंच वहिनी ऊठल्या.म्हशीसमोरील शेण काढलं. चारा वैरण टाकली. भावजी दिवस उजाडताच चरवी घेऊन दूध काढायला म्हशीजवळ आले तर म्हैस दूर सरू लागली. बराच वेळ झाला तरी म्हैस काही दूध काढू देईना. सारखी इकडून तिकडं हालत होती. तेंव्हा शेजारच्या शेवंता अक्का म्हणाल्या,

जनावर नवं हाये. बुजलंय. रेडकू सोडा म्हणजे पान्हा सोडंल.

बराच वेळ रेडकू सोडले तरी, रेडकाला पिऊ देत होती पण, काहीकेल्या म्हैस दूध काही काढू देईना. शेवटी सायंकाळी बघूया म्हणून भावजी दुसऱ्या कामात गुंतले.

दिवसभर वाड्यात माणसांची नुस्ती गर्दी झाली होती. जनावरं बघायला शेजारी पाजारी येत होते.

सायंकाळ झाली तशी दरवाज्याला आडणा घालून भावजी पुन्हा चरवी हातात घेऊन दूध काढू लागले. म्हैस पुन्हा एका जागेवर थांबेना. दूध काढायला कासच धरू देईना. रेडकू सोडून पाहिले. तरीही काही फायदा झाला नाही.

दुसऱ्या दिवशी लिंबालाच सकाळ सकाळी बोलावणं धाडलं. लिंबा आला. त्यानं म्हशीचे दोन पाय बांधले. कशीबशी धार काढली. लिंबा एवढा जाणकार माणूस पण, तोही धार काढून वैतागला. सबंध पुढील आठवड्यात एक दोनदाच म्हशीने धार काढू दिल्याने भावजी व वहिनी चांगल्याच वैतागल्या. शेवटी जनावरांचे डॉक्टर बोलावून झाले. पण काही केल्या इलाज चालेना. म्हैस चारा पाणी वेळेवर खात पित होती. आजारी नव्हती पण, दूध मात्र काहीकेल्या देत नव्हती.

कोणीतरी मग म्हशीला राकोळी लावायचा सल्ला दिला. सकाळी दहा ते सायंकाळी पाच वाजेपर्यंत म्हैस रानात जावू लागली. दादा न्हावी सर्व जनावरांना राकोळी लावून फिरवून आणत असे.

पुढे कोणीतरी म्हशीला बाहेरची बाधा झाली असून त्यासाठी गंडेदोरेही बांधले. सुमारे महिनाभर यथेच्छ चारा, वैरण, पेंड पचवून अधूनमधून कधीमधी अर्धा लिटर दूध पातेल्यात पाडू लागलेल्या या म्हशीला लवकरच घरातील सर्व कंटाळले. म्हशीचा खर्च, चारा, वैरण, पेंड, राकोळी इत्यादी वरील खर्च काढला असता सुखासुखी घरात दररोज दोन लीटर दूध नक्कीच आले असते, असा निष्कर्ष काढून भावजींनी एकदाची आपली म्हैस विकायचा निर्णय घेतला आणि लिंबाला गिर्हाईक बघायला सांगितले. लिंबाने ताबडतोब गिर्हाईक शोधले. सौदा ठरला. वाडीच्या एका शेतकऱ्याने म्हैस व रेडकू पाच हजारात विकत घेतले होते. भावजी आनंदाने तयार झाले कारण, पाच तर पाच. शेवटी ही म्हशीची एकदाची कटकट तर त्यांच्या मागची जाणार होती.

म्हैस शेतकरी घेऊन गेला. त्या दिवशी रात्री भावजींच्या स्वप्नात आले की, आपण म्हशीचे दूध काढत आहोत. चरवी भरून गेली. घरातील सर्व पातेली दुधाने भरली आहेत. घरात सर्वत्र दूधच दूध झाले आहे. भावजी दचकून जागे झाले. बघतात तर रात्रीचे दोन वाजले होते....

लेखक...मयुरेश अरुण कुलकर्णी
संपर्क...९४२१०२४८८१

आमचे असंख्य हितचिंतक व तमाम
नागरिकांना दीपावली व नुतन
वर्षानिमित्त हार्दिक शुभेच्छा!

शुभेच्छुक

आकाश बियरबार
अ‍ॅण्ड परमीट रुम

जवळा, ता.सांगोला, जि.सोलापूर

प्रोप्रा.सुनिल आप्पासाहेब कलाल

कलाल परिवार जवळा, ता.सांगोला

आमचे असंख्य हितचिंतक व तमाम
नागरिकांना दीपावली व नुतन
वर्षानिमित्त हार्दिक शुभेच्छा!

शुभेच्छुक

श्री. अशोक भागवत पाटील
श्री. अमर अशोक पाटील

मो. ९७६७००२६४२, ९४२३९७०४६९

पाटील परिवार, सांगोला.

आमचे असंख्य हितचिंतक व तमाम
नागरिकांना दीपावली व नुतन
वर्षानिमित्त हार्दिक शुभेच्छा!

शुभेच्छुक

सौ.सुलभा सुरेशराव देशपांडे
माजी ग्रामपंचायत सदस्या,नाझरे, ता.सांगोला

श्री.सुरेशराव विष्णूपंत देशपांडे
प्रगतशील बागायतदार नाझरे

कु.ओंकार सुरेशराव देशपांडे
अध्यक्ष, सांगोला तालुका राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी विद्यार्थी संघटना

देशपांडे परिवार,नाझरे

आमचे असंख्य हितचिंतक व तमाम
नागरिकांना दीपावली व नुतन
वर्षानिमित्त हार्दिक शुभेच्छा!

शुभेच्छुक

माळी ट्रेडिंग कंपनी

महात्मा फुले चौक, सांगोला

माळी परिवार,
सांगोला, जि.सोलापूर

प्रो.रमेश शंकर माळी
मो.९८९०४२०७१३ /९५१८९१५४१८

सांगोला तालुक्यातील तमाम नागरिक, शेतकरी
बांधवांना दीपावली व नुतन वर्षानिमित्त
हार्दिक शुभेच्छा !

शुभेच्छुक

संकेत डेव्हलपर्स

सहारा कॉम्प्लेक्स, छ.शिवाजी महाराज चौक, सांगोला,जि.सोलापूर
संपर्क : विलास बापूसाहेब बिले (भ्रमणध्वनी : 9421065617)

बिले परिवार, पाचेगांव बु।। व सांगोला

श्री.विलास बिले

ऋतू लहरी झालाय का?

ललित लेख

खरंच असं वाटतंय ऋतू लहरीच झाला आहे. वाढते प्रदूषण, ग्लोबल वॉर्मिंगमुळे वातावरणाचा बदलजाणवतोय .हवामान खात्याच्या अंदाजाचा निश्चित आढावा जनमानसात कळत नाहीय कारण परवाच मे महिन्यात भरपूर पाऊस झाला. की जिथे में महिन्यात उन्हाळा असतो. गावे ,शहरे या ठिकाणी भरपूर प्रमाणात पाऊस झाला. जून महिन्यात पेरणीसाठी हवा त्यावेळी तितका पाऊस झाला नाही. जुलै संपला तरी पाऊस लहरीच वाटतोय फक्त आभाळ भरुन येते की, किती पाऊस येईल आता पण पाऊस पडत नाही. यामुळे बळीराजा मात्र चिंतेत आहे. कारण काही पिकांना वेळेतच पाऊस लागतो तर तेव्हा मिळत नाही.

आणि अवेळी भरपूर पडून गेल्यामुळे पिकांचे नुकसान भरपूर झालेले आहे. नुकसान भरपाई मिळविण्यासाठी सरकारी नोंद ,पंचनामा वगैरे बरीच मोठी प्रोसेस असते. एवढे सगळे करून पुरेपूर मोबदला मिळतच नाही त्यासही उशीरच लागतो. हे त्या बिचा-या शेतकऱ्याची खंतच आहे. त्याची दैन्यावस्था कधी आणि कशी संपणार कळतच नाही. त्याच्याच जीवावर आपण दैनंदिन जीवनात अन्न खातो. रोजी रोटी कमावणाऱ्यांना फार बिकट अवस्थेला तोंड द्यावे लागते त्याचे वाईट वाटते.

एक तर नवीन पिढी एग्रीकल्चरकडे वळत नाहीये. शेतकरी स्वतः किंवा जवळच्या कोणालातरी किंवा बाहेरच्या माणसाला बटाईने शेत करायला देतो.

शेतात काम करायलाही माणसे मिळत नाहीत असे ऐकिवात आहे. कारण आधुनिकतेत माणसे इतर क्षेत्राकडे जास्त वळलीत सोप्या पद्धतीने पैसा कमवायचा, जास्तीचे कष्टच नकोत अशी सवय झाली आहे.आपल्या महाराष्ट्रात कृषीप्रधान संस्कृतीत अशी अवस्था आहे ही लज्जास्पद बाब म्हणावी लागेल.

एकंदरीत पावसावर अवलंबून असणारी काही धान्ये, भाजीपाला, फळे अशा सर्वच वस्तूंवर याचा परिणाम होतो आणि महागाईचा भडका उडतो. आर्थिक ताळमेळ घालताना सर्वसामान्य माणसाला मेटाकुटीला यावे लागते.

कृत्रिम पावसाचा प्रयोग हाही करून झाला परंतु नैसर्गिक पावसाची गरजच महत्त्वाची आहे. थोड्याश्या पावसाने सुद्धा पिके तरारुन येतात हे वेगळे सांगायला नको.

जनावरे, पशुपक्षी यांना चारा पाणी मिळते. नद्या नाल्यांमुळे पाण्याचा प्रश्न जास्त भेडसावत नाही जर वेळेवर पाऊस पडला तर पाऊस वातावरण बेधुंद करून टाकतो. प्रीतीत मुग्ध असा पाऊस तरुण–तरुणींना शहारुन टाकतो. प्रेमाचे बंध अजून घट्ट होतात. आकाशी अनेक रंगांचे इंद्रधनुष्य नजारा मनाला भावून जातो. तेव्हा अगदी मोरही हर्षाने पिसारा फुलवून नाचत असतो. हे सर्व पावसाच्या आगमनाने आनंदी प्रफुल्लित असे वातावरण असते.

पण सध्या उन्हाळा ,पावसाळा ,हिवाळा हे तीनही ऋतू अस्तित्वाच्या माध्यमातून बदललेले असे वाटत आहेत. कलियुगाचा प्रभाव म्हणावा की काय माणूस पैसा पैसा म्हणत माणुसकी विसरत चालला आहे तर दैवी कृपा किंवा न्याय असाही चालू आहे का असेच वाटते आहे. त्यात निर्दोषीही सर्वांबरोबर भरडले जाणारच यात शंकाच नाही.

पाऊस बेभान .... कधी हलक्या सरी
प्रेमात याच्या धुंद ...तनमन हर्षात भरी
ईश कृपा दान..... पावसाचा ताळमेळ
ठेवू निसर्गाचे भान... थांबणार घालमेल

डॉ.सौ.राजश्री संजय जाधव
सोलापूर (९४२०४८८७३३)

शुभ दीपावली शुभेच्छुक

सर्व ग्रामस्थ, शेतकरी बांधव व तमाम नागरिकांना दीपावली व नुतन वर्षानिमित्त हार्दिक शुभेच्छा !

ग्रामपंचायत बागलवाडी, ता.सांगोला

प्रशासक : श्री. मिलींद संभाजी सावंत
विस्तार अधिकारी, आरोग्य विभाग, पंचायत समिती, सांगोला

ग्रामपंचायत अधिकारी : श्री. मानसिंगराव सोपान गुळीक

सर्व सदस्य ग्रामस्थ व कर्मचारी वर्ग, ग्रामपंचायत बागलवाडी, ता.सांगोला

लोकप्रिय आमदार

मा.आम.ॲड.शहाजीबापू पाटील
विधानसभा सदस्य, सांगोला.

।। शुभ दीपावली ।।

आमचे हितचिंतक, मित्रपरिवार, शेतकरी बांधव तमाम नागरिकांना दीपावली व नुतन वर्षानिमित्त

माजी नगरसेवक

मा.प्रा.संजय देशमुख

सामाजिक कार्यकर्त्या

सौ.शोभा संजय देशमुख

अनघादत्त इंजिनिअर्स ॲण्ड डेव्हलपर्स

ता.सांगोला, जि.सोलापूर
पत्ताः स्वाभिमानी भवन, मिरज रेल्वे गेट जवळ
शिवाजीनगर, सांगोला, जि.सोलापूर

देशमुख परिवार, सांगोला

काय म्हणू

खुर्चीसाठी राजकारणी पक्ष बदलती काय म्हणू
पैशांसाठी इमान अपुले विकू लागती काय म्हणू

स्वार्थासाठी जनतेला या वेठिस धरती काय म्हणू
तत्त्वांची अन् निष्ठेची ही दुनिया नाही काय म्हणू

परस्परांच्या टाळूवरचे लोणी खाती काय म्हणू
विरोधकांवर रोज उठूनी झोड उठवती काय म्हणू
नात्यांपेक्षा पद नि प्रतिष्ठा मोठी झाली काय म्हणू
बाप नि मुलगा उभे राहती विरोधात हो काय म्हणू

रंग धरेचा हिरवा हिरवा कुठे दिसेना काय म्हणू
जिकडे तिकडे गगनभेदती उंच मनोरे काय म्हणू
जनतेचा हा पैसा सारा कुणी लाटतेकाय म्हणू
चंद्रावरती घर करण्याची स्वप्ने बघती काय म्हणू

आज कालच्या तरुणाईचे तंत्र बिघडले काय म्हणू
आज लग्न अन उद्या विभक्त असे वागणे काय म्हणू
संस्कारांचे अध:पतन हे होत चालले काय म्हणू
चैनीसाठी नात्यांमधली ओल संपली काय म्हणू

– मानिनी महाजन

सांग ना रे कान्हा

सांग ना रे कान्हा
नाते काय माझे
तू सारथी माझा
गीता बोध सांगे

ओढ अनामिक
शोधे चहूकडे
मन वेडे लागे
तुझ्या रुपाकडे

सावळा श्रीहरी
कधी बंधू होतो
मी द्रौपदी तुझी
रक्षण करतो

माहेरा आठवी
येते डोळा पाणी
मूर्ती पाहता तुझी
भासे माय माझी
असा खट्याळ तू
भक्तात गुंततो
एकनाथा घरी
कावड वाहतो

असो कुठलेही
नाते तुझे माझे
वाटेल एकटे
जवळ तू नसे

सौ .प्रज्ञा सचिन देशपांडे

शुभदिपावली

आमचे असंख्य ग्राहक, मित्रपरिवार, हितचिंतक, शेतकरी बांधव व तमाम नागरिकांना दीपावली व नुतन वर्षानिमित्त हार्दिक शुभेच्छा!

GSCI

गोवा स्टील सेंटर ॲण्ड इंडस्ट्रीज्

बांधकामासाठी लागणारे सर्व साहित्य मिळेल.

सांगोला महाविद्यालय शेजारी कडलास रोड, सांगोला (मो.९७६४९२१०९५)

अधिकृत विक्रेते : रुपम स्टील, जी.डी.महलोचा चैनल, कलर शीट, टाटा पत्रा, जिंदाल पत्रा, कोटींग पत्रे ऑर्डरप्रमाणे बनवून मिळतील.

प्रोप्रा. चौधरी बंधू

शुभदिपावली

सर्व ग्रामस्थ, शेतकरी बांधव व तमाम नागरिकांना दीपावली व नुतन वर्षानिमित्त हार्दिक शुभेच्छा !

सर्व सोयींनी सुसज्ज असणारे ग्राहकांना वाजवी व योग्य दरात उपलब्ध होणारे, अद्यावत पध्दतीने प्रशस्त व हवेशीर जागेत मंगळवेढा नगरीत साकारलेले एकमेव मंगल कार्यालय म्हणजेच...

शुभेच्छुक

लक्ष्मीनारायण मंगल कार्यालय

किल्लाभाग, मंगळवेढा जि. सोलापूर

एकवेळ अवश्य भेट द्या व आपल्या कार्याचे बुकींग करा.

छोट्या मोठ्या कार्यासाठी उपलब्ध

संपर्क : अभिजित भालचंद्र पटवर्धन फोन नं. (०२१८८) २२०२६५फोन नं. (०२१८८) २२०२६५

शुभदिपावली

सर्व ग्रामस्थ, शेतकरी बांधव व तमाम नागरिकांना दीपावली व नुतन वर्षानिमित्त हार्दिक शुभेच्छा !

शुभेच्छुक

ग्रामपंचायत वझरे, ता.सांगोला

सरपंच - सौ. बानु मल्हारी चव्हाण

उपसरपंच : श्री. लक्ष्मण गोविंद वाघमारे

ग्रामपंचायत अधिकारी : सौ. मेघा आण्णाप्पा हिप्परकर

सर्व सदस्य, ग्रामस्थ व कर्मचारी वर्ग, ग्रामपंचायत वझरे, ता.सांगोला

गरज की थोतांड?

ललित लेख

’दसरा सण मोठा नाही आनंदाचा तोटा’ . खरंच सण सौख्याचा व्हावा ही जबाबदारी आपलीच नाही का? . रामायण घडून गेले, रावणाचा वध झाला हे खरे आहे पण त्याची आठवण म्हणून उगाचच थोतांड माजवून पैशाचा अपव्यय करायचा आणि समाजात टेंभा मिरवायचा ही वृत्ती म्हणजेच आसुरी वृत्तीचा विनाश ऐवजी कलीयुगी भरकटलेल्या मूठभर समाजातील लोकांनी कुविचारांनी केलेली कृती असेच वाटतेय. यातून काय निष्पन्न होणार बरे?.

आजूबाजूला भ्रष्टाचार ,अत्याचार, नैसर्गिक आपत्तीचा मुकाबला करण्यासाठी अगदी बोटावर मोजण्या इतकेच लोक असतात. आणि पुढाऱ्यांच्या सभा, ली,रावण दहन सोहळा,एखाद्या अभिनेत्याने नवीन पक्ष काढून जमविलेल्या गर्दीत चेंगराचेंगरी होऊन अनेकांचे जीवही जातात, गंभीर जखमी होतात म्हणजेच गोष्टींचा बाऊ करून विनाकारण पैशाचा अपव्यय केला जातो ही गोष्टच मुळात मनातील आसुरी प्रवृत्तीची वाटते. हे कुठेतरी थांबायला हवे असे कोणालाच का वाटत नाही हा प्रश्न अनुत्तरीत वाटतो. पौराणिक आधार वेगळा नि प्रत्यक्षात काय घडत आहे,कुठे कसा आळा घातला पाहिजे हे बघणे त्यासाठी उपाय शोधून कृती अमलात आणणे महत्त्वाचे आहे.

कोणीतरी सात्विक विचारांचा माणूस पुढे येऊन काहीतरी करत असेल तर त्याचे पाय ओढायचे ,काहीतरी अडथळा आणायचा जेणेकरून ती व्यक्ती हतबल व्हावी यांच्या माजापुढे . ही प्रवृत्ती समाजाच्या विकासासाठी बाधा ठरते हे मात्र खरे. रावणही तत्वनिष्ठ, महादेवाचा भक्त होताच की. त्याने सीतेला पळवून नेताना भिक्षा मागायला आल्यावर भिक्षा वाढ माय हा शब्द उच्चारला . आणि त्यामुळेच माय या शब्दाला कलंक न लागू देता त्याने सीतेला गैर अर्थाने वापरले नाही ही एक बाजू अर्थपूर्ण वाटत नाही का?.

प्रत्येक वाईट गोष्टीतून काहीतरी शिकण्यासारखे नक्की असते खरेच.

दुष्ट प्रवृत्ती संपविणे सहज सोपे नाही हे जरी खरे असले तरी प्रत्येकजण आपापल्या परीने जबाबदारीने सत्कर्म करीत किंबहुना वाईट कृत्ये तरी करु नयेत, विचार आणि आचार यांची सांगड घालून थोडा जरी खारीचा वाटा उचलला तरी कितीतरी अनर्थ टळतील ,प्रखरता तरी कमी होईल.

खोटा मुखवटा घालून माणुसकीचा आवडणारे ही बरेच असतात. त्यांना ओळखण्यात गफलत होते आणि त्यातूनच फसवणूक होते. विनाकारण निर्दोष लोक भरडले जातात, त्यांचे अतोनात नुकसान होते आर्थिक आणि शारीरिकही . आणि इज्जतीला घाबरून नाव खराब होईल या भीतीने ही लोकं मूग गिळून गप्प बसतात.

उलट पक्षी त्यांच्याच बाजूने राहून समाजात साळसूदपणाचा आव आणतात. कशी नि कधी बदलणार ही समाजव्यवस्था हा प्रश्नच आहे.

शिक्षित किंवा अशिक्षित कोणीही असो आर्थिक सुबत्ता आली की त्याच्याकडे नितीमत्तेचा अभाव दिसून येतो. एके दिवशी गर्वाचे घर खाली होते ही म्हण खरी ठरते हे माहीत असूनही त्या व्यक्तीला सुबुद्धी येत नाही किंवा इच्छाच नसते हेच दुर्दैव म्हणावे लागेल. उच्च नीच , गरीब श्रीमंत हा भेद न करता होईल तितके माणुसकीने वागणे हिताचेच असते हे वेगळे सांगायला नको असे वाटते.

नैसर्गिक आपत्ती आल्यानंतर करण्यात आलेली मदत ही तिथपर्यंत किती प्रमाणात पोहोचते आणि त्याचा गैरफायदा किती जण घेतात हेही आपण पाहतच असतो. गरज वाटते ती सच्चेपणाची.

कोणी एखादा व्यक्ती ही व्यवस्था बदलू शकत नाहीत. स्वतःच्या अंतःकरणाशी प्रामाणिक राहून केलेली एखादी छोटीशी कृती सुद्धा चांगले फलित देऊन जाते. किंबहुना त्याच्या पिढीला सुद्धा त्याचा फायदाच होतो. प्रारब्धाचा न्याय हा ज्याच्या त्याच्या नशिबात घडतच असतो. वाईट विचाराने टाकलेले फासे त्याचे त्यालाच उलटून बरबाद सुद्धा करु शकतात हे वेगळे सांगायला नको.

तर एकंदरीतच कोणत्याही गोष्टीचे भान ठेवून काम करणे आवश्यक असते. परमेश्वर किंवा इतर व्यक्तींच्या माध्यमातून योग्य न्याय हा होतच असतो.हे विसरायला नको असे वाटते.स्वतःच्या मनातील रावण प्रवृत्तीचे विचार काढून टाकण्याची गरज आहे. शक्ती मातेचे पूजन महत्त्वाचे मानून जगदंबेच्या म्हणजेच देवीला भक्तीभावाने,श्रध्देने पूजा केली जाते आणि चरणी लोटांगण सुद्धा घातले जाते.

स्त्री शक्ती एवढी श्रेष्ठ असताना मग दुसऱ्या बाजूने विचार करता स्त्रीला समाजात

॥ शुभ दीपावली ॥

आमचे असंख्य हितचिंतक, शेतकरी बांधव
व तालुक्यातील तमाम नागरिकांना
दीपावली व नुतन वर्षानिमित्त हार्दिक शुभेच्छा !

श्री.हरीश्चंद्र अरुण जाधव

मंडलाधिकारी,नाझरे ता.सांगोला

अध्यक्ष, ग्राम महसूल अधिकारी संघटना, सांगोला

जाधव परिवार,सांगोला

॥ शुभ दीपावली ॥

आमचे असंख्य ग्राहक, हितचिंतक व
तमाम नागरिकांना दीपावली व नूतन
वर्षानिमित्त हार्दिक शुभेच्छा !

श्री.रामचंद्र ईश्वरा कदम

माजी चेअरमन
चिकमहूद,वि.का.से.सोसायटी
माजी अध्यक्ष
महात्मा गांधी तंटा मुक्त समिती चिकमहूद
उपाध्यक्ष
सुशीलकुमार शिंदे माध्यमिक विद्यालय
प्रगतशील बागायतदार

समस्त कदम परिवार,महूद,ता.सांगोला

॥ शुभ दीपावली ॥

आमचे असंख्य ग्राहक, हितचिंतक व तमाम
नागरिकांना दीपावली व नूतन वर्षानिमित्त
हार्दिक शुभेच्छा !

शुभेच्छुक

निसारभाई इनामदार

मु.पो.जवळा,ता.सांगोला

आर.टी.ओ. एजंट

मो.९४२३३३४६०१

इनामदार परिवार, जवळा

आमचे हितचिंतक, ग्राहक व तमाम नागरिकांना
दीपावली व नूतन वर्षानिमित्त हार्दिक शुभेच्छा!

ॲड.तुकाराम दत्तात्रय ढेरे

शुभेच्छुक

तुषार ढेरे ॲण्ड कं.

(चार्टर्ड अकौंटंटस्)

श्री अपार्टमेंट, महुद रोड, सांगोला
मो. 7057703737, 9119423737

सीए तुषार ढेरे

ढेरे परिवार, मस्के कॉलनी,सांगोला

दुय्यम वागणूक मिळते.

अजूनही पुरुष सत्तेचा अवलंब जास्ती दिसून येतो. मग ती स्त्री कोणत्याही क्षेत्रात अव्वल स्थानावर असली तरी तिचे विचार समजून घेतले जात नाहीत. क्वचितच एखादे ठिकाणी न्याय मिळतो अन्यथा बऱ्याच ठिकाणी बऱ्याच वेळी तिची कुचंबना झालेली दिसून येते. एक अस्पष्ट हुंदका त्या ठिकाणी जाणवतो खरा.

प्रपंचात राहून कुटुंबासाठी, संसारासाठी तिची धावपळ, नोकरीत असूनही दोन्ही ठिकाणी तिचीचालू असलेली कसरत म्हणजे खऱ्या अर्थाने स्त्री शक्तीचे अस्तित्व सतत जाणवत राहते खरे.

त्याचे महत्त्व अगदी क्वचित व्यक्तींना जाणवते किंबहुना ते तिचे कर्तव्यच आहे असे सांगून डावलले जाते. वर्चस्व खपवून घेतले जात नाही. तिला तिचे स्वातंत्र्यही मिळत नाही. नियमाच्या चाकोरीत बांधून व्यवहारिक विचार केला जातो. ही अविश्वास आणि संशयी प्रवृत्तीची माणसेच अशा प्रकारची वागणूक स्त्रीला देत असतात. तिने स्पष्ट मत व्यक्त केले तर काहीतरी कारण काढून तिचा मानसिक छळ देखील करायला मागे पुढे पाहत नाहीत. जनाची नाही तर स्वतःच्या मनाची देखील लज्जा या नराधमांना नसते यांचे वाईट वाटते.

अशा आसुरी प्रवृत्तीच्या माणसांमध्ये मनामनातील रावण जाळून टाकण्याची सध्याच्या परिस्थितीत गरज आहे. क्लेश , भांडणे याच्यामधून काय साध्य होणार हेच कळत नाही. कोण श्रेष्ठ हे ठरवीत असताना जो न्याय होतो तोच मुळात क्लेशदायक असतो. न्याय आंधळा म्हणजेच खऱ्याचा न्यायनिवाडा क्वचितच सकारात्मक केला जातो अन्यथा पैशाच्या जोरावर ब-याच ठिकाणी फासे पलटले जातात. आणि न्याय मात्र अनितीच्या बाजूने केला जातो. होरपळ मात्र खऱ्याची होते. असेच चित्र पाहायला मिळते.

दिसते तसे नसते या विचाराने खरेच मन सुन्न होऊन अस्वस्थता निर्माण होते. सांगायचे कोणाला नि कुठे न्याय मागायचा हाच मोठा प्रश्न आहे. एखाद्या व्यक्तीला पाठीशी घालण्यासाठी त्यांचे गैरवर्तन गृहीत धरले जाते. आणि दुसऱ्या बाजूची मात्र मानहानी शिवाय आर्थिक ताणही पडतो हे आणखी वेगळेच.

कधीतरी कोणीतरी धाडसाने पाऊल पुढे टाकत याचा विचार केला तर त्या व्यक्तीला चांगलाच धडा शिकवला जातो अन्यथा आयुष्यात पुन्हा ताठ मानेने उभे राहू शकणार नाही अशी रेबीज केली जाते. अशा या कलियुगात प्रवृत्ती तर कधी बदल होणार माहित नाही. स्वतःचा चेहरा आरशात पाहून पांघरलेला बुरखा बाजूला करताच कळले तरी पुष्कळ होईल असे वाटते.

नकली की असली...
विचार स्वतःच मनाला
नको विचारु मजला....
नकली निवड कशाला ?.

डॉ.सौ.राजश्री संजय जाधव
सोलापूर
९४२०४८८७३३,
८००७२०३८०८

सर्व ग्रामस्थ, शेतकरी बांधव व तमाम नागरिकांना दीपावली व नुतन वर्षानिमित्त हार्दिक शुभेच्छा !

शुभदिपावली शुभेच्छुक

ग्रामपंचायत पाचेगांव बु।।, ता.सांगोला

सरपंच : श्रीमती इंदाबाई शिवाजी कर्चे

उपसरपंच : श्री. महेंद्र शामराव दौंड

ग्रामपंचायत अधिकारी : श्री. प्रदिप रंगनाथ लोहार

सर्व सदस्य, ग्रामस्थ व कर्मचारी वर्ग, ग्रामपंचायत पाचेगांव बु।।,

।। शुभ दीपावली ।।

आमचे असंख्य ग्राहक, हितचिंतक, मित्रपरिवार व तमाम नागरिकांना दीपावली निमित्त हार्दिक शुभेच्छा!

शुभेच्छुक

श्री.माधव सदाशिव देशपांडे

देशपांडे पेढेवाले

महाद्वार, पंढरपूर, जि.सोलापूर



केशरी पेढा, आंबाबर्फी, खवाबर्फी, मलईबर्फी, गुलकंद बर्फी इत्यादीचे उत्पादक.

प्रोप्रा.पांडुरंग माधव देशपांडे (नाझरेकर)

फो.०२१८६/२२५२९०

पंढरपूर तीर्थक्षेत्रातील अग्रनामांकीत केशरी पेढा

।। शुभ दीपावली ।।

आमचे असंख्य हितचिंतक व तमाम नागरिकांना दीपावली व नुतन वर्षानिमित्त हार्दिक शुभेच्छा !

शुभेच्छुक

श्री. रमाकांत श्रीनिवास जोशी (भंडारकवठेकर)
सौ. रोहीणी रमाकांत जोशी
श्री. राघवेंद्र रमाकांत जोशी
सौ. वर्षा राघवेंद्र जोशी
चि. श्रीयश राघवेंद्र जोशी
चि.वेदश्री राघवेंद्र जोशी

समस्त जोशी परिवार, पुणे

आमचे असंख्य मित्रपरिवार, हितचिंतक व तमाम नागरिकांना दीपावली व नुतन वर्षानिमित्त हार्दिक शुभेच्छा !

शुभेच्छुक

प्रगती क्लासेस

राजरत्न गाडे (सर)

कचेरी रोड, सांगोला

गाडे परिवार,सांगोला

शुभदीपावली

आमचे असंख्य हितचिंतक व तमाम नागरिकांना दीपावली निमित्त हार्दिक शुभेच्छा!

शुभेच्छुक

वसंतराव शामराव बनसोडे

मु.पो.सांगोला, जि.सोलापूर

सदस्य : भ्रष्टाचार विरोधी जनआंदोलन समिती (न्यास)

।। शुभ दीपावली ।।

आमचे असंख्य हितचिंतक व तमाम नागरिकांना दीपावली व नुतन वर्षानिमित्त हार्दिक शुभेच्छा !

शुभेच्छुक

श्रीमती सुलभा वसंत अभ्यंकर
सौ.रसिका सौरभ कुलकर्णी, पुणे
सौ. राधिका (रश्मी) सुमित मुळे, पुणे

अभ्यंकर/कुलकर्णी/मुळे परिवार, पुणे

प्राजक्त

स्वर्गीचे हे फूल कोवळे
अवतरले या मर्त्य भूवरी
गंध सुगंधी प्राजक्ताच्या
शुभ्र पाकळ्या देठ केशरी

रात्रौ समयी फूल उमलुनी
चराचरासी गंधित करते
पहाट वारा भिरभिरणारा
कुसुमांचा या सडा पाडते

पारिजात ही म्हणती त्याला
मोहविते ते श्रीकृष्णाला
क्षणात फुलुन विरून जाते
काय म्हणावे समर्पणाला

गंध फुलांचा पुलकित करतो
तनामनाला सुखवुन जातो
जिवनाचे ही सार सांगतो
सूक्ष्म आयुष्य गंधित करतो

पर्णोपर्णी अलगद फुलते
अंगणात अन् माळावरती
छाप आपली सोडुन जाते
गंध लागता त्याचा हाती

मानवी देह त्यजण्या आधी
प्राजक्तासम जगून घ्यावे
असे कर्तृत्व करून जावे
या जगताचे होउन जावे

सौ.मानिनी महाजन

लवंगलतेचा प्रणय

नव्या पिढीला जेष्ठांसंगे विनय
जाचतो आहे
एकांताचा सलज्जतेचा प्रणय
जाचतो आहे

संघर्षाची गर्मी त्याच्या तनामनाला
भिडली
हटवाद्याला तडजोडीचा विषय
जाचतो आहे

संस्काराची-सौजन्याची मढी
जाळली त्यांनी
बिनलाजेचा नवचालींचा प्रलय
जाचतो आहे

वंशदिव्याचे-बालपणाचे कौतुक
टिकते कोठे
मायपित्याला नाकर्ता पण तनय
जाचतो आहे
अन्यायाची सदैव रुखरुख जीव
जाळते त्याचा
दुबळ्यावरती जरी मिळवला विजय
जाचतो आहे

पाठीवरचे धीराचे ते हात कमी का
झाले
इथे कुणाला नवोदितांचा उदय
जाचतो आहे

चौकामधल्या कुचाळक्यांनी कळी
कुणाची खुलते
ईश्वरनामाविना कुणाला समय
जाचतो आहे

सिराज करीम शिकलगार
मोबा. नं. ९८९०५९७८५५

पैश्याची कहाणी

सोने चांदी रूपे
होती जुनी नाणी
देवाण घेवाण
पैशाची कहाणी

पैशाची कहाणी
पैसा आणि आणे
कामाला यायचे
चाराणे आठाणे

चाराणे आठाणे
रुपयाचा बंदा
छान चालयाचा
व्यापाऱ्याचा धंदा

व्यापाऱ्याचा धंदा
पेटी आणि गल्ला
त्याच्या वर कधी
चोर मारी डल्ला
चोर मारी डल्ला
मग आल्या नोटा
भ्रष्टाचार आला
पैसा झाला खोटा

पैसा झाला खोटा
महागाई आली
शंभराची गोष्ट
कमजोर झाली

कमजोर झाली
पैसा झाला खेळ
गरिबाने कसा
बसवावा मेळ

दत्तात्रय गणपतराव इंगळे
७५८८२१६१२५

हिरवा सण

तुरा खोवूनी-भाळी सैरभैर सुरांचे पक्षी
त्यांच्या गगन भराऱ्यांनी गगनाचा गाभारा
नक्षीदार झाला
आणि नभात उठली प्रकाशाची गोडी खळी
तसेच लक्ष लक्ष वेलींवर विसावतात
पाखरांचे लक्ष थवे, फांद्याफांद्यांवर
अनरवी लता वेलींवर मोहक पुष्पांची दाटी
नि विविध फुलांनी गच्च बहर आलेला
कारण पराग कण फुलाफुलांचे
त्यावर जीवन फुलपाखरांचे
त्यामुळे गंध हसरी फुले वाऱ्यावर झुलतात
शिवाय सुवासाच्या फुलांच्या ओळी
आनंदाचे सुरेख रंग पसरवतात
रान माय पदरांच्या सुरावटीमुळे जागे गजबूजन
अन सभोवार हिरवी गर्दी गवत पात्यांची नव निर्माणाची
म्हणून हिरव्या गर्दीचे रान आणि रानपाखरे मित्रत्वाचे भूषण
दोन्ही मिळून साजरा करती हिरवा आनंदाचा हिरवा सण

श्री ना. मा. कांबळे सांगोला ७४४८२९८४०५

।। शुभ दीपावली ।।

आमचे असंख्य हितचिंतक, मित्रपरिवार व
तमाम नागरिकांना दीपावली व
नूतन वर्षानिमित्त हार्दिक शुभेच्छा !

श्रीमती ए.एस. गुरव

दुय्यम निबंधक वर्ग-१

अधिकारी व कर्मचारी वर्ग

दुय्यम निबंधक कार्यालय, सांगोला, जि.सोलापूर

सर्व ग्रामस्थ, हितचिंतक, मित्रपरिवार व तमाम नागरिकांना दीपावली व
नुतन वर्षानिमित्त हार्दिक शुभेच्छा !

शुभेच्छुक

सौ.नसीमा खाजुद्दीन मुजावर	सौ.रेणुका बापूसाहेब वलेकर
सरपंच	उपसरपंच

ग्रामपंचायत मांजरी, ता.सांगोला, जि.सोलापूर

ग्रामपंचायत अधिकारी : श्री. प्रमोद महादेव गायकवाड

सर्व सदस्य, कर्मचारी वर्ग व ग्रामस्थ, ग्रा.पं.मांजरी

आमचे असंख्य हितचिंतक, ग्रामस्थ, शेतकरी बांधव व
तमाम नागरिकांना दीपावली निमित्त हार्दिक शुभेच्छा!

शुभेच्छुक

• सरपंच •	• उपसरपंच •	• ग्रामपंचायत अधिकारी •
सौ.छाया हणमंत खांडेकर	श्री. अजय मल्लिकार्जुन कांबळे	श्री.मारूती पांडुरंग जुंदळे

सर्व सदस्य, ग्रामस्थ व कर्मचारी वर्ग

ग्रामपंचायत वाकी (घेरडी), ता.सांगोला

आजची युवा पिढी

'आजची युवा पिढी मूळ संसंस्कृतीपासून दूर जात आहे कारण आजची पिढी समजून घेणे फारच कठीण आहे असे उद्गार आजकाल सर्रास पालकांच्या तोंडून ऐकू येत असतात. तंत्रज्ञानाने झपाटलेली आणि डोक्याने तितकीच शार्प अशी आजची पिढी आहे यामध्ये कोणतेही दुमत नाही. भावनांचा जास्त विचार न करता बऱ्यापैकी प्रॅक्टिकली आजची मुलं जगतात आणि हे वास्तव आहे. आधीच्या काळात हे असे नव्हते अशी वाक्य ऐकवणाऱ्यांना त्याच क्षणी तोंडावर बोलून दाखवणारी देखील आजची पिढी आहे.

अगोदरच्या काळी मोबाईल, कॉम्पुटर, फॅक्स, टॅब, लॅपटॉप, पामटॉप, आयपॉड, असे काही उपकरणे उपलब्ध नव्हती. तेव्हा नात्यामध्ये खूप जिव्हाळा होता पण आता मात्र जस-जसा नवीन पिढीचा काळ येत आहे त्याप्रमाणे माणुसकी कुठेतरी लोप पावू लागली आहे. कारण जेव्हा एक नातू जेव्हा त्याच्या आजीला तिला तिच्या वाढदिवशी गावीच जाऊन भेटायचा आज तोच नातू मोबाईलवरून त्याच्या आजीला वाढदिवसाच्या शुभेच्छा देतो. याचे मुख्य कारण म्हणजे प्रत्येकाची दैनंदिन जीवनशैली. सध्याची पिढी ही त्यांच्या कामात, अभ्यासात, अनेक वैयक्तिक जीवनात पूर्णतः व्यस्त होऊन गेलेली असते. यामुळे नात्यामध्येसुद्धा कुठेतरी दुरावा निर्माण होण्याची आणि प्रश्नचिन्हे निर्माण होण्याची दाट शक्यता असते.

बहुतेक नविन पिढी मॉडर्न संस्कृती जोपासण्याचा विचार करत असते आणि त्यामुळे ते पूर्णपणे आपल्या स्वतःच्या संस्कृतिलासुद्धा विसरून जातात. यामुळे आपली मूळची सांस्कृति कुठेतरी मागे पडलेली दिसते आणि हे जर हे असेच चालू राहिले तर मूळ संस्कृतीला याचा जबर फटकाही बसू शकण्याची दाट शक्यता आहे. युवा लोकांनी विकसित संस्कृती स्वीकारावी पण आपली सामाजिक संस्कृतीसुद्धा जोपासली पाहिजे. युवा अवस्थेत व्यक्तिमत्वदेखील विकसित होत असते. त्यावेळी मानसिक आणि शारीरिक या दोन्ही बाजू महत्त्वाच्या असतात. अयोग्य आहार, रात्रीची जागरण करणे हे टाळायला हवे. पण हे सगळे समजून घ्यायचे ते वय नसते. काही युवक-युवती समजून घेतात तर काहीजण घरातील मोठ्यां व्यक्तींबरोबर वाद घालून त्रास करून घेतात.

युवा मनामध्ये अनके गोष्टींचा मोह होणे साहजिकच असते. पण या सगळ्या मोहांपासून तरूणाईने स्वतःला दूर ठेवणे देखील गरजेचे आहे. मानसिक स्वास्थ्य निकोप राहण्यासाठी सामाजिक कार्याबद्दल, समाजातील वेगवेगळ्या घडामोडीबद्दल तरूणाईला आकर्षण असायला हवे. त्यामुळे व्यक्तींचा आदर करणे, वेळेप्रसंगी लोकांच्या उपयोगी पडणे, वैफल्यातून मार्ग काढण्यासाठी दुसर्यांना मदत करणे यातूनच आपल्या व्यक्तिमत्वाचादेखील विकास होत जातो. आजची तरुण पिढी आदर कमी आणि अपमान करण्यात जास्तच पुढे असते. काही तरुण खूप समजूतदार असतात तर काही समजूतदार अजिबात नसतात कारण त्यांचा वयक्तिक स्वभाव तसा असतो आणि त्यांच्यावर संस्कारसुद्धा काही प्रमाणात कमी झालेले असतात. आजच्या तरूण पिढीला कुठेतरी चांगले मार्गदर्शन आणि उत्तम संस्काराची अत्यंत अवश्यकता आहे. ज्यामुळे भविष्यात येणारी पिढी ही देखिल यांचे आदर्श घेऊन उत्तम कार्यास सुरवातीपासूनच प्रयत्न करेल.

भूषण सहदेव तांबे
व्हाट्सअप क्र.: ९०२९२५८०३८

चारोळी

पानाफुलात दरवळ
निसर्ग राजा नांदतो
प्रभूची किमया न्यारी
फुलणे स्वानंद सांगतो

स्वरचित
डॉ सौ. राजश्री संजय जाधव सोलापूर
९४२०४८८७३३

झोका

श्रावण सरींनी चिंब मन
निळेशार आकाश भूलावून
झोक्यावरी झुलताना तन
राधा कृष्ण प्रीत सूरातून

स्वरचित
डॉ सौ. राजश्री संजय जाधव सोलापूर
९४२०४८८७३३

सर्व ग्रामस्थ, शेतकरी बांधव व तमाम
नागरिकांना दीपावली व नुतन वर्षानिमित्त
हार्दिक शुभेच्छा!

• शुभेच्छुक •

सौ. विमल भिमराव सरगर (सरपंच)

श्री. बाळासो विलास आलदर (उपसरपंच)

श्री. जयवंत पांडुरंग लवटे (ग्रामपंचायत अधिकारी)

सर्व सदस्य, कर्मचारी व ग्रामस्थ

ग्रामपंचायत उदनवाडी, ता.सांगोला

शुभदिपावली

आमचे असंख्य मित्रपरिवार, हितचिंतक, तमाम नागरिक,
शेतकरी बांधव व सिताराम महाराजांचे भाविक भक्तांना
दीपावली व नुतन वर्षानिमित्त हार्दिक शुभेच्छा!

शुभेच्छुक

हॉटेल प्रदिना

एस.टी.स्टँड समोर, सांगोला, जि.सोलापूर

एस.टी.उपहार गृह

शुद्ध शाकाहरी, मांसाहरी
जेवणासाठी प्रसिद्ध...

महालक्ष्मी कॉम्प्लेक्स

श्री.प्रकाश दशरथ जाधव

श्री.दिपक दशरथ जाधव

जाधव परिवार, सांगोला

महिला दिन

आज शब्दाशब्दातून
त्या सगळ्यांची
तिच्या विषयी कळकळ
आंतरिक उमासे
तिचा सन्मान, गौरव
तिच्या कार्याचे दाखलेही
दिले जातील कित्येक
आज तर ती देवी
देव्हार्यातली
मखरात बसवलेली
सगळीकडे जल्लोष
सभा, समारंभ,
नवनवीन घोषणा
तिचा सन्मान केल्याच्या...
त्याही नटून थटून
साजरा करतील आजचा दिवस
मोठ्या उत्साहाने
आंतरिक उमाळ्याने

समजतं तिला
बळी देण्याआधी
सजवतात असे तेही...

कविता झुंजारराव

सुंदर सृष्टी

लख्ख उजाडलं सारं
झालं मोकळं आकाश
सुर्यदेव प्रकटले नभी
सांडला स्वच्छ प्रकाश

दडी मारून बसलाय
पर्जन्यराजाही ढगांत
गेला पेरुन पावसाळा
धरेवरी भागाभागांत

बळीराजा सुखावला
पिकं तरारती जोषात
उब प्रकाश देईल रवी
राहे नभाच्या कोशात

चिंब भिजलं शेतंरानं
खळाळती ओढेनाले
उनाड रानवाऱ्यामुळे
झुले पोपटी तृणभाले

वाऱ्यासंगे पाऊसधार
करी नर्तन कौलारावर
यौवन मदनकांता घेई
सावरून पदर डोईवर

तडाडतेय सौदामिनी
अंबरातून अवनीवरी
आगमनाचीच दवंडी
देतो वरूणराज बरी

घालतो अल्लड वारा
शीळ मंजुळ कानात
जागवुन रानफुलांना
घुमतो रानी चक्रवात

हसती फुले उमलूनी
करत सृष्टीचे स्वागत
बदल ऋतुंचे होताना
बळी बसतो जागत

सौ. भारती दिलीप सावंत
खारघर, नवी मुंबई
९६५३४४५८३५

आमचे हितचिंतक व तमाम नागरिकांना
दीपावली व नूतन वर्षानिमित्त
हार्दिक शुभेच्छा...!

शुभेच्छुक
ज्ञानदिप वाचनालय
जवळा, ता.सांगोला
श्री.सुहास दिगंबर कुलकर्णी
अध्यक्ष
सर्व संचालक मंडळ, सदस्य व सभासद वर्ग

|| शुभ दीपावली ||

माजी नगरसेवक

आमचे असंख्य हितचिंतक व तमाम नागरिकांना दीपावली व नुतन वर्षानिमित्त हार्दिक शुभेच्छा !

शुभेच्छुक

अ‍ॅड.संजीवकुमार शिंदे

अ‍ॅड.संजीवकुमार शिंदे

माजी नगरसेवक सांगोला नगरपरिषद सांगोला
व्हा.चेअरमन, अजिंक्यतारा नागरी पतसंस्था, सांगोला
माजी अध्यक्ष, बार असोसिएशन सांगोला

आमचे असंख्य हिंतचिंतक व तमाम नागरिकांना दीपावली व नुतन वर्षानिमित्त हार्दिक शुभेच्छा !

शुभेच्छुक

प्रो. शंकर बनकर

हॉटेल रुचिसंगम

छ. शिवाजी चौक, सांगोला



सकाळच्या उत्कृष्ट नाष्ट्यासाठी स्वादिष्ट व रूचकर
चहासाठी प्रसिद्ध असलेले हॉटेल...

बनकर परिवार, सांगोला

अमृततुल्य चहा

।। शुभ दीपावली ।।

आमचे असंख्य मित्रपरिवार, हितचिंतक, व तमाम नागरिकांना दीपावली व
नूतन वर्षानिमित्त हार्दिक शुभेच्छा!

शुभेच्छुक

गावडे बाल रुग्णालय व नर्सिंग होम

कडलास रोड, सांगोला फोन : ७७७४०४८६४३

डॉ. एच. व्ही. गावडे
(एम.बी.बी.एस. डी.सी.एच.)

कमी दिवसाच्या बाळासाठी इनफन्ट वार्मर, लहान बाळाच्या काविळीसाठी फोटोथेरपी
* सर्व प्रकारच्या लसीकरणाची सोय, बीसीजी व गोवर लस, पोलिओ, ट्रिपल, मेंदूज्वर, कावीळ, टायफाईड दररोज दिली जाईल. *लहान मुलांच्या सर्व आजारावर उपचार

डॉ. संध्या गावडे
(एम.बी.बी.एस.) स्त्री रोग तज्ञ
स्त्ररोग विषयी तपासणी, प्रसुतिपूर्व तपासणी,
कुटुब नियोजन सल्ला केंद्र, वंध्यत्व निवारण सल्ला

नानांच्या गमती

एक मजेशीर किस्सा नानांसोबत घडतो. काकींच्या माहेरी त्यांची आई आजारी पडलेली असताना. एक-दोन आठवड्यांसाठी काकी त्यांच्या माहेरी जातात. नाना घरी एकटेच असतात म्हणून नानांना जेवणाची पूर्वकल्पना देऊन काकी घरी जेवण बनवून ते त्यांच्या माहेरी प्रवासासाठी निघतात. नेहमी प्रमाणे नाना त्यांच्या आराम खुर्चीवर आराम करत असतात. रात्रीचे दहा वाजलेले असतात. एवढ्यात बाजूच्या टेबलावर फोनची रिंग वाजते.

(ट्रिंग... ट्रिंग......, ट्रिंग... ट्रिंग......, ट्रिंग... ट्रिंग......)

नाना: (फोन उचलतात) हॅलो बोला.

काकी: अहो... मी बोलतेय.

नाना: हा... बोल.. पोहोचलीस का? प्रवास कसा झाला?

काकी: हो. पोहोचली. प्रवास ठीक झाला.

नाना: आईची तब्बेत कशी आहे

काकी: ठीक आहे. तुम्हाला विचारत होती.

नाना: बरं. मी ठीक आहे सांग. आणि मी पण त्यांना विचारत होतो म्हणून सांग आणि हा मी जमिनीच्या कामात थोडा व्यस्त असल्यामुळे यायला नाही मिळाले हे सुद्धा सांग. राग मानू नको, फोनवर चौकशी केली.

काकी: हो. हो. सांगते सगळं. तुम्ही आधी सांगा जेवलात का?

नाना: हो. मगाशीच. आठ वाजता जेवलो आणि मग आराम खुर्चीवर बसलोय कादंबरी वाचत.

काकी: जेवण ठीक झालं ना? घाई गडबडीत झालं सगळं.

नाना: अगं. तू कशाला एवढं टेन्शन घेतेस. मस्त झालं जेवण. खेकडे तर मला जास्त आवडतात आणि तुला हे चांगलचं माहित आहे. खेकडा आणि रस्सा अगदी मस्त झालेला. पोट भरून मनसोक्त जेवलो.

काकी: अहो. तुमचं डोकं फिरलंय का?

नाना: का गं? आता काय झालंय?

काकी: का म्हणजे? मी खेकड्याच कालवण नाही बनवलेलं.

नाना: मग? मी खाल्लं ते काय होत?

काकी: (संतापाने) मला काय माहित? तरी गॅस बंद करायच्या आधी मी तुम्हाला सांगितले होते की, कढईवर कालवण शिजत आहे. तुम्ही त्यावर झाकण ठेवा. घाई गडबडीत मी झाकण ठेवले नव्हते.

नाना: अरे. देवा. (नाना डोक्याला हात मारून) जेवण जेवताना लाईट गेली होती म्हणून मेणबत्तीच्या मंद प्रकाशात मी जेवत होतो. नेहमी प्रमाणे जेवणाला सुगंध छान येत होता. खेकड्यांचे कालवण होते म्हणून चवीप्रमाणे मी आज दोन घास जास्तचं खाल्ले.

काकी: (जोरात ओरडतात..) अहो.... आधी कीचनमध्ये जाऊन बघा.

नाना: आता काय बघू?

काकी: भांडी आजून घासली नसली तर ताटातील उष्ट बघा म्हणजे समजेल तरी आपल्याला.

नाना: (फोन बाजूला ठेवून नाना किचनमध्ये धाव घेतात आणि बॅटरीच्या साहाय्याने ताट तपासून बघतात. आश्चर्याचा धक्का बसल्यावर.... (धावत) नाना पुन्हा फोनकडे येतात आणि काकींशी संवाद साधतात.) हॅलो..... (घाबरत आवाजात)

काकी: अहो एवढं घाबरायला काय झालंय?

नाना: अगं घाबरण्यासारखंच आहे तसं. काहीतरी.

काकी: (संतापून...)अहो कोड्यात काय बोलू नका.... जे काय आहे ते स्पष्ट बोला.... नाहीतर इथेच मला अटॅक येईल.

नाना: (मंद आवाजात..) तो तर येणारच आहे ऐकल्यावर.

काकी: काय बोललात का?

नाना: (पुन्हा थोडस घाबरून) नाही नाही.

काकी: अहो, मग सांगा ना नक्की काय झालं ते?

नाना: मी सांगेन पण तू नीट आणि शांतपणे ऐकून घ्यायचंस ओरडायच अजिबात नाही.

काकी: नक्की आजच सांगणार आहात ना? नाही ओरडत. पण आता तरी सांगा. माझी ऐकण्याची सर्व सहनशक्ती संपली आता.

नाना: अगं मी खेकडा समजून विंचू खाल्ला.

काकी: अरे देवा.... (जोरात ओरडते)

नाना: मी तुला सांगितलेलं ना... ओरडायचं नाही म्हणून...

काकी: अहो पण हे कस शक्य आहे?

नाना: अगं तू कढईवर झाकण ठेवले नव्हतेस... तेव्हा कालवण शिजत असतानाच.... भिंतीवरचा विंचू त्यात पडला असावा... जेवणाच्या वेळी लाईट गेली त्यावेळी मेणबत्तीच्या प्रकाशात मी जेवलो. मी खेकडा समजून त्या विंचूला खाल्लं.

काकी: (हात जोडून...) धन्य रे पांडुरंगा...

नाना: आता झालं ते झालं...

काकी: अहो, तुमचे पूर्वज का आदीमानव होते का?

नाना: अगं ते जाऊदे... (बेचैन होऊन) मला सांग आता मी काय करू?

काकी: डॉ. सचिन साहेबांना फोन करा आणि सांगा त्यांना पटकन. आणि ते काय बोलतात ते मला पण कळवा पून्हा. मी वाट पाहतेय तुमच्या फोनची.

भूषण सहदेव तांबे

व्हाट्सअप क्र.: ९०२९२५८०३८

मार्गदर्शक

संस्थेचे सभासद, ठेवीदार, व्यापारी वर्ग, हितचिंतक व

तमाम जनतेस दीपावलीनिमित्त

लक्ष्मीच्या सोनेरी पावलांनी
तुमच्या घरी सुख समृध्दी येऊ दे,
रांगोळीच्या सप्तरंगात
सुखाचे दीप उजळू दे....

मा.आ.दिपकआबा साळुंखे-पाटील

संस्थेचे भाग भांडवल	: ३७ लाख ५२ हजार ७५०/- रूपये
सभासदांना कर्ज वितरित	: १ कोटी ७४ लाख २० हजार रूपये
वसुली	: ६५%
ऑडिट वर्ग	: 'ब'

- **दुर्बल घटकांच्या उन्नतीसाठी कर्ज वाटपात अग्रेसर**
- **दिवाळीनिमित्त सभासदांना घसघशीत भेट देणारी संस्था**
- **सोने तारण व वाहन खरेदीकरीता कर्ज देण्याची सुविधा**

चेअरमन

मा.विजयकुमार तारळकर

ठेवीवर आकर्षक व्याजदर,
मासिक व्याज मुदतठेव योजना

शुभेच्छुक

मा.आनंद म्हेत्रे (सचिव)

व्हा.चेअरमन

मा.गुणाप्पा शिवणगी

शुभेच्छुक

सर्व संचालक मंडळ, सभासद वर्ग व कर्मचारी वृंद

कृष्णाई रूरल नॉन ॲग्री को-ऑप. क्रेडिट सोसायटी, जवळा ता.सांगोला, जि.सोलापूर

अनुबंध

दैवावरठेवुनी भरोसा
केला एकाकी जीवन प्रवास
झाली किती रे ओढाताण
सोसवेना आता बहु – प्रयास

पाहिली स्वप्ने वाजतील चौघडे
असतील पायी पायघडी
पुढे जाऊनि पाहू जाता
दिसते वाट सारी निसरडी

कालौघात होती बेरंग नाते बंध
कशाला बांधू आधी आराखडे
सदैव असावा प्रेमाचा अनुबंध
कधी न जावो विश्वासाला तडे

सूर्यकांत घिवारे
मोबा.९८९०६४५०१८

सुख नि दुःख हे असे नेहमी वेगवेगळे

करते दूभर कुणाकुणाचे जीवन जगणे रंगभेद हा
दुस्वासाचे कारण बनते कुणी गमविते प्राणही पहा
कोणी गोरे, कोणी काळे, कोणी असते, कृष्ण सावळे
ज्याचे त्याचे सुख नि दुःख हे असे नेहमी वेगवेगळे

व्यक्ती तितक्या असती प्रकृती जन्मतात नित या धरेवरी
जो तो येथे तरतो अपुल्या मनबुद्धीच्या हो बळावरी
कोणी असती अती शहाणे नि कोणी असती अती बावळे
ज्याचे त्याचे सुख नि दुःख हे असे नेहमी वेगवेगळे

कोणी करती कांगावा तर कोणी करती फक्त दिखावा
या जगतासी खरा चेहरा कसा कुणाचा तो समजावा
कुणी घालती गर्भ रेशमी कुणी नेसती सुती सोवळे
ज्याचे त्याचे सुख नि दुःख हे असे नेहमी वेगवेगळे

माणुसकीला ही काळीमा फासती दिसे असे वागणे
कळतच नाही कुणाला इथे कसेच आणिक काय सांगणे
जो तो येथे खेळत असतो जगण्यासाठी खेळ निराळे
ज्याचे त्याचे सुख नि दुःख हे असे नेहमी वेग वेगळे

कमी लेखणे धोका देणे ऐसे घडते ठायी ठायी
कित्येकांचे जीवन होते पहा उध्वस्त त्याच्या पायी
घाव झेलते ते मन असते पहा कुणाचे अती कोवळे
ज्याचे त्याचे सुख नि दुःख हे असे नेहमी वेगवेगळे

मानिनी महाजन

धन्य जिजाऊ...

धन्य जिजाऊ धन्य जिजाऊ
सदैव नमतो सदैव स्मरतो
अभिमानाने भरूनी ऊर
महान त्यांची कीर्ती गातो

अत्याचारी अन्यायाची
जगी वाढलीकाळीमाया
पसरली तव तमा सारण्या
मराठमोळी अमूल्य छाया

लखुजींच्या समशेराची
जाण तुम्हाला होती
म्हाळसाईच्या संस्काराची
झालर तुमच्या हाती

घोड्यावरती मारूनी टाच
तलवारीशी जोडून नाती
शपथ घेतली धैर्याने
अन्यायाची करण्या माती

मनामध्ये असे सदैव
स्वातंत्र्याची आस
शहाजींच्या रूपाने तव
स्वारी, भेटली खास

शिवनेरीवर सुर्य जन्मला
तुम्हाच उदरी माता
त्या तेजाने उजळून
गेला सह्याद्रीचा माथा

गीता गाथा अन् नीतीच्या
संस्काराचे भरूनी सारण
शस्त्रास्त्रांच्या पराक्रमांने
बांधले स्वराज्य तोरण

पराजयाची तमा न करता
शूर मावळे कितीक लढले
गनिमांवरती रोऊन भगवा
गडकिल्ल्यांचे वैभव झाले

वीर पुरंदर शंभू वाढले
कुशी मध्ये तुमच्या
युगे युगे गातील त्यांच्या
गाथा बलिदानाच्या

अगाध आहे महिमा भारी
दशदिशाही देती ग्वाही
एकमेवाद्वितीय तुम्ही
झाले नाही होणे नाही

आनंद घोडके, सोलापूर
७३९७८१३२३६

चारोळी
ओंजळभर सुख

ओंजळभर सुख
पुरे झाले जीवनी देवा
सुगंध दरवळ याचा
नाही कुणाचा हेवा

स्वरचित
डॉ सौ. राजश्री संजय जाधव सोलापूर
९४२०४८८७३३



।।श्री बिरोबा प्रसन्न।। ।।श्री मायाक्कादेवी प्रसन्न।।

आमचे असंख्य, ग्राहक, हितचिंतक व तमाम नागरिकांना दीपावली निमित्त हार्दिक शुभेच्छा!

सुर्यनारायण कन्स्ट्रक्शन

कन्सल्टिंग इंजिनिअर ॲण्ड अप्रोव्ड व्हॅल्युअर

इंजि.राहुल अशोक सोनलकर
(B.E.Civil) F.I.V.

सूर्यनारायण, महादेव गल्ली, वाढेगांव नाका, सांगोला
मो.९८८१४३०४३०

मा.श्री.अरूण(काका)देशपांडे

आमच्या असंख्य मित्र परिवार व तमाम नागरिकांना दिपावली व नुतन वर्षाच्या आभाळभर शुभेच्छा..!

शुभ दीपावली

श्री.अरूण (काका) रामचंद्र देशपांडे
सौ.आशा अरूण देशपांडे

समस्त देशपांडे परिवार, सांगोला/बारामती

।। दिपावलीच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा ।।

शिक्षण व कृषी विकास प्रतिष्ठान, मेडशिंगी संचलित,

सह्याद्री कॉलेज ऑफ फार्मसी

मेथवडे, ता. सांगोला, जि. सोलापूर- ४१३३०७

मा.डॉ.दिलीपकुमार इंगवले (सर)

: महाविद्यालयास यांची मान्यता :

भारतीय औषधनिर्माणशास्त्र परिषद, नवी दिल्ली (पी. सी. आय), तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई (डी.टी.ई.) व डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ लोणेरे, रायगड विद्यापीठ, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण परिषद मुंबई (एम. एस. बी. टी. ई.) संलग्नित.

-: अभ्यासक्रम :-

अ.क्र.	अभ्यासक्रमाचे नाव
१.	डी. फार्मसी (औषधनिर्माणशास्त्र पदविका)
२.	बी. फार्मसी (औषधनिर्माणशास्त्र पदवी)
३.	एम. फार्मसी (औषधनिर्माणशास्त्र पदयुत्तर) (फार्मासुटीकल केमिस्ट्री)

-: महाविद्यालयाचे वैशिष्टये :-

* अनुभवी व तज्ञ प्राध्यापक वृंद * उत्कृष्ठ निकालाची परंपरा * सुसज्ज व सर्व सोयी युक्त प्रयोगशाळा * प्रशस्त इमारत व सर्व सोयी युक्त लासरुम *महाराष्ट्र शासनाच्या व भारत सरकारच्या सर्व शिष्यवृत्ती उपलब्ध * विद्यार्थी व विद्यार्थीनीसाठी स्वतंत्र वसतिगृह *विविध संशोधनास स्वतंत्र ॲनिमल हाऊस *सर्व सेवा सुविधा युक्त खानावळ व उपहारगृह *परिवहन सुविधा व पार्कींग व्यवस्था *महाविद्यालय परिसर सीसीटीव्ही (CCTV) च्या निगराणी खाली *सर्व पुस्तके व सोयी युक्त डिजिटल लायब्ररी *२४ तास विद्युत सुविधा *विद्यार्थ्यासाठी प्लेसमेंटची सुविधा *सुसज्ज व सर्व सोयी युक्त मशीन रुम *सेंट्रल इन्स्ट्रयुमेंट लॅब *संशोधन प्रयोगशाळा *अंतर्गत व बहिर्गत खेळाची सुविधा व खेळाचे मैदान

: शुभेच्छुक :

शिक्षण व कृषी विकास प्रतिष्ठान,मेडशिंगी संचलित,

सह्याद्री कॉलेज ऑफ फार्मसी
मेथवडे, ता. सांगोला, जि. सोलापूर

ईमेल आयडी: sahyadrisangola@gmail.com,
वेबसाईट: www.sahyadripharmacy.org
संपर्क: 9336277777, 9823107371

हडळ

विनोदी कथा

सूर्य मावळतीच्या प्रवासाला निघताच गजबजलेल्या मरीआईच्या डोंगरावरची गर्दी वेगात पांगायला लागली होती. जो तो आपले गाव जवळ करायच्या मागे लागला होता. त्याला कारणही तसेच होते.. डोंगर पायथ्याशी असणाऱ्या वडाच्या झाडावरील दोन हाडळी तुक्यामाल्याने कशाप्रकारे पाहिल्या आणि त्या कशा हिडीस आणि भयंकर आहेत याची बातमी तुक्या माल्याने आणि त्याच्या बायकोने बरोबर आपापल्या परीने रंगवून रंगवून सांगितली होती त्यामुळे लोकांमध्ये दहशत ना पसरली तर नवलच.तुक्या माली म्हणजे गावाचे गुप्तहेर खातेच म्हणा..लोकांच्या दाढी मिशीला पाणी लावता लावता कुणाचा टाका कुठे भिडलाय पासून ते कुणाच्या कोंबडीने किती अंडे दिलेत ,कुणाची मैस गाबन आहे पासून ते आसवल्याच्या वंदिले कोणता महिना चालू,अशा ग्रामपंचायतीतल्या सगळ्या पंचायतीचा एकमेव खात्रीचा वार्ताहर म्हणजे तुक्या माली..काही काही आंबट शौकीन तर नुसत्या पंचायतीकरायलाच.. निवळ तुळतुळीत टकलावरून वस्तरा फिरून घ्यायचे..मग तोही रंगी रमश्याबरोबर कशी पळून गेली पासून ते सदू सोनाराच्या घरी हिश्शेवाटनी करताना सदू वर कसा अन्याय झाला हे रुबाबातसांगताना चर्र ऐक.शिवी पंचांना हासडून वाटणीखरे तरकशी व्हायला हवी यावर मत देत पांचां ची भुमिका करून मोकळा होई..आणि या वेळेला तर आपबिती असल्यानेशंकेला जागाच नव्हती..खुद्द तुक्यानेच हडळी पाहिल्या म्हंटल्यावर गावच्या तोंडचे पाणीच पळाले..पारावर बसलेली मंडळी मुद्दाम तुक्याकडून हाडळी विषयी अधिक जाणून घेण्याचा प्रयत्न करू लागले. हाही आता शेलिब्रिटीबनल्यागत हाडळीची असली नसली बातमी गंभीर चेहऱ्याने शोशिकपणाचा आव आणीत वाटत होता...आता धंदाही जोर्यात चालू

होता..त्यामुळे तुक्याची कलावतीही त्याच्यावर खुशच होती म्हणा..आतागावात तुक्याचा तुकोबा, तुकोबाराव. झाला होता..पाटलाच्या गोऱ्यापान संगिकडे पहात तर हाडळीची गोष्ट धोत्रा पर्यंत पोहोचूनच थांबली.... मग काय हातच सांगतो काय राव? आगांवर धोतर नाही राहिला म्हणतो तरखरे तर पोटातली कळ असह्य झाल्याने तुक्या माल्याने त्या दिवशी बिना धोत्रानेच पांदन गाठल्याचे सविस्तर वृत्त तुक्याच्या चार वर्षाच्या सोबत असलेल्या कार्ट्याने जाहीर केल्यावर त्याच्या पाठीचा तबला वाजवत त्याच्या तोंडातून निघणाऱ्या पिपाणीच्या स्वरात त्यांनी त्या दिवशी तिथून पळ काढला होता... पण हडळीचा प्रश्न ऐरणीवरच होता..जो तो दबकून वागत होता.. नाम्या कोंबडी चोराच्या धंद्यातही मंदी आली होती.. हडळीच्या भीतीने कोंबड्या बेंडव्याच्या बाहेरच सोडल्या जाईना.. रंगीची मायही रगींला बाहेर पडू देईना..त्यामुळे रमश्याची प्रेमारधना स्वल्पविराम घेऊन थबकली होती..आणि तूक्याची प्रगती पाहून बऱ्याच जनाची पोटे दुखायला लागली होती...खरे तर नाम्या कोंबडी चोर आणि रमशा जिगरी दोस्त.. दोघांनी आपली दुःखे एकमेकांवर बोलून दाखवल्यावर हडळीचा बंदोबस्त केला पाहिजे हा ठराव दोघांमध्ये पास झाला. आता तो कशातरी प्रकारे पंचायतीसमोर मांडण्याची जवाबदारी रमश्याने स्वतःकडेच राखून ठेवली..रगीच्या बापसमोर तोरा मिळवायची ही संधी काही त्याला सोडवायची नव्हती.. मी काय म्हणतो पाटील किती दिवस आपण असे भित भित फुटाण्याला वाटाणे वाटत फिरायचे? रंगीच्या बापाला चिकटून बसलेल्या तुक्याला जबदस्त टोमणा मारीत रमश्या बोलला..ते लक्षात येऊन तुक्यातला सेलिब्रिटी डिवचल्या ला गेला. तावा तावात तो उभा होऊन बोलला... फुटाण्या कुणाला म्हणतोस रे वाटाण्याच्या? आता आपले काही खरे नाही आणि होणाऱ्या सासरेबुवांसमोर इज्जत जायला नको म्हणून...वेळ सांभाळत रमश्या उद्गागरला तुकोबा अवो मी म्हणतो आपण किती दिवस त्या हाडळीनां भ्यायचे म्हणतो हो..काही बंदोबस्त नको का करायला ? रंगीच्या बापाला त्याचा विचार पटलेला पाहून रमशाच्या अंगावर मूठ भर मास चढले...आता त्याला अजून काही तरी रुबाबदार करायची इच्छा अनावर झाली.उपाय म्हणून सगळ्यांनी मांत्रिक तांत्रिक सुचवून पाहिले..रमश्याची सासर्या समोर हिरोगिरी करण्याची इच्छा अनावर होऊन तो बोलला.. बघा म्हणजे तुम्हाले पटते का? आज जमाना बदललाय. आपल्याले त्यायच्याबद्दंल माहिती आहे

तशी त्यायच्या सोशल मीडियातून आपल्याबद्दलही त्यायले बरीच माहिती असेल.. आण त्याच्यातले त्याच्यात त्या पडल्या बाई माणूस,कायले पंगा घ्यायचा म्हणतो आपन..रमश्याचे बोलले टकुर्याच्या बाहेर गेल्याने भीमा पहीलवानाने मूठ आवळून ऐक गुद्धाच रमश्याच्या पाठीवर हाणला पण ऐनवेळेस लघुशंकेला निघालेला तुक्या मध्येआल्याने तो वार तुक्याच्या पाठीचा पाहुणचार घेत शांत झाला तसा तुक्या वेदनेची ठणक मेंदूपर्यंत जाऊन किंचाळलाचच्या मायला मेलो,कोण व्हय रे?



शुभ दीपावली..!

आमचे असंख्य ग्राहक, हितचिंतक, मित्र परिवार, शेतकरी बांधव
व तमाम नागरिकांना दीपावलीनिमित्त हार्दिक शुभेच्छा !

शुभेच्छुक **बालाजी कृषी, सांगोला**

शेतीसाठी लागणारी खते,
औषध व बी–बियाणे यांचे वितरक

प्रोप्रा. : अनिरूद्ध वसंतराव पुजारी
मो.९०११७०७०७७, ९४२३०५५२३३
Email-anup1131@gmail.com

पुजारी परिवार, सांगोला, जि.सोलापूर

।। शुभ दीपावली ।।
आमचे हितचिंतक व तमाम नागरिकांना दीपावली व नूतन वर्षानिमित्त हार्दिक शुभेच्छा!

सुरवसे पेट्रोलियम

वाढेगांव रोड, अयोध्यानगरी समोर, सांगोला

सुरवसे सर्व्हेअर्स

(सर्व्हेअर्स अँण्ड गव्हर्नमेंट व्हॅल्युअर्स)

श्री.विजयसिंह सुरवसे
कार्यालय : सुरवसे पेट्रोलियम, वाढेगांव नाका, सांगोला

सुरवसे परिवार, सांगोला

सर्व ग्रामस्थ, शेतकरी बांधव व तमाम नागरिकांना दीपावली व
नुतन वर्षानिमित्त हार्दिक शुभेच्छा !

शुभेच्छुक
शासनाच्या विविध विकास योजना राबविणारी

ग्रामपंचायत राजुरी, ता.सांगोला

सरपंच

सौ.प्रतिभा दादासाहेब व्हळगळ

उपसरपंच

सौ.मोहिनी रमेश काटे

शुभेच्छुक

सरपंच : सौ. प्रतिभा दादासाहेब व्हळगळ
उपसरपंच : सौ. मोहिनी रमेश काटे
ग्रामपंचायत अधिकारी : श्री. आण्णासो मधुकर भडंगे

सर्व सदस्य, ग्रामस्थ व कर्मचारी वर्ग, ग्रामपंचायत राजुरी, ता.सांगोला

आवो तुकोबा तुम्ही कश्या पायी मधी आला हो? भीमा पहिलवान सारवासारव करून बोलल्यावर तुक्या कोकडा कोकडाच जागेवर बसला... रमश्याला अजून चेव आला तो बोलू लागला ..पाटील बघा हाडळणी कधी नव्हे तो आपल्याकडे आल्या,,त्या बाजूच्या गावचे पिंपळाचे झाडही घेऊ शकल्या असत्या पण त्यानी आपल्या गावाचे झाड निवडले..आपला मान वाढविला म्हणू मले वाटते आपण त्यायचा सत्कार समारंभ घेऊन त्यायले चांगल्या मनाने जायले सांगितले पाहिजे आता कळ अनावर होते हे पाहून तुक्या माली लगेच जाऊन मोकळे होऊन येऊ या विचारात उठताच , भोकणीच्या तुया नात्यात लागतात का हाडळी? म्हणून पुन्हा उगरलेला मुक्का मध्ये आलेल्या तूक्याच्या पाठीचा कर्र आवाज करून गेला..आणि पुन्हा डोक्यावर चांदण्या चमकून तुक्या जमिनीवरच पालथा आदळला...मुक्का येव्हडा जबरदस्त होता की की यावेळेसमेलो शब्दही तोंडातून फुटे ना...आपले आडदांड शरीरपाराच्या ओसरीवर जवळजवळ ढकलतच भीमा पहिलवान स्थानापन्न झाला..आपण पुन्हा तुक्यालाच बदडले हे काही त्याच्या ध्यानातही आले नाही..रामश्याला मात्र आता मजा येऊ लागली... सत्कार कुणाचा का होईना आपल्याला भाषण करायला मिळणार या खुशीने पाटलाने सत्काराला हिरवी झेंडी दाखवली तर बायापोरी कोणते लुगडे घालायचे यावर कुजबुजत एकमेकींच्याभेटीच्या जागा ठरऊ लागल्या.कलावतीलाही नवऱ्याच्या बक्कळ कमाईतून घेतलेलं नवीन लुगडं मिरवायची घाई होतीच..वेदनेने केकाटणाऱ्या तुक्या कडे तर तिचे लक्षच नव्हते.. हाडळीचा सत्कार हामोठा उत्सव आपल्याकडे साजरा होणार हैं,तेव्हा समध्यानी जमेल तशी वर्गणी द्यावी अशी बटुक वाण्याने सत्काराची न दिलेली आर्थिक जबाबदारी आपल्यावरच घेत गर्दीला आव्हान केले च की गर्दीतली मागची एक लाईन पूर्ण मागच्या माघे फरार झाली..पैसे द्यायचे या विचारानेच पुन्हा भीमा पहीलवानाचे डोके गरगरले ऐका बुक्कीतच बटुक वाल्याचा तोंड बंद करण्याच्या अविर्भावात भीमा पैलवान धावून गेला .ही बुक्की आपल्या साठीच आहे हे लक्षात येऊन बटुकमटकन खाली बसताच केव्हाचा कण्हत जमिनीवर पडलेला तुक्या उठण्याच्या बेतात बुड टेकवून स्थिर होत नाही तोच भीमाच्या बुक्किने पुन्हा माती चाटू लागला...आणि आता मात्र त्याचे डोके सनकले..आता आपला जीववाचविणे गरजेचे ही बातमी त्याच्या दुखणाऱ्या शरीराने मेंदूला पोहवाविल्यावर आंगात आल्यागत तो तडदिशी उभा होऊन डोलूच लागला..... मी मरीआई बोलते ...कोंबडे कापा..उत्सव नको...गोडधोडाचे जेवण द्या.. मी हाडळींना पाहून घेईन असेयाईकाताच बायाबापड्या पटापट पाया पडायला लागल्या. केव्हापासून ठिय्या मांडून बसलेला बन्या बामन जणू देवीच्या देनगीवर आपला अलिखित अधिकार असल्या हक्काने पंचा पसरून लोकांनी दिलेली ऐक दोन अन्यांची देणगी सावडून घेऊ लागला..हे पाहून खरे तर तुक्या माल्याला बन्या बामानाच्या पाठाडावर

सांगोला तालुक्यातील तमाम नागरिकांना
दीपावली व नूतन वर्षानिमित्त

हार्दिक शुभेच्छा

शुभ दिवाळी

सरपंच

सौ.रूपाली सतिश तंडे

उपसरपंच

श्री.नितीन तुकाराम काळे

शुभेच्छुक

मा.सौ.रूपाली सतिश तंडे (सरपंच)
मा.श्री.नितीन तुकाराम काळे (उपसरपंच)
श्री. संजय संभाजी खटकाळे (ग्रामपंचायत अधिकारी)
सर्व ग्रामपंचायत सदस्य, कर्मचारी वर्ग व ग्रामस्थ

कमलापूर ग्रामपंचायत, कमलापूर, ता.सांगोला

सर्व ग्रामस्थ, शेतकरी बांधव व तमाम नागरिकांना
दीपावली व नुतन वर्षानिमित्त हार्दिक शुभेच्छा !

शुभदिपावली

शुभेच्छुक

शासनाच्या विविध विकास योजना राबविणारी ग्रामपंचायत

ग्रामपंचायत लोटेवाडी, ता.सांगोला

सरपंच : सौ.नकुसा मधुकर लवटे

उपसरपंच : श्री. सत्यवान बाळासो देशमुख

ग्रामपंचायत अधिकारी : श्री. समाधान शंकर आदाटे

सर्व सदस्य, ग्रामस्थ व कर्मचारी वर्ग, ग्रामपंचायत लोटेवाडी, ता.सांगोला

सांगोला तालुक्यातील तमाम नागरिकांना
दीपावली व नूतन वर्षानिमित्त

हार्दिक शुभेच्छा

शुभ दिवाळी

सरपंच

श्री. शिवाजी वाघमोडे

उपसरपंच

श्री. संतोष माने

शुभेच्छुक

मा.श्री. शिवाजी भैरू वाघमोडे (सरपंच)
मा.श्री. संतोष प्रकाश माने (उपसरपंच)
श्री.सोमनाथ शिवाजी गायकवाड(ग्रामपंचायत अधिकारी)
सर्व ग्रामपंचायत सदस्य, कर्मचारी वर्ग व ग्रामस्थ

सावे ग्रामपंचायत, सावे, ता.सांगोला

बुक्कीच द्यायचा विचार चमकून गेला..पण त्याच्या पाठीच्या दुखण्याची सल आणि

पाया पडायला आलेल्या भीमाशी नजरानजरहोऊन .. बन्या बामण्याला कणपटायची अतीव उर्मी दाबून घेत डोलने चालू ठेवले..संपूर्ण गाव आता मरी आईच्या आशिर्वादासाठीजमला होता..मी पाहिले मी पाहिले च्या धकाबुक्कीत बन्या बामण जवळच्या टंमरेलातल्या पाण्यालाच देवीचे तीर्थ म्हणून देत होता..गाव या भानगडीत गुंग असताना भीमाची बायको सगुणी आणि गावाची पाटलीन ठुमकाबाई मात्र डोंगरा पायथ्याशी असलेल्या वडाच्या पारंब्यावर झोका घेत पाटलाच्या खिशातून लंपास गेलेल्या दोनबीड्यांचै य झुरके घेत आरमात झुलत बसल्या होत्या... काही ठिक्कर भीमा पैलवानाची सगुना दिसायला काही हडळी पेक्षा कमी नव्हती.. आणि गोरीसडक ,भल्ल मोठ कुंकू कपाळावर चमकवणारी ठुमकाबाई अंधारात कुणालाही आरामात घाबरू शकत होती, खरे तर विड्यांचे झुरके घेण्यासाठी त्यांच्या पसंतीस पडलेली त्यांची सिक्रेट जागा म्हणजे वडाचे झाड होते.. सगळं गाव निवांत झाल्यावर या दोघी आपली हौस भागवत झोके घेत त्या तास अर्धातास गप्पा हाणत वडाच्या पारंब्यावर बसायच्या.. खिदळायच्या जगून घ्यायच्या.. पण आता तुक्या माल्याच्या हडळ प्रकरणाने संपूर्ण विसकोटच झाला होता.. दोघी नवीन जागेच्या चर्चेत रमल्या असताना. इकडे लघुशखेंची कळ तुक्या माल्याला न आवरती झाली.. बह्याड गोंद्या काय चाललंय हे गर्दीत घुसून पाहायला आलास की तुक्या माल्याने त्याला आत मध्ये ओढून घेत आपल्या जागेवर उभे करत धूम ठोकला आणि टमरेल उचलत सरळ पुन्हा एकदा वडाजवळचे पांदण गाठले.. पूर्ण गावाला मोकळी व्हायला तीच एकजागा होती.. आता धोतर सोडून कार्यक्रमाला सुरुवात करणार तोच तुक्या माली आता आपल्यासमोर नावगा होणार की काय या भीतीने सगुना आणि पाटलीन जोरात हाडेनीच्या आवाजात ही हीहीही किंचाळू लागतात आता मात्र तुक्या माल्याची बोबडीच वळालीया वेळेला मात्र खरंच धोतर आणि टमरेल तसाच टाकत उघडा बंब पळू लागला. पळता पळता अनावर झालेल्या लघुशंखेलामोकळी वाट करत सरळ थांबला तो बिछान्यातच... सगळे गाव दुसऱ्या दिवशीच्या कोंबडीच्या जेवणाचची गोडाधोडाची ला जिभेवर रेटत झोपी गेले तर सगुना पहिलवानीन आणि ठुमका पाटीलन हडळीच्या नव्या वास्तव्याच्या शोधात बिडीच्या झुरक्यात घराकडे वळल्या....

शितल प्रमोद बोढे,
Principal,child parent councilor (नागपूर)

राम माझा

आदर्शाचा महामेरू
मनोमनी राम माझा
निश्चलाचा हा सागरू
क्षणोक्षणी राम माझा

ममत्वाचा सागर वा
मातृभक्त राम माझा
भावनांचा महाकुंभ
पितृभक्त राम माझा

एक वचनी पुत्र हा
धर्मवीर राम माझा
शांत संयमी योध्दा हा
शूरवीर राम माझा
जगतोधारक् राजा
प्रजापिता राम माझा
युगप्रवर्तक असा
दुजा नाही राम माझा

श्वास आहे ध्यास आहे
चरणांशी देह माझा
जगताचा धनी फक्त
प्रिय आहे राम माझा

आनंद घोडके,
सोलापूर
७३९७८१३२३६

शब्दगंध

कधी , कुणा न बोलता
शब्द माझे बोलतील
कधी , कुणा न भेटता
शब्द माझे भेटतील
कुणा , कांही न रूचता
शब्द माझे रुचतील
कुठे, काही न रूजता
शब्द माझे रूजतील

कधी कुणा न भुलता
शब्दां माझ्या भुलतील
कधी कोणा न स्मरता
शब्दां माझ्या स्मरतील
कोठे काही न फुलता
शब्द माझे फुलतील
शब्दां माझ्या शब्दगंध
साऱ्या मुखी राहतील

सूर्यकांत घिवारे
मोबा. ९८९०६४५०१८

आमचे असंख्य मित्र परिवार, हितचिंतक व तमाम नागरिकांना दीपावली व नूतन वर्षानिमित्त हार्दिक शुभेच्छा...

शुभेच्छुक

डॉ.लवटे ऑर्थोपेडिक हॉस्पिटल अ‍ॅन्ड ट्रॉमा केअर युनिट

MJPJAY | PM-JAY

सांगोल्यातील एकमेव NABH नामांकित हॉस्पिटल तेही कॅशलेस

महाराष्ट्र शासन

सांगोल्यातील महात्मा जोतिबा फुले जन आरोग्य व आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेतून मोफत उपचार व शस्त्रक्रिया मिळणारे एकमेव NABH नामांकित सुप्रसिध्द अस्थिरोग तज्ज्ञ डॉ.सुनिल लवटे यांचे ऑर्थोपेडिक हॉस्पिटल अ‍ॅण्ड ट्रॉमा केअर युनिट

* योजनेअंतर्गत मिळणारे मोफत उपचार *

* सर्व प्रकारच्या हाडांचे फ्रॅक्चरचे ऑपरेशन
* दुर्बिणीद्वारे गुडघ्याची शस्त्रक्रिया
* लहान मुलांचे हाडांच्या सर्व प्रकारच्या शस्त्रक्रिया
* मोफत प्लास्टरची सोय
* मणक्याच्या शस्त्रक्रिया
* डोक्याला मार लागलेल्या पेशंटवर उपचार
* फाटलेल्या किंवा लागलेल्या जखमांवर मोफत टाके घेण्याची सोय
* कामगार विमा योजनेअंतर्गत ESIS कामगारांवर मोफत उपचार

अपघातात फ्रॅक्चर झालेल्या सर्व प्रकारच्या हाडाचे ऑपरेशनची मोफत सुविधा

डॉ.सुनिल के.लवटे
(MBBS.,D.Ortho) (मुंबई)

डॉ.सौ.प्रज्ञा सुनिल लवटे
(MBBS.,D.A.) (मुंबई) – भुलतज्ञ

उपलब्ध सुविधा :

* २४ तास अत्यावश्यक सेवा.
* सी आर्मची सोय
* स्वतंत्र एक्स - रे विभाग
* अत्याधुनिक मशिनद्वारे ऑपरेशनची सोय
* ट्रॉमा केअर सेंटर
* मणक्याचे विकार, निदान व उपचार
* इलिझारो * स्वतंत्र भौतिकोपचार विभाग

Ph. : 8857052789/ 7774038838

पत्ता: – यशनगर,पोलीस स्टेशन शेजारी, पंढरपूर रोड, सांगोला

आपला सन्मान आणि आदर आपल्यापाशीच

मंगल कार्यालयात वधू पक्ष आणि वर पक्ष असा उल्लेख विवाह सोहळ्यात होत असला तरी एकदा विवाह सोहळा पार पडल्यानंतर दोघेही एकमेकांचे एकाच नाण्याच्या दोन बाजू म्हणजे सोयरिक होतात म्हणजेच स्नेह संबंधी होतात त्यामुळे दोघांचे मनोमिलन आणि आपुलकीचे भावबंध असणें हिताचे असते

लग्न सोहळा संपन्न झाल्यानंतर दोन्ही कुटुंबांतील कौटुंबिक स्नेहबंध हे सौहार्द पूर्ण असणे गरजेचे आहे तसेच दोन्ही कुटुंबांतील सदस्य हे एकमेकांचे संपर्कात राहून मैत्रीपूर्ण संबंध प्रस्थापित करुन हितचिंतकाची भूमिका बजावली पाहिजे. कौटुंबिक भान ठेवून विचार आणि वर्तन केल्यास समाजात मान मिळेल आणि समाजात शान वाढून सन्मान मिळेल.

हे सामाजिकदृष्ट्या पोषक आणि हिताचे आहे. हेच सामाजिक सुदृढतेचे लक्षण आहे . दोन्ही कुटुंबांतील स्नेहबंध हे सौहार्द पूर्ण संबंध असल्याने नव- दाम्पत्यांना जीवन चैतन्यमय वाटेल. असे वातावरण सुखदायी होते तसेच दोन्ही परिवार मध्ये कौटुंबिक जिव्हाळा आणि कौटुंबिक दृष्ट्या ऐक्य हे सर्व समाजात वाखाणण्याजोगी व कौतुकास्पद बाब होते. यांची जाणीव असणे आणि काळजी घेणे हिच काळाची आणि कौटुंबिक गरज आहे

आजकालच्या जमान्यात आत्मभान असलेली सुशिक्षित तरुण पिढी हि दांपत्य जीवनात पदार्पण करीत आहेत.त्यांना त्यांची जीवनमूल्ये हक्क आणि कर्तव्य यांचे भान ज्ञान आलेले आहे.

कुटुंबात आणि समाजात वावरताना दिसताना बोलताना त्यांनी जबाबदारीने वागावे आणि रहावे असे कुटुंब कर्त्या

व्यक्तीला वाटणे स्वाभाविक आहे तथापि आहार विहार पोषाख तसेच रुढी परंपरा चालीरीती देवधर्म या विषयी मार्गदर्शन जरुर करावे त्यांना विश्वासात घेऊन बोलावे पण मोजक्या शब्दांत आपले विचार व्यक्त करावे. जेणे करून त्यांना त्यांचा अवमान होईल अथवा स्वाभिमान दुखावले जाऊ नये असे पहावे. आपल्या भाषेत आत्मप्रौढीचा लवलेशही नसावा तसेच कुठल्याही गोष्टीचा आव न आणता आणि आब न दाखवता उचित भाषेत मार्गदर्शन करावे. कुटुंब वत्सल भावनेने वागून कौटुंबिक भरण पोषणची जबाबदारी पार पाडणे इष्ट आणि काळ उचित ठरेल असे वाटते.

आपली भूमिका बजावताना आपण केवळ विश्वस्त भावनेने आणि कर्तव्य भावनेतून सांगत आहोत याची त्यांना जाणीव करुन द्यावी. प्रशासक अर्थात विश्वस्त व्हावे , हुकुमशाह नव्हे.

सभ्य , सुशिक्षित , सुसंस्कृत आणि संस्कारी असल्याचे बोलून - भासवून उच्च विद्या विभूषित सुशिल सुवासिनीस जर आप्तगण पाहुणे - मंडळी नातेवाईक तसेच आई वडिलांना भेटायला त्याच्यांशी बोलायला प्रतिबंध करणे म्हणजे एक प्रकारे जाच , छळ होय. हा पूर्वापार रिवाजानुसार रुढी परंपरा या सर्व गोष्टींचे समायोजन व्हायला हवीत , समन्वय साधला तरच समाज सुधारला असे म्हणता येईल अन्यथा अशा प्रवृत्ती मुळेच अनेक सामाजिक प्रश्न निर्माण होतील हे समाज सुधारकांनी लक्षात घेऊन काही उपाय योजना करणे आवश्यक आणि अगत्याचे आहे.हे कौटुंबिक सामाजिक कार्य वधू वर सूचक मेळावा आयोजकांनी प्राधान्यक्रमाने हाती घ्यावे. असे आजकालच्या नव दांपत्य जीवनातील गहण प्रश्र्न सोडविण्यासाठी प्रयत्नशील रहाणे , समाजांचे प्रबोधन करणे हे काळाची गरज आहे.

सुज्ञ सुजाण संवेदनशील पालकांनी समोरच्याने एक शब्दही न बोलताही त्याच्या मनातील 'दु:खाला' समजून घेत त्याच्या लटक्या हसण्यावर न जाता त्याने 'लपवलेल्या वेदनांवर विश्वास' ठेवता यायला हवे..!

अन...जागृत समाज धुरीणांनी 'मी ठिक आहे' या वाक्याने समाधान करुन न घेता त्यामागचे 'मी एकटा पडलो आहेफहे उघड गुपित समजून घेता यायला हवे..!! खरंतर'आपलेपणा' हा दाखवण्यापुरता न राहता समोरच्याच्या 'मनाला भेदून खोलवर डोकावून सावली सारखा पाठराखण' करणारा असायला हवा. तेव्हाच त्या 'आपलेपणातली' अद्भूत शक्ती वा उर्जा समोरच्याला आपोआप जाणवायला लागते..!!!

कुठलेही यश एका क्षणात मिळत नाही.संयम शिस्त आणि कठोर परिश्रम यातूनच आपली स्वप्ने पूर्ण होतात

आमचे असंख्य हितचिंतक, ग्रामस्थ, शेतकरी बांधव व
तमाम नागरिकांना दीपावली निमित्त हार्दिक शुभेच्छा!

शुभेच्छुक

ग्रामपंचायत चिकमहूद, ता.सांगोला

सरपंच

सौ.शोभा कदम

उपसरपंच

मा.तुषार भोसले

सरपंच : सौ. शोभा सुरेश कदम

उपसरपंच : श्री.तुषार नागन्नाथ भोसले

ग्रामविकास अधिकारी : श्री.प्रदीप भानुदास काळे

सर्व सदस्य, कर्मचारी वर्ग व ग्रामस्थ

ग्रामपंचायत चिकमहूद, ता.सांगोला

आमचे असंख्य हितचिंतक, ग्रामस्थ, शेतकरी बांधव व
तमाम नागरिकांना दीपावली निमित्त हार्दिक शुभेच्छा!

शुभेच्छुक

ग्रामपंचायत मेडशिंगी, ता.सांगोला

सरपंच : सौ. उमा प्रतापसिंह इंगवले

उपसरपंच : श्रीमती सुशिला मनोहर सोनलकर

ग्रामविकास अधिकारी : श्री.अशोक शिवाजी पाटील

सर्व सदस्य, कर्मचारी वर्ग व ग्रामस्थ

ग्रामपंचायत मेडशिंगी, ता.सांगोला

त्यामुळे दैनंदिन जीवनात ही राग अस्वस्थता किंवा तणावाच्या वेळी संयम हेच उत्तम शस्त्र आहे.

आपणांस जीवन जगताना दूर दृष्टीने वागावे लागेल. आपण आई म्हणून भूमिका बजावताना आपण केवळ आई नसतो तर कुटुंबात समाजात नात्यात अनेक भूमिकेत वावरत असतो कधी पत्नी तर कधी आई बहिण मुलगी सून काकी भावजय वहिनी मावशी काकू आत्या नणंद भावजय अशी संवेदनशील नाती जपणे क्रमप्राप्त आहेत.

अशावेळी आपण आपला अहंकार अहंभाव दूर ठेवणे आवश्यक आहे. मैत्रीपूर्ण संबंध प्रस्थापित करणे आवश्यक आहे.तरच प्रत्येक सण सोहळे समारंभ आयोजित करण्यात आणि त्यांचा आनंद घेण्याची मजा काही औरच असेल. जीवनात चैतन्यमय वातावरण निर्माण होईल आणि आपले कुटुंब एक आनंदवन बनेल.

आजकाल माणुसकीची भावना हरवली जात आहे, सुख शांती समाधान नष्ट होत आहे. त्यामुळे स्थैर्य संपते आणि प्रगती खुंटते, म्हणून आपुलकी आत्मियता स्नेह माया ममता यांची बांधिलकी जपायला हवीत. माणसांत माणूसपण पहायला हवे. माणसांत देवपण शोधून आणि माणूस बनून जगू यात. आपल्या जवळच आपला सन्मान आणि आदर आहे .तोच आपण राखून वागू या.यांची आपणांस जाणीव असणे आणि जाण येईल असे जिव्हाळ्याचे आणि सौहार्दाचे संबंध प्रस्थापित करणे आवश्यक बाब आहे. हीच आजच्या काळाची गरज आहे.

सूर्यकांत घिवारे
७१अ राजस्व नगर
विजापूर रोड सोलापूर
मोबा.९८९०६४५०१८

देता

सागराने अथांगता द्यावी
पृथ्वीने क्षमा वृत्ती
आणि नक्षत्राकितन नभाने
शितल तेच दान द्यावं
तशाच प्रकारचं दान
या संस्कृतीने द्यावं
दिसांचा फुटला झुला ज्यांच्या
रोजच्या दारिद्र्यामुळे त्यांना
तसेच जीवनदर्शक कौल द्यावा संस्कृतीने
समीपपणाचे आशीर्वाद होऊन
आणि श्रमपुत्र लक्ष्मीपुत्र व्हावेत
विद्या नेसून जीवनात
मूर्तिमंत तजेलपणा येण्यासाठी
दिवपुष्पांच्या दीर्वळण्यातून
कमळ पत्रांनी अलिप्तता द्यावी
हृदयदलाने द्यावा
सुख सौहादरांच्या गोष्टीही
वसंताच्या विस्तारातून
त्याने हिरवे हिरवे गालिचे द्यावे
आणि शिशिर ऋतू ने विश्वव्यापी
करुणा द्यावी कवितांची झड देऊन

– ना. मा. कांबळे, सांगोला

मी जाणतो

या मातीत वाढलो मातीतलं जगणं मी जाणतो
गगनाची ठाऊक नाही मातीची महती जाणतो
श्रम केले झटून तेव्हा नशीबही माझे झाले
घट्ट्या खाली लपलेल्या रेषा बदलतात जाणतो
वाकले जे झाड वादळात ते सहजच तगले
जे ताटच राहिले त्याचे काय झाले जाणतो
लहानचा मोठा होणे नेहमीच असते कठीण
संयम ठेवून पाहायला हवी वाट ते मी जाणतो
सतत हसतमुख राहतो कधीही कारणावी नाही
कित्येक शत्रू त्यानेच होतात नामोहरम जाणतो
पुष्कळ मिळाले जीवनात मी म्हणालो इदंन गम
कारण शेवटी मातीतच मिसळायचे निश्चित जाणतो

चंद्रशेखर पटवर्धन (पुणे)
७, सायली अपार्टमेंट, शाहू कॉलनी
लेन नं. १,
११/२ कर्वेनगर, पुणे.

शुभदिपावली

सांगोला शहर व तालुक्यातील तमाम नागरिकांना दिवाळी व नुतन वर्षानिमित्त हार्दिक शुभेच्छा!!!

शुभेच्छुक

दांताचा दवाखाना

एस.टी.स्टँड समोर, भोपळे रोड, सांगोला, मो.९८९०७८८९४३

डॉ. बी. यू. देवकते B.D.S. (Bom.) Reg.No. A-2650

डॉ.प्राची प्रदीप देवकते B.D.S.

डॉ.स्नेहल भगवान देवकते B.D.S.

डॉ.प्रदीप भगवान देवकते
D.N.B. (Med)DM (Cardiology)

डॉ.संदीप भगवान देवकते
M.B.B.S.,M.D.(Pedictrics)

डॉ.मेघना संदीप देवकते
M.B.B.S.M.S.(Obs/Gynac)

उपलब्ध सुविधा-
- अल्ट्रासोनीक स्केलरने दात स्वच्छ करणे.
- रूट कॅनाल ट्रिटमेंट
- दातांचा एक्स-रे
- संपूर्ण व अंशिक दातांची कवळी
- किडलेल्या दातांमध्ये चांदी/सिमेंट कम्पोझीट भरणे.
- सिर्रॅमिकचे कायमस्वरूपी दात बसवणे.
- अवघड अक्कल दाढ ऑपरेशन करून काढणे.
- वेडेवाकडे दात तज्ञ डॉक्टरांकडून सरळ करणे.

देवकते परिवार सांगोला

सांगोला तालुक्यातील तमाम नागरिकांना
दीपावली व नूतन वर्षानिमित्त

हार्दिक शुभेच्छा

शुभ दिवाळी

शुभेच्छुक

मा.सौ.आशाताई अविनाश सरगर (सरपंच)
मा.श्री.दिपक रमेश काटे (उपसरपंच)
सौ.सुमन धनाजी लेंढवे (ग्रामपंचायत अधिकारी)
सर्व ग्रामपंचायत सदस्य, कर्मचारी वर्ग व ग्रामस्थ

ग्रामपंचायत, धायटी, ता.सांगोला

शेवट चं प्रेमपत्र



प्रिय विश्वा

कसा आहेस रे विश्वा, आधी मी तुला सॉरी म्हणते कारण माझ्यामुळे तुला आधीच खूप त्रास झाला आहे.आणि आताही होत असेल ना ?,दोन दिवस चिडून बोलला सुद्धा नाहीस माझ्याशी .आता नाही येणार मी तुला बोल म्हणायला .वाटलं होतं स्टेशनवर येशील शेवटचं बोलायला नसलं तरी बाय म्हणायला तरी येशील वाटलं होतं.खूप वाट पाहिली तुझी .शेवटी आले मुंबईला भरले डोळे घेऊन .

माझ्यासाठी पण खूप अवघड आहे तुझ्याशिवाय जगणं .पण हे करणं गरजेचं होतं कारण ह्या सगळ्या वादामध्ये तुला जास्त त्रास झाला असता .आणि तुला झालेला त्रास मला पहावला नसता.

किती समजावू रे तुला माझ्या जीवा. माझ्या लाडक्या .मी खूप प्रेम करते तुझ्यावर आणि असंच करत राहीन. जीवापाड ....अगदी शेवटच्या श्वासापर्यंत. तुला कधीही मनातून दूर करणार नाही.

मला माहित आहे तुला खूप राग आला आहे माझा .खूप चिडचिड होत असेल ना तुझी. पण विश्वा प्लीज ....हे पत्र वाचल्यावर तू शांत होशील अशी अपेक्षा करते .शांतपणे वाच आणि समजून घे.....माझ्यासाठी .

मला माहित आहे मी मुंबईला जाण्याचा माझा निर्णय तुला अजिबात आवडलेला नाही. प्रत्येक गोष्ट तुला विचारून करणारी मी हा निर्णय मात्र तुझ्या परस्पर घेतला. माफ कर मला. पण बघतोस ना किती त्रास व्हायला लागला होता. तुझे हाल डोळ्यांनी कसे पाहू रे जान . तुझी काही चूक नव्हती ना यामध्ये. आणि माझी तरी काय चूक होती सांगू शकतोस का तू ?आणि बिचाऱ्या सरू ची ही काही चूक नाही ना .मग माझ्यामुळे तिला तरी काय उगीच त्रास .तेच तेच वाद तेच तेच टेन्शन किती सहन करणार आपण सगळे. कोणीतरी माघार घ्यायलाच हवी होती ना .आणि माझं तिथं राहणं खूप त्रासदायक ठरले असतं.

मी खूप नशीबवान आहे कारण तुझ्यावर प्रेम केलं आणि जानू तू मला मिळालास. थोडं का असेना पण तुझ्याबरोबर घालवलेला प्रत्येक क्षण मी माझ्या मनाच्या कोपऱ्यात माझ्याबरोबर जपून ठेवणार आहे .ते कधीही मिटले जाणार नाहीत .तुझ्या त्या मिळालेल्या सहवासाच्या आधारावरच मी पुढचे आयुष्य काढीन .कसं किती ते नाही मला माहित. मी प्रयत्न करेन तुझ्या आठवणीत छान जगण्याचा. काही राहिलेली स्वप्न पूर्ण करण्याचा.

सरू चा तुझ्यावर खूप जीव आहे .सांभाळ तिला .मी नसले म्हणून काय झालं ? ती आहे ना तुझ्याबरोबर .काळजी घे तिची पण .ती तुला चांगलं जपेल खात्री आहे मला .आणि उगीच तिच्यावर चिडचिड करत जाऊ नकोस. अडाणी असली म्हणून काय झालं खूप प्रेमळ आहे ती. आयुष्यभर साथ निभावेल तुझी.

ए विशू जेवत जा वेळेवर. खाण्यापिण्याकडे नीट लक्ष दे .तब्येतीला सांभाळ काळजी घे स्वतःची मनात एकच खंत राहील ,शेवटचं तुला डोळे भरून पाहायचं होतं ते राहून गेलं. नशीब आता कुठे घेऊन जाईल माहित नाही .पण मनात तुझी छबी मात्र अशीच कोरलेली राहील. जरी लांब गेले असले तरी मनाने मात्र मी तुझ्यातच राहणार आहे .खुप आठवण येते तुझी. माफ कर मला .आय लव यू माझ्या जाना..!.

तुझी आणि तुझीच वेडी

सौम्या

पत्र वाचताना त्याच्या डोळ्यातून अश्रू थांबत नव्हते .ते पुसता पुसता त्याच्यासमोर तिचा चेहरा फिरू लागला होता .तिच्या खोडी, तिचा आगाऊपणा .हसणं, बोलणं ,आनंद झाला की उड्या मारून नाचणं .काही खटकलं की रागाने शांत राहणं .बोलणं बंद करणे. जशीच्या तशी ती त्याच्या नजरेसमोर फिरू लागली होती .

दोघे एकमेकांवर जीवापाड प्रेम करत होते.प्रेमात पुढे गेले. लग्नाची स्वप्ने रंगवत असताना सौम्या च्या घरातून विरोध आणि मग विश्वा चं लग्न नात्यातील मुलीबरोबर झालं .आणि सगळेच विस्कटले. त्याच्या लग्ना नंतरबायको सरू ला काहीतरी समजले. आणि त्यातून बरेच काही घडूनसरू विश्वा आणि सौम्या तिघांना ही खूप त्रास होतो.सौम्या विश्वा ला आणि ते शहर सोडून कायमचे मुंबईला निघून जाते.जाताना तिने विश्वा ला पाठवलेले हे शेवटचं प्रेम पत्र.

आठवण येईल तसे तो अधेमधे पत्र वाचत असे.

त्या घटनेला २५ वर्ष झाली होती आज . आणि सरू च्या दवाखान्या साठी विश्वा एका नवीन शहरात राहायला गेला होता .आजच तो तिथे त्याच्या नवीन फ्लॅट मध्ये आला होता. आणि अस्वस्थ होऊन घाईघाईने रूम मध्ये जाऊन सुटकेस मधून ते पत्र घेऊन वाचून रडतच त्यात काही शोध घेत होता.कारण नियतीने एक नवा डाव टाकला होता.समोरच्या फ्लॅट मध्येच त्याची हसरी ,खेळकर ती एका गंभीर चेहऱ्याने रहस्यमयी नजरेने त्याच्यासमोर उभी होती सौम्या.

मनिषा निकाळजे भिसे
मो. नं._९०११०४१२५६
सांगली

आमचे असंख्य हितचिंतक, ग्रामस्थ, शेतकरी बांधव व
तमाम नागरिकांना दीपावली निमित्त हार्दिक शुभेच्छा!

शुभेच्छुक

ग्रामपंचायत कटफळ, ता.सांगोला

सरपंच : श्रीमती जनाबाई रंगनाथ चव्हाण

उपसरपंच : श्रीमती मंदाबाई जगू शेळके

ग्रामविकास अधिकारी : श्री.पांडुरंग आत्माराम बुरूंगले

सर्व सदस्य, कर्मचारी वर्ग व ग्रामस्थ

ग्रामपंचायत कटफळ, ता.सांगोला

॥ शुभ दीपावली ॥

आमचे हितचिंतक, ग्रामस्थ, शेतकरी बांधव व तालुक्यातील तमाम
नागरिकांना दीपावली व नुतन वर्षानिमित्त हार्दिक शुभेच्छा !

शुभेच्छुक

ग्रामपंचायत शिरभावी, ता.सांगोला

सरपंच : बाळासाहेब तुकाराम बंडगर

उपसरपंच : श्री. रोहन सुरेश जगदाळे

ग्रामपंचायत अधिकारी : श्री. धनाजी मनोहर गोतसुर्य

सर्व सदस्य, कर्मचारी वर्ग व ग्रामस्थ

ग्रामपंचायत शिरभावी, ता.सांगोला

सर, मला शिकायचंय!

प्रियाकुमारी ही माझ्या इयत्ता सहावीच्या वर्गात आली तेव्हा अगदी अबोल होती. तिचं कुटुंब मुळचं बिहारचं. बिहारमधील पाटण्यापासून काही अंतरावर आमचं गाव आहे असं तिचे बाबा नेहमी सांगायचे. श्रवण शर्मांना प्रियाकुमारीसहीत एकूण पाच अपत्यं. त्यांपैकी दोन नंबरची सजनीकुमारी गेल्या वर्षीच माझ्या सातवीच्या वर्गात शिकून आठवीत गेली होती. प्रियाकुमारीच्या पाठची दोन भावंडं. रौनककुमारी आणि रोशनकुमार. तीदेखील आमच्याच शाळेत शिकत होती. प्रियाकुमारीचे बाबा शाळेजवळच्या एका गृहनिर्माण प्रकल्पात मजुरी करायचे. तिथल्याच एका 'लेबर' वस्तीत हे कुटुंब रहायचं. श्रवण बहुधा सेंटरींगचं आणि कधी कधी प्लास्टरचंही काम करायचे. तसं पाहता प्रियाकुमारी आणि तिचं कुटुंब काही वर्षं पुण्यात काम करीत होतं. त्यामुळेच या मुलांचं बालपण तसं महाराष्ट्रातच गेलं होतं. घरात हिंदी सारखी मातृभाषा बोलण्यात असली तरी ही मुलं शाळेत बऱ्यापैकी मराठी बोलायची.

मात्र वर्गातील इतर मुलं हसत खेळत शिकत असताना प्रियाकुमारी मात्र नेहमी अबोल रहायची. ती अशी अबोल का राहते याचा मी काही दिवस विचार करत होतो. कारण माझ्या वर्गातील सारी मुले माझ्याशी नेहमीच मनमोकळेपणाने बोलतात. अगदी त्याच्या मनातल्या, सांगावयाच्या साऱ्या गोष्टी ती मला सांगतात. एकवेळेस ती त्यांच्या आईबाबांकडे जेवढी व्यक्त होत नसतील, तितकी ती माझ्याशी व्यक्त होतात. एकदा तिच्या मनात शिरून अलवार विचारल्यावर ती मला म्हणाली, सर, मला इथे शाळेत चांगलं वाटतं. शाळेतला दिवस अगदी चांगला जातो. तुम्ही शिकवताना मध्येच विनोद करता, तेव्हा मीदेखील मनमुराद हसावयाचा प्रयत्न करते. पण मलासंध्याकाळी घरात गेल्यावर भीती वाटते.

कसली भीती वाटते? आई, बाबा मारतात का तुला बेटा? मी विचारलं.

नाही सर. भीती वाटते, ते आता यंदाच्या दिवाळीत सजनीदिदीची शादी करायचं ठरवतायत. कदाचित पुढच्या वर्षी ते माझी शादी तर करणार नाहीत ना? सर, मला शादी नाही करायची. मला शिकायचंय, भरपूर शिकायचंय.

प्रियाकुमारीने जे काही सांगितलं ते ऐकून मला धक्काच बसला. कारण तिची दीदी यंदाच तर कुठे आठवीत गेली होती. तिला लांबच्या शाळेत लवकर व वेळेत जाता यावं म्हणून मी तिला माझ्या मुलीची जुनी सायकलही दिली होती. जेमतेम बाराव्या-तेराव्या वर्षीच तिला लग्नाच्या बेडीत, संसाराच्या रहाटात अडकविणाऱ्या त्या बापाला काय म्हणावे तेच मला कळेना.

प्रियाकुमारी पुढे सांगू लागली, सर, तुम्हाला माहीत नसेल, मला सजनीदिदीपेक्षाही एक मोठी आशादेवी नावाची बहीण आहे. आधी तिचं नाव होतं, आशाकुमारी. आता तिचं नाव झालंय, आशादेवी. आमच्याकडे लग्नानंतर मुलीच्या नावात असा बदल होतो सर. तुम्ही तिला पाहिली नसाल. पण जर ती शाळा शिकत असती तर ती आज अकरावीत असती. पण गेल्यावर्षीच पप्पांनी तिची शादी उरकली. जिजुजी पुण्यात पप्पांसारखंच काम करतो. गेल्याच महिन्यात तिला बच्चादेखील झालाय. आता यावर्षी सजनीदिदीची शादी, कदाचित पुढच्या वर्षी माझी शादी. सर, मला शिकायचंय ओ. मी काय करू?

प्रियाकुमारीच्या बाबांना मी एकदा शाळेत बोलावून घेतलं. ते म्हणाले, सर, मी तरी थोड्याफार अशा वयात मुलींची शादी करतोय. आमच्यात तर यापेक्षाही कमी वयात मुलांची शादी करतात. मी श्रवण शर्मांना समजावलं, अहो, काळ आता बदललाय. या वयात शादी करून संसार, मुलंबाळं संभाळण्याइतपत अशा मुलींचा शारीरिक, मानसिक विकास झालेला नसतो राव. त्यांच्या कोवळ्या खांद्यांवर का अशा अवजड, बोजड जबाबदाऱ्या देताय? आजचं त्यांचं वय खेळण्याचं, बागडण्याचं,शाळा शिकण्याचं, अभ्यास करण्याचं. नका असा मुलींवर अन्याय करू.

कदाचित त्यांना माझं म्हणणं पटलं असावं. होकारार्थी मान हलवीत ते निघून गेले. पण काय कमाल झाली माहीत नाही, दुसर्या दिवसापासून वर्गात प्रियाकुमारी चुटुचुटु बोलायला लागली. मन लावून अभ्यास करायला लागली. इतर मुलींसोबत खेळायला लागली, बागडायला लागली. एके दिवशी तीच स्वतःहून माझ्याजवळ आली. मला म्हणाली, आता पप्पा सुधारलेत. कदाचित तुम्हीच त्यांचे छान कान टोचलेत, मतपरिवर्तन केलंय. आता ते घरात कधी सजनीदिदीच्या शादीचा विषय काढीत नाहीत. उलट म्हणतात, शादीची गोष्ट बंद! मी आता माझ्या तिन्ही मुलींना भरपूर शिकवणार. त्यांना जेवढं शिकावसं वाटेल, तेवढं शिकवणार. माझ्या मुली शिकल्या-सवरल्या की चांगल्या मार्गाला लागतील. मगच त्यांच्या शादी करणार. मग आमचे लोक काय म्हणायचं ते म्हणूदेत.

मध्यंतरीच्या कोरोना महामारीच्या काळात शाळा बंद असली तरी आमचं शिकवणं सुरुच होतं. त्या काळात प्रियाकुमारीने नेहमीच चांगला अभ्यास केला. केलेला गृहपाठ वहीत लिहून ती त्याचे फोटो काढून पप्पांच्या व्हाटस् पवरून मला पाठवायची. मात्र एकेदिवशी त्यांच्या 'साईट'वरचा एक वॉचमन तिची अभ्यासाची वही घेऊन शाळेत आला. ती वही माझ्याकडे देत तो मला म्हणाला, आता ती शर्मांची मुलं कधी या शाळेत येणार नाहीत. कालच रात्री ती साईट सोडून गेलीत. पण प्रियाकुमारीने

सांगोला संपदा दिपावली विशेषांकास तसेच आमचे हितचिंतक व
तमाम नागरिकांना दीपावली व नूतन वर्षानिमित्त आभाळभर हार्दिक शुभेच्छा !

शुभेच्छुक

श्री अंबिका महिला गृहउद्योग,
सांगोला यांची दर्जेदार उत्पादने

हसबनीस फूडस्

- ✦नाचणी पापड
- ✦पोहा पापड
- ✦तांदूळ पापड
- ✦मका चिवडा
- ✦शेंगदाणा चटणी
- ✦जवस चटणी
- ✦बटाटा वेफर्स
- ✦शेंगादाणा लाडू

प्रोप्रा : श्रीकांत हसबनीस मोबा. ९८६०१९७६०७

हॉटेलसाठी लागणारे सर्व प्रकारचे स्नॅक्स मिळतील

तसेच लग्न, मुंज, वास्तुशांती इ. कार्यक्रमांसाठी
नाचणी व पोहा पापड होलसेल दरात मिळतील.

।। शुभ दीपावली ।।

आमचे हितचिंतक व तमाम नागरिकांना
दीपावली निमित्त हार्दिक शुभेच्छा!

शुभेच्छुक

श्री.चंद्रकांत घड्याळजी

सौ.मिनाक्षी घड्याळजी

चंद्रकांत रंगनाथ घड्याळजी
सौ.मिनाक्षी चंद्रकांत घड्याळजी
चि. ऐश्वर्या व चि. अथर्व

घड्याळजी परिवार, पंढरपूर

मा.लोकनियुक्त नगराध्यक्ष

सौ.राणीताई माने

सांगोला शहर व तालुक्यातील तमाम नागरिक व बंधु -भगिनींना
दिपावली व नुतन वर्षाच्या

सौ.छायाताई सुर्यकांत मेटकरी
माजी नगरसेविका, सांगोला नगरपरिषद सांगोला

श्री. सुर्यकांत(टिकु) मेटकरी

मा.नगरसेविका

सौ.छायाताई मेटकरी

शुभेच्छुक

समस्त मेटकरी परिवार, सांगोला जि.सोलापूर

ही अभ्यासाची वही तुम्हाला पाठवलीय. ती वही हातात घेतली खरी. पण मी क्षणभरासाठी अवाक झालो. काय बोलावे मला सुचले नाही. त्या वॉचमनने सांगितल्याप्रमाणे व्यावहारिक मतभेदांतून तेथील बिल्डरशी बाचाबाची झाल्याने श्रवणनी ती साईट सोडली होती. ती साईट सोडून ते पुण्यात गेले होते. मी वर्गात जाऊन ती वही उघडली. ती अभ्यासाचीच वही होती. अगदी कालपर्यंतचा सगळा गृहपाठ तिने पूर्ण केला होता. पण त्या वहीतच एक लिहून घडी केलेलं चिठोरं सापडलं. मी ते उघडून वाचलं. तिने लिहीलं होतं, सर, आमचे पप्पा आम्हा सर्वांना घेऊन पुण्यात चाललेत. आता आम्ही कधीच या शाळेत येणार नाही. पण सर, मला खूप शिकायचंय. मला व्हाटस् पवरशिकवाल ना दररोज? तिची शिकण्याची तळमळ, जिद्द बघून माझे डोळे भरून आले. माझ्या वर्गात ती माझी अगदी लाडकी मुलगी होती. पण आता यापुढे ती कधी माझ्या वर्गात येणार नाही याचं मला दुःख झालं.

मध्ये तीनचार वर्षांचा काळ उलटून गेला. मध्यंतरी अचानक श्रवण शर्मांच्या व्हाटस् प नंबरावरून मला 'कळळ'चा मेसेज आला. समोरून मेसेज आला, सर, मी प्रियाकुमारी बोलतेय. मी आता दहावीत शिकतेय. तिकडून आल्यावर इकडे पुण्यात माझ्या पप्पांना लगेच काम मिळालंय. त्यांनी आम्हाला एका चांगल्या शाळेत टाकलंय. म्युनिसिपालीटीची शाळा आहे, पण अगदी सेम तुमच्यासारखेच सर भेटलेत. छान शिकवतात, समजावून सांगतात. आता पप्पाही आमचे खूप लाड करतात. आम्हाला छान छान कपडे घेतात. आता सजनीदिदी तेरावीत गेलीय. तिनं अकरावीपासून सायन्स घेतलंय. आता पप्पा तिच्या शादीची गोष्ट काढत नाहीत. तिला, आम्हाला भरपूर शिकूदेत म्हणतायत. पण सर, त्या दिवशी ते तुम्हाला भेटले नसते तर?

मलाही वाटतं, प्रियाकुमारीसारख्या मुलींनी भरपूर शिकायला हवंय, शिकून मोठ्ठं व्हायला हवंय. तशा पालकांनीही जुनाट रीतीरिवाज, अनिष्ट परंपरांना सध्याच्या काळात नक्कीच छेद द्यायला हवा. एक बरं झालं की, श्रवण शर्मांसारखे पालक मी समजावून सांगितल्यावर ऐकले, समजून घेतलं. बालवयातच मुलींचे विवाह करण्याचा बेत बदलला. पण तरीही मनात विचार येतोच, त्या श्रवण शर्मांसारखेच सारे पालक असतील का, समजावून सांगितल्यावर समजून घेतील का? आणि महत्वाचं म्हणजे प्रियाकुमारीसारख्या सगळ्याच मुली अशा प्रकारे कोणाजवळ व्यक्त होत असतील का?

बाबू घाडीगांवकर,
मो. ९४२१७९५९५५
फोन ९७६३७०६२००

****

आमचे असंख्य हितचिंतक, ग्रामस्थ, शेतकरी बांधव व तमाम नागरिकांना दीपावली निमित्त हार्दिक शुभेच्छा!

स्नेहाचा सुगंध दरवळला
आनंदाचा सण आला
एकच मागणे दिवाळी सणाला
सौख्य, समृद्धी लाभो सर्वांना
दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा

महालक्ष्मी शु पॅलेस
मिरज रोड, सांगोला

मा.शशिकांत सावंत साहेब

मा.शशिकांत सावंत मित्र परिवार सांगोला तालुका

सावंत परिवार, हंगिरगे, ता.सांगोला

सर्व ग्रामस्थ, हितचिंतक, मित्रपरिवार व तमाम नागरिकांना
दीपावली व नुतन वर्षानिमित्त हार्दिक शुभेच्छा !

शुभदीपावली

शुभेच्छुक

शासनाच्या विविध विकासाच्या योजना राबविणारी ग्रामपंचायत

ग्रामपंचायत तिप्पेहळ्ळी, ता.सांगोला

सरपंच : सौ.नंदा मारूती बजबळकर

ग्रामपंचायत अधिकारी : श्री. विजय परशुराम कांबळे

सर्व सदस्य, ग्रामपंचायत कर्मचारी वर्ग व ग्रामस्थ

ग्रामपंचायत तिप्पेहळ्ळी, ता.सांगोला

।। शुभ दीपावली ।।

सांगोला शहर व तालुक्यातील सर्व नागरीकांना
दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा!

शुभेच्छुक

आमचे नेते

मा. दिपकआबा साळुंखे-पाटील

मा. सुभाष उर्फ तानाजीकाका पाटील

सुभाष उर्फ तानाजीकाका कृष्णदेव पाटील

- संचालक, सांगोला तालुका कृषी उत्पन्न बाजार समिती
- संचालक, सांगोला तालुका खरेदी-विक्री संघ लि.
- माजी चेअरमन व संचालक सांगोला बृहत वि.कार्य.से.सह. सो.लि.सांगोला, जि.सोलापूर

पाटील परिवार, सांगोला

श्री चौंडेश्वरी शिक्षण प्रसारक मंडळ सांगोला, संचलित,

सुंदर आश्रम शाळा, राजापूर.

ता.सांगोला, जिल्हा-सोलापूर.

-: संस्थापक,अध्यक्ष :-

ॲड. डॉ. अनिल विठ्ठल कांबळे

सुंदर आश्रम शाळा, राजापूर.

ता.सांगोला, जिल्हा-सोलापूर.

-: राष्ट्रीय अध्यक्ष :-

राष्ट्रीय विणकर सेवा संघ

सांगोला तालुक्यातील तमाम
नागरिकांना दीपावली व नूतन वर्षानिमित्त

हार्दिक शुभेच्छा

शुभेच्छुक

- ओमशंकर हुलगेरी केंद्रीय समन्वयक
- विजयकुमार जुंजा केंद्रीय समन्वयक
- गणेश दौंडे सांगोला, अध्यक्ष
- रामगोपाल म्याकल सोलापूर जिल्हाध्यक्ष

समस्त राष्ट्रीय विणकर सेवा संघ, सोलापूर जिल्हा

किशोरवयीन मुलं आणि लैंगिक शिक्षण

वाचक हो नमस्ते! मूल ज्यावेळी कुमारावस्थेमधून किशोरावस्थेत येत असतात त्यावेळी त्यांच्या शरीरात ,लैंगिक इंद्रियात बदल होत असतात.त्यांच्या वागणुकीत, विचार करण्याच्या पद्धतीत बराच फरक होत असतो. या वयात त्यांना आई – वडिलांच्या कोणत्याही सूचना नको असतात.त्यांच्या कामात पालकांची लुडबूड त्यांना डोकेदुखी वाटते. आणि पालकांना आपल्या पाल्याबद्दल खूप काळजी वाटत असते. आपले मूल चुकीच्या मार्गाला लागू नये याचा विचार पालक करत असतात. त्यामुळे आपलं मूल कुठं जातं? कोणासोबत असतं ?काय करतं? या प्रश्नांची उत्तरे मिळवण्यासाठी पालक त्याला किंवा तिला अनेक प्रश्न विचारत असतात. आणि नेमके हेच मुलांना नको असते. यामुळे त्यांच्यावर अविश्वास दाखवल्या सारखं होतं. पण पालकांची काळजी योग्यच आहे. मग अशावेळी पालकांनी काय करावं? तर यावरचा उपाय म्हणजे मुलाच्या– मुलीच्या मित्र– मैत्रिणींना किमान चार–सहा महिन्यातून एकदा घरी नाश्तासाठी बोलवावे. त्यांच्याशी अनेक विषयावर गप्पा माराव्यात. मनमोकळा संवाद साधावा. मित्र मैत्रिणींची कौटुंबिक परिस्थिति, आवड, पुढील ध्येय याबद्दल माहिती घ्यावी मात्र चुकून ही सूचनांचे डोस पाजू नये. तसेच त्यांच्यासोबत पूर्ण वेळ न बसता आपल्याला आवश्यक माहिती कळाली की शपक्षेूँ्ीं शिश्रष म्हणून उठून जावे. त्यांच्या िंर्ळीिंरलू ला पण आपण महत्त्व देतो हे त्यांच्या लक्षात आलं की आपल्यावरचा त्यांचा विश्वास वाढतो. आधुनिक पालकांनी हे आवर्जून लक्षात ठेवावे की आपल्या मुलाला मैत्रिणी आणि मुलीला मित्र असतात. त्यांना ही बोलवावे.यामुळे आपल्या पाल्याची संगत कळते. त्यामधील एखादे मूल वाईट विचारांचे असेल तर त्याबाबत आपण आपल्या पाल्याला आधीच सावध करू शकतो. खरं तर या वयातील मुले खूप दडपणाखाली जगत असतात. त्यांच्या शररीरात बदल होत असतात. भावनिक, मानसिक अवस्था गोंधळलेली असते. या होणाऱ्या बदलां बाबत अनेक प्रश्न त्यांच्या मनाला भेडसावत असतात. मात्र कोणाला विचारायचं आणि काय विचारायचं हेच कळत नाही. 'न बोला जाय न खोला जाय!' आशा कात्रीत सापडल्या सारखी अवस्था होते. अजून ही भारतातील कुटुंबात लैंगिकते बाबत खुली चर्चा होत नाही. आणि मुलांना त्यांचे प्रश्न गप्प बसू देत नाहीत. मग ते बऱ्याच वेळा अर्धवट आणि चुकीच्या ज्ञानामुळे वाईट मार्गाला लागू शकतात. आतातर एका क्लिकवर हवी ती माहिती मिळते. मग ती किती बरोबर किती चूक हे कळण्याच त्यांचं वयच नसतं. मुलींच्या बाबतीत तर हे जीवन उध्वस्त करणारं ठरू शकतं. म्हणून तर याबाबत मनमोकळी चर्चा झाली पाहिजे.मग आशावेळी पालकांनी काय करावे?तर काही बाबतीत जरी बोलता नाही आले तरी लैंगिक शिक्षणाबाबत योग्य मार्गदर्शन करणारे, अचूक ज्ञान देणारी पुस्तके मुलांना वाचायला द्यावीत. नंतर त्यावर चर्चाही करावी. यातून मुलांचे मन मोकळे होईल, चूक–बरोबर लक्षात येईल आणि आपल्या पालकांबद्दल अभिमान वाटेल व त्यांच्यावरीलविश्वास वाढेल. त्यातून विशेष करून मुलांना स्वतःच्या कामवासनेवर नियंत्रण कसे ठेवता येईल याचे ज्ञान मिळेल. त्यामुळे मुलींवर होणाऱ्या अत्त्याचारावर आळा बसेल.

त्याच बरोबर मुलांनी लैंगितेबाबत विचारलेल्या प्रश्नांना खरी उत्तर दिली पाहिजेत. जर पालकांना याबद्दल बोलायला संकोच वाटत असेल तर आपले फॅमिली डॉक्टरांकडे जाऊन शरीराची व शरीरात होणाऱ्या बदलांची अचूक माहिती घ्यावी त्यामुळे मुलांचे अनेक प्रश्न मार्गी लागतील तसेच ते डॉक्टरांशी मोकळेपणाने बोलतील.

लैंगिक शिक्षणाचा विचार करताना घरातील वातावरण खूप महत्त्वाचे आहे. मुलगी मोठी झाली म्हणजेच तिची मासिक पाळी सुरू झाली की तिच्यावर खूप बंधने लादली जातात. सात च्या आत घरात, मित्र नको, कपड्यांबाबतचे निर्बंध असे अनेक नियम मुलींसाठी लावले जातात. मुलींना त्यांच्या मनाप्रमाणे जगण्याचे स्वातंत्र्य नाही का? आपण जर मुलींवर योग्य संस्कार केले असतील तर मुली वाईट मार्गाला जाणार का? आपल्या मुलीवर आपला विश्वास नाही का? वरील प्रश्न प्रत्येक मुलीच्या पालकांनी स्वतःला विचारावे. अशावेळी किंवा लहानपणापासूनच मुलींना गुड टच – बॅड टच याची माहिती देणे अनिवार्य आहे.

खरी मेख वेगळीच आहे. आपण जर स्वतःला प्रश्न विचारला की मुलींना कोणापासून धोका आहे? तर सर्वांचेच उत्तर येईल मुलांपासून. मग मुलींना बंदिवासात ठेवण्यापेक्षा मुलांमध्ये चांगले संस्कार आपण का रुजवत नाही? रात्री मुलांनाच बाहेर सोडले नाही तर मुली बिंधास्त जगू शकतील.

आपल्या घरातील प्रत्येक मुलाला लहानपणापासूनच आपल्या घरातील आजी,आई, बहीण यांचा आदर करायला शिकवतो का? घरातील मोठी माणसेच घरातील स्त्रीयांचा कित्तेक वेळा अपमान करतात , त्यांना कमी लेखतात, त्यांच्या विचारांना, भावनांना किंमत दिली जात नाही. मग मुलगा मोठा झाल्यावर इतर मुलींकडे त्याच नजरेने बघणार. त्यामुळे योग्य संस्कार करण्याची गरज मुलींपेक्षा मुलांसाठी जास्त महत्त्वाची आहे. त्यासाठी घरातील स्त्रीयांबाबतचे वागणे सुद्धा बदलले पाहिजे. त्याचवेळी मुलींवर होणारे अत्त्याचार थांबतील.

वरील सर्व गोष्टींचा विचार केला तर लैंगिक शिक्षणाचा बाऊ न करता. योग्य वेळी योग्य मार्गाने मुलांना माहिती दिली पाहिजे. मुलांनी त्याबाबत पालकांना काही विचारायची शक्यता खूपच कमी आहे. मग मुलांना याबाबत कसं बोलतं करावं? तर योग्य वयात पालकांनी स्वतःच लैंगिक शिक्षणाबाबत योग्य मार्गदर्शन करणारे पुस्तक मुलांना आणून द्यावे, वाचायला सांगावे. तसेच नंतर आपण या विषयावर बोलूया. तुझ्या प्रश्नांचे निरसन करुया असे

सांगोला तालुक्यातील तमाम नागरिकांना
दीपावली व नूतन वर्षानिमित्त

सरपंच

सौ.कोमल सुरेश डोईफोडे

शुभेच्छुक

मा.सौ.कोमल सुरेश डोईफोडे (सरपंच)
मा.श्री.शिवाजी शहाजी दिघे (उपसरपंच)
श्री. सोमनाथ होळ (ग्रामपंचायत अधिकारी)
सर्व ग्रामपंचायत सदस्य, कर्मचारी वर्ग व ग्रामस्थ

वाढेगांव ग्रामपंचायत, ता.सांगोला

आमचे असंख्य ग्राहक हितचिंतक व तालुक्यातील तमाम
नागरिकांना दीपावली व नुतन वर्षानिमित्त हार्दिक शुभेच्छा !

उत्कृष्ट चव व स्वादिष्ट भोजन शुध्द शाकाहारी व
मांसाहारी सर्वोत्कृष्ट जेवणासाठी अल्पावधीत लोकप्रिय ठरलेले
व ग्राहकांच्या पसंतीस पात्र ठरलेले एकमेव हॉटेल

AC/Non AC रूम

हॉटेल शिवलोचन &लॉज

एकवेळ अवश्य भेट द्याच....

प्रोप्रा : अरूण सदाशिव पाटील (7709062747/9518764951)

सांगोला-मंगळवेढा बायपास रोड, सांगोला

सांगा. म्हणजे मुलांनापण चर्चा करणे सोपे जाईल.

पालकांनो लैंगिक शिक्षण ही काळाची गरज आहे हे लक्षात घ्या. आजच्या काळात जे अत्याचाराचे प्रमाण वाढत आहे ते केवळ योग्य वयात योग्य ज्ञान न मिळाल्यामुळे. चुकीचे व अर्धवट ज्ञान एखाद्याचे आयुष्य उध्वस्त करते. त्याला कुठेतरी पालक म्हणून आपणच कारणीभूत ठरू नये. यावर विचार करावा.

काळाचे पाऊल ओळखावे,
त्या प्रमाणे वागावे!

नमस्ते!

सौ. जस्मिन रमजान शेख,
समुपदेशक, साहित्यिक, व्याख्याती,
शिक्षिका, रेकी हीलर, टैरो रीडर, मिरज.
जि. सांगली. ९८८१५८४४७५

वृद्धाश्रम

वृद्धाश्रमीच्या पायऱ्यांना... पाऊल अडखळले
ईश्वरा चरणी ठेव...प्राण कंठाशी आले।।धृ।।

वार्धक्याच्या वाटेवरती..समाज भान हरपले
अंतरीच्या वेदनांना... कस्पटासम ठरवले...२

मुलगा मुलगी आता... भेद कुठेही नाही
पदराखाली मातृत्वाच्या.. भावना अनावर पाही...२

प्रार्थनेत हे मायबाप... गोकुळ सुखी नांदू दे
समाधानी नौका देवा... पैलतीरी जाऊ दे...३

पोराबाळा नाही किंमत... काळजात घाव केले
पांग फेडण्या जन्मदात्याचे.. आरपार मन रक्ताळले...४

शरीरही थकले मनासह..रस्ता दाखविला आश्रमाचा
आशीर्वादही नाही घेतले.,घालमेल गत आठवांचा...५

हिशोब होईल चुकता हाही... इथेच उणे अधिक माप
ईशाचा हा न्याय मिळेल..स्वर्ग नरक ठरवील पाप...६

श्वास थांबता माऊलीचा..हंबरडाही नाही साधा
खुशकमाल स्वारी यांची..सरणावर नकोच बाधा...७

पोटच्यांनी घात केला.... दुसऱ्यां हाती पुण्यकर्म
बहुरूपी मुखवट्यांचे... वाऱ्यावरती यांचे कुकर्म...८

स्वरचित

डॉ सौ. राजश्री संजय जाधव
सोलापूर ९४२०४८८७३३

संस्कृती

प्लास्टिकचे ग्लास
प्लास्टिकच्या बाटल्या
रस्त्यावर भरला क्लास
वरलोडच साठल्या

प्लेट वाट्या यांचाही
पंगतीत थाट भारी
अन्नासह कचराकुंडी
नशिबाची होते वारी

अन्न पूर्णब्रह्म असे
नसे कुणा देवाची भीती
बोलाचीच कढी नि भात
अंगी पाश्चिमात्यांची रिती

भारतीय संस्कृतीची
व्याख्याच बदलली
भरकटली खरंच पिढी
भूमाता कणव हरवली

कचरा गाड्या कमी
ढीगभर साचे कचरा
रोजंदारी काम नाही
कुणापुढेही हात पसरा

एआय सिस्टीमचे आक्रमण
चिंताग्रस्त कर्मचारी राही
समाधानी कसे रहावे ?
हरेक बाबी दुर्लक्षित पाही

डॉ सौ. राजश्री संजय जाधव सोलापूर
९४२०४८८७३३

आमचे असंख्य मित्र परिवार, हितचिंतक व तमाम नागरिकांना दीपावलीनिमित्त हार्दिक शुभेच्छा !

गव्हर्नमेंट कॉन्ट्रॅक्टर

मा.तौसिफ शेख

उद्योगपती

मा.चारूदत्त खडतरे

शुभेच्छुक

अर्श कन्स्ट्रक्शन्स, सांगोला

प्रोप्रा.तौसिफ शेख – गव्हर्नमेंट कॉन्ट्रॅक्टर

शेख परिवार, सांगोला

आमचे असंख्य ग्राहक व तमाम नागरिकांना दीपावली व नुतन वर्षानिमित्त हार्दिक शुभेच्छा

शुभदिपावली

शुभेच्छुक

सुनिल कोरे मेडिकल मॉल

प्रोप्रा. सुनिलदत्त गिरजाप्पा कोरे

मो. ७०३८७८१६२८, ९९२१३९८८९९, ७६६६१४९९४४

अर्चनाज् ब्युटी पार्लर ॲण्ड स्पा

प्रोप्रा. अर्चना सुनिलदत्त कोरे मो. ९९२१४६८८९९

ॲलोपथी औषधे, जेनरिक औषधे, डायबेटिक केअर, आयुर्वेदिक औषधे, सर्जिकल प्रॉडक्टस्, ऑरगॅनिक फूड, नॅचरोपॅथी औषधे, कॉस्मेटिक, बेबी केअर, पेट शॉपी

घरपोच सेवा उपलब्ध !

कोरे टॉवर बिल्डिंग, कडलास नाका, जत रोड, तळमजला, सांगोला

नाळ

स्वरा मुंबई एअरपोर्टवर रात्री अकरा वाजता हातात मोठा बुके घेऊन अमेरिकेवरून वरून येणाऱ्या फ्लाईटची आतुरतेने वाट बघत होती.फ्लाईट नेमकी त्या दिवशी पावसाळी वातावरणाने लेट झाली होती.एक तास...दोन तास...तीन तास...! तिच्या उत्साहाची जागा आता काळजीने घेतली होती....जरी वेळोवेळी स्क्रीनवर माहिती मिळत होती तरी ती उगीचच कासावीस होत होती...इतक्या वर्षांनी तिच्या भावाची भेट होणार होती ना...!पण भाबडे मन शंका कुशंकांनी विचलित होत होते....विमानाला काही झाले नसेल ना?माझा बंधू सुखरूप येईल ना?

आणि शेवटी एकदाचे विमान लॅन्ड झाले.आणि मनीषला समोरून येतांना तिने पाहिले...अगदी डोळे भरून...! अगदी पहिल्यांदा...!हो पहिल्यांदा...!!तरीही दिसताक्षणी ओळखले...!त्याचे ते राजबिंडे रूप डोळ्यात साठवत ती त्वरेने त्याच्याकडे झेपावली.त्यांची ती स्नेहार्द गळाभेट मनाच्या डोहात आनंदाचे तरंग उठवून गेली.

गंमत बघा ना!ज्या तिच्या भावाला तिच्या अख्ख्या पंचवीस वर्षाच्या आयुष्यात कधीच पाहिले नव्हते.कधीच भेटली नव्हती तरी तिने सहज ओळखले.कारण ती रक्ताची ओढ होती.दोघांचा तोंडवळाही तेच सांगत होता.जगाच्या पाठीवर कुठेही हरवलातं तरी रक्ताच्या नात्याचा शोध सहज लागू शकतो हेही निसर्गदत्त सत्य आहे.नाही का?आणि त्यामुळेच तर आज ते एकमेकांना भेटत होते.

दादा!किती रे वाट बघायला लावलीस?लटक्या रागाने स्वरा म्हणाली.

माय लव्हली सिस!ज्या गोष्टी जेव्हा व्हायच्या असतात त्या तेव्हांच होतात.तिच्या गालावर लाडाने टिचकी वाजवत मनीष म्हणाला.

चल जाऊ या घरी! बाबा पण तुझी वाट बघत आहेत.

ओह!ते का नाही आले?

अरे!त्यांची हल्ली वयोमानानुसार तब्बेत चांगली नसते.त्यामुळे प्रवास झेपत नाही.

हं!दगदग झेपत नाही या वयात!

हो ना !आणि रात्री कमी पण दिसतं त्यांना!

हं!पण स्वरा,आपल्याला किती वेळ लागेल गं घरी जायला?

तीन तास तरी लागतील बघ!ट्रॅफिक लागली तर एखादा तास जादा लागू शकतो.

ओके!डिअर सिस!निघू या का मगआता?

हो रे !तुला एव्हढ्या लांबच्या प्रवासाचा थकवा आला असेल ना?

इट्स ओके बेबी!मला कामानिमित्त जावेच लागते त्यामुळे सवय आहे.नो प्रॉब्लेम!

दादा!मला तर हे सारे स्वप्न वाटते...आपलंही कुणीतरी आहे या जगात अगदी जिवाभावाचं...!

दोघे बोलत बोलत त्यांच्या कार जवळ येतात.

दादा! तुला जेव्हा समजले फक्त की आपली एक छोटी बहीण आहे आणि ती भारतात आहे.मग तिला शोधण्यासाठी तू जीवाचं रान करतो काय!आणि ती सापडते काय! किती भारी ना!स्वरा हर्षोल्हासित होत कारमध्ये पूर्णवेळ अखंड बडबड करत होती.मनीष तिच्याकडे प्रेमाने बघत तिची ती बडबड ऐकत सुखावत होता.बोलता बोलता ते घरी पोहोचले.

घरी स्वराचे बाबा रावसाहेब पाटील वाट बघत होतेच.बाहेर गाडीचा आवाज ऐकताच ते दार उघडून बाहेर आले.मनीषने येताबरोबर त्यांच्या पायांना स्पर्श केला.त्यांनी मोठया प्रेमाने त्याला जवळ घेतले.आणि त्यानंतर सर्वजण घरात आले.

स्वरा!मनीषला त्याची खोली दाखव.आणि लवकर झोपून जा.उद्या सावकाश बोलू या.आता तो प्रवास करून थकून आला असेल.

अहो काका!असे काही नाही कदाचित जेटलॉकमुळे मला झोप येणार नाही.पण ठीक आहे झोपू या आपण!

स्वराने त्याची खोली त्याला दाखवली आणि स्वतः तिच्या खोलीत झोपायला गेली.

मुलं तर झोपून गेले.पण रावसाहेबांच्या डोळ्यासमोर गत जीवनाचा सारा चित्रपट आला.ते त्या भूतकाळात हरवले.

रावसाहेब पाटील...!एक प्रतिष्ठित व्यक्तिमत्त्व...!चाळीस एकर बागायती जमिनीचे मालक..!ऊस,स्ट्रॉबेरी,ब्लू बेरी यासारखे पिकं तर ते घ्यायचेच पण त्याबरोबर त्यांच्या वँडी करायचा उद्योग देखील सांभाळून होते.लक्ष्मी तिथे पाणी भरत होती.त्यांची पत्नी रेखा सुविद्य ...सुंदर..!तिच्यासाठी सारी सुखे हात जोडून उभी होती.

पण एक दुःख होतंच.त्यांच्या लग्नाला दहा वर्षे झाली पण त्यांना मुलबाळ नव्हतं.साऱ्या चाचण्या करून झाल्या.पण देवाने तिची कोख कोरी ठेवली होती.त्यामुळे ती कधीच आई बनू शकत नव्हती.रावसाहेब मात्र सुदृढ पूर्ण पुरुष होते.त्यामुळे रेखा आता सतत रावसाहेबांच्या मागे लागली होती

मला मूल होणार नाही हे सत्य स्वीकारून तुम्ही दुसरे लग्न करा.मी तुम्हाला घटस्फोट देते.असा सतत लकडा त्यांच्याकडे लावत होती.हे बघ रेखा!मला तुझ्या प्रेमात वाटेकरी नकोयत्यांचे रावसाहेबांचे रेखावर खूप प्रेम होते. ते तिला नेहमी म्हणत,मला संसारात मूल नसलं तरी चालेल पण तुझ्याशिवाय मी दुसरीचा विचाराचं करू शकत नाही.

त्यांच्या घरी लक्ष्मी पाणी भरत होती तरी रिकामा वेळ खायला उठायचा.त्यामुळे रेखा कॉलेजमध्ये प्राध्यापक म्हणून काम करायची.कॉलेजच्या कामामध्ये आपले मन रमवायची.

सीमा ही तिची मावस बहीण त्यांच्याच शहरात राहत होती.औषधशास्त्रात पदव्युत्तर शिक्षण घेत होती.दोघींच्या वयात फारसे अंतर नव्हते.सीमाने पदवी परीक्षेनंतर तिच्याच क्षेत्रातील औषधशास्त्रात पदव्युत्तर

शुभदिपावली

सर्व ग्रामस्थ, शेतकरी बांधव व तमाम नागरिकांना दीपावली व
नुतन वर्षानिमित्त हार्दिक शुभेच्छा !

शुभेच्छुक

ग्रामपंचायत गायगव्हाण, ता.सांगोला

सरपंच : सौ. अनिता बाळासाहेब कांबळे
उपसरपंच : सौ. कमलाबाई दत्तात्रय देवकते
ग्रामविकास अधिकारी : अश्विनी सुभाष रणदिवे

सर्व सदस्य, ग्रामस्थ व कर्मचारी वर्ग, ग्रामपंचायत गायगव्हाण, ता.सांगोला

सांगोला तालुक्यातील तमाम नागरिकांना
दीपावली व नूतन वर्षानिमित्त

शुभ दिवाळी

हार्दिक शुभेच्छा

शुभेच्छुक

मा.सौ.सुनिता भारत बरंगे (सरपंच)
मा.श्री.गिरजाप्पा दादा बुरंगे (उपसरपंच)
श्री. संजय संभाजी खटकाळे (ग्रामपंचायत अधिकारी)
सर्व ग्रामपंचायत सदस्य, कर्मचारी वर्ग व ग्रामस्थ

बुरंगेवाडी ग्रामपंचायत, बुरंगेवाडी, ता.सांगोला

शुभ दीपावली.. !

आमचे असंख्य हितचिंतक व
तमाम नागरिकांना दीपावली व
नुतन वर्षानिमित्त हार्दिक शुभेच्छा!



शुभेच्छुक

श्री. रामहरी दिगांबर किरगत

माजी अध्यक्ष, मस्टर असिस्टंट संघटना,
सांगोला तालुका

किरगत परिवार, डोंगरगांव, ता.सांगोला

शुभ दीपावली.. !

आमचे असंख्य हितचिंतक व
तमाम नागरिकांना दीपावली व
नुतन वर्षानिमित्त हार्दिक शुभेच्छा!

शुभेच्छुक

श्री.शिवाजी शिंदे

दस्त लेखनिक (मो.९९७५६६१९३७)
नगरपालिका शॉपिंग सेंटर, वरचा मजला,
तहसिल कार्यालयासमोर, सांगोला

आमच्याकडे संगणकीकृत
दस्त तयार करून मिळतील.

...मीबरोबर आंतरजातीय विवाह केला होता.त्यांच्या आंतरजातीय विवाहाला दोन्हीकडून विरोध असल्याने त्यांना तसे जवळचे कोणी संपर्कात नव्हते.

पण रेखा आणि साहेबराव आधुनिक विचारसरणीचे असल्याने सीमा आणि रेखा यांचे एकमेकांकडे येणे जाणे असायचे.सीमाचा एक वर्षाचा मुलगा मनीष खूप गोड होता. रेखाला त्याचा खूप लळा लागला होता.

त्याला सांभाळण्या धीरजकुमार आणि सीमाने पूर्णवेळ आया लावली होती.पण शेजारी राहत असल्याने दिवसभर रेखाच्या घरी आया त्याला सांभाळत होती आणि त्या आयावर रेखाचे पूर्ण लक्ष असायचे.त्याचे दुखणं खुपण सारं रेखाचं बघायची.

सीमा आणि धीरजकुमार दोन्ही हुशार असल्याने त्यांनी पुढचे शिक्षण अमेरिकेत घ्यायचे ठरवले होते.तिथे अभ्यास करून स्टायपेंडवर शिकण्याचा त्यांचा मानस होता.त्यासाठी ते जीव तोडून अभ्यास करत होते.पण नियतीला ते मान्य नव्हते

एक काळा दिवस उगवला आणि धीरजकुमार वर काळाचा घाला घालून गेला.हॉस्पिटलमधून परत येत असताना धीरजकुमारच्या दुचाकीला अपघात झाला आणि होत्याचे नव्हते झाले.हॉस्पिटलला न्यायची पण वेळ आली नाही.

सीमा पूर्णपणे दुःखाच्या सागरात बुडून गेली.भविष्यातला अंधार तिला भयभीत करत होता. त्यात जवळचे असे कोणीच नव्हते. फक्त रेखाचाच काय तो आधार वाटत होता.

लहानग्या एक वर्षांच्या मनीषकडे पाहून तिला भरून येत होते.तिला त्या परिस्थितीतून बाहेर काढण्यासाठी रेखाने खूप मदत केली.कारण जिवाभावाचे सीमाला तिच्याशिवाय कोण होते?बाकी साऱ्यांनी तर संबंध तोडून टाकले होते. तिने रेखाच्या मदतीने पुन्हा कॉलेजमध्ये जाणे सुरू केले. मात्र आता पुढचे शिक्षण अमेरिकेत जाऊन घ्यायचे स्वप्न मात्र भंग पावले होते.कारण त्यासाठी लागणारी अभ्यासाची तयारी तिला शक्य नव्हती.

रेखाचा संसार सुखाचा होता.तरी तिला मूल नसल्याची बोच स्वस्थ बसू देत नव्हती.रावसाहेबांचे तिच्यावर खूप प्रेम होते.त्यामुळे ते तिला सोडून दुसरे लग्न करायला तयार नव्हते.ते नेहमी म्हणतजगात किती जोडप्यांना मूल नाही.तरी ते सुखाने राहतातचं ना?मला जगण्यासाठी फक्त तुझे प्रेम पुरेसे आहे.पण रेखा मात्र स्वतःच्या मुलासाठी आग्रही होती.त्यासाठी ती रावसाहेबांना हरप्रकारे तयार करू इच्छित होती.पण त्यांना ते पटत नसल्याने ते तिला दाद देत नव्हते.

तशात तिला सरोगसीविषयी माहिती कळली.त्यासाठी भारतात असलेले नियम तिने जाणून घेतले.आणि तिला मार्ग सापडला.तिने मनोमन ठरवले.रावसाहेबांच्या शुक्राणू वापरून सरोगसीद्वारे मूल जन्माला घालायचे.म्हणजे ते त्यांचे स्वतःचे मूल असेल .आणि त्यांच्या संसारास पूर्णत्व येईल.

पण तो मार्ग इतका सोपा नव्हता.त्यासाठी रावसाहेबांना तयार करण्याचे दिव्य तिला पार पाडावे लागले.

अहो!प्लिज हो म्हणा ना? सरोगसी ने होणारे मूल हे जरी दुसऱ्या गर्भात जन्मले तरी ते आपले असेल.तुम्ही त्याचे खरेखुरे बाप असाल.आणि माझ्यासाठी ते पुरेसे आहे.आणि ह्यात कोणताही व्यभिचार नाही.तुम्हीच त्या बाळाचे वडील असाल.जरी माझ्या उदरात त्याने जन्म घेतला नसला तरी तो माझ्या मातृत्वाची आस पूर्ण करेल.रेखा काकुळतीला येऊन विनवत होती.

अगं वेडाबाई!सोपं आहे का ते?आणि त्यासाठी कोणी स्त्री का तयार होईल?

इच्छा असली की मार्ग सापडतो. तुम्ही फक्त हो म्हणा.

बरं बाई !शोध तू तशी स्त्रीअशी स्त्री मिळणार नाही असे गृहीत धरून रावसाहेब बोलले.

ते बोलले मात्र तो धागा पकडून ती लगेच तयारीला लागली.अशी स्त्री जी रावसाहेबांचे मूल आपल्या उदरात वाढवायला तयार होईल.

आणि मग एकदम सरोगेटर मदर म्हणून तिच्या डोळयांसमोर आली सीमा..!साऱ्या नियमात बसणारी..!पण तिला तयार कसे करायचे? ती तर तिच्या स्वतःच्या दुःखात बुडालेली...! त्यासाठी तिला विचारायचं कसं? तिला मोठे धर्मसंकट पडले.

पण मग एका हळव्या क्षणी हिम्मत करून शेवटी तिने सीमाला विचारलंच,आमच्या बाळाची आई होशील?देशील का मला तुझ्या गर्भाशयाचे दान?संभाळशील त्याला नऊ महिने?जन्मभर मी तुझ्या ऋणात राहीन.प्लिज!नाही म्हणू नको.घालशील कामातृत्वाचे सुख माझ्या झोळीत? डबडबलेल्या कंठाने रेखा बोलली.

’ताई !असं तुझ्या मनात तरी कसं आलं? इतकी लाचार समजलीस का मला? रुद्ध कंठाने सीमा म्हणाली.मी तुला त्यांच्याशी लग्न कर असे नाही म्हणत गं? कोणतं वावगं काम पण नाही सांगत!फ

मग?

सरोगेसीसाठी तयार हो,प्लिज!ह्यांचे शुक्राणू वापरून!रेखा तिला काकुळतीला येऊन म्हणाली.

काहीतरीच काय?लोक काय म्हणतील. मी जगाला तोंड कसे दाखवू?आणि आज जगात नसला तरी माझ्या जिवलग धीरजकुमारशी प्रतारणा?कधीच नाही!ताई दुसरे काहीही माग.पण हे नको.

सीमा!उलट तूंच मला समजू शकते.फक्त एव्हढे दान दे.मी जन्मभर तुझी ऋणी राहीन.

ताई!आधीच आम्हाला जगाने वाळीत टाकले होते..! त्यात धीरजकुमारचा असा मृत्यू...! तुला हे–बोलवतं तरी कसं?माझी म्हणावी अशी तू एकटीचं होतीस!आणि तुही माझ्या अगतिकतेचा असा फायदा घेते होय?रडवेली सीमा दुखीत अंतःकरणाने तिथून निघून गेली.

धीरजकुमारच्या अचानक जाण्याने सीमाची सारी स्वप्नं धुळीत मिळाली होती.त्यामुळे आताशा जीवनचं नकोसे झालं होतं.साऱ्या समाजाचा तिटकारा वाटू लागला.सगळं सोडून कुठेतरी निघून जावे असे सारखे वाटत होते.पण लहानगा मनीष

शुभदीपावली

सर्व ग्रामस्थ, शेतकरी बांधव व तमाम नागरिकांना दीपावली व नुतन वर्षानिमित्त हार्दिक शुभेच्छा!

शुभेच्छुक

ग्रामपंचायत बलवडी, ता.सांगोला

सरपंच

श्री.ज्ञानेश्वर पांडुरंग राऊत

उपसरपंच

श्री.रविराज रमेश शिंदे

सरपंच : श्री.ज्ञानेश्वर पांडुरंग राऊत

उपसरपंच : श्री.रविराज रमेश शिंदे

ग्रामपंचायत अधिकारी : श्री.राजकुमार मोहन ताटे

सर्व सदस्य, कर्मचारी वृंद व ग्रामस्थ,

ग्रा.पं.बलवडी, ता.सांगोला

आमचे असंख्य मित्र परिवार, हितचिंतक व तमाम नागरिकांना दीपावली व नूतन वर्षानिमित्त हार्दिक शुभेच्छा....!

मा.उपअभियंता

व सर्व शाखा अभियंता व कर्मचारी वर्ग

जि.प.बांधकाम उपविभाग, सांगोला

।। शुभ दीपावली ।।

आमचे असंख्य ग्राहक, मित्रपरिवार, हितचिंतक, शेतकरी बांधव व तमाम नागरिकांना दीपावली व नूतन वर्षानिमित्त हार्दिक शुभेच्छा!

Hero

ओम साई सर्व्हिसेस

पंढरपूर-मिरज रोड, सांगोला, जि.सोलापूर

मो.७७४५८६७२७३/८१७७८४७१२३

प्रोप्रा.अवधूत चंद्रकांतशेठ कुमठेकर (मो.९८९०८४९००६)

हिरो मोटोकॉर्पचे अधिकृत वितरक

हिरो-मोटोकॉर्प मोटारसायकलचे भव्य शोरूम

- आमच्याकडे नेहमीच हिरो मोटोकॉर्प दुचाकी गाड्यांचा भरपूर स्टॉक
- सर्व मॉडेल्स सर्व रंगात उपलब्ध

हिरो मोटोकॉर्प जुन्या ग्राहकांसाठी भव्य योजना

३ सर्व्हिसिंगवर १ सर्व्हिसिंग फ्री

तिला जगायला भाग पाडत होता.

धीरजकुमार सोबतच्या आठवणींनी ती व्याकुळ होत होती.अभ्यास तर बंद झाला.होता.लोकांच्या वखवखलेल्या नजरा आता त्रस्त करत होत्या.तिचा भक्कम आधार सुटला होता.जीवनाची भरकटलेली नावआता कशी पैलतीर गाठणार होती?

खूप विचार केल्यावर तिने निर्धार केला,आता इथे राहायचे नाही.अभ्यास करून स्टायपेंडवर शिकायला जाणे आता शक्य नाही.पण इथे राहणे नको.असे स्वतःला बजावून तिने रेखाने सुचवलेला मार्ग स्वीकारण्याचे ठरवले आणि एक निर्धार करून रेखाकडे आली.

मी तयार आहे.पण अमेरिकेतील पेइंगसीटचा माझ्या शिक्षणाचा खर्च...!देशील?

हो!करेन मी. ती एक तडजोड होती. पण आपल्या पाठीशीकोणीच नसताना आधार देणाऱ्या आपल्या बहिणीलात्यामुळे स्वतःचे मूल मिळणार होते.तिच्या जीवनात आनंद फुलवण्याचे समाधान तिला मिळणार होते.आणि तिचीही पैस्यांची गरज भागून नव्याने उभी राहणार होती

यथावकाश साऱ्या प्रक्रिया पार पडल्या.रेखाच्या एकांतातील फार्म हाऊसवर तिची राहण्याची व्यवस्था केली.मनीषला सांभाळण्याची सारी जबाबदारी रेखाने पार पाडली आणि सीमाने सरोगेसी द्वारे गोड अशा मुलीला जन्म दिला आणि ती अमेरिकेत कायमस्वरूपी निघून गेली.आपला सारा भूतकाळ विसरण्यासाठी...!

रेखा मात्र छोट्या स्वराच्या आगमनाने खुश होती.तिच्या संगोपनात गढून गेली होती. तिचे बोबडे बोल तिला सुखावत होते. म्हणता म्हणता पाच वर्षे निघून गेले.स्वरा आता शाळेत जाऊ लागली.

पणविधिलिखित काही वेगळे होते.काळाची नजर रेखावर पडून कॅन्सरच्या विळख्यात सापडून देवाघरी गेली.आणि स्वरा आईच्या मायेला पारखी झाली.

लोक रावसाहेबांना पुन्हा लग्न करायचा सल्ला देत होते.पण रावसाहेबांनी ते निग्रहाने टाळले.

रावसाहेबचं आता स्वराची आई आणि बाबा दोन्ही झाले होते.ते डोळ्यात तेल घालून तिला सांभाळत होते. जपत होते.

बघता बघता पंचवीस वर्षे सरली.इकडे सीमा अमेरिकेत उच्च शिक्षण घेऊन तिथेच स्थिरावली होती.ती आणि मनीष हेच तिचे विश्व होते.सत्तावीस वर्षाचा मनीष आता राजबिंडा दिसू लागला होता.चांगला शिकून तिथेच एका नामांकित कंपनीत सॉफ्टवेअर इंजिनिअर म्हणून काम करीत होता.

मात्र कधीतरी कातरवेळी तिला आपल्या रक्ताशी जोडलेली नाळ कासावीस करत होती.आपल्या हाडामासाच्या गोळ्याच्या आठवणीने ती कातर कातर होत होती.मनाच्या कोपऱ्यात लपवलेली कधीतरी रक्ताची ओढ तिला बेचैन करत होती.

अशाच एका संध्याकाळी ती उदास बसलेली असताना मनिषने तिला खोदून खोदून विचारले.ममा!तू कसल्या विचारात गढलेली असतेस गं? कोणते दुःख तुला खातेय? मला सांगशील?

तेव्हा बेसावधपणे अचानक तिच्या तोंडून निघून गेले,माझ्या उदरातून जन्म घेणारा तू एकटा नाहीस,मनीष!

काय?मनीष आश्चर्यारितेकाने ओरडला.

कोण आहे तो ?आणि कुठे आहे?

तो नाही ती आहे !ती तुझी बहीण!

ओह!खरंच!!

हो बहीण असली तरी लौकिकार्थाने ती माझी मुलगी नाही.

आई !प्लिज मला समजेल असे सांगशील का?

मग समंजस असलेल्या आपल्या मुलापासून तिने काहीच लपवून ठेवले नाही.आणि सारी कथा सांगितली.

मनाशी काही ठरवून मनीष आपली बहिण आता कुठे असेल काय करत असेल ते शोधून काढण्याच्या तयारीला लागला.

हे बघ मनीष !ती तुझी बहीण असली तरी ती आपली नाहीय,हे लक्षात ठेव.ती जरी सापडली तरी तिला आपल्यामुळे कोणताही त्रास व्हायला नको.

हो आई !मी तुला वाचन देतो जर तिला आणि तिच्या आईवडीलांना जर ह्या गोष्टीचा त्रास होणार असेल तर मी त्यांना काहीच समजू देणार नाही.मला माहित असलेले सत्य माझ्या मुखातून बाहेर पडणार नाही.याची खात्री बाळग.

आता इंटरनेटच्या माध्यमातून जग जवळ आलेले असल्याने मनीषला आपल्या बहिणीला शोधून काढणे फार कठीण गेले नाही.त्याला रेखा मावशीचा मृत्यू,..!.त्यानंतर रावसाहेबांनी केलेले स्वराचे संगोपन... ! हे सर्व समजल्यावर त्याने रावसाहेबांशी प्रत्यक्ष बोलण्याचे ठरवले.अणि मग तो रावसाहेबांशी फोनवर बोलला ,काका!मी मनीष वर्मा बोलतोय

कोण मनीष?माझ्या लक्षात येत नाहीय.

महेशने त्यांना ओळख दिल्यावर तेही खुलले.आणि त्यांनी सीमाची चौकशी केली.

काका!माझ्या आईच्या उदरात जन्मलेली स्वरा माझी बहिणीचं आहे ना?तुमची हरकत नसेल तर मी माझ्या बहिणीला भेटू शकतो का?

अर्थात आयुष्याच्या उतरंडीवर त्यांच्या लाडक्या लेकीला जिवाभावाचं कुणीतरी मिळणार हे ऐकूनच त्यांना आनंद झाला.आणि त्यांनी त्याला भेटीला बोलावले.

जेव्हा ही गोष्ट त्यांनी स्वराला सांगितली तेव्हा ती तर स्वरा तर हवेतच उडू लागली.या जगात आपलं असं कुणीतरी आहे,ही भावना तिला सुखावून गेली.रक्ताची ओढ नाते घट्ट करती झाली.कधी एकदा आपल्या लाडक्या भावाला भेटेल असे तिला झाले.त्याच्या जंगी स्वागताची तयारी तिने सुरू केली.

त्या बहीण भावाची विलग झालेली रेशमी वीण अखेरीस घट्ट होऊन जीवन कृतार्थ करून गेली.आयुष्यच्या शेवटी कोणताही किंतु परंतु न राहता रावसाहेब आणि सीमा यांची दोन वेगवेगळी कुटुंब आपापल्या अस्तित्वासह बंधुत्वाच्या प्रेमळ धाग्याने जोडली गेली.कायमची..!

हेमांगी बोंडे,वाकड,पुणे
मो:९९६०७९९६७२

आमचे नेते



मा.आ.दिपकआबा साळुंखे-पाटील
माजी आमदार सोलापूर जिल्हा

किंग

तमाम जनतेस
दीपावली
व नूतन वर्षाच्या
हार्दिक
शुभेच्छा...!

मा.दिलीप (काका) मस्के

मा.सौ.सुचिता(काकी) दिलीप मस्के

मस्के परिवार, सांगोला, जि.सोलापूर

गावाची वाट

सोडून गाव माझा ज्या वाटेवरून गेलो
स्वप्नात रोज येतो तो गाव ना विसरलो...

जन्म माझा नव्याने शहरांत या झाला,
मोहात काम धंद्याच्या येथेच मी रमलो....

माझीच दोन रूपे कळली मला नव्याने,
पहिले जी स्वप्ने शोधित मी राहिलो....

झगमगाट इथला मोहित मज राहिला,
सोडून गाव माझा नगरीत या बुडालो....
शहरात मी एक बांधले घर छान,
गावातील झोपडी कधी न विसरलो..

संपली धावपळ झालो आता निवांत,
आता न मी शहराचा, न गावाचा उरलो...

कळलेच नाही मजाला गेले कसे दिवस,
पुन्हा गावाची वाट शोधित मी राहिलो....

दत्तात्रय गणपतराव इंगळे
७५८८२१६११५

मी व्यर्थ केली चिंता जगाची (गजल)

मी व्यर्थ केली चिंता जगाची
गुंडाळली मग इच्छा मनाची
का स्वप्न मोठे केले उगा मी
विसरून गेलो ओळख स्वत:ची
या आसवांना वाहू दिले मी
का वाट पाहू ओल्या नभाची
घेतो जराशी माघार मीही
भाषा सखीची आहे तहाची
जर हात माझा माझ्याच हाती
नाही जराही भीती कशाची
हेही करूया तेही करूया
ही खूप झाली मरमर जिवाची
जे आज झाले ते आज झाले
केली तयारी आता उद्याची

– डॉ. सुभाष हरिबा कटकदौंड
मो. ९५६१२८४४०८

सर्व ग्रामस्थ, शेतकरी बांधव व तमाम नागरिकांना दीपावली व
नुतन वर्षानिमित्त हार्दिक शुभेच्छा !

शुभेच्छुक

ग्रामपंचायत अकोला, ता.सांगोला

सरपंच : सौ. धनश्री शशिकांत गव्हाणे
उपसरपंच : श्री. महादेव शिवाजी शिंदे
ग्रामविकास अधिकारी : श्री. दत्तात्रय रावसाहेब लंगोटे

सर्व सदस्य, ग्रामस्थ व कर्मचारी वर्ग, ग्रामपंचायत अकोला, ता.सांगोला

आमचे हितचिंतक, मित्रपरिवार, शेतकरी बांधव व तमाम नागरिकांना दीपावलीनिमित्त हार्दिक शुभेच्छा !

श्री.हरिभाऊ क्षिरसागर

शुभेच्छुक

मा. हरिभाऊ क्षिरसागर

सेवानिवृत्त कृषी पर्यवेक्षक, सांगोला.

क्षिरसागर परिवार, सांगोला जि. सोलापूर.

सर्व ग्रामस्थ, हितचिंतक, मित्रपरिवार व तमाम नागरिकांना दीपावली व नूतन वर्षानिमित्त हार्दिक शुभेच्छा !

शुभेच्छुक

ग्रामपंचायत अचकदाणी, ता.सांगोला, जि.सोलापूर

सरपंच : सौ.राधाबाई अंबादास कोळेकर उपसरपंच : श्री. शिवाजी बाबा चव्हाण

ग्रामपंचायत अधिकारी : सौ.सुषमा सुदर्शन मोरे

सर्व सदस्य, कर्मचारी वर्ग व ग्रामस्थ

ग्रामपंचायत अचकदाणी, ता.सांगोला, जि.सोलापूर

सर्व ग्रामस्थ, असंख्य हितचिंतक, मित्रपरिवार व तमाम नागरिकांना दीपावली व नुतन वर्षानिमित्त हार्दिक शुभेच्छा !

शुभेच्छुक

ग्रामपंचायत डोंगरगांव, ता.सांगोला, जि.सोलापूर

सरपंच : सौ. सुरेखा तानाजी बाबर

उपसरपंच : श्री.नवनाथ तात्यासाहेब राजगे

ग्रामपंचायत अधिकारी श्री.शमिरखान मोहिद्दीन पठाण

सर्व ग्रामपंचायत सदस्य, कर्मचारी वर्ग व ग्रामस्थ

एक पर्याय

शकुंतलाने आज सकाळीच मुलाला फोन केला. मात्र संजीवने उचलला नाही. यावर विक्रमराव म्हणालेच,

'अगं आपण भारतात रहातोय ते परदेशात राहतात. त्यांच्या आणि आपल्या वेळेमध्ये फरक असतो ना!'

यावर शकुंतला गप्प बसली. तिच्या मनात विचारांचे काहुर माजले होते. विक्रमरावांची एनजिओग्राफी झाली, त्यांना चार ब्लॉकजेस असल्याचे निदर्शनास आले होते. आताएनजिओप्लास्टी करावी लागणार होती. संजीव अन् कुमूद या दोघांनी यावेळी हजर असलंच पाहिजे असं शकुंतलाला वाटत होतं. ती सहजच भूतकाळात हरवली. जेव्हा शकुंतला अन् विक्रमराव नोकरी करत होते, तेव्हा विक्रमरावांच्या आईने आणखी एखादंआपत्य होवू द्या असं सुचवले होते, पण.. करिअर अन् वाढती महागाई वाढत्या जबाबदाऱ्या अशी प्रशस्त कारणं दाखवत शकुंतला अन् विक्रमरावांनी जबाबदारी पासून हात झटकले. तसं विक्रमरावांना राहून राहून मनात नेहमी एक विचार यायचा. आपल्या मुलाला अजून एक भाऊ किंवा बहिण असलीच पाहिजे. एकमेकांना साथ सोबत जिव्हाळा, प्रेम राहील. शकुंतला मात्र एका मुलावरच खुश होती. ती नेहमी विक्रमरावांना त्यांच्या भावा-बहिणीच्या परस्पर संबंधांची उदाहरणं देई. तिचे सख्खे दीर जगाला सढळ हाताने व सहर्ष प्रत्येक गोष्ट करत. मात्र सख्ख्या भावाला किंवा त्याच्या घरातील कुणालाच काही करायचे म्हणलं की त्यांच्या डोक्यात व्यवहाराचं भूत थैमान घालत असे. आपण किती अन् काय केलं याचा हिशेब ते कधीच लावत नसत. फक्त पुढच्याने माझ्यासाठी किंवा माझ्या कुटुंबासाठी काय केलं हाच स्वार्थी विचार करत. त्यांना फक्त आणि फक्त बाहेरची माणसं, नाती, हे जग म्हणजे खूप चांगले आहे. घरातले मात्र. पण काही का असे ना विक्रमराव आणि त्यांची आई मात्र आपण सरळ मार्गानेच वागायचं. पुढच्याने कसे जरी वागले तरी आपल्या वागण्यात काही फरक पडू द्यायचा नाही हे मनाशी ठरवून निश्चयावर ठाम होते.

बघता बघता दिवस जात होते. शकुंतलाच्या सासूबाईंचे वय आता वाढू लागले. एकीकडे संजीवचे बालपण आणि दुसरीकडे सासूबाईंचे म्हातारपण. तारेवरची कसरत पार पाडत तिचं नोकरी करणं सुरू होतं. विक्रमरावांच्या एकट्या पगारावर कुटुंबाचा खर्च पेलवला जाणार होताच पण शकुंतलाच्या नोकरी करण्याने थोड्या सैल हाताने खर्च करणे सोपे जाणार होते. काही का असेना आपल्या एकुलत्या एक मुलाला म्हणजेच संजीवला आपण काहीतरी वेगळे बनवायचे असे त्यांनी ठरवले होते. आपण एकदम उच्च वर्गा इतका खर्च करू शकत नाही. अगदी गरिबा इतकी आपली परिस्थिती बिकट नाही. आपण मध्यम वर्गातील अगदी वरच्या स्तरात नाही पण एकदम खालच्या स्तरातही नाही. आपण मधल्या स्तरात असल्यामुळे कमीत कमी महिन्याच्या वीस बावीस तारखेपर्यंत तरी चिंतामुक्त वातावरणात राहू शकतो. गाठीला चार पैसे ठेवण्याचं यशस्वी नियोजन शकुंतलेला जमलं होतं. सध्या मात्र घरातल्या अन बाहेरच्या वाढत्या जबाबदाऱ्या तिला त्रस्त करत होत्या. तिने विचार केला, नोकरी सोडून तर चालणार नाही. घरातल्या जबाबदाऱ्या दुसरं कोणी घेणार नाही. मग यातून आपल्यालाच काहीतरी मार्ग काढावा लागणार आहे. म्हणून मग तिने सासूबाई व संजीवसाठी गावाकडून नात्यातली एक सारिका नावाची गरजू मुलगी आणली. तिचे शिक्षण जास्त काही झाले नव्हते. ती जेमतेम हिशेब व पत्र वाचण्यापुरतं शिकली होती. तिची इच्छा असेल तर तिला दहावीच्या परीक्षेसाठी ती बसवणार होती पण प्रथम घरातल्या जबाबदाऱ्या ती कशी पेलवते हे पहावे मग पुढे ठरवावे असा विचार झाला. पहाता पहाता सारिकाने शकुंतलाला घरातील जबाबदाऱ्यांपासून मोकळं केलं. ती घरातील सर्वांनाच हवं नको पाहत होती. संजीव अन् सासूबाई यांच्याकडे जातीपूर्वक लक्ष देत होती. शकुंतलाला आता दिवसातला काही वेळ का होईना थोड्या वेळाचा निवांतपणा मिळत होता. आता सारिका म्हणजे जणू घराचा श्वासच बनली होती. फक्त संजीव अन् सासूबाईंसाठीच नाही तर शकुंतला आणि विक्रमरावांनाही तिची चांगलीच सवय झाली. हळूहळू तिचे शिक्षणही सुरू झाले. तिने बहिस्थ विद्यार्थी म्हणून दहावी, बारावी चांगल्या मार्कांनी पास केले. पण हे सारं काही वर्षांपुर्वी. पुढे शिक्षिका होण्यासाठी व्यवसायिक शिक्षणासाठी शकुंतलाच्या कुटुंबाचा निरोप घेऊन ती बाहेर पडली. खरंतर सारिकाचं जीवन मार्गी लागलं पण पुन्हा शकुंतला पुढे नव्याने अडचणी उभ्या राहिल्या. सारिकाला पुढील शिक्षणासाठी बाहेर पाठवूच नये असे विक्रमरावांना आणि त्यांच्या आईला वाटतच होते पणसारिका सोबत असं वागणं स्वार्थीपणाचा वाटलं असतं. पाहता पाहता पुन्हा नातेवाईकात

नवाज कोल्ड्रिंक्स

शाखा नं.१ : महात्मा फुले चौक, डॉ.विभुते दवाखान्याशेजारी, सांगोला

शाखा नं.२ : जयभवानी चौक, सांगोला

रहिमान बागवान (मो.९८२३४२४००७)
अल्लामीन बागवान (मो.९८२३४२१००७)

बागवान परिवार, सांगोला, जि.सोलापूर

शुभदिपावली

आमचे असंख्य मित्रपरिवार, हितचिंतक, शेतकरी बांधव व तमाम नागरिकांना दीपावली व नुतन वर्षानिमित्त हार्दिक शुभेच्छा!

शुभेच्छुक

ग्रामपंचायत बुद्धेहाळ, ता.सांगोला

सरपंच : सौ. सुगंधा श्रीमंत गवंड
उपसरपंच : सौ. शहाबाई शिवाजी करांडे
ग्रामविकास अधिकारी : सौ. हेमलता राजेश आडसूळ

सर्व सदस्य, कर्मचारी वृंद व ग्रामस्थ, ग्रा.पं.बुद्धेहाळ, ता.सांगोला

आमचे हितचिंतक,आप्तेष्ठ नातेवाईक,शेतकरी बांधव व तमाम नागरिकांना दीपावली निमित्त हार्दिक शुभेच्छा !

शुभेच्छुक

अशोक ज्ञानेश्वर भुसे

(दस्त लेखनिक)

(मो.९८५०७१०७१८)

गुरूकृपा ई-सेवा केंद्र, नगरपालिका शॉपिंग सेंटर, वरचा मजला, तहसिल कार्यालयासमोर, सांगोला

आमच्याकडे संगणकीकृत दस्त तयार करून मिळतील.

आमचे असंख्य ग्राहक, हितचिंतक, शेतकरी बांधव, आप्तेष्ठ नातेवाईक व तमाम नागरिकांना दीपावलीनिमित्त हार्दिक शुभेच्छा !

बाळकृष्ण ऑफसेट प्रिंटर्स

नेहरू चौक, सांगोल.

लग्नपत्रिका, बीलबुक, लेटरपॅड, व्हिजीटींग कार्ड व सर्व प्रकारची छपाई योग्य दरात केली जाईल.

प्रोप्रा. अशोक माळी मो. ९४२३३३४२६०,
स्वप्नील (श्याम) माळी मो. ९८५०५२३९९३

गरजू मुलीचा शोध सुरू झाला पण काही करता यश मिळालेच नाही. मग आता कसे म्हणून खूप विचारांती त्यांनी नोकरी सोडायचे ठरवले. आर्थिक काटकसर, धावपळ आणि विचारांचा गुंता. शकुंतलाचा स्वभाव अलीकडे चिडचिडा झाला होता. विक्रमराव जमेल त्या पद्धतीने आर्थिक अन मानसिक जबाबदारी पेलवत होते. शकुंतला संजीवला स्वतः शाळेत सोडत व आणत होती. सासूबाईंचं हवं नको करत होती. शकुंतलेला मात्र नोकरीत असताना मिळणारं मानसिक व आर्थिक समाधान, मन स्वच्छंदी, आनंदी राहण्याची अनुभूती दुर्मिळ झाली. शेवटी तिने आता विचारांची कवाडं घट्ट लावून, झापडं लावलेल्या बैलाप्रमाणे संसाराचा घाणा ओढण्याचं ठरवलं होतं. खरंच गृहिणीला जाणवणारी घुसमट तोच तोचपणा नक्की का आणि कशामुळे होत असतो हे तिच्या लक्षात येऊ लागलं. हळूहळू संजीव मोठा होत होता. तसं सासुबाईंचे वयही वाढत होते. संजीवला एके दिवशी शाळेतून आणण्यासाठी शकुंतला घाईघाईने निघालीच होती. तेवढ्यात सासूबाईंना अचानक त्रास होऊ लागला. नाईलाजाने तिला थांबावं लागलं. खरं तर तिकडे संजीव वाट पाहत असेल किंवा चुकून कुणाबरोबर गेला तर? किंवा एकटाच घरी येण्यास निघाला तर? अशा अनेक प्रश्नांच्या वावटळीत तिच्या मनातील विचार कस्पटासारखे उडत नव्हते तर प्रचंड वेगाने इकडे तिकडे फेकले जात होते. तसा तिने त्याच्या वर्गशिक्षिकेला फोन केला पण उपयोग झाला नाही. संजीवला मी येईपर्यंत थांबवा असं सांगितलंही असतं पण काहीच उपयोग नव्हता. संजीवने थोड्या वेळ आईची वाट पाहिली होती आणि तो एका मित्रासोबत शाळेबाहेर पडला होता. शिपाई काकांकडे चौकशी केली तर तिला कळाले की जवळजवळ अर्धा तासापूर्वीच तो कोणासोबत तरी घरी गेला आहे. पुढे अचानक उभारलेल्या परिस्थितीला नक्की कोण जबाबदार होते हे तिच्या तिलाच कळले नाही. ती आता संजीवच्या सगळ्या मित्रांना फोन करत होती पण संजीव काही केल्या सापडत नव्हता नक्की तो कोणाबरोबर गेला हेही कळत नव्हतं. तिने आता ही गोष्ट आपल्या नवऱ्याला सांगितली तोही धावत पळत तिच्याकडे निघाला. मग त्यांनी सर्व चौकशीअंती पोलीस स्टेशन गाठले. पोलिसांनी शाळेचा सीसीटीव्ही तपासला पण योगायोगाने गेट जवळचा कॅमेरा बंद होता. दुर्दैवाने पिच्छा पुरवणं जणू सुरू केलं होतं. त्या दोघांना आता तहानभूक, घरदार या सर्वांचा विसर पडला होता. काही वेळानंतर मात्र शेजाऱ्यांचा फोन आला. तुमच्या आजी मोठमोठ्याने ओरडत आहेत. सगळी परिस्थिती समजून सांगूनही त्या एकसारखं माझा संजूबाबा.. माझा संजूबाबा.. म्हणून गोंधळ घालत आहेत. या सगळ्या परिस्थितीत गावातच राहणाऱ्या आपल्या भावाला विक्रमरावांनी फोन केला तर काय? तोही लग्न कार्यानिमित्त दूर गावी गेला होता. नातेवाईकांमध्ये असे कोणी नव्हते की ते पळत मदतीसाठी येतील. शेवटी नणंदेला फोन करून बोलावून घेतले.

शाळेतून घरी जाताना संजीवला आई न्यायला आली नाही, हे पाहून तो गांगारुन गेला. खूप वेळ वाट पाहून तो शेवटी एकटाच घराकडे चालत निघाला. मात्र इथे जवळतर घर आहे आणि आपण सहज एकटे जाऊ शकू या त्याच्या विचारांनी तो संकटात सापडला. रस्त्याने जाताना तो एकतर आई सोबत गाडीवर किंवा रिक्षात जात असल्याने त्याला रस्ता तितकासा लक्षात येईना.घर लांब होते पण त्याला जवळ वाटत होते. चालत असताना त्याला त्याच्या घराचा रस्ता लक्षात येईना. शेवटी आपल्यासारखाच गणवेश घातलेल्या मुलाच्या मागे तो गेला आणि रडू लागला. त्याला स्वतःचा पत्ता, मोबाईल नंबर ही कुणाला सांगता येईना. घाबरलेल्या मनस्थितीत आपण कुठे राहतो त्या सोसायटीचे नाव ही धड त्याच्या लक्षात येईना.त्याला खेळण्याच्या नादात आपल्याला घरी जायचं ह्याचा विसर पडला. तो ज्या मुलासोबत गेला, त्याच्या आई-वडिलांनाही ते रात्री कामावरून आल्यानंतर आपल्या मुलासोबत कोणी दुसरा मुलगा आला आहे हे कळाले. तरी त्यांनी चौकशी केली. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून त्यांच्या वर्गशिक्षिकेला फोन केला पण उशीर झालेला असल्याने फोन उचलला गेलाच नाही. मग आता पर्याय काय? एवढ्या रात्री कुठे जायचं आणि कुठे या सापडलेल्या मुलाचे घर शोधायचं. पोलिसांना सांगायला गेलं तर अंगलट येणारं प्रकरण. जवळ ना गाडी, ना पैसा. शोध घेणार कसा? हा विचार करत करत शेवटी उद्या आपल्या मुलाबरोबर ह्या मुलाला शाळेत घेऊन जाऊ.हा विचार करत ते सर्वजण जेवण करून झोपले. नेहमीच्या दिनक्रमाच्या ऐवजी थोडे लवकरच दोन्ही मुलांना सोबत घेऊन ते बाहेर पडले. दोन्ही मुलांना शाळेत मुख्याध्यापकांकडे न्यायचं आणि सगळी परिस्थिती सांगून ज्याच्या त्याला मुलगा स्वाधीन करा असं सांगायचं ठरवून ते शाळेत पोहोचले. गेट वरच्या शिपाई काकांनी त्या मुलाला पाहिले अन् पटकन ऑफिस मध्ये फोन करून कळवले. पालकांसह दोन्ही मुलांना ऑफिसमध्ये पाठवले. सगळ्यांनाच नक्की काय झालं याची उत्सुकता होतीच. संजीवचे आई-वडील धावत पळत आले. आईने त्याला

आमचे नेते



मा.आ.दिपकआबा साळुंखे-पाटील

आमचे हितचिंतक ग्राहक, मित्र परिवार व तमाम नागरिकांना दीपावलीनिमित्त हार्दिक शुभेच्छा !

मा.मोहसीन तांबोळी

मा.साजित तांबोळी

शुभेच्छुक

मा.मोहसिन अ.सत्तार तांबोळी

अध्यक्ष : यशराजे कला व क्रिडा सांस्कृतिक शिक्षण प्रसारक मंडळ

जिल्हा कार्याध्यक्ष, मुस्लीम समन्वय समिती महाराष्ट्र राज्य
सोलापूर जिल्हा सोलापूर.
मो. ९४०३०७४७८६

ए.बी.तांबोळी किराणा स्टोअर्स

जय भवानी चौक, सांगोला मो. ९८२२०३२७८६

तांबोळी परिवार, सांगोला

आमचे असंख्य हितचिंतक, ग्रामस्थ, शेतकरी बांधव व तमाम नागरिकांना दीपावली निमित्त हार्दिक शुभेच्छा!

शुभेच्छुक

ग्रामपंचायत मेथवडे, ता.सांगोला

सरपंच :

उपसरपंच : सौ. पुनम सिताराम शेळके

ग्रामविकास अधिकारी : श्री.बाळू दिगंबर मारकड

सर्व सदस्य, कर्मचारी वर्ग व ग्रामस्थ

ग्रामपंचायत मेथवडे, ता.सांगोला

आपल्या कुशीत घेतले. पटापट त्याचे पापे घेतले. तिकडे पोलिसांचा शोध सुरू होताच. त्यामुळे मुलगा सापडला म्हणून त्यांनाही कळवले. ऑफिसमध्ये संजीव सोबत आलेल्या त्या मुलाला व त्याच्या पालकांना दोषी ठरवले जाऊ नये म्हणून शकुंतलाने सर्व ऐकल्यावर पोलिसांना विनंती करून आमची काही हरकत नाही, असे सांगितले. शेवटी त्या पालकांचे आभार व्यक्त करून संजीवच्या आई बाबांनी त्याला शाळेत न बसवता घरी आणले. त्याला पाहून आजी आणि आत्याच्या जीवात जीव आला होता. कालची रात्र घरात कोणीच झोपले नव्हते. आजी जपमाळ ओढत बसली होती. बाबा बेचैन होवून नुसत्या येरझाऱ्या मारत होते. आत्याने गणपती पाण्यात ठेवला होता. शकुंतला तर माझंच चुकलं याचा विचार करून रडत होती.

आजीने त्याला शाळेत पाठवू नका बास झालं एवढ्या दूरच्या शाळेत पाठवणं. त्यापेक्षा घराजवळच्या शाळेत पाठवा. असं म्हणून लागल्या. मात्र विक्रमरावांनी त्याला तिसरी, चौथी इथेच शिकवून पाचवीपासून हॉस्टेलला ठेवायचे ठरवले. संजीव आता तर दुसरीत होता. बाहेरचं जग हे घरातल्या वातावरणापेक्षा खूप छान असते, असा त्याचा गैरसमज होता. एवढे दोन वर्ष आहे त्या शाळेत काढून नंतर पुढच्या वर्षी होस्टेलला ठेवायचे ठरले. सप्तरंगी इंद्रधनुषाप्रमाणे भासणाऱ्या बाहेरच्या जगाचा अनुभव संजीवला नव्हताच. इकडे आजीची तब्येत खूपच खलावत चालली होती.शकुंतला आपल्यावर आलेल्या जबाबदारीला पूर्वीसारखीच सामोरे जात होती. मी कितीही कष्ट करेन पण माझ्या मुलाला हॉस्टेलवर ठेवायचं, हे शक्य नाही असं तिला वाटायचं पण शेवटी विक्रमरावांनी घरातल्या उभ्या ठाकलेल्या परिस्थितीबद्दल समजून सांगितलं. पाहता पाहता संजीव चौथी पास झाला. तो मुळातच खूप हुशार होता. शकुंतला अन् विक्रमराव त्याच्या सर्वांगीण विकासाकडे लक्षपूर्वक पाहत होते. सासूबाईंची जबाबदारी पेलवत शकुंतला ही त्याच्या अभ्यासाकडे, खाण्यापिण्याकडे, खेळण्याकडे लक्ष देतच होती. त्याला सैनिक स्कूलमध्ये ऍडमिशन मिळाले. तो आई-बाबा, आजी यांना सोडून जाणार म्हणून ते सारे मनातून दुःखी असले तरी तो तेवढा दुःखी वाटत नव्हता. घराबाहेर राहणं म्हणजे अगदी सिनेमा, सिरीयलमध्ये दाखवतात तसंच, असं त्याला वाटत होतं. हॉस्टेलवर जाताना फक्त घरातील्यांनाच नव्हे तर शेजाऱ्यांनाही दुःख झाले होते. त्यालाही या सर्वांना सोडताना थोडे का होईना वाईट वाटत होते पण दिवस येतात आणि जातात. वर्षा मागून वर्ष सरत होती. सणासुदीला आणि उन्हाळी सुट्टीला तो येत जात होता. हळूहळू आजी आता अंथरुणालाच खिळून होत्या. तो आठवीत असताना त्याच्या आजी देवाघरी गेल्या. थोडे दिवस, थोडे महिने भेटायला येणारे आणि जाणारे. परत सगळं, सगळं शांत शांत

आता शकुंतला घरात एकटीच होती. आपण मुलाला घरी आणावे, एकुलता एक मुलगा तेवढ्या लांब ठेवायचा? हे तिचे विचार नवरा आणि तिच्या लेकालाही पटले नाही. त्याचे उज्वल भवितव्य ते दोघे पाहत होते. तिचा एकटेपणा किंवा मुलाची मानसिक दुरावलेपणाची अवस्था कोणाच्याच लक्षात येत नव्हती. शेवटी घरात बसून काय करायचे म्हणून तिने पुन्हा एकदा नोकरी करण्याचा निर्णय घेतला. या निर्णयाचे स्वागतच झाले. तिचा वेळ जाईल आणि चार पैसे गाठीला राहतील. असा विचार तिने केला. तोही यशाच्या पायऱ्या चढत चढत सैनिक स्कूलमध्ये शिकून बाहेर पडून नोकरीला लागला. शकुंतला अन् विक्रमराव दररोज आठवणी मध्ये रमत पण संजीव आपल्या सोबत रहावा असे त्यांना सारखे वाटे. नोकरी लग्न अन् सण समारंभ क्रमानुसार घडतच गेले. तो पाहता पाहता परदेशी नोकरीसाठी जाणार होता. प्रथम शकुंतला आणि विक्रमरावांना हे ऐकून अभिमानाने मान ताठ झाली, मात्र दुसऱ्याच क्षणी तो आपल्यापासून कायमचा दूर जाणार याची जाणीव झाली. मात्र संजीव आणि कुमुदचा निर्णय ठरला होता. त्यांनी त्यांच्या उज्वल भवितव्याचा विचार केला कुठेतरी लहानपणापासून, घरापासून दूर राहिल्यामुळे संजीवच्या मनात आई-वडिलांच्या प्रेमाचा कोपरा रिकामाच राहिला होता. लहानपणापासून बाहेर राहिल्यामुळे आलेल्या अनुभवांनी त्याला हसवलं अन रडवलंही होतं. तो परदेशी चांगलाच स्थिरावला. आई-वडिलांनाही सोबत न्यावं असं त्याला जरी वाटत होतं, तरी हवामान बदल, परदेशी राहण्यासंदर्भातले नियम आणि बऱ्याच गोष्टींमुळे ही दोघं इकडं अन् तीदोघं तिकडं राहिली.

लग्नाला चार वर्षे होऊन गेली होती. संजीव अन् कुमुदने बाळाचा निर्णय घ्यायचा ठरवला. या निर्णयाने त्या मोठ्या जबाबदारीस ती दोघं तोंड देत होती. अशातच विक्रमरावांची एन्जिओग्राफी आणि एनजिओप्लास्टी. संजीवची अवस्था म्हणजे सोडलं तर पळतंय अन् धरलं तर चावतंय अशी झाली होती. पाहता पाहता आई-बाबांचे मेसेज फोन या भावनिक प्रश्नांना काही उत्तर नव्हते. ना परदेशातून अशा परिस्थितीत ती दोघं येऊ शकत होती. शेवटी या क्षणाला शकुंतला आपल्या जीवनाचे सिंहावलोकन करत होती. निभावलेली कर्तव्य अन्

शुभ दीपावली..!

आमचे असंख्य मित्र परिवार, हितचिंतक व तमाम जनतेला
दीपावली व नुतन वर्षानिमित्त हार्दिक शुभेच्छा !

शुभेच्छुक

संजीवनी हॉस्पिटल

कडलास नाका, सांगोला, ता.सांगोला, जि.सोलापूर मो.7558496575

संजीवनी हॉस्पिटल अँण्ड एक्स-रे क्लिनिक बलवडी, ता.सांगोला

डॉ. शिवाजीराव ढोबळे
G.C.E.H. (Bom.) Reg.No. 13383

डॉ.सुधीर शिवाजी ढोबळे
M.B.B.S., M.S.(Mumbai)
DNB. DMAS. FMAS
General & Laparoscopic Surgeon

डॉ.सुहास शिवाजी ढोबळे
Physician & Consultant

सौ.प्रतिभा शिवाजी ढोबळे
(संचालिका)
शेतकरी महिला सहकारी सूत गिरणी सांगोला

बलवडी, ता.सांगोला – ४१३ ३०८
फोन (हॉस्पिटल) : (०२१८७) २४८२३८

डेंटल सुविधा उपलब्ध

उपलब्ध सुविधा

- सुसज्ज ऑपरेशन थिएटर
- लेसरद्वारे सर्जरी
- ई.सीजी., व्हेंटिलेटल, डिफिब्रिलेटर
- ऑक्सिजन
- बाह्यरूग्ण विभाग (ओ.पी.डी.)
- हृदयरोग, मधुमेह, उच्च रक्तदाब
- पोटाचे आजार
- जनरल व लॅप्रोस्कोपिक ऑपरेशन
- आय.सी.यु. व सेमी आय.सी.यु.
- कार्डियाक मॉनिटर
- आंतररूग्ण विभाग (आय.पी.डी.)
- रूग्णवाहिका (ॲम्ब्युलन्स)
- दमा, मेंदूचे आजार, फुफ्फुसाचे आजार
- तज्ञ डॉक्टर

एंडोस्कोपी
सुविधा उपलब्ध

- अन्ननलिका/जठर तपासणी (ODG Scopy)
- मोठ्या अतडीची तपासणी (COLONOSOPY)

तुम्हाला जर पुढील लक्षणे जाणवत असतील तर पोटविकार तपासणी अवश्य करून घ्या..

- पोटात दुखणे, अपचन अतिसार
- मळमळ व उलटी होणे
- छातीत व पोटात जळजळ होणे
- उलटीमध्ये रक्त पडणे किंवा शौचास काळी होणे
- पाणथरीचा आजार असणे

ढोबळे परिवार, बलवडी

जबाबदाऱ्यांची गणितं मांडत होती. पण बाकी आता शून्य येत होती. सारिका तरी मदतीला किती दिवस येणार होती. त्यांनी काही का होईना सारीकाच्या जीवनाला नवीन दिशा देण्याचा प्रयत्न केला होता. तिच्याहीकडून काही वर्ष यांना आधार मिळाला. तीही तिच्या मुलाच्या, कुटुंबाच्या जबाबदारीत गुंतली होती. तरीही ती जमेल तसे कर्तव्य पार पाडतच होती. विक्रमराव रिटायर झाले आणि शकुंतलाने ही नोकरी सोडली होती पण आता पुढे काय हा यक्ष प्रश्न पाठ सोडत नव्हता. आता या उतारवयात हातात भरपूर पैसा, अडका, सुख वाटावं अशा वस्तू होत्या पण नव्हतं ते फक्त सून आणि मुलाचं प्रेम. सरता दिवस काळजीत टाकत होता, मनाला घाबरवत होता पण पर्याय नव्हता. आपल्यापैकी कोणीही एक जण आधी गेला तर मागच्याचं काय हा यक्षप्रश्न होताच. शेवटी विचारांती वृद्धाश्रमाचा पर्याय दोघांनीही निवडला. आपला गरजेपुरता पैसा बँकेत नावावर ठेवायचा आणि बाकी सर्व पैसा त्यांनी अनाथाश्रमाला अन् वृध्दाश्रमाला दान करायचं असं ठरलं. या सर्व निर्णयाला संजीव व कुमुदचा विरोध झाला. आम्ही अधून मधून भारतात आलो तर कसे? तुमच्या सोबत आम्ही राहायचेच नाही का? आमच्या मुलांना आजी आजोबा नको का? अशा अनेक प्रश्नांना शकुंतलेने उत्तर दिलं नाही पण गेल्या सहा वर्षात दोघं किती वेळा भारतात आले? भारतात आले तरी कुमुदच्या माहेरी किती आणि आपल्याकडे किती दिवस राहिले हेही ती जाणतच होती. आज एवढा मोठा एनजीओ प्लास्टीचा निर्णय घ्यायचा.शेवटी काय, आलेल्या परिस्थितीला सामोरे जावं लागणार होतं. मग कोणासाठी आणि का असं राहायचं? जीवनाच्या अंतिम क्षणांना चार माणसांसोबत सुख दुःख अनुभवत, वाटत जगणं केव्हाही चांगलं. हा विचार करून ते वृद्धाश्रमात गेले. त्यांनी आनंदी समाधानी राहायच्या त्यांच्या निर्णयाला वृद्धाश्रम निवडला.कोणी एक आधी गेला तर दुसऱ्याची काळजी थोडी कमी वाटेल हे ही खरेच होते. शेवटी माणसाला काय हवं असतं. चार शब्द प्रेमाचे अन् दोन अश्रू जवळीकतेचे. मायेनं कुणी पहावं अन् आधार हेच महत्त्वाचं. ते आता इथं काही प्रमाणात का होईना मिळणार म्हणून ती दोघं समाधानी होती.

सौ आशा अरुण पाटील
आदर्श बाल व प्राथमिक मंदिर
कवठेकर प्रशाला पंढरपूर

स्वत:लाचं मी पाहिलं....!!

प्रत्येक संकटांतून मार्ग काढताना,
स्वत:लाचं मी जगताना पाहिलं.

दु:ख चेहऱ्यावर उमटू न देण्यास,
स्वत:लाचं मी हसताना पाहिलं.

निरागस माझ्या मनाला एकांतात,
स्वत:लाचं मी रडताना पाहिलं.

वेदनांचे काटे शरीरास स्पर्शता,
स्वत:लाचं मी मरताना पाहिलं.

अजून किती सहन करायचं आहे ?
स्वत:लाचं मी विचारताना पाहिलं.

भिऊ नकोस ही वेळही निघून जाईल,
स्वत:लाचं मी बोलताना पाहिलं.

प्रत्येक टिकेला चोख उत्तर देताना
स्वत:लाचं मी ऐकताना पाहिलं.

उजाडलेल्या नव्या आशेचा किरणात,
स्वत:लाचं मी बघताना पाहिलं.

सर्व गोष्टी मनासारख्या नक्की घडतील,
स्वत:लाचं मी समजावताना पाहिलं.

मलापण मनसोक्त जगायचं होतं,
स्वत:लाचं मी संपताना पाहिलं.

भूषण सहदेव तांबे
मुंबई
९०२९२५८०३८

गुरुवंदना

प्रथम नमू आईला
जिने मला श्वास दिला
ओला गोळा चिखलाचा
आकारून पक्का केला
नमन त्या गुरुजना
विद्या दान दिले मला
चुकता देऊन छडी
सन्मार्ग मज दाविला
ज्ञात अज्ञात भेटल्या
गुरुतुल्य सर्व व्यक्ती
संस्कारुनी पदोपदी
मिळे सत्कर्म शिदोरी
गुरु आहेस तू स्वत:
मनी वसे सुविचारा
स्पर्शिले ना कुबुद्धीला
सदा बाळगे निर्मळता
प्रथा ही गुरु शिष्याची
व्यास गुरूने निर्मिली
पुष्पांजली ही काव्याची
अर्पिते मनापासून

सौ .प्रज्ञा सचिन देशपांडे

आमचे असंख्य हितचिंतक, मित्रपरिवार व तमाम नागरिकांना
दीपावली व नुतन वर्षानिमित्त हार्दिक शुभेच्छा !

श्रीनंद हॉस्पिटल

बालरूग्णालय व नवजात शिशु अतिदक्षता विभाग

अल्प उत्पन्न असलेल्या कुटुंबासाठी पुर्णपणे मोफत
व गुणवत्तापुर्ण आरोग्य योजना

महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना
प्रधानमंत्री आयुष्यमान भारत योजना मोय

* लहान मुलांच्या शस्त्रक्रिया विभाग
* लहान मुलांच्या डोळ्यांची तपासणी व उपचार
विभाग लहान मुलांचे मेंदुचे आजार तपासणी व उपचार
विभाग नवजात शिशु व लहान मुलांवर मोफत उपचार

बालरूग्णालय व नवजात
शिशु अतिदक्षता विभाग

मा.डॉ.आर.बी.जानकर

उपलब्ध सुविधा

* २४ तास अत्यावश्यक सेवा * कमी वजनाच्या/नवजात अर्भकासाठी अतिदक्षता विभाग (NICU)
* प्रिमॅच्युअर केअर युनिट * बालरूग्ण अतिदक्षता विभाग (PICU) *सुसज्ज आंतररुग्ण विभाग
* व्हेंटीलेटर (कृत्रिम वास देण्याची मशीन) * सी पॅप मशीन (CP-PM-CHINE) मल्टी पॅरामॉनिटर
* सुसज्ज ऑपरेशन थिएटर * सर्व प्रकारचे लसीकरण सेंट्रल ऑक्सिजन * बालदमा व ॲलर्जी क्लिनिक
* एक्स-रे सुविधा क्लिनिकल लॅबोरेटरी * मेंदुची पट्टी (EEG) * ॲम्ब्युलन्स

पिवळे व केशरी कार्ड धारकांसाठी मोफत उपचार

* खालील आजारावर मोफत उपचार केले जातील
* कमी दिवसाच्या व कमी वजनाच्या नवजात शिशुवरील उपचार
* वसनाचे आजार * नवजात शिशु कावीळ / गंभीर आजार व उपचार मेंदूचे आजार इतर लहान मुलांचे आजार शस्त्रक्रिया

जानकर डेंटल क्लिनिक

जानकर डेंटल क्लिनिक

मा.डॉ.अनिता जानकर

पत्ता : एस.टी. स्टॅण्डसमोर, भोपळे रोड, सांगोला जि. सोलापूर -४१३३०७
फोन : ०२१८७-२२२३२० मो.९५०३८६६०३०

श्रीकांत मोरे लिखित 'मनात शिरताना' व 'आत्मा आणि मन' ने केले मला विचारप्रवण

आदरणीय सौ. शोभाताई मोरे मॅडम यांनीकवीश्रीकांतजी मोरे साहेबांनी लिहिलेल्या कथा, कवितांचा अविट आस्वाद ऐकण्याचा मला अलिकडे एक आनंददायी छंद लागलेला, व्हाटसअपवर हिरव्या रंगाचा बिंदु दिसला रे दिसला की अधाशीपणे ते

सौ. मोरे वहिनींच्या शुद्ध, भावऊच्चारातील ते अभिवाचन ऐकणं व त्यावर भलीमोठी प्रतिक्रिया देणं नित्याचं आनंददायी, त्यावर त्यांनी चिन्हाद्वारे मानलेले थंक्स(तेच लेख देण्यापेक्षा त्यावर आधारित ललित लिहावं) हेएकटाकी जसं सुचला तसं बोलत राहीलो नि नेहमीच्या माझ्या छोटया मित्राने टाईप व मोबाईली संस्कार करुनमनोरमा दिवाळी अंकासाठी पाठवलेही.....)

जनी वादवेवाद सोडुनिया द्यावा,सुखेसंवादचि करावानको रे मना वाद हा खेदकारी......

परवा असेच एका कार्यक्रमात बोलण्याचा आग्रह झाला.मी मत मांडले, अळवावरचं पाणी तसं मोबाईलचं आहे असे मी मानतो.तुम्हीच म्हणता ना नव्वद टक्के फेक, व वेळखाऊ असत. परवा पर्यंत माझ्याकडे साधा मोबाईल होता. अलिकडे नवा आलाय.शिकतो आहे. मोबाईल निरक्षर म्हणा हवं तर मला.असे म्हणुन एक कविता सादर करुन शेवटी मित्र,नातेवाईक, हितचिंतक यांचे आभार मानले.बोलणे संपवुन माझ्या जागेवर आलो, उपस्थितांनी टाळ्या वाजवुन माझ्या भाषणाचे कौतुक केले. मात्र माझ्या शेजारी बसलेल्या एका वयस्कर असलेल्या काकांनी माझी चुक काढत मला सांगितले ते असे की, तुम्ही अहितचिंतकाचे आभार का मानले नाहीत? मी म्हणालो मला असे कोणी नाहीतच मी अजातशत्रु आहे. तेव्हा काका म्हणाले,

तुम्ही चांगले वागता यात सर्वाधिक वाटा तुमच्या हितचिंतकापेक्षा, कुभांडकारी अहितचिंतकाचा असतो हे माहीत असु दया.असं दचकु नका. एक सामाजिक संशोधन असं सांगतं की,कुणाविरुद्ध सतत कुरघोडी करणं असो कुणा विरुद्ध एक निगेटिव्ह, नरेटीव्ह सेट तयार करण्याचा प्रयत्न करणं वा कानं भरणं,कुणा विरुद्ध सतत कुणाला तरी उकसवत राहणं, तुम्ही कुठं शब्दात, वागण्यात अडकता का? हेबारकाईनेवॉच ठेवुन बगळ्यासारखं सतर्क राहुन पहाणं. एक ना दोन अनेक उपद्व्याप करायला का कमी अक्कल, शक्कल वेळ लागत असेल का? हे कुणासाठी कोण करतं सांगा बरं आजच्या धकाधकीच्या युगात.याला काय कमी असुया, कुत्सितपणा लागत असेल का? स्वत:चा वेळ देऊन कामधंदा, संसार सोडुन जपतप सोडुन तुम्ही कुठं खपु शकता हे डोक लावुन जपुन तुम्हाला खपवण्यासाठीच ना? या त्यांच्या कुलंगड्यांपासुन बचाव व्हावा म्हणुन मग तुम्ही चांगले वागता, सावध रहाता, समंजस होता, संयमी होता अध्यात्मिक मार्गावर रहाता यामुळे तुमची प्रतिष्ठा नावलौकिक वाढत रहातो तसतशी त्यांचीही जबाबदारी वाढत जाते नाही का? सांगा बघु. तुम्हाला बदनाम करायला त्यांना आणखी कंबर कसावी लागते. या त्यांच्या यातायातीचा अजिबात विचार न करता

अन् तुम्ही मर्दाहो सरळसरळ हितचिंतकांला क्रेडिट देता. हे चुकतंय असं वाटत नाही का?

संतांनी उगाच नाही म्हटलं निंदकाचे घर असावे शेजारी

आजच्या काळात शेजारी राहता येत नसल्याने तर ते शेजारी न रहाताही गुप्त मार्गाने (पाताळयंत्री)ते आपलं उचापती कळलावी काम चोखपणे मोबाईल, फोन करुन बजावतात.म्हणजेच तुमच्यासारख्या कुणाचा तरी हक्काचाइथे तिथे पत्ता कट करीत रहाणे,चांगल्या व्यक्ती विषयी गुपचुप मत वाईट करुन मी कसा पात्र आहे पटवुनस्वत:ची पत्रिकेत, स्टेजवर वर्णी लाऊन घेणे, अशी चांगली व्यक्ती कुठेच उपस्थित राहू नये याची व्यवस्था करुन वर त्याच्या अनुपस्थितीत त्याचेच नावाची छुपी बदनामी करीत त्या बिचार्याची अनुपस्थिती भरुन काढणे, यासाठी चांडाळ चौकडीची, टोळीची, कंपुगिरीची स्तुतीपाठकांची आखणी करणे याला का कमी यातायात करावी लागत असेल का?दिवसरात्र हे मोबाईलवर, एखाद्या पदावर, एकमेकांची तळी उचलताना थकत नाहीत.प्रतिभावालाकुठे शिरकाव तर करीत नाही ना? हे डोळ्यात तेल घालुन निगराणी करतात. चांगली व्यक्तीआली रे आलीकी त्या बिचार्या विरुद्ध एकच कालवा करुन त्याला हे (डोम) कावळे हुसकावुन लावुनच पाशवी आनंद घेतात. यालाच आपण कुटील,कपटाचं राजकारण म्हणतो.जरा विचार कर.(हेच चार लोक एखाद्या पत्रिकेत माझ नांव नाही तुझं कसं,तुझं नावं वर कसं? म्हणत एकमेकांशी आपसात शीतयुद्ध शीतयुद्ध खेळतात, कुरघोडी करतात,एकमेकांची खिल्ली उडवतात. हा वेगळा विषय) तुम्हाला किनई तुम्हाला मोठे करणार्या या प्राण्यांची किमंतच नाही या खडुसवाल्यांची.तुमच्या दिमतीला ते क्षण न क्षण वेचतात नव्हे आयुष्यांच त्यांच ध्येयच हे असते. ती नाही का म्हण यांचे वरुन पडलीमी मरीन पण तुला रंडकी करीन. आता तरी सुधरा, त्यांच गुणगान करीत चला. माझ्या यशात त्यांचा वाटा आहे हे कबुल करीत चला. अशी माणसं म्हणण्यापेक्षा प्रवृत्ती म्हणु या. हरेक क्षेत्रातया ठाण मांडुन असतातच.बोचणार्या गवतासारखे. राजकारणाच्या क्षेत्रात प्रमाण जास्त असतं हे निरीक्षण सांगतं. हे सगळे मान्य करतातच (कारण यांच्या काळया कर्तुतीपासुन हरेक संवेदनशील माणुस भाजुन निघालेला असतोच.एकाही नामांकित व्यक्तीला नव्हे महान व्यक्ती,संतांना यांनी न छळता सोडल्याचा इतिहास आपण वाचतोच ना. मात्र कुठेही या विषवल्लींना समाजमनाने स्विकारले तर नाहीच यांनी कितीही कोलांट्याउड्या मारल्या तरीही इतिहासाने याबोभाटाकारमंडळींची दखल घेतली नाही

आमचे असंख्य हितचिंतक,
मित्रपरिवार व
तमाम नागरिकांना
दीपावली व नुतन वर्षानिमित्त
हार्दिक शुभेच्छा !

संस्थापक

श्री. शिवाजीराव व्हनमाने पाटील

चेअरमन

श्री.रणजीतसिंह व्हनमाने-पाटील

दाम दुप्पट ठेव योजना ६ वर्षे
सोनेतारण कर्ज
प्रतितोळा १,०१,०००/-

डिजिटल पिग्मी (UPI Collection)
QR code सुविधा
मिनी एटीएम कॅश विड्रॉल सुविधा
मोबाईल बँकिंग
IMPS, NEFT, RTGS सुविधा
वाहन तारण कर्ज, वैयक्तिक कर्ज, गहाणखत कर्ज

विठाई अर्बन

संपर्क: पंढरपूर रोड मार्केट यार्ड समोर सांगोला
मो.९९७५६७९५९५, ९१५८७०९५९५

आमचे असंख्य हितचिंतक, मित्रपरिवार व तमाम नागरिकांना
दीपावली व नुतन वर्षानिमित्त हार्दिक शुभेच्छा !

गायत्री कन्स्ट्रक्शन

विटा खानापूर, जि.सांगली

प्रोप्रा : श्री.प्रकाश सिद्राम भोसले नेलकरंजी, जि.सांगली
पार्टनर : श्री.मनोज आनंदराव पाटील (गव्हर्न्मेंट रजि. कॉन्ट्रॅक्टर-वर्ग १)

भोसले व पाटील परिवार

तर जे सात्विक लोक यांचे कारस्थानाने भरडले गेले त्यांचीच काळाने कायम डोईवर स्थापना करुन टाकली. एकुणच काय तर संतत्वाच्या वाटेवर हे नाग फणा काढुन असतातच यांनी डसल्याशिवाय कोणी मोठे झाल्याचे उदाहरण विरळाच असावे.संतवचन हेच आपल्याला सांगतात.संतशिरोमणी ज्ञानेश्वर माऊलींना छळल्याच्या गोष्टी ऐकतांना आजही भाविकांच्या डोळ्यात अश्रू उभारतात.)इतकंच काय सुंदर इमारतीच्या पायात दगड धोंडेच तर असतात तेव्हाच मजबुत दणकट बिल्डिंग तयार होते.माणसाचंही इमारती पेक्षा वेगळे काय असते.दगड धोंडे त्याची भुमिका पार पाडतात तेंव्हा माणुस देवत्वाला पावतो. खलनायक हिरोला घडवण्यासाठी स्वत:ची इमेज नकारात्मक करुन घेतो.सहानुभुती हिरोला मिळते. म्हणजे एखादी सात्वीक पापभिरु व्यक्ती घडण्यासाठी खोडसाळांची गरज अनन्वीत ठरते.आणि अगोदर ते गाणे म्हणायचे बंद करा पाहु.कुछ तो लोंग कहेंगे, लोगोंका काम है कहना, छोडो बेकारकी बातोंमे कंही बीच ना जाए रैनाम्हणजे तुम्ही त्यांना किंमत देणारच नाही म्हणा की.एक मित्र म्हणाला येथे सुगंध येत नाही, दुसरा मित्र म्हणाला जरा अलिकडे ये..हं!अस्सं आता येतोय ना? अरे वा सुगंध खुप दरवळतोय येथेहे कसं काय? दुसरा मित्र मग म्हणाला तुझी जागा चुकली होती तिथे जळाऊ लाकडांची वखार होती अन तु त्या दुर्गंधीत सुगंधाची अपेक्षा करीत होतास आता तु अलिकडे फुलांच्या बागेत आलास आता सुगंधच सुगंध घे. याचा अर्थ काय घेतला सांग पाहु? संकुचित,कुजलेल्या आखुड अडेलतट्टुंकडुन कौतुक, आनंदाची अपेक्षा करु नये. वाहवा आता शहाणा झालास खरा. एवढे ज्ञान मला देऊनही मी काकांचे नाखुषीनेच आभार मानले, कारण मला हे असे नकारात्मक अनुभव कधी आले नाहीत,आले तरी मी कधी मनावर घेतले नाहीत.कारण होते कधी कुणाकडुन आगळीक. माणसे आपलीच असतात ना? वाटतं कुणाला मी पुढं जावं हा मागे रहावा. आणि अध्यात्म मार्गात तरमज पामरासी काय मोठेपण,पायीची वहाण पायी बरी ...असं निक्षुन सांगीतलंच नाही का? मला कोणी छुपा शत्रु बित्रु नाही. असला तर आपसातलं बोलणं बंद काही दिवस होत. कधी त्याचे कडुन कधी माझेकडुन, रुसवा म्हणा ना हवं तर. जिथं जास्त प्रेम असतं तिथंच हे घडतं, रस्त्यावरच्या अनोळखी माणसा बरोबर तर हे होणार नाही ना?खोडकर वेगळं आणि खोडसाळ वेगळं दोहोंत जमीन आसमानचा फरक एक सकारात्मक एक नकारात्मक.आणि यात असतंच काय हो शेवटी.याचा किती म्हणुन बाऊ करायचा? मला न सही त्यांना तर मिळाले ना ? यात आनंद मानणारे मोठया मनाचे ठरतात. माझ्या गावी एका भल्या माणसाचे गोडवे आजही गायले जातात,आदर्श मानला जातो,त्यांचे सालस ओलावामय आचरण लोक समोर ठेवतात. ते ज्या क्षेत्रात होते तिथे त्यांनी सत्कार्यातुन त्यागाची रांगोळी काढली. स्व:त मागे राहुन सर्वाना पुढे घालण्याचा त्यांचा नेहमीचा हातखंडा, आपलं नावं फोटो कुठेही येऊ नये असा त्यांचा कटाक्ष, कुठे कार्यक्रमास निमंत्रण आले की, याला बोलवा, त्याला बोलवा, पत्रिकेत सगळयांची नावे येतील याच्याकडे त्यांचा कटाक्ष असायचा, स्टेजवर जागा मिळण्याची धडपडन करता सर्वाना मानाने बोलावण्याचे जणु आदेश संयोजकांना त्यांनी दिलेले असायचे. आपण कुठेतरी बाजुला बसणे किंवा प्रेक्षकात निगर्वी साधेपणाने बसणे हे नित्याचं होत. ते म्हणायचे कोठेही बसले तरी जनमनात स्थान निर्माण केलेल्यांना काही फरक पडत नाही.व सर्व ठिकाणी मीच पुढे मध्यभागी कशाला? इतराचं कर्तृत्व झाकण्याचं किंवा असुयेने कुणा बिचार्याला टाळणं, गाळण्याचं सामाजिक, सांस्कृतीक पाप मी करणार नाही.(लोकही कंटाळुन जातात तेच ते चार नेहमीचे मुखडे पाहुन यांनी कुणाला गाळलयं खरं तर यांचेपेक्षा त्या भल्या माणसाचं पारडं जड असतं हे त्याच्या पासंगालाही पुरत नाहीत.म्हणुन हे जाणीवपुर्वक टाळतात.)तुमचं यांचेशी जमत नाही मग ते नाव कसं?असे कोणीतरी विचारले तर ते लगेचच भडकायचे म्हणायचे ते तुम्हाला काय करायचे? त्याना पहीलं घ्या त्यांचे काम मोठे आहे.मतभेद असतीलहीमाझे किरकोळ, मात्र माझ्याअंतकरणात स्थान आहे त्यांचे. इतकंच काय एखादा पुरस्कार निवडीचे पत्र द्यायला कोणी आले की आवर्जुन सांगायचे की, माझ्यापेक्षा अमुक व्यक्तीची निवड करा, अहो त्याने घरादाराची राखरांगोळी केलीय या क्षेत्रासाठी, आणि मी सांगितले म्हणुन त्यांना सांगु नका नैसर्गिकतेनेहे होऊ द्या.माझ्या आनंदासाठी एवढे करा. समोरचा चाट पडायचा.आज भेदांनी उच्छाद मांडलाय, सर्वसामान्यांचे जगणे कठीण झाले आहे, बेकारी,महागाई दारिद्र्य अशा एक ना दोन अनेक समस्या आ वासुन उभ्या आहेत. स्पर्धा वाढत आहेत तरुणाई निराशेच्या गर्तेत ढकलली जातेय.देशा देशात संहारक युद्ध होताहेत,नव्हे सारं जग नामशेषविध्वंसक अशा अण्वस्त्राच्या टोकावर उभारल्याचं भेसूर, भयंकर चित्र आहे.करुणायुक्त बुद्ध पुरेसा नीट न स्विकारता आल्याने युद्ध दारात आलंय. अविश्वासाई अनिश्चिततेच्या दिवसात एकमेकांना साथ, धैर्य देत वाटचाल करणे ही काळाची गरज आहे.माझी आई ज्ञानेश्वरीतील संदर्भ देत सांगायची की, आपल्या आसपास माणसं पशुपक्षी इतकंच काय जड पदार्थातही शिव शक्ती म्हणजे चेतनशक्ती जीव असतो. कारण पंचहाभुतां पासुन हे चराचर निर्माण झालेय,आपलं शरीरही त्याचाच अंश आहे म्हणुन जमिनीवर पाय ठेवताना चालताना हळुवार चालावे कोणालाही बोलताना हळुवार शब्दांत बोलावे कोणतीही वस्तु हाताळताना,वापरताना संवेदनशीलतेने ती सजीव आहे या विनम्र भावनेने व्यवहार केल्यास संकटकाळी हे चराचर तुम्हाला मदतीला येते. दैनंदिन व्यवहारात कुणाविषयीही कटुता निर्माण झाली तरी कायम न ठेवता समजुतदारपणा कमीपणा स्विकारुन आपला मोक्षाचा मार्ग मोकळा करावा,कारण कोणा जीवाविषयी किंतु, आकस वा कोणतीही भौतिक वासना मृत्युसमयी राहील्यास मुक्ती, सद्गती वा

परमेश्वर चरणी विलीन होण्यातीलती मोठी धोंड ठरते.कारण चित्रगुप्त दरबारी एक नियम आहे तो म्हणजे माणुस आईच्या उदरातुन बाहेर येताच ज्या निरागस निर्मळ भावावस्थेत तो होता त्याच मनोवस्थेत येथे आला पाहिजे नसता त्याला जन्ममरणाच्या चौर्यांशी लक्ष योनी फेर्याच्या चक्रात अडकणे क्रमप्राप्त ठरते.मनुष्यजन्म हा

जन्म-मृत्युच्या फेर्यातुन सुटणेची शेवटची योनी भाग्याने लाभते.हे शरीर ,जीवन अल्पकाळाचे असते नंतर ते कायम मातीशी तादात्म्य पावुन रहाते म्हणुन या जगताशी आईच्या मायेने वागावे भलेही कोणा एका जीवाने आपल्याला त्रास दिला तरी त्याचे विषयी ममत्व भावच ठेवावाहे थोडे जड वाटले तरी यातच दोन्ही बाजुचे कल्याण तर असतेच शिवाय देवाच्या प्रशासनात ढवळाढवळ केल्याचे पापही लागत नाही. हे सारे ज्ञानेश्वरी निरुपणाधारे आई सांगायची.म्हणुनमाझा तर स्मशानातील माझ्या अंत्यसंस्काराचे चित्र रोज सकाळी उठल्यावर पहाणे हाचमाझा पुजापाठ असतो म्हणुन सकारात्मक नजरेने सर्वत्र पहाणारा, सर्वमित्र आहे. पण काकांना कोण हे सांगणार? मानले त्यांचेही आभार.आणि विशेष आभार मानले, हे चिंतन प्रसवण्यासाठी आधारभुत ठरलेल्या मनात शिरताना व भावरंग चे लेखक, कवी व मानवी मनोव्यव्हार व भावभावनांचे सुक्ष्मातिसुक्ष्म विवरण कवितांतुन करीत रसिकांना मनाच्या श्लोकांची याद देणारे मनाचा मवाळु ,स्नेहाळु कृपाळु असणारे श्रीकांतजी मोरे साहेब ,प्रभावी अभिवाचन करणार्या मा. सौ. शोभाताई मोरे मॅडम यांचे पुनश्च आभार.

।।इतिश्री रसिकराजार्पणमस्तु श्रीरस्तु।।

कवी- देवेंद्र औटी

(बसवरत्न पुरस्कार२०१० प्राप्त , मो. ९८८१४८२९२४)

चेअरमन

मा.गिरीषभाऊ नष्टे

आमचे असंख्य सभासद, ठेवीदार, कर्जदार, हितचिंतक व तमाम नागरिकांना दीपावली व नुतन वर्षानिमित्त हार्दिक शुभेच्छा !

शुभेच्छुक

- **गिरीषभाऊ नष्टे** (चेअरमन)
- **संजीव शिंदे** (व्हा.चेअरमन)
- **प्रसाद पोरे** (व्यवस्थापक)

अजिंक्यतारा नागरी सहकारी पतसंस्था मर्या. सांगोला

कार्यालय : अजिंक्य प्लाझा वासूद रोड, सांगोला

लखपती ठेव योजना

वाढत्या महागाईतसुद्धा आपण लक्षाधीश होऊ शकता...

- २४ महिने दरमहा केवळ रू. ३७३०/- • मुदतीनंतर मिळवा रू.१,००,०७१/-
- ३७ महिने दरमहा केवळ रू. २३००/- • मुदतीनंतर मिळवा रू.१,००,९५५/-
- ६० महिने दरमहा केवळ रू. १२५०/- • मुदतीनंतर मिळवा रू.१,००,०००/-

माजी नगरसेवक

मा.रफिकभाई तांबोळी

आमचे असंख्य, ग्राहक हितचिंतक, मित्रपरिवार, शेतकरी बांधव व तमाम नागरीकांना ही दिपावली आनंदाची, प्रगतीची मांगल्याची व भरभराटीची जावो याच हार्दिक शुभेच्छा!

स्वाद आपुलकीचा

उत्कृष्ठ नाष्टा व शुध्द शाकाहारी जेवणाची उत्तम सोय

हॉटेल गुलजार

गुलजार लॉजिंग अॅण्ड बोर्डींग

एस.टी.स्टॅंडसमोर, सांगोला

प्रोप्रा.आर.एन.तांबोळी

तांबोळी परिवार, सांगोला

माझ्या स्वप्नांचा मांडव

ऐक आताशा पावसा
तुझे थांबव तांडव
अरे अपूर्ण राहील
माझ्या स्वप्नांचा मांडव

तुझे वेळेवर येणे
यंदा सुखाचे ठरले
मात्र अति बरसणे
आता दु:खाचे रे झाले

झाली मशागत छान
आणि पेरणीही खास
बीज अंकुरण्या आधी
आले तणाला बरास

बीज अंकुराला आले
पीक पाण्यात थांबले
मात्र केलेल्या कष्टाचे
पाणी पाणी रे जाहले

आता नशिबात आले
पुन्हा दुबार पेरणी
नको बरसू असा तू
विनवितो मनोमनी

आनंद घोडके, सोलापूर
७३९७८१३२३६

विठ्ठला

तुझ्या चरणावरी रे
आहे सुकुन विठ्ठला
होऊ नकोच दूर तू
गेले थकून विठ्ठला

सुखावती नयन रे
तुला पाहून विठ्ठला
नसे भय सावलीत
तुझ्या राहून विठ्ठला

भले जीवनी तुझ्याने
गेले घडून विठ्ठला
तुझ्या नामातच आहे
माया दडून विठ्ठला

जगी या नश्वर फक्त
तूच करूण विठ्ठला
फेडणेच अशक्य रे
तुझे ते ऋण विठ्ठला

श्रद्धा तुझ्यावरीच रे
आहे भरून विठ्ठला
उभ्या संकटातूनी ने
आम्हा तरून विठ्ठला

आनंद घोडके, सोलापूर
७३९७८१३२३६

मराठी महिने

गुढी उभारूनी चैत्र
वर्षारंभ तो करतो
दाह तनाचा करण्या
ग्रीष्म उष्णता पेरतो

ज्येष्ठ असे पावित्र्याचा
सत्यवान सावित्रीचा
भक्त करिती जागर
आषाढात विठ्ठलाचा

श्रावणाच्या गोड सरी
झोका झुल्यावरी घेती
भाद्रपदमहिन्यात
गौरी गणेशा वंदती

अश्विनच्या चांदण्यात
चिंब न्हाते कोजागरी
येते दिवाळी कार्तिकी
दीप लावण्यास दारी

व्रत वैकल्याचा खास
मार्गशीर्ष असे मास
गुळ तिळाचे मिश्रण
पौष संक्रांतीचा सण

उपासना शंकराची
माघामध्ये करतात
फाल्गुनात नानारंगी
सर्वधर्मी भिजतात

आनंद घोडके, सोलापूर
७३९७८१३२३६

पुन्हा एकदा

तुझ्याचसाठी गोळा झाले
,आभाळ पुन्हा एकदा
अंगावरती धुंद सरीना तू
माळ पुन्हा एकदा

स्पर्शात काय जादू असते
माहित आहे साजना
अलगद माझ्या ओठांना
तू सांभाळ पुन्हा एकदा

कवेत माझ्या रोज बहरतो
आठवणीचा मोगरा
धुंद होऊन मिठीत माझ्या
गंधाळ पुन्हा एकदा

तुझ्या न माझ्या भेटीची
तर गोष्टच होती वेगळी
परतुन यावा मना वाटते
तो काळ पुन्हा एकदा

अजून आहे डोळ्यांमध्ये
रंग प्रितीचा आपुल्या
डोळ्यामध्ये डोळे घालून
न्याहाळपुन्हा एकदा

मनीषा रायजादे पाटील

आमचे असंख्य मित्रपरिवार, हितचिंतक, शेतकरी बांधव व तमाम
नागरिकांना दीपावली व नुतन वर्षानिमित्त हार्दिक शुभेच्छा!

सरपंच

शुभेच्छुक

उपसरपंच

श्री. नामदेव काशीनाथ पवार

सौ. मोनिका हणमंत निकम

ग्रामपंचायत अधिकारी : श्री. शंकर नामदेव मेटकरी

सर्व सदस्य, कर्मचारी वृंद व ग्रामस्थ, ग्रा.पं.वाटंबरे

ग्रामपंचायत वाटंबरे, ता.सांगोला

सर्व ग्रामस्थ, शेतकरी बांधव व तमाम नागरिकांना दीपावली व नुतन
वर्षानिमित्त हार्दिक शुभेच्छा !

सरपंच : सौ. साऊबाई सयाप्पा करे

उपसरपंच : श्री.अंकुश आबासो बिचुकले

ग्रामविकास अधिकारी : श्री.बाबासाहेब यशवंत कोळी

सर्व सदस्य, कर्मचारी वर्ग व ग्रामस्थ

ग्रामपंचायत घेरडी, ता.सांगोला

त्रिखंडात दुमदुमे नाव ऐसे माझे सोलापूर।।

कला, संस्कृती,साहित्य, वैद्यकीय,औद्योगिक,

शैक्षणिक क्षेत्रात जयाचा दिग्विजयी अश्व उधळतो आहे जगभर चौखुर

ऐसे माझे हे सिद्धरामांचे सोलापूर।।

देशाआधी चार दिवस स्वातंत्र्य भोगलेले सोलापूरी

क्रांतीवीरांचा धसका घेऊनी गोरा पळाला कलेक्टरनाईट झाला होता स्टेशनवरभिकारी पालटला भितीने इंग्रजांचा नुर, ऐसे हेदेशप्रेमाने धगधगलेले ऐतिहासिक सोलापूर ।।

देशात फक्त येथेच पुकारले गेलेमार्शल लॉ

बीबीसी लंडन ने जयाचा उल्लेख केला होता शोलापूर ।।

आशिया खंडातील एकमेव जुनी गिरणी, लक्ष्मी विष्णू, नरसिंगगिरजीएकेकाळी ओकत होती सोन्याचा धुर

ऐसे माझे आकर्षणाचा केंद्रबिंदू सोलापूर।।

काय बे, आलास का बेच्या मवाळ(?)भाषेत आपुलकीचा गवसेयेथे सुर

ऐसे माझे सोलापूर।।

जगातील पहिले मल्टीप्लेक्स भागवत थिएटर आणि एकाच ठिकाणी रस्ते सात ,लेंडकीही भर गावातुन येथे वहात

तरी सु(?)वासाने कोण माईचा लाल करतो ना आमच्यावर गुरगुर

ऐसे माझे सोलापूर।।

जुनी झाली असली तरी आम्ही ' नवी ' च म्हणणार पेठ येथे, भावनांना जोडतो म्हणुन ' जोडभावी ' पेठ येथे गोडच आहोत आम्ही म्हणुन थेट वसवली आहे साखरेची पेठ,

अळणी म्हणु नका जावा मीठ गल्ली त हवा असेल तर मुर्गीनाला च आहे आमचेकडे कशाला जाता दुर

माहेरवाशीणींना लागे हुरहुर

ऐसे माझे सोलापूर।।

आता झालेत 'पीएम' आमच्याकडे आधीपासूनच आहेत म्हणलं '' मादीसोन्यामारुती ' ही आमच्याकडे,आसराही देई सर्वांना

ऐसे माझे सोलापूर।।

कुणाकडे असतील कितीभांडी, पण आमच्याकडे थेट

भांडीगल्ली च आहे।।

रोड तुमच्या गावातही असतील पण सांगा किती फुटाचा? तुम्ही म्हणाल येडा

हाय काय ?अहो आमच्याकडं रस्त्यालाच म्हणतात हो विचारा कुणालाबी सत्तर फुट रोड कुठं हाय त्यो म्हणल हाय काय नाय काय मंगळवार बाजारातुन बुधवार बाजारात जा बादशहा पेठतनं त्येलाच विचार तुझी (बेगम नको)पण बेगम पेठ कुठं हाय त्यो सांगल हत्ती बावडी जवळ जाऊन माझ्या दाजीला विचारदाजी पेठ कुठं हाय मग तुम्हीच काय हे बाबा आदम काळातले नाव ऐकुन बो(अ)र होऊन टेप हातात घेऊन रोड सत्तर फुट हुडकत फिरचाल

इसकुच बोलतैं शोलापूर आया क्या दिमागमे हमरा खतरा शोलापूर।।

हो! आमच्याकडे लष्करही आहे घाबरु नका तुम्हीही येऊ शकता तिथं, क्याम्पमध्ये भाग घेऊ शकता येथे विचित्र म्हणाल कांही म्हणाल पण 'थ्रील' आहे, वेगवेगळ्या अशा घेऊ शकता 'फिल'आहे

दाखवा म्हणु नका पण आहेत आमच्याकडेआजही वेशी विजापूर,तुळजापूर बाळी , आणि हां आहे आमच्याकडे काय म्हणणं तुमचं? पाण्याचीही वेस (पाणी वेस)

आम्ही तुम्हाला जा मधल्या मारुतीकडे म्हणलं तरी तुम्ही शोधत जायचं कडेकडेनंच सापडतो मग मधला मारुती कर नाही त्याला डर कशाला म्हणुन आमच्याकडे आहे बेडरपुल घाबरु नका पोटफाडी आली तरी, उभा नळ आला तर त्याला थेट आडवा नळ करतोय म्हणलं आम्ही जुनी होत नसते आमची नवी वेस रुपाभवानी कडं चल! तर हो आमचा रिक्षावाला थेट देवीच्या दारात उभा करतो घ्या परीक्षा एकदा

माणसालाच कशाला आमच्या गावालाही झालंय जुळं.

काय म्हणण तुमचं? आम्ही

लाडाने म्हणतो आमच्या लहान भावास

जुळे सोलापूर ।।

नाद करायचा नाही आमचा कारण

' माय कुणाची व्याली गगनाखाली ऐसी कविता सोलापूरी ' ...म्हणुन महाकवी रामजोशी यांनी आधीच ठणकावलं आहे त्या महान विभुतींच हे सोलापूर।।

भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या पदस्पर्शाने पुनित आमचं सोलापूर।।

किती गाऊ मी किर्ती या मातीची भरुनिया येतो ऊर

ऐसे माझे सोलापूर।।

दक्षिणभारताची सीमा कर्नाटक विजापूर,भीमा नदी, टाकळी शेवटचे गाव, मराठवाडयाचे प्रवेशद्वार भवानीचे तुळजापूर तुम्ही आहात कुठे राव ?

विचारे सोलापूर।।

तेलगू, कन्नड, सह सर्व भाषांची, बांधवांची मांदियाळी जणु राष्ट्रीय एकात्मतेचे ऐसे माझे मिनी इंडियाशोभतसे सोलापूर।।

देशातील सर्वात स्वच्छ रेल्वेस्थानक म्हणुन पुरस्कार सतत मिळवणारे सोलापूर।।

तुळजाभवानी, पंढरीचा पांडुरंग, श्री स्वामी समर्थ

बार्शीचे भगवंतांनी चौफेर धरलाय जया गावा फेर ते अध्यात्मिक सोलापूर।।

कंबरे च्या अवयवांची आठवण देणारे खोली (अ) चुक सांगणारे तळे येथे

विचित्र वाटे कोणा गड्डा येवो म्हणल्यास ती यात्रा जेथे भरे ते सोलापूर।।

गावाच्या भरमध्यभागी पाणीचपाणी तलाव चोहोबाजूंनी वसलाय देखणामाझा गाव ,म्हणती तयास सिद्धरामांचे सोलापूर ।।

DAKSHATA MULTISPECIALITY HOSPITAL

दक्षता मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल, सांगोला.

आपल्या आरोग्याची दिवाळी नेहमीच आनंदी राहो, आपले हृदय मजबूत राहो, शरीर निरोगी राहो, आणि जीवन प्रकाशमय व समाधानपूर्ण राहो!

दक्षता हॉस्पिटलकडून
सर्वांना दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा!

शुभ दीपावली

उच्च दर्जाच्या वैद्यकीय सुविधा आता सांगोल्यात!

केशरी, पिवळे आणि आता शुभ्र (पांढऱ्या) रेशनकार्डधारकांनाही मिळणार
महात्मा ज्योतीराव फुले जनआरोग्य आणि प्रधानमंत्री जनआरोग्य योजनेचा मोफत लाभ.

उपलब्ध सुविधा
60 बेडचे सुसज्ज हॉस्पिटल। १५ आयसीयू बेड व सुसज्ज ऑपरेशन थिएटर
सेंट्रल ऑक्सिजन व दुर्बिणीद्वारे शस्त्रक्रिया। २४ तास मेडिकल, लॅब व ॲम्बुलन्स सेवा

अस्थिरोग विभाग
- अस्थिरोग निदान व उपचार.
- सर्व प्रकारच्या फॅक्चर केसेस व उपचार.
- संधिवात उपचार.
- सर्व ॲक्सिडेंट केसेस निदान व उपचार.

सर्जरी व गॅस्ट्रोइंटेरॉलॉजी विभाग
- अल्सर व पोटाचे विकार उपचार
- अन्ननलिका व आतड्यांचे आजार उपचार
- पित्ताशयाचे आजार व शस्त्रक्रिया
- पचनसंस्थेवरील तज्ञ उपचार

डायलिसिस विभाग
- आधुनिक हेमोडायलिसिस मशीनसह उपचार
- अनुभवी नेफ्रॉलॉजिस्ट व प्रशिक्षित स्टाफ
- २४ तास रुग्ण देखभाल व आपत्कालीन सेवा
- सुरक्षित आणि आरोग्यदायी वातावरण

मेडीसीन विभाग
- दमा, मधुमेह व विषबाधा उपचार
- सर्पदंश, हृदयरोग व मेंदूविकार उपचार
- अर्धांगवायू व थायरॉईड उपचार
- न्युमोनिया व इतर आजारांवर उपचार

मूत्ररोग विभाग
- मुत्रविकार व मुतखड्यांचे निदान व उपचार
- प्रोस्टेट ग्रंथी सूज व किडनी आजारांवर उपचार
- किडनी व मूत्रवाहिनीतील खड्यांवर शस्त्रक्रिया
- अत्याधुनिक तंत्रज्ञानाद्वारे सुरक्षित उपचार.

बालरोग विभाग
- कमी दिवसाचे बाळ, कावीळ झाली असल्यास.
- बाळाला सतत झटके येत असल्यास.
- न्युमोनिया, लहान बाळाच्या ऑपरेशनची सोय.
- जन्मा नंतर बाळ रडत असल्यास.

ॲंजिओग्राफी ॲंजिओप्लास्टी
- हृदयातील रक्तवाहिन्यांचा अडथळा शोधणे
- रक्तवाहिन्या फुगवून स्टेंट बसवणे
- हृदयाला रक्तपुरवठा पुनर्स्थापित करणे
- हृदयविकाराचा धोका कमी करणे

हृदयरोग विभाग व कॅथ लॅब
- हृदयविकार तपासणी
- ईसीजी, 2D इको
- स्ट्रेस टेस्ट
- तज्ञ कार्डिओलॉजिस्ट सल्ला

दक्षता मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल, जयभवानी चौक, सांगोला. I फोन : 02187-221188, मो : 9503853420

आमच्या सर्व ग्राहकांना व मित्रपरिवारास दिवाळीनिमित्त हार्दिक शुभेच्छा.!

SS टुर्स & ट्रॅव्हल्स

डेली सर्व्हिस
सांगोला-पुणे-सांगोला

सांगोलकरांसाठी पुणे जाण्याकरिता दिवसातून 3 वेळा AC BUS सर्विसेस

सांगोला-पुणे		पुणे-सांगोला		
बस क्र:१	सांगोला मधून सकाळी ५:४५	बस क्र:१	निगडी स.५:४५	स्वारगेट स.७:००
बस क्र:२	सांगोला मधून दुपारी २:४५	बस क्र:२	निगडी दु.२:४५	स्वारगेट दु.३:४५
बस क्र:३	सांगोला मधून रात्री ९:४५	बस क्र:३	निगडी रा.९:४५	स्वारगेट रा.११:००

बुकिंग संपर्क **8100401401 / 9503260027**
7038111190 / 7038111191

असतात सगळीकडे किल्ले उंच डोंगरकडीकपारी,

येथे स्वागता तुमच्या थेट भुईवर आलायभुईकोट सोलापूर।।

ब्रिटिश काळात विमान, जहाजे ,मोटार, साखर कारखाने भारतभरात सुरु केलेलेशेठ वालचंद हिराचंदगाव सांगत आपले सोलापूर।।

लोकमान्य टिळकांना सार्वजनिक गणेशोत्सवाची कल्पना सुचवलेले सोलापूर।।

उघडयानागड्या माणसावर मायेचीउबदार चादर पांघरूण घालणारंकनवाळुसोलापूर।।

गवसती या नगरीतच मानवी जीवनाचे सप्तसुर

ऐसे माझे सोलापूर।।

विज्ञान, अध्यात्म, वीरश्रीचा वाहे येथेच हो महापूर

ऐसे माझे सोलापूर।।

नसतील माझ्या गावात उंच डोंगर, खळखळणार्या नदयापण आहेत डोंगराएवढी मनाची,नदी सारखी हळुवार झुळझुळ वहाणारी माणसं शमवतात ती प्रेमाने भेदांच काहुर

ऐसे माझे सोलापूर।।

हिणवु नका जी! आम्हास मोठे खेडे, दुष्काळी म्हणुन

लोटु नका जी! दुर

त्यागाचे दुसरे नाव जी! माझे सोलापूर।।

स्वागत करण्या आपुले सृजनहो ! तेवविला ' कवी देवेंद्र 'ने अंतरीचा कापुर ।।

त्रिखंडात दुमदुमे नाव ऐसे माझे सोलापूर।।

कवीवर्य–देवेंद्र औटी
(अ. भा. मराठी साहित्य परिषद पुणे, मृत्युंजयकार शिवाजीराव सावंत जीवन गौरव पुरस्कार) सोलापूर
९८८१४८२९२४

आमचे असंख्य हितचिंतक, ग्रामस्थ, शेतकरी बांधव व तमाम नागरिकांना दीपावली निमित्त हार्दिक शुभेच्छा!

शुभेच्छुक

ग्रामपंचायत महुद बु॥, ता.सांगोला

● सरपंच : सौ. संजीवनी कल्याण लुबाळ

● उपसरपंच : भिमराव नामदेव ढाळे

● ग्रामपंचायत अधिकारी : श्री.बाळासाहेब गंगाधर शिंदे

सर्व सदस्य, कर्मचारी वर्ग व ग्रामस्थ

ग्रामपंचायत महुद बु॥, ता.सांगोला

आमच्या असंख्य मित्र परिवार, हितचिंतक व तमाम नागरिकांना दिपावली व नुतन वर्षाच्या आभाळभर शुभेच्छा..!

शुभ दीपावली

श्री.संजिवनी क्लिनीक

डॉ.विवेकानंद ज.विभुते
BAMS
R.NO -I-36547 A-1

महात्मा फुले चौक, सांगोला
वेळ :– स ९. ते १२.३० व
दु. १.३० ते रात्री ८ पर्यंत

विभुते परिवार, सांगोला जि.सोलापूर

अरविंद इलेट्रॉनिक्स्
प्रोप्राः गोपाल चोथे
Mo: 9420359494
समर्थ शॉपींग सेंटर, मिरज रोड, सांगोला

कुलदिप इलेट्रॉनिक्स्
प्रोप्राः दिपक चोथे
Mo: 9822359875
छ.शिवाजी चौक सांगोला जि. सोलापूर

कुलदिप इलेट्रॉनिक्स्
प्रोप्राः दिपक चोथे
Mo: 9822359875
छ.शिवाजी चौक सांगोला जि. सोलापूर

अरविंद इलेट्रॉनिक्स्
प्रोप्राः गोपाल चोथे
Mo: 9420359494
समर्थ शॉपींग सेंटर, मिरज रोड, सांगोला

ओहोटी

खूप वाटते तुझ्याशी
भरभरून बोलावे दुरुनच
तरीही आड येते समाज
व्यवस्था
गोरगरीबधनवान
सान थोरांच्या भिंती
तू वैचारिक तुला
बोलायचं असतं
आपल्या बद्दल
तू बंदिस्त साखळदंडाने
मान मर्यादांच्या चौकटीत
त्यांना जपायची असती
पोकळ घराणेशाहीचा
मोठेपणा
मी असा भरतीचा समुद्र
आणि
तू मौन धारण केलेला
किनारा
मी किनाऱ्यावर आदळून
सोलून घेतो स्वत:ला
तरी तू स्थिरप्रज्ञ, अबोल
जेव्हा माझी ओहोटी सुरू
होईल
मी मागे मागे जाईन
...एकटा एकटा
माझ्या काळीज कप्प्यात
आणि
ओल्या वाळूमध्ये
तुझेच नाव ठळक दिसेल
आणि
मी खोल समुद्राच्या
तळाशी
धूसर धूसर ....!

मारुती कटकधोंड
संवाद९८८११२४४५०

बारमाही वाहणे

असे कोणते दु:ख पीडा
वेदना
पावसाला दाटून आले
असेल
जो दिन रात्र नभाच्या
डोळ्यातून बरसतोय जोमाने
काय सांगायचे आहे त्याला
दु:खद घटना कीप्रेयसीचा
विरह
काय समजावे त्याचे दु:ख
विरह
हताश होऊन
मीही रिते करतोय भरलेले
डोळे
ज्यांच्या झोपडीत गुडघाभर
पाणी
ज्यांनी कष्टाने जमवलेला
संसार
डोळ्या देखत
पाण्यावर तरंगत गेला
राड चिखलाने ज्यांचे घर
भरले
ते कसे झुंजतील
रिकाम्या पोटी कसे उभे
करतील
आपला संसार
पाणी भरलेल्या चुलीला
पुन्हा कशी ऊब देतील
माझी खारीची मदत
त्यांना कशी देईल पुन्हा
उभारी
मी डबडबलेल्या डोळ्यांनी
पाहत असतो त्याचं जगणं
पावसाचं काय तो ऋतू
संपल्यावर
निघून जाईल पुन्हा ना त्याचे
नाव
ना त्याचा ठिकाणा
पण मी वाहतच असतो
सतत डबडबत्या डोळ्यांनी
बारमाही पाऊस असो वा
नसो

मारुती कटकधोंड
संवाद.९८८११२४४५०

वृत्त..प्रियलोचना

आज अचानक पुढे ठाकला शाळेमधला मुलगा ढ
मोठ्ठी गाडी तिच्यात बसला शाळेमधला मुलगा ढ

काठावरती पास कधी तर नापासच तो होतसे
शाळेमध्ये नाही टिकला शाळेमधला मुलगा ढ

उंची कपडे अमीर झाला नोकरचाकर दिमतीस
काय बरे तो असेल शिकला शाळेमधला मुलगा ढ

शाळेमध्ये पहिला नंबर परंतु हरलो जगण्यात
मला पाहुनी उदास हसला शाळेमधला मुलगा ढ

व्यासपीठ हे गाजवतो तोगर्दीमधलेमी टिंब
नशिबाने का वरती चढला शाळेमधला मुलगा ढ

उर्मिला बांदिवडेकर

झुकणे ना अपकीर्ती

पडलेले पायतळीजे
असते काही मोलाचे
ना झुकता येत न हाती
ते झुकणे ना अपमानाचे
पैसाच कुणी जो ठेवी
पायावर तुमच्या माथा
त्या झुकून दोन्ही हाती
उचलून हृदयी लावावा
हे झुकणे ना अपकीर्ती
सौंदर्य तुम्हा हृदयीचे
जो बघेल त्या भावेल
हे दर्शन सद्भावाचे

चंद्रशेखर पटवर्धन (पुणे)

आमचे असंख्य हितचिंतक, मित्रपरिवार व तमाम नागरिकांना
दीपावली व नुतन वर्षानिमित्त हार्दिक शुभेच्छा !

शुभेच्छुक

मा.डॉ.श्री. सुधीर हरीभाऊ गवळी

प्रशासक/मुख्याधिकारी, सांगोला नगरपरिषद सांगोला
सर्व अधिकारी व कर्मचारी वर्ग

सांगोला नगरपरिषद, सांगोला, जि.सोलापूर

आमचे असंख्य हितचिंतक, मित्रपरिवार व तमाम नागरिकांना
दीपावली व नुतन वर्षानिमित्त हार्दिक शुभेच्छा !

शुभेच्छुक

श्री. औदुंबर सखाराम बडवे (9405372675)
श्री. अमित औदुंबर बडवे (9423318621)
श्री. अजित औदुंबर बडवे (9505372674)
महाद्वारनजीक, मु.पो. शिखर शिंगणापूर, ता.माण, जि.सातारा

बडवे परिवार, शिखर शिंगणापूर, ता.माण,जि.सातारा

दीपावलीनिमित्त लक्ष लक्ष शुभेच्छा!

श्री.मनोज पांडुरंग भोसले

शुभेच्छुक

श्री. मनोज पांडुरंग भोसले

स्टॅम्प व्हेंडर (मोबा. ९२२६१७४०२३)
आमच्याकडे स्टॅम्प, तिकिटे मिळतील तसेच खरेदीखत, गहाणखत, साठेखत, बक्षीसपत्र, वाटणीपत्र, हक्कसोडपत्र, दत्तकपत्र, मृत्यूपत्र, बँक मॉर्गेज, गहाणमुक्ती दस्त आदी कामे करुन मिळतील.

सहायक रायटर : संकेत बोत्रे (७२७६६४८७८९)

सांगोला तहसील कचेरीसमोर, पहिला मजला,
सांगोला, ता. सांगोला, जि. सोलापूर

स्त्री शक्तीचा जागर

प्रत्येकाने स्त्रीशक्तीचा जागर करुया घरोघरी
सन्मानाने तिला जगू द्या दुर्गादेवी तीच खरी
जन्म देतसे ती माऊली सहन वेदना करूनिया
धन्य होतसे घरदाराचे सौख्य सोहळे पाहुनिया

माय जिजाऊ,सावित्रीचे कार्य आठवा क्षणोक्षणी
तयांसारख्या वीर धुरंधर स्त्रिया पुजूया मनोमनी
अबला नारी सबला झाली सावित्रीच्या यत्नाने
अन्यायाला फोडत वाचा झगडत होती ध्येयाने

कुणी जाहली ज्ञानदायिनी कुणी जाहली विरांगना
कुटुंब म्हणुनी संसाराला आधाराचा तीच कणा
परिवाराची घेत काळजी प्रगती केली नारीने
वक्तृत्वाने छाप पाडते मधाळ अपुल्या वाणीने

इतिहासाच्या पानावरती नाव रेखले नारीचे
पराक्रमाने रक्त सांडले नाव जाहले झाशीचे
कर्तृत्वाने अन् शौर्याने संकटावरी मात करी
स्त्री शक्तीच्या अस्तित्वाची सदैव ठेवू जाण उरी

धैर्याने अन् कौशल्याने झेप घेतली आकाशी
सहनशीलता असते भारी नकोच तुलना नारीशी
नृत्य असो की गायन वादन आहे नारी खेळाडू
दुर्गा होते नारी तेव्हा तिला कुणीहीनका भिडू

सर्वच क्षेत्री प्रगती करुनी ठसा उमटला नारीचा
महिषालाही ठार मारण्या वापर केला शक्तीचा
सारी क्षेत्रे व्यापत गेली पडली नाही कुठे कमी
रक्षणास मी तुझ्याच पाठी द्या सा–यांनी तिला हमी

सौ.दिप्ती दिलीप यादव
ता.खेड जि.रत्नागिरी

॥ शुभ दीपावली ॥
आमचे असंख्य हितचिंतक, ग्राहक, मित्रपरिवार, व्यापारी बांधव,
व तमाम नागरीकांना दीपावली व नूतन वर्षानिमित्त हार्दिक शुभेच्छा!

शुभेच्छुक

गणेश एन्टरप्राझेस

आमचेकडे नामवंत कंपनीचे खते, बि-बियाणे व किटकनाशके मिळतील.

नगरपालिका शॉपिंग सेंटर, आ.क्र.५९, गाळा नं.९, आठवडा बाजार मंडई समोर, सांगोला

प्रोप्रा. तमन्ना बंडगर (मो.९८८१०९७३५३)
योगेश कुलकर्णी (मो.९८५०७८५१६८)
मधुकर सुरवसे (मो.९८२२१४८८५५)

आमच्या सर्व ग्राहकांना व मित्रपरिवारास दिवाळीनिमित्त हार्दिक शुभेच्छा.!

अल्पावधीत ग्राहकांच्या पसंदीस पात्र ठरलेले

ए.बी.ज् फुड कॉर्नर

उत्कृष्ट व चवदार नाष्टा सेंटर

कचेरी रोड, भोसले हॉस्पिटल शेजारी, सांगोला

अभिजीत शिवाजी बनकर
अविनाश शिवाजी बनकर
अमर शिवाजी बनकर
मो. 9921498282,
9922998124

बँकेचे सर्व ग्राहक, खातेदार, ठेवीदार, हितचिंतक व सभासदांना दीपावलीनिमित्त हार्दिक शुभेच्छा !

ठेवींवर आकर्षक व्याजदर

१ ते ९० दिवस - ७%
१ ते १७९ दिवस - ७.५%
१ ते २६९ दिवस - ९%
१ ते ३६४ दिवस - ९.५%
१ ते १०९५ दिवस - ११%

सर्वांना आर्थिक सहाय्य शेतकऱ्यांपासून व्यावसायिकापर्यंत

विविध कर्ज योजना

सोने तारण कर्ज योजना
वैयक्तिक कर्ज योजना
व्यावसायिक कर्ज योजना
स्थावर कर्ज योजना
वाहन कर्ज योजना

व्यावसायिकांसाठी
पिग्मी ठेवींवर त्वरीत कर्ज योजना

बँकेची वैशिष्ट्ये
- महाराष्ट्र शासनमान्य
- सर्व प्रकारचे बँकींग व्यवहार
- सहज व सुलभ कर्ज पुरवठा
- सर्व संगणकीकृत शाखा
- पारदर्शक व्यवहार
- शिक्षित व प्रशिक्षित कर्मचारी वर्ग
- विनम्र व तत्पर सेवा
- NEFT व SMS सुविधा उपलब्ध

मा. श्री. दादासाहेब माने
(चेअरमन)

• संचालक मंडळ •
डॉ. अभिजीत सोनलकर (व्हा. चेअरमन)
डॉ. गणेश गुरव (संचालक)
श्री. प्रसाद कुलकर्णी (संचालक)
श्री. राहुल देवकर (संचालक)

इंद्रदत्त अर्बन को-ऑपरेटिव्ह
क्रेडिट सोसायटी लिमिटेड, सांगोला

पत्ता : भोपळे रोड, रत्नपारखी ज्वेलर्स शेजारी, सांगोला. | M : 9637050516

आपल्या सेवेसाठी इंद्रदत्त अर्बन सदैव तत्पर

आमच्या सर्व ग्राहकांना व मित्रपरिवारास
दिवाळीनिमित्त तसेच नूतन वर्षाच्या
हार्दिक शुभेच्छा.!

पांडुरंग

स्टील अ‍ॅण्ड ट्रेडर्स



आमच्याकडे बांधकामासाठी लागणारे
सर्व मटेरियल योग्य दरात मिळेल

कल्पेश येलपले
9697991017

भालुकाका येलपले
9067111017/9697971017

मिरज रोड, गायत्री मार्टच्या शेजारी, सांगोला, ता.सांगोला, जि.सोलापूर

सहकारी अर्थव्यवस्था

भारत देशात सहकाराचे पर्व सुरु होऊन दीडशे वर्षे पूर्ण झाली. १९०४ मध्ये ब्रिटिशांच्या काळात सहकारी तत्त्वप्रणाली आणि त्यासाठी आवश्यक नियमावली तयार करण्यात आली. त्याकाळी ग्रामीण भागात खासगी सावकारांकडून शेतकऱ्यांची पिळवणूक होत असे. त्यांच्याकडून होत असलेल्या छळापासून सर्वसामान्य शेतकऱ्यांची मुक्तता करण्यासाठी या कायद्याची गरज तत्कालीन सरकारला वाटली. गरीब शेतकऱ्याला कर्जासाठी सावकाराकडे जावे लागू नये, त्याला आवश्यक असलेला पतपुरवठा कसा करता येईल याचा विचार पहिल्यांदा केला गेला. १९१२ मध्ये या कायद्यात आणखी काही सुधारणा करण्यात आल्या. कायद्याची व्याप्ती वाढवण्यात आली. ग्रामीण तसेच शहरी भागासाठी सहकाराचा वापर करून सहकारी अर्थप्रणाली विकसित कशी करता येईल याचा विचार केला गेला. या कायद्यानुसार विविध प्रकारच्या संस्था उदा. साखर कारखाने, कापसावर प्रक्रिया करणाऱ्या स्पिनिंग मिल, गृहनिर्माण संस्था, गाव पातळीवरील विविध कार्यकारी सोसायट्या, जिल्हा बँका, राज्य सहकारी बँका, पाणी पुरवठा संस्था, औद्योगिक संस्था, ग्राहक सहकारी संस्था, सहकाराची व्याप्ती ही चौफेर झाली. यामुळे सहकारी अर्थप्रणाली अधिक सक्षम झाली.

सहकारी अर्थप्रणाली ही एक अशी प्रणाली आहे जिथे व्यक्ती समान आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक किंवा इतर गरजा पूर्ण करण्यासाठी स्वेच्छेने एकत्र येतात. नफ्यापेक्षा सामाजिक, आर्थिक स्तर उंचावण्याला महत्त्व आहे. सदस्यांच्या आर्थिक सहभागातून सहकारी संस्था चालते. आंतरराष्ट्रीय सहकार परिषदेने २०२५ हे वर्ष सहकारी आर्थिक वर्ष साजरे करत असताना सहकारी संस्थेची मुख्य तत्त्वे कोणती आहेत याची माहिती आपल्याला या लेखाच्या माध्यमातून करुन देत आहे. १) ऐच्छिक व खुले सभासदत्व, २) लोकशाही नियंत्रण, ३) सदस्यांचा आर्थिक सहभाग, ४) स्वायत्तता आणि स्वातंत्र्य, ५) सामूहिक उद्दिष्टे, या मुद्द्यांचा विचार केला पाहिजे.

सहकारी अर्थव्यवस्थेमध्ये सामूहिक हिताचा विचार केला जातो. लोकशाही आणि समानतेला महत्त्व दिले जाते. सहकारी अर्थव्यवस्थेमध्ये सामूहिक फायदे आणि तोटे असतात. यामध्ये भांडवलाची पूर्तता समूहाकडून होते. उद्देश समान असल्याने आर्थिक काटकसर होते. नफा वाटणीमुळे संस्थेचे हित सांभाळले जाते.

जागतिक सहकारी चळवळ ही १८५४ मध्ये रोकडेल पायोनियर्स यांच्यापासून सुरुवात झाली असे मानण्यात येते. इंग्लंडमध्ये ही चळवळ सुरू झाली.१८९५ मध्ये लंडन येथे आंतरराष्ट्रीय सहकारी संघटनेची स्थापना झाली. जगातील सर्व सहकारी संस्थांना ही तत्त्वेचे लागू होतात. भारतात ही चळवळ सर्वसमावेशक विकास धोरणांचा आधारस्तंभ आहे. कृषी, बँकिंग, प्रोसेसिंग, सहकारी गृहनिर्माण संस्था, पाणीपुरवठा संस्था, मजूर संस्था अशा अनेक प्रकारच्या संस्था भारताच्या सहकारी चळवळीत आपणास दिसून येतात.

त्रिस्तरीय रचना महाराष्ट्र सहकारी कायद्याचे वैशिष्ट्य म्हणजे त्रिस्तरीय रचना. गावपातळीवरील विविध कार्यकारी सोसायट्यांच्या माध्यमातून शेतकऱ्यांना शेतीसाठी अल्पदरात कर्ज पुरवठा केला जातो, जिल्हा पातळीवर जिल्हा मध्यवर्ती बँका तसेच राज्य पातळीवरील सहकारी बँकादेखील कर्जपुरवठा करतात, अशी ही त्रिस्तरीय रचना आहे. या त्रिस्तरीय रचनेमध्ये शासनाच्या नोटीफिकेशननुसार जिल्हा पातळीवर जिल्हा मध्यवर्ती बँक ही फेडरल संस्था आहे. या जिल्हा मध्यवर्ती बँकेमार्फत सहकारी संस्थांचा विकास करणे, अर्थपुरवठा करणे, सहकारी तत्त्वप्रणाली मजबूत करणे, सहकारी अर्थव्यवस्थेला योग्य दिशा देणे ही कामे अपेक्षित आहेत. राज्य सहकारी बँक ही महाराष्ट्र पातळीवरील एकमेव बँक, या बँकेमार्फत राज्यातील सहकारी तत्त्वप्रणाली विकसित करणे, राज्यातील सहकारी अर्थव्यवस्था सक्षम करणे उदा. साखर कारखाने, स्पिनिंग मिल, नागरी सहकारी बँका इत्यादी संस्थांना मदत करणे अशा संस्थांना मदत केली जाते.

महाराष्ट्र राज्यातील त्रिस्तरीय रचना ही एक सहकारी कायद्याचे आगळेवेगळे वैशिष्ट्य आहे. यानुसार प्राथमिक संस्था, जिल्हा



शाश्वत

येऊ दे तुफान
होऊ दे प्रलय
कोसळू दे आकाश
पेटू दे वणवा
वा थरथरू दे धरणी
अखेर पंचमहाभूतेच ती...
पण तुही आहेस
याच पंचतत्वांचा एक अंश
हे लक्षात ठेव
असु दे हातात हात आणि
अंतरीच्या दिव्याची साथ
तू आपला चालत रहा
खंबीरपणे सत्याच्या मार्गावर
न सोडता धर्म आणि ध्येय
संकटं ही असतात अशाश्वत
जशी येतात तशी जातातही
पाहून आपली परीक्षा
शाश्वत असतो तो
सत्याचा विजय
प्रयत्नांती यश आणि
कर्माचे फळ !

आनंद देशमुख,
९१,दंडवतेनगर,
शिरपूर, जि.धुळे,
(९८६०६३०२३०)

पातळीवरील जिल्हा बँक, राज्य पातळीवरील राज्य बँका शेतकऱ्यांना पतपुरवठा करतात. तथापि आज आपण पाहतोय ही त्रिस्तरीय अर्थव्यवस्था कुठेतरी अडचणीत आलेली आहे. या अर्थव्यवस्थेला अडचणीत असलेल्या जिल्हा मध्यवर्ती बँकांमुळे धोका निर्माण झाला आहे. तथापि, यापूर्वीही अनेक कमिट्या सहकाराने नेमल्या होत्या. उदा. गोरवाना कमिटी त्याने असे म्हटले आहे उे-ेशिीरींळेपी ऋऋळश्रशव लीीं उे-जशिीरींळेप ीीीं ीलिलशशव.. म्हणजेच सहकार जरी असले तरी सहकारी अर्थव्यवस्था मजबूत झालीच पाहिजे.

सध्या महाराष्ट्रात ६० प्रकारच्या सव्वा दोन लाख सहकारी संस्था कार्यरत आहेत. विविध सेवा सहकारी संस्था, गृहनिर्माण संस्था, साखर कारखाने, दूध संघ, सूत गिरण्या, नागरी बँका, सेवक पतसंस्था, नागरी व बिगरशेती पतसंस्था, ग्रामीण व शेती पतसंस्था, जिल्हा मध्यवर्ती बँका यामुळे महाराष्ट्राचा ग्रामीण व शहरी भाग समृद्ध झाला आहे. १९८०-९० पर्यंत सहकार सक्षम होता, त्यानंतरच्या काळात सहकाराला घरघर लागली. सहकार चळवळ ज्यांच्या हातात होती त्यातील काही जणांनी गैरवापर केला. अर्थशास्त्रीय दोषामुळे व नैसर्गिक संकटांमुळे या संस्था अडचणीत आल्या. १९९० नंतर जागतिक अर्थव्यवस्था बदलत गेली. मुक्त अर्थव्यवस्थेत स्पर्धा वाढली, जिल्हा बँका, पतसंस्था आर्थिकदृष्ट्या अडचणीत येऊ लागल्या. २००० ते २०१० या कालावधीत ग्रामीण भागाला पतपुरवठा करणाऱ्या संस्थांच मोडकळीस आल्याने राज्यातील शेतकऱ्यांचा आर्थिक कणा मोडला.

चार वर्षांपूर्वी देशपातळीवर आमूलाग्र बदल झाला आहे. सहकार हे स्वतंत्र मंत्रालय निर्माण केले गेले. यंदाचे हे वर्ष आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष साजरे करण्यात येत आहे. देशाचे पहिले सहकारमंत्री म्हणून मा. अमित शहा यांनी याची धुरा सांभाळली. देशपातळीवर सहकाराला मजबूत करणे, ग्रामीण पातळीवरील विविध कार्यकारी सोसायट्या अधिक कार्यक्षम करणे, सहकारी संस्थांचे संगणकीकरण करणे, सहकारी अर्थप्रणालीच्या माध्यमातून देशपातळीवर अधिक व्याप्ती वाढविणे.

देशपातळीवर अमित शहा यांनी २००२ चा मल्टिस्टेट सहकारी कायदा अधिक सक्षम केला असून या कायद्यानुसार ग्राहकांच्या सभासदांच्या सुरक्षेला प्राधान्य देण्यात आले आहे. तसेच या कायद्यानुसार बहुराज्य सहकारी संस्थांना, देशपातळीवर सहकारी संस्थांना अधिक सक्षम करण्याचा प्रयत्न केला गेला.

मध्यंतरी २०००-२०२० या कालावधीमध्ये राज्य पातळीवर, देश पातळीवर अनेक सहकारी संस्था अडचणीत आल्या. यामध्ये विशेषतः नागरी बँका, नागरी सह. पतसंस्था, ग्रामीण भागातील विविध कार्यकारी सोसायट्या, शेतीपूरक संस्था इत्यादी, तथापि देशपातळीवर सहकार मंत्रालय स्थापन झाल्यानंतर गेल्या चार वर्षात अनेक पातळीवर सहकारी संस्था आणि सहकारी अर्थप्रणाली सक्षम करण्याचे प्रयत्न होत आहेत. आता अलीकडे राज्य सहकारी बँकेमार्फत विविध कार्यकारी संस्थांना थेट कर्जपुरवठा करणे तसेच शेतीला कर्ज पुरवठा करण्याचा विचार चालू आहे. यामुळे त्रिस्तरीय रचनेला कुठेतरी धक्का पोहोचणार आहे. सबब त्रिस्तरीय रचना सक्षम करण्याकडे राज्याचा आणि केंद्राचा कल असला पाहिजे

त्रिस्तरीय रचना हे वैशिष्ठ्य टिकले पाहिजे सहकारामध्ये अनेक यशस्वी संस्था असून प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष रोजगाराची निर्मिती होते. ग्रामीण तसेचशहरी भागात अत्यंत मोठ्या प्रमाणात भांडवलशाही अर्थव्यवस्थेला पर्याय म्हणून सहकारी अर्थव्यवस्था विकसित होणे गरजेचे आहे. आज देशात ३२८ जिल्हा मध्यवर्ती बँका, ३४ राज्य पातळीवरील बँका, जवळपास १५४० नागरी सहकारी बँका अत्यंत सक्षमपणे कार्यरत असून यामधील दोष हे व्यक्तिसदृश आहेत. मुळात सहकारी अर्थप्रणाली ही तात्त्विक बैठकीवर आधारित आहे. देशात आणि राज्यात हरितक्रांती आणि धवलक्रांती यामध्ये सहकाराचा मोठा वाटा आहे. ग्रामीण अर्थप्रणालीमध्ये सहकारी संस्थांनी आपला ठसा निर्माण केला आहे.

आज जवळपास २९ ते ३० कोटी लोक सहकारी संस्थेशी निगडित आहेत. देशात जवळपास ८ ते ९ लाख सहकारी संस्था असून एकूण सभासद २९ कोटीच्या जवळपास आहेत, शेतीसाठी पत पुरवठा करणाऱ्या एक लाख ३३५३ संस्था आहेत. डेअरी व्यवस्थेमध्ये एक लाख ४१ हजार ३७१ संस्था, तर मासेमारीमध्ये २५ हजार ५५९ संस्था आहेत. याशिवाय नागरी सहकारी पतसंस्था, गृहनिर्माण संस्था यांचे प्रचंड मोठे जाळे या देशात कार्यरत आहे. यानुसार सहकारी अर्थव्यवस्थेची पाळेमुळे खोलवर रूजलेली आपण पाहतोय.

देशपातळीवरचा विचार केला तर महाराष्ट्र राज्य सहकार चळवळीत अग्रेसर असून राज्यात २.४० लाख सोसासट्या असून जवळपास ८ ते ९ कोटी सभासद संख्या आहे. सहकारी अर्थप्रणाली ही यशस्वी होणे ही काळाची गरज आहे.

आजसुद्धा देशात ग्रामीण भागात, डोंगराळ भागात, जंगलव्याप्त भागात, अनेक किनारपट्टीच्या भागात आर्थिक विकास झालेला नाही. ३० ते ४० टक्के लोक दारिद्रयरेषेखाली असून लोकसंख्या मोठ्या प्रमाणावर आहे. या सगळ्यांसाठी सहकारी अर्थव्यवस्था विकसित होणे महत्वाचे आहे. यामुळे रोजगार निर्मिती, ग्रामीण उद्योगधंदे वाढीस लागतील. देशाच्या एकूण अर्थव्यवस्थेमध्ये सहकाराचा अधिक सहभाग वाढेल. सहकारात अनेक अडचणी असल्या तरी सहकार यशस्वी झाला पाहिजे, यासाठी केंद्र पातळीवरून प्रयत्न चालू आहेत, त्यासाठी केंद्रातील सरकारला तसेच सहकार मंत्री अमित शहा यांना धन्यवाद दिलेच पाहिजेत.

श्रीकांत मोरे, सोलापूर

मोबा. ९६५९२०४४१३

****

बँकेचे सर्व ग्राहक, खातेदार, ठेवीदार, हितचिंतक व सभासदांना दीपावलीनिमित्त हार्दिक शुभेच्छा !
महिला व ज्येष्ठ नागरिकांसाठी 1% ज्यादा व्याजदर
अधिक माहितीसाठी आमच्या शाखेशी संपर्क साधा
कर्जाची झंझट नाही फक्त सोने द्या आणि रक्कम घ्या!
गोल्ड लोन तोळ्याला ₹95,000
•कमीत कमी कागद पत्र
•आकर्षक व्याजदर
• योजना व इतर सेवा-सुविधांच्या माहितीसाठी आमच्याजवळच्या शाखेला भेट द्या.
KMU
कृषीरत्न महिला अर्बन
को ऑप. क्रेडिट सोसायटी लि. सांगोला
बोत्रे कॉम्प्लेक्स, भोपळे रोड, सांगोला
952 773 4550
983 491 8945
संस्थापक. संदीप सुरेश सुरवसे

आमच्या सर्व ग्राहकांना व मित्रपरिवारास दिवाळीनिमित्त हार्दिक शुभेच्छा.!
सर्व शुभकार्यासाठी भव्य व प्रशस्त हॉल...
सदानंद
मल्टीपर्पज हॉल
वैशिष्ट्ये
भव्य हॉल
आकर्षक स्टेज
प्रशस्त जेवण हॉल
राहण्याची उत्तम सोय
पार्किंगची सोय
फुलझाडांनी बहरलेला परिसर
संपर्क-7709214995,8600095276
सदानंद प्लाझाच्या पाठीमागे, मिरज रोड, सांगोला

दिपावली व नूतन वर्ष आपणा सर्वांना सुख, समृध्दी व भरभराटीचे जावो याच सदिच्छा..!
शुभेच्छुक
मा.सचिन मारूती इंगोले
दस्त लेखनीक (बॉण्ड रायटर)
मो.८९९९१७८५००
आमच्याकडे खरेदी खत, बक्षीसपत्र, वाटणीपत्र, हक्कसोडपत्र
दत्तकपत्र, मृत्यूपत्र, बँक मॉरगेज, गहाणखत, मुक्तीदस्त,
इत्यादी दस्तऐवज तयार करून मिळतील.
तहसील कार्यालयासमोर, सांगोला, जि.सोलापूर

ज्ञानदीप लावू जगी

भारतीय संस्कृती ही सण-उत्सव साजरी करणारी संस्कृती आहे. चराचरात व्यापलेले ईश्वरी तत्त्व ज्याचे मूळ सत् (सत्य-ज्ञान), चित् (चैतन्य), आनंद आहे, हीच आपली संस्कृती. आप, तेज, वायू, पृथ्वी, आकाश यांचे पूजन करणाऱ्या ऋषिमुनींनी जगण्यातील एकसुरीपणा घालवण्यासाठी समाजजीवनात सण-उत्सवांची पेरणी केली, त्यांपैकीच हा दिव्यांचा उत्सव, दीपावली. दिव्यांच्या प्रकाशाने अंधार उजळतो. दीपावली हा तेजाचा उत्सव, प्रकाशाचा उत्सव. दिवाळी नात्यातील भावबंध दृढ करते, आनंद वृद्धिंगत करते.

सामान्य जनांचा आनंद त्यांच्या गणगोताशी, त्यांच्या लौकिक आयुष्यात घडणाऱ्या लहानसहान घटना-प्रसंगाशी, बाह्य साधनांशी निगडित असतो, तर संतांचा आनंद त्यांच्या अलौकिक अनुभूतीशी, आत्मज्ञानाशी जोडलेला असतो. संत जगण्याचे मर्म समजून घेत समाज प्रबोधन करतात.

असतो मा सद्गमय । तमसो मा ज्योर्तिगमय ।
मूल्योंमा मृतङ्ङ्गमय ।।
(बृहदारण्यक)

उपनिषदातील ही प्रार्थना म्हणजे पसायदानच आहे. मनुष्याच्या ठायी असलेले असत, तमस, पापबुद्धी, अज्ञान नष्ट होऊन सत, तेजस्विता व अमृतत्त्व प्राप्त होणे ही संतांची दिवाळी आहे. नामदीपाने सर्व वासना हरिरूप झाल्यानंतर संतांचे आयुष्य दैवी गुणांनी उजळते. बहुतेक मानवी दोष अज्ञानातून उत्पन्न होतात. हा दोष नष्ट करण्यासाठी नामदेवमहाराजादी संत तळमळत असतात. या तळमळीतूनच नामदेवमहाराज म्हणतात,

नाचू कीर्तनाचे रंगी ।
ज्ञानदीप लावू जगीं ।।
सर्व सांडुनी माझाई ।
वाचे विठ्ठल रखुमाई ।।

संत श्रुती-स्मृती-पुराणोक्त ज्ञान त्यांच्या वाणीतून काळाला अनुसरून समाजात पोहोचवतात. सामान्यांचा उत्सव हा देहाचा उत्सव असतो आणि संतांचा उत्सव हा आत्मतेजाचा उत्सव असतो, ज्ञानोत्सव

असतो.

म्हणूनच सामान्य लोकांना अभिप्रेत असलेली दिवाळी, उत्सव आणि संतांना अभिप्रेत असणारी दिवाळी, उत्सव वेगळे ठरतात, त्यांचा ते आनंद त्यांच्या गीतातून, काव्यातून व्यक्त करतात. ज्ञानेवर माउली म्हणतात,

मी अविवेकाची काजळी ।
फेडूनि विवेकदीप उजळी ।।
तै योगिया पाहे दिवाळी ।
निरंतर ।।

आपण भक्ती करतो म्हणजे काय करतो? मूर्ती पूजा करतो, आरत्या म्हणतो, मंत्र म्हणतो. साधकाने पूजेचे सगळे उपचार करावेत; पण बुद्धीवरील अविवेकाची काजळी चढू देऊ नये म्हणजेच अज्ञान निपटून काढावे तरच विवेकाचा दीप उजळतो. जेव्हा ज्ञानप्रकाशाने बुद्धी उजळते हीच संतांना अपेक्षित असलेली खरी दिवाळी. जीव-शिव एकतत्त्व आहे.

जीव हाच शिव आहे आणि शिव हाच जीव आहे. हे शैव तत्त्वज्ञान मांडताना निर्गुणाच्या उपासक मुक्ताबाई सांगतात, या साधकाचे एकत्व असे की, प्रकाशातून प्रकाश, तेजातून तेज वेगळे करता येत नाही,

प्रकाशाचे राहणे प्रकाशचि पहाणे ।।
सिद्धसाधक ब्रह्म स्वये जाले ।।
म्हणे मुक्ताबाई जीव-शीव आत्मा ।।
समूळ पुसलिया खुणा मागे यांच्या ।।

मुक्ताबाईना साधकाकडून असाच प्रकाशाचा उत्सव अपेक्षित आहे. नामदेवमहाराज, जनाबाई यांना श्रीविठ्ठलाचा कायमचा सहवास होता. श्रीविठ्ठल जनाबाईंचा सखा, दळणकांडण, सडासावण, धुणीभांडी या त्यांच्या सगळ्या कामात त्यांना हातभार लावत असे. जनाबाई नामदेवमहाराजांच्या शिष्या असल्याने नामदेवमहाराजांच्या जीवनातील अनेक नाट्यमय प्रसंग जनाबाईंनी अनुभवले, त्यापैकीच एक दिवाळीचा प्रसंग. नामदेवमहाराजांचा परिवार दिवाळीच्या दिवशी साक्षात श्रीविठ्ठलाला अंघोळीसाठी त्यांच्या घरी आणतात. सर्वजण श्रीविठ्ठलाला न्हाऊमाखू घालतात असा हा भावविभोर प्रसंग जनाबाईंनी सादर केला आहे,

सण दिवाळीचा आला ।
नामा देऊळासी गेला ।।
हातीं धरूनी देवासी ।
चला आमुच्या घरासी ।।
देव घरासी आणिले ।
चंदनपाटी बसविले ।।
गोणाईने उटणें केलें ।
दामाशेटीने न्हाणिले ।।
पदर काढिला माथ्याचा ।
बाळ पुशिला नंदाचा ।।
हाती घेऊनी पंचारती ।
चक्रपाणि ओवाळिती ।।
देव जेवुनि तृप्त जाले ।
दासी जनीने विडे दिले ।।

श्रीविठ्ठलाबरोबर दिवाळी साजरी करणाऱ्या, रात्रंदिवस त्याच्या सहवासात असणाऱ्या

बँकेचे सर्व ग्राहक, खातेदार, ठेवीदार, हितचिंतक व सभासदांना दीपावलीनिमित्त हार्दिक शुभेच्छा !
अर्थाबरोबरच माणुसकीचा ओलावा जपणारी सर्वसामान्यांची जिव्हाळ्याचा बंक

दि विटा मर्चंटस् को-ऑप. बँक लि., विटा (जि. सांगली)

प्रधान कार्यालय : यशवंतनगर, साळशिंगे रोड, विटा (सांगली) फोन नं. (०२३४७) २७३३१३, २७३३१४, ७५८८५६४७१९

व्यवसाय कर्ज १२.५०% व्याजाने कर्ज उपलब्ध

घरकुल कर्ज १०% व्याजदर
मासिक समान हप्ता कर्ज योजना (EMI)

घरकुल घरतारण योजने अंतर्गत ई-मॅन्डेड पेमेंट सर्व्हिसनुसार कर्ज घेतलेस व्याजदर ९% राहील.

ठेवीवरील व्याजदर	
१ ते २ वर्ष	७.५०%
२ ते ३ वर्षे	८%
३ वर्षाचे पुढे	७.५०%

ज्येष्ठ नागरिकांना ०.५०% जादा व्याजदर

२ व ४ चाकी नविन वैयक्तीक वापराचे वाहन खरेदी कर्ज १०% व्याजदर

सोने गहाण कर्ज (तात्काळ) १०% व्याजदर
* प्रति १० ग्रॅम चोख सोने जिन्नसाचे तारणावर रूपये ८०,०००/- पर्यंत कर्ज मर्यादा उपलब्ध

* नियम व अटी सर्व योजनांना लागू

* FSWM (आर्थिकदृष्ट्या सक्षम उत्कृष्ट व्यवस्थापन) साठीचे RBI चे निकषांची पूर्तता. * कोअर बँकिंग प्रणालीद्वारे सेवा
* लॉकर सुविधा उपलब्ध RTGS/NEFT सेवा उपलब्ध * CRAR - १७.४५% भागभांडवल- १२ कोटींचे पुढे
* Net Worth (नक्त मुल्य) १५ कोटींचे पुढे Net NPA २.२२% * ठेवी - १८२ कोटींचे पुढे कर्जे ११० कोटींचे पुढे

५ लाखापर्यंतच्या ठेवींना विमा संरक्षण

विनोद चिंतामणी गुळवणी	उत्तम दत्तात्रय चोथे	वैभव भिकन म्हेत्रे	प्रविण बाबुराव बाबर
चेअरमन	व्हा.चेअरमन	अध्यक्ष	प्र.मुख्य कार्यकारी अधिकारी

सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, रत्नागिरी, सिंधुदूर्ग, पुणे, मुंबई या ८ जिल्ह्यात २२ शाखांव्दारे कार्यरत

आपल्या आरोग्याची दिवाळी नेहमीच आनंदी राहो, आपले हृदय मजबूत राहो, शरीर निरोगी राहो, आणि जीवन प्रकाशमय व समाधानपूर्ण राहो!

सिद डायग्नोस्टिक सेंटर

डॉ.संजय सिद
M.B.B.S. DMRE
Cunsultant Radiologist

श्री गुरूनंदन बिल्डींग, कडलास नाका, सांगोला
जि.सोलापूर मो. 8007960909
8788636324
drsnsid2005@gmail.com

sdc

सिद डेंटल क्लिनीक

डॉ.कल्पना सिद
BDS. GDC (Mumbai)
Dentist Surgeon

श्री गुरूनंदन बिल्डींग, कडलास नाका, सांगोला
जि.सोलापूर मो. 8007960909
8788636324
drsnsid2005@gmail.com

sdc

जनाबाई तरीही म्हणतात,
येती साधुसंत घरा ।
तोची दिवाळी दसरा ।।

यावरून सहज लक्षात येते की, जगाचे कल्याण, जगाला शहाणे करणे हेच कार्य तळमळीने हाती घेतलेल्या या संतसहवासाने, संतसंगतीने आपले आयुष्य उजळते, आपण अंतर्बाह्य बदलत असतो. जनाबाईचे जीवन संतसंगतीने उजळले, त्याची महती त्या गातात,

संतांचा तो संग नव्हे भलतैसा ।
पालटावी दशा तात्काळिक ।।
चंदनाचे संगें पालटती झाडें ।
दुर्बळ *** लांकडे देवामाथां ।।
हैं कां ऐसें व्हावे संगती स्वभावें ।
आणिके न पालटावे देहलागी ।।
तँसा निःसंगाचा संग अग्रगणी ।
जनी ध्याय मर्नी ज्ञानेश्वरा ।।

सतत चिंतन, मनन करणे हा सुखानंद म्हणजे दिवाळी. ईश्वरी साक्षात्कारानंतर चराचरात भरून उरलेल्या चैतन्य प्रकाशाचे आपणही एक अविभाज्य घटक आहोत याची जाणीव झाल्यानंतर हृदयात दिव्यत्वाची ज्योत पेटते त्याक्षणी ती अवस्था स्वसंवेद्य असते.

स्वसंवेद्य म्हणजे स्वयंप्रकाशी, स्वतःला जाणण्यात योग्य असणारा. ही स्वसंवेद्य अवस्था म्हणजेच परमार्थातील दिवाळी, या क्षणासाठी तुकाराम महाराज म्हणतात,

आनंदाचे डोही आनंद तरंग ।
आनंदचि अंग आनंदाचे ।।
काय सांगों झाले काहींचिया बाई ।
पुढें चाली नाहीं आवडीने ।।
गर्भाचे आवडी मातेचा डोहाळा ।
तेथींचा जिव्हाळा तेथें बिंबे ।।
तुका म्हणे तैसा ओतलासे ठसा ।
अनुभव सरिसा मुखा आला ।।

मी कोण? याचा शोध संपणे म्हणजेच परमार्थातील अत्युच्च अवस्था प्राप्त होणे. ही अवस्था प्राप्त झालेल्या सोयराबाई म्हणतात,

अवघा रंग एक झाला ।
रंगी रंगला श्रीरंग ।।
मी तूं पण गेले वायां ।
पांहतां पंढरीच्या राया ।।
नाही भेदाचे तें काम ।
पळोनी गेले क्रोध काम ।।
देहीं असुनी तू विदेही ।
सदा समाधिस्थ पाहीं ।।
पाहते पाहणे गेले दुरी ।
म्हणे चोख्याची महारी ।।

परमार्थमार्गात भौतिक सुखे आपल्याला चकवतातही आणि चुकवतातही; पण ज्ञान मिळविण्याच्या लालसेने जाणिवेचा स्तर उंचावत जातो. मीतूंपणाची सीमा ओलांडून साधक निस्सीम होतो.

संत त्यांचे ज्ञान आणि त्यांची स्वधर्मावरील निष्ठा समाजापुढे आदर्श ठेवतात. ज्ञान, विवेक, संत सहवास अशा विविध तत्त्वांनी साजरी होणारी दिवाळी संतांची दिवाळी होय.

डॉ. वैशाली मोहिते
मोबा. ८१४९१२८४३५

शुभदीपावली
शुभेच्छुक
सर्व ग्रामस्थ, शेतकरी बांधव व तमाम नागरिकांना दीपावली व नुतन वर्षानिमित्त हार्दिक शुभेच्छा !

ग्रामपंचायत संगेवाडी, ता.सांगोला

सरपंच : श्री. समाधान सोबा होवाळ
उपसरपंच : सौ. दिपाली नागनाथ नष्टे
ग्रामपंचायत अधिकारी : सौ.समिक्षा बाहुबली हेमगिरे

सर्व सदस्य, ग्रामस्थ व कर्मचारी वर्ग, ग्रामपंचायत संगेवाडी, ता.सांगोला

सर्व ग्रामस्थ, हितचिंतक, मित्रपरिवार व तमाम नागरिकांना
दीपावली व नुतन वर्षानिमित्त हार्दिक शुभेच्छा !

शुभदिपावली

शुभेच्छुक

शासनाच्या विविध विकासाच्या योजना राबविणारी ग्रामपंचायत

ग्रामपंचायत हणमंतगांव, ता.सांगोला

सरपंच : सौ.दिपाली तात्यासाहेब खांडेकर
उपसरपंच : श्री. दत्तात्रय गोविंद खांडेकर
ग्रामपंचायत अधिकारी : श्री. सागर वसंत आदाटे
सर्व सदस्य, ग्रामपंचायत कर्मचारी वर्ग व ग्रामस्थ

ग्रामपंचायत हणमंतगांव, ता.सांगोला

शुभदिपावली

सांगोला शहर व
तालुक्यातील सर्व नागरिकांना
दीपावलीच्या
हार्दिक शुभेच्छा..



मा.दिपाली जाधव
(तालुका कृषी अधिकारी)

शुभेच्छुक

सर्व कृषी मंडल विभाग,
सर्व कृषी सहाय्यक, कर्मचारी वर्ग

सांगोला तालुका कृषी विभाग कार्यालय

शुभदिपावली

शुभेच्छुक

सर्व ग्रामस्थ, शेतकरी बांधव व तमाम नागरिकांना दीपावली व नुतन
वर्षानिमित्त हार्दिक शुभेच्छा !

ग्रामपंचायत किडेबिसरी, ता.सांगोला

सरपंच : श्री. श्रीकांत भागाप्पा कोळेकर
उपसरपंच : श्री. विकास महादेव साबळे
ग्रामपंचायत अधिकारी : श्री. हणमंत श्रीमंत मोहिते

सर्व सदस्य, ग्रामस्थ व कर्मचारी वर्ग, ग्रामपंचायत किडेबिसरी, ता.सांगोला

रक्षितं रामनामभिः।।

प्रत्यक्ष सदाशिव ज्याचे निरंतर स्मरण करतो, ज्याच्या उच्चाराने मौनालाही स्फुरण चढून गीत उमटते, ज्याच्या अविरत नामस्मरणाने हलाहलाचे अमृतात रूपांतरण होऊन संजीवनी म्हणून उद्धरिते अन् वाल्याचा वाल्मिकी होतो असे हे महापातकांचा नाश करणारे श्रीरामनाम सर्वश्रुत आहे.

चराचरात व्यापून उरलेलं पूर्णब्रह्म तत्व असलेला तो अविनाशी, अपौरुषेय, अनादि, अनंत सृष्टीचा चालक जगत्पिता श्रीमन् महाविष्णुंचा सातवा अवतार असलेला निर्गुण निराकार प्रभु श्रीरामचंद्र !

मांगल्याचे ब्रीद, चैतन्याची पहाट अन् सर्वोत्तम अशी ज्याची गुणख्याती असणारा राम आपल्या सर्व प्राणीमात्रांचे निरंतर रक्षण करी हीच तयाच्या चरणी विनम्र प्रार्थना !

भक्तश्रेष्ठ दासोत्तम मारुतीराया यांनी रचलेल्या स्तोत्रात ते म्हणतात की जगताच्या शेवटी शेष राहील असे माझ्या प्रभुचे नाम आहे, जे गुणातीत सगुण आहे, जे स्मरण मात्र जीवन उद्धरून टाकते, त्या तीन अक्षरांच्या अभ्यासाने कित्येक योगीयांचे योग सुलभ होऊन ते सद्गतीस पावले. त्या श्रीराम नामाच्या तीन अक्षरांची महती मी काय वर्णावी, जे भवतारक आहे, या ईहलोकांच्या सर्व यातनांचे ते उत्तर आहे. हे राम नाम नुसते नाम नसून ते चराचर व्यापी अशा ऊर्जेचे मर्म आहे. परब्रह्म अशा ओंकारचे ते सगुण साकार रूप आहे. जो आदि आहे, मध्य आहे आणि अंत आहे. हे नाम भक्तासाठी तारक आहे आणि दुष्टांसाठी मारक आहे. अविचारासाठी विचार आहे, विद्यार्थ्यांसाठी प्रेरणा आहे, कवी साठी गीत आहे, योगीयांसाठी योग आहे, समस्त प्राणीमात्रांसाठी हे खऱ्या अर्थाने 'जीवन' आहे लौकिक अर्थासाठी ते अलौकिक आहे, प्रापंचिकासाठी परमार्थ आहे अन् अशा अगणित गोष्टींच्या उत्पतीचे ते कारण असणारे सार्थ असे राम नाम आहे.

रामनामाची महती मी काय वर्णन करणार???

आज सारं विश्व अंधःकारमय होत चालल आहे, स्वार्थ हेच उद्दिष्ट होत असताना आपल्या ऋषी मुनींनी सांगितलेली सत्वाची आज उणीव भासत आहे. जो तो उठतो आणि मी श्रेष्ठ मीच सर्वकाही अशा आविर्भावने तो पुढे येतो. शेवटी कालातीत होतो. या सामान्य जीवनात न प्रेरणा, न सार्थकता, असे हे जीवन व्यर्थ निरर्थक आहे. पण यातून उद्धरून जाण्यासाठी आपल्या पूर्वजांनी आपल्याला खूप सारे उपाय सांगितले आहेत. त्यातीलच एक मला आवडणारा व सर्वोत्कृष्ट असा उपाय म्हणजे नित्य रामरक्षा पठण होय !



खरंतर यासाठी काहीच लागत नाही, कुठे पद्मासनात बसून तासन्तास ध्यान ना कोणता त्याग, लागते ती फक्त ओढ अन् या जीवासोबत समस्त जीवांचे कल्याण होवो ही शुद्ध भावना! समर्थ रामदास स्वामी रामाजवळ प्रार्थना करताना म्हणतात ब्रह्मानुभव दे रे राम। अनन्यसेवा दे रे राम।। या जीवनात जर काही तुला द्यायचेच असेल तर तुझे नाम मला दे ! तेच सर्व काही आहे. गोंदवलेकर महाराज म्हणतात या जीवातील जीवात्मा हा राम आहे, त्याची ओळख व्हावी अन् हे जीवन मंगल व्हावे हीच प्रार्थना ते सदोदित करत आज मोक्षपदास पोहचले.

आत्ताच्या धावत्या युगात आपल्याला त्रिविध तापासोबत अनेक व्याधींनी आपल्याला जखडून ठेवलं आहे, उपाय काय म्हणून आपण जर शास्त्रांकडे पाहिले तर त्याचे उत्तर एक येईल ते म्हणजे रामरक्षा होय रामरक्षा !

आज समाज विज्ञान मान्य करतो. हो रामरक्षा ही एक विज्ञानच आहे आणि सरलार्थी अध्यात्म देखील !

बुधकौशिक ऋषींनी लिहिलेली वेदप्रामाण्य अशी ही रामरक्षा

१) काय आहे ही रामरक्षा ?

रामरक्षा याच्या अर्थ असा की , प्रभू श्रीराम आपल्या देहाचे, आपले या विश्वाचे कसे रक्षण करतो याची केलेली एक अनुष्टुप छंदातील लयबद्ध मांडणी.

२) मला संस्कृत येत नाही मग मी कशी म्हणावी ?

संस्कृत येत नाही हा आपल्या भारतीयांचा सगळ्यात मोठ्ठा भ्रम आहे.

॥ धनाची पुजा ॥
॥ यशाचा प्रकाश ॥
॥ किर्तीचे अभ्यंगस्नान ॥
॥ मनाचे लक्ष्मीपुजन ॥
॥ संबंधाचा फराळ ॥
॥ समृध्दीचा पाडवा ॥
॥ प्रेमाची भाऊबीज ॥
दिपावलीनिमित्त सांगोला तालुक्यातील तमाम जनतेस हार्दिक शुभेच्छा..
लोकनियुक्त सरपंच
धवलक्रांतीचे नेते
शुभेच्छुक
* मुक्ताई दूध उत्पादक महिला सह. संस्था, मर्या.शिवणे
* मुक्ताई अर्बन को-ऑप.क्रेडिट सोसायटी मर्या.शिवणे
* मुक्ताई मंगल कार्यालय, शिवणे, ता.सांगोला
श्री. दादासो जनार्दन घाडगे
संस्थापक अध्यक्ष : मुक्ताई उद्योग समुह, शिवणे, ता. सांगोला

आईला आई म्हण हे कोणी शिकवीत नाही तसे हिंदुना संस्कृत शिकवावी लागत नाही. हा काळाच्या ओघात उच्चारक्षमता व अभ्यासपद्धतीमुळे बदल झालेला जाणवतो पण सरावाने नित्य श्रवणाने संस्कृत बोलता येते.

३) रामरक्षा म्हणायला अधिकार हवा का ?

शास्त्रात असा कोणताही संदर्भ नाही. आचरण शुद्धी व चित्त शुद्धी महत्त्वाची आहे. सर्व वर्णातील लोक रामरक्षा म्हणू शकतात .

४) रामरक्षा कोणत्या काळात म्हणावी ?

रामरक्षा तीन्ही काळात म्हणाली तरी चालते. पण दुपारी १२ ते १ पर्यंतचा काळ हा वर्ज्य म्हणून ओळखला जातो या काळात रामरक्षा पठण करू नये असा नियम आहे.

५) रामरक्षा स्त्रियांनी म्हणावी का ?

रामरक्षा हे नित्यनेमाचे स्तोत्र असल्याने पुरुष व स्त्रिया दोघेही हे स्तोत्र म्हणून शकतात. स्त्रियांनी मासिक धर्मात या स्तोत्राचे पठण करू नये .

६) रामरक्षेने या देहाचे रक्षण शक्य आहे का ?

हा सतत आणि साहजिकतने विचारला जाणारा प्रश्न आहे. असो.

रामरक्षेची मांडणी ही संपूर्ण अनुष्टुप छंदात असून ' र ' या वर्णाभोवती फिरते . कुंडलिनी अभ्यासात र वर्णाचा सहसंबंध मणिपूर चक्राशी येतो. नैमित्तिक र चा उच्चाराने मणिपूर चक्र जागृत होण्यासाठी मदत होते हा झाला अध्यात्मिक व योगिक संदर्भ. तर वैज्ञानिक संदर्भ असा की मानवी जीवनात श्वासोच्छवासाचे कार्य सगळ्यात श्रेष्ठ आहे, प्राण हा जीवाचा अविभाज्य घटक आहे. मानव सतत कार्यात व्यस्त असल्याने एका ठराविक काळानंतर त्याचे वलय हे क्षीण होऊ लागते, त्याच्या वलयात अनेक प्रकाराच्या निगेटिव शक्ती सामावू लागतात, त्यामुळे त्याला ताण, एकाग्रता क्षीण होणे, कार्य करण्याची क्षमता कमी होणे, अशा कित्येक समस्यांना तोंड द्यावे लागते अशावेळी त्याच्या बोलण्यात र चा उच्चार सतत झाला तर शरीरातील रक्तसंचाराचा वेग व श्वासोच्छवासाच्या लयीत साम्यता येऊन त्याचे बाह्य वलय जागृत होऊन एक समानता, स्थिरता व त्याच्या नित्य कामात सहजता प्राप्त होते व त्याची कार्यप्रणाली सुधारते. रामरक्षेतील र च्या मांडणीचा मानवाला झालेला हा सगळ्यात मोठ्ठा फायदा म्हणायला हरकत नाही. रामरक्षेतील श्लोक क्रमांक ४ ते श्लोक क्रमांक१२ हे रामरक्षेतील कवच म्हणून ओळखले जाते. या संपूर्ण श्लोकात प्रभू श्रीरामचंद्र आपल्या केसांपासून ते पायाच्या नखापर्यंत कसे संरक्षण करतात याचा उल्लेख केलेला आहे. यावेळी प्रभु श्री रामचंद्रांना बुधकौशिक ऋषींनी वेगळवेगळ्या नावाने संबोधिले आहे. रामरक्षेचे पुढील वैशिष्ट्य असे की लहान मुलास जर बोलण्यात अडचणी येत असतील तर रामरक्षा नित्य पठणाने त्या अडचणी दूर होण्यास मदत होतात . स्त्रियांच्या प्रजनन काळात त्यांनी जर नित्य रामरक्षेचे चिंतन व राम रक्षा कवचाचे पठण केल्या असता अर्भकाची स्थिती सुधारते तसेच जन्माला येणारे बालक हे स्वस्थ बालक म्हणून जन्माला येते . पुरुषांनी पद्मासनात नित्य रामरक्षा पठण केली असता पुरुषांना वाताचे रोग कमी होण्यास मदत होते . ज्या व्यक्तींना रक्तदाब आहे, अशा व्यक्तींनी रामरक्षा नित्य पठणाने व रामनामाच्या नित्य नामस्मरणाने रक्तदाब नियंत्रणात राहतो. विशेषतः ज्या व्यक्तींना अर्धांगवायू झालेला आहे, अशा व्यक्तींनी नित्य रामरक्षा पठण केल्यास अपंग भागातील रक्तसंचार सुधारून हळुहळु अपंगत्व आलेला अवयव सुधारण्यास मदत होते .

विद्यार्थ्यांनी रामरक्षा नित्य अभ्यास केला असता कालांतराने प्रज्ञाशक्ती जागृत होण्यास मदत होते . प्रापंचिक जीवनात समाधान व शांती प्राप्तीसाठी सर्वांनी सायंकाळी देवासमोर दिवा लावल्यानंतर ७.३० च्या वेळेत रामरक्षा म्हणावी .

७) रामरक्षा हा तांत्रिक स्तोत्र आहे का ?

हे म्हणणे हास्यास्पद आहे हिंदूचे सगळे स्तोत्र हे कल्याणकारी स्तोत्रे आहेत, यातून कोणताही जादूटोणा अथवा करणी केली जात नाही .

८) रामरक्षा सिद्ध कसे करावे ?

नित्य पठणाने हळू हळू रामरक्षा सिद्ध होऊ लागते . विशेषतः चैत्र प्रतिपदा ते रामनवमी हा काळ सर्वात उत्तम मानला जातो. या काळात पृथ्वीवर रामतत्व हजार पटीने अधिक प्रमाणात जागृत असते. रामरक्षा सिद्ध करण्याचे असे कोणते विशिष्ट नियम नाहीत पण काही अभ्यासकांच्या मते ९९९९ वेळा रामरक्षा पठणानंतर ती परिपूर्ण पद्धतीने सिद्ध होते. या काळात जो व्यक्ती रामरक्षा सिद्ध करण्याचा संकल्प करतो त्याने पादत्राणे व तिखट व मिठाचा आहार वर्ज्य करावा असे मत येते .

९) रामरक्षेचा संकल्प काय ?

संकल्प हा विशेषतः व्यक्तीनुसार बदलतो पण सर्वांच्या कल्याणाचा संकल्प हा एकमेव संकल्प असावा .

जीवनात शांतता, समाधान प्रस्थापित करण्यासाठी या काळातील सर्वात सोप्पा आणि सहज मार्ग म्हणजे रामरक्षा पठण होय. रामनामाची महती समर्थांच्या मते जया वर्णिता शिणली वेदवाणी अशी आहे. तिचा प्रत्येकाने अनुभव सर्वसंपन्न अशा रामरक्षा पठणाने घेऊयात व या कलियुगात आनंदी जीवनाचा श्री गणेश करुयात !

विद्याधर संजय
७४२०८२५१२९

****

सर्व ग्रामस्थ, शेतकरी बांधव व तमाम नागरिकांना दीपावली व नुतन वर्षानिमित्त हार्दिक शुभेच्छा !

शुभेच्छुक

ग्रामपंचायत हातीद, ता.सांगोला

सरपंच : सौ.संगीता बबन घाडगे

उपसरपंच : श्री. संतोष रंगनाथ आधटराव

ग्रामपंचायत अधिकारी : श्री. बाळासाहेब अशोक नरळे

सर्व सदस्य, ग्रामस्थ व कर्मचारी वर्ग, ग्रामपंचायत हातीद, ता.सांगोला

॥ शुभ दीपावली ॥

आमचे असंख्य हितचिंतक, मित्रपरिवार, व्यापारी बांधव, शेतकरी बांधव आप्तेष्ट नातेवाईक, व तमाम नागरीकांना दीपावली व नूतन वर्षानिमित्त हार्दिक शुभेच्छा!



दृष्टी क्लिनिक

भोपळे रोड, एस.टी.स्टँड जवळ, सांगोला,

फोन : मो.७२७२९६४४४४

• उपलब्ध सुविधा •

• स्लिट लॅप मायक्रोस्कोप • काचबिंदू-निदान व उपचार
• नेत्रपटल (रेटिना) तपासणी • लासरू शस्त्रक्रिया
• बिनटाका मोतीबिंदू शस्त्रक्रिया

डॉ.किर्तीकुमार उद्धव शिंदे
(M.B.B.S., D.O.M.S.)

डॉ.उद्धव शिंदे एम.एस.(नेत्र)
नेत्ररोग तज्ज्ञ

वेळ - सकाळी १० ते २, दुपारी ४ ते ७

शिंदे परिवार सांगोला, जि.सोलापूर

योगसाधना : काळाची गरज

आजच्या वेगवान जीवनशैलीत, माणूस स्वतःकडूनच दूर गेला आहे.

त्याच्या हातात स्मार्टफोन आहे, पण मनात शांतता नाही.

त्याच्याकडे सोयींचं साम्राज्य आहे, पण समाधानाचं रिकामेपण आहे.

त्याच्याकडे साधनं आहेत, पण साधना नाही.

आणि म्हणूनच – योगसाधना ही आजच्या काळाची खरी गरज बनली आहे.

१. तणावपूर्ण जगात संतुलनाचा शोध

आजची दुनिया फास्ट आहे – फास्ट फूड, फास्ट नेटवर्क, फास्ट लाइफ.

पण या वेगातच माणसाने शांततेचा वेग हरवला आहे.

कामाचा ताण, आर्थिक धावपळ, नात्यांमधील संघर्ष, आणि डिजिटल जगातील सततची तुलना –

हे सर्व मनावर अज्ञात भार टाकतात.

योगसाधना ही त्या भारातून मुक्ती देणारी प्रक्रिया आहे.

ती शिकवते थांबायला, श्वास घ्यायला आणि आत वळायला.

दिवसातून काही मिनिटे आसन, प्राणायाम आणि ध्यानाचा सराव केल्यास

मनातील गोंधळ हळूहळू निवळतो आणि स्थैर्य वाढतं.

योग म्हणजे शरीराला शांत करणे नव्हे,

तर मनाला शहाणं बनवणे आहे.

– २. शरीर, श्वास आणि मन यांचा संवाद

योग सांगतो – तुमचं शरीर म्हणजे आत्म्याचं वाहन आहे.

हे वाहन मजबूत, स्वच्छ आणि संतुलित ठेवलं तरच जीवनप्रवास सुखकर होतो.

आसनांमुळे शरीर लवचिक, बलवान आणि सक्रिय होतं.

प्राणायामामुळे शरीरात प्राणशक्तीचा प्रवाह सुधारतो,

तर मेंदूला अधिक ऑक्सिजन मिळतो.

ध्यानामुळे मन स्थिर होतं आणि विचारांवर नियंत्रण येतं.

जेव्हा ही तीन स्तरं – शरीर, श्वास आणि मन – एकाच लयीत येतात,

तेव्हा खरी योगसाधना फुलते.

ही साधना बाहेरची नाही; ती अंतर्मुख प्रवासाची सुरुवात आहे.

३. रोगांवर औषध नव्हे, उपाय

आजचे बहुतेक आजार मनाच्या असंतुलनातून सुरू होतात.

तणावामुळे शरीरात कॉर्टिसोल आणि अॅड्रेनॅलिन सारख्या हॉर्मोन्सची पातळी वाढते,

ज्यामुळे मधुमेह, उच्च रक्तदाब, निद्रानाश, आणि थकवा वाढतो.

योगसाधना शरीर आणि मनाच्या या संवादाला संतुलित करते.

ती केवळ रोगांवर उपाय देत नाही,

तर शरीराच्या नैसर्गिक उपचारशक्तीला जागं करते.

आज जगभरात योगाला Preventive Medicine म्हणून मान्यता मिळाली आहे.

योग केल्याने औषधांची गरज कमी होते आणि जीवनाचा दर्जा उंचावतो.

– ४. डिजिटल युगात मानसिक स्वच्छतेची गरज

आज माहितीचा स्फोट झाला आहे –

दररोज आपण शेकडो संदेश, बातम्या, व्हिडिओ, पोस्ट पाहतो.

हे सर्व मनाला थकवतं, विचलित करतं, आणि आतली शांती हिरावून घेतं.

योगातील शुद्धीक्रिया, प्राणायाम आणि ध्यान ही मानसिक स्वच्छतेची साधनं आहेत.

त्या मनातील कचरं – राग, मत्सर, असुरक्षितता – साफ करतात.

जसा आपण शरीराची स्वच्छता रोज करतो, तसा मन स्नान रोज करणंही तितकंच आवश्यक आहे.

आजच्या काळात डिजिटल डिटॉक्स म्हणजेच योगिक मानसिक स्वच्छता हीच खरी गरज आहे.

५. आधुनिक माणसासाठी आध्यात्मिक दिशा

योग आपल्याला शिकवतो – जीवन बाहेर नाही, आत आहे.

आजचा माणूस बाह्य सुखांच्या शोधात एवढा गुंतला आहे

की आतल्या शांततेकडे पाहायलाही वेळ नाही.

योगसाधना माणसाला आत्मजागरूक करते.

ती शिकवते की आनंद हे मिळवायचं काही नसून –

तो आधीपासूनच तुमच्यात आहे, फक्त त्याची ओळख व्हायची आहे.

ध्यान आणि प्राणायामाचा सराव केल्यावर

माणूस स्वतःला, इतरांना आणि निसर्गाला अधिक समजून घेतो.

तो अधिक करुणामय, संयमी आणि संतुलित बनतो.

६) योगसाधना म्हणजे जीवनशैली

योग ही केवळ व्यायामपद्धती नाही; ती जीवनाचा दृष्टिकोन आहे.

शुभदिपावली

सर्व ग्रामस्थ, शेतकरी बांधव व तमाम नागरिकांना दीपावली व
नुतन वर्षानिमित्त हार्दिक शुभेच्छा !

शुभेच्छुक

ग्रामपंचायत मानेगांव, ता.सांगोला

सरपंच : सौ.ताई माणिक बाबर
उपसरपंच : श्री. तुकाराम नारायण बाबर
ग्रामपंचायत अधिकारी: श्री. मारूती शिवाजी वाघ

सर्व सदस्य, ग्रामस्थ व कर्मचारी वर्ग, ग्रामपंचायत मानेगांव, ता.सांगोला

शुभदिपावली

सर्व ग्रामस्थ, शेतकरी बांधव व तमाम नागरिकांना दीपावली व
नुतन वर्षानिमित्त हार्दिक शुभेच्छा !

शुभेच्छुक

ग्रामपंचायत इटकी, ता.सांगोला

सरपंच : सौ. निर्मला त्र्यंबकेश्वर इंगोले
उपसरपंच : श्री. दादासाहेब सोमा वाघमारे
ग्रामपंचायत अधिकारी : पांडुरंग आत्माराम बुरूंगले

ग्रामसेवक, सर्व सदस्य, ग्रामस्थ व कर्मचारी वर्ग, ग्रामपंचायत इटकी ता.सांगोला

आमचे नेते

सर्व ग्रामस्थ, शेतकरी बांधव व तमाम नागरिकांना दीपावली व
नुतन वर्षानिमित्त हार्दिक शुभेच्छा !

शिवसेना नेते

शुभदिपावली

शुभेच्छुक

मा.जगदीश नामदेव पाटील

माजी सरपंच, ग्रामपंचायत, मेथवडे

पाटील परिवार, मेथवडे, ता.सांगोला

ती शिकवते –
कसे शांत राहायचे तणावात,
कसे सजग राहायचे यशात,
आणि कसे संतुलित राहायचे प्रत्येक परिस्थितीत.
योग म्हणजे परिपूर्णतेचा नव्हे, तर सजगतेचा प्रवास आहे.
तो शरीराला सामर्थ्य देतो, मनाला स्पष्टता देतो,
आणि आत्म्याला शांतता देतो.
गोष्ट तशी काल्पनिकच,पण मित्रांनो, गोष्टीतल्या चिऊताई सारखे आपल्याला नाही का जगता येणार? आपल्या समोरही अशा अनेक छोट्या मोठ्या गोष्टी घडतात.कधी कुणी नुसती बघ्याची भूमिका घेतो तर कधी नुसतेच कोरडे तत्त्वज्ञान मांडत बसतो.माझ्या एकट्याच्या कृतीने असा काय फरक पडणार आहे? असे आपल्याला वाटते.पण असंच सर्वांना वाटले तर घडणारा अनर्थ टळणार कसा?**वर्षात**असे एक सुवचन आहे. सुरुवात माझ्यापासुन झाली पाहिजे.प्रत्येकाला आपल्या क्षमता व मर्यादा माहीत असतात.किंबहुना त्या माहित असायला हव्यात. आपल्या सभोवताली अनेक चुकीच्या गोष्टी आपण घडतांना पाहतो.आणि त्यातून निष्कर्षही काढून मोकळे होतो.जग अतिशय स्वार्थी झालंय... भ्रष्टाचार सर्वत्र बोकाळलाय.. व्यसनांचे थैमान माजले आहे..काम करण्याची दानत उरली नाही वगैरे वगैरे.पण यासाठी मी काय करू शकतो. या गोष्टी तर माझ्या हातात नाहीत. एवढा मोठा समाज वा देश बदलणं मला कसं शक्य आहे? हो,मला हे बदलणे शक्य नाही पण मला स्वत:ला बदलणे तर शक्य आहे. स्वत: पासून सुरुवात व्हायला हवी. आणि मगआधी केले मग सांगितलेया न्यायाने मला तीच गोष्ट इतरांना सांगण्याचा अधिकार आपसूकच प्राप्त होतो. पण घडते मात्र वेगळेच. आपण इतरांना ज्ञान पाजळण्यातच आपला वेळ व शक्ती खर्ची पाडतो.कधीकधी अशा घटनांसोबत सेल्फी काढण्याइतकेसेल्फिश सुद्धा बनतो. असे होता कामा नये.प्रत्येक चांगल्या कामात आपला खारीचा, या गोष्टीतल्या चिऊताईचा वाटा असायला हवा.

दिवसेंदिवस भौतिक प्रगती होत आहे.पण नैतिकतेची पातळी मात्र घसरत आहे. भ्रष्टाचाराने कळस गाठलाय.भ्रष्टाचाराच्या (अव)मानांकनाच्या यादीत आपला देश अगदीच शिखरावर नसला तरी चांगलाच वरच्या क्रमांकावर आहे. लाच देणं-घेणं याचं आता फारसं कुणाला चुकीचं वाटत नाही.वजन ठेवल्याशिवाय ऑफिसात टेबलावरील फाईल पुढे सरकत नाही.कोणताही विभाग भ्रष्टाचाराच्या या दुष्टचक्रातून सुटलेला नाही. जो या प्रवाहाविरुद्ध पोहण्याचा प्रयत्न करतो तो वेडा ठरतो.तो थकतो-भागतो . म्हणून अशा या प्रवाहाबरोबर वाहात जायचं काय? असं वाहात जाणं जिवंत माणसाचं लक्षण नाहीच.

आली जरी कष्टदशा अपार, धैर्य टाकिती न तथापि थोर या न्यायाने चालत राहायचं, सत्याच्या मार्गावर !

आज जग महायुद्धाच्या उंबरठ्यावर उभं आहे. रशिया -युक्रेन, चीन तैवान, इस्त्रायल -इराण अशा अनेक आघाड्यांवर युद्धाचा ज्वालामुखी खदखदत आहे. या सर्व देशांना आपल्या सीमा विस्तारायच्या आहेत.त्यांच्या या राक्षसी महत्त्वाकांक्षेच्या आगीत अनेक निष्पापांचे बळी जात आहेत. पिण्याचे पाणी वा जीवनावश्यक वस्तुंपेक्षा अण्वस्त्रांचे यांना भारी अप्रूप आहे. झुंजी लावायच्या व आपली शस्त्रास्त्रांची दुकानं चालवायची हा यांचा जुनाच फंडा आहे.वातावरणात जीवनविरोधी तत्वं हेच सोडतात आणि वरून ग्लोबल वार्मिंगची हाकाटीही पिटतात. हेच वार्मींग एक दिवस गाठणार आहे कळस आणि मग संपूर्ण पृथ्वीचंच लाक्षागृह हे पुरोचन करणार आहेत.

हे इतकं होऊ शकतं म्हणून आपण नुसतं हातावर हात धरून विनाशाची वाट बघत बसायचं का? गोष्टीतल्या चिमुकल्या चिऊताई सारखं बालतरुंना पाणी घालायचं.आधी वृक्षारोपण करायचं.,इतरांना करायला लावण्यास प्रेरणा द्यायची . प्लॅस्टिकच्या वापराला मर्यादा घालायची.फटाक्यांच्या आतिषबाजीला मर्यादा घालायची.अन्न व पाण्याची नासाडी टाळायची. अशा छोट्या छोट्या गोष्टी तर आपण नक्कीच करू शकतो.

मै अकेला ही चला था जानिब-ए-मंज़िल मगर
लोग साथ आते गए और कारवॉ बनता गया

मजरूह सुलतानपुरीच्या या शेरातला कारवॉ छोटा-मोठा असू शकतो.पण परिणाम साध्य होणार हे निश्चित.

आज माणूस माणसापासून दूर जातांना दिसत आहे. तो जाती-धर्मात तोडला जातोय. भगवा,हिरवा,निळा,लाल अशा वेगवेगळ्या झेंड्याखाली एकवटलाय. नात्यातली विणीत प्रेमाच्या धाग्यांची जागा स्वार्थाच्या धाग्यांनी घेतलीय. मोबाईलमय जग,तोचि एक धर्म,सोडोनिया कर्म,बोलती बिचारे अशी गत झालीय. वेळहा नात्यांचा श्वास होय ,तो देता आला पाहिजे. मी त्यागूनआम्हीस्विकारला पाहिजे. अहंकार व क्रोध हे नात्यांचे शत्रू होत.. अशी एक म्हण आहे.जगभरातली युद्धं थांबली पाहिजेत असे आपल्याला वाटते तसे नाजूक नात्यातले मनमुटाव पण संपायला हवेत . त्यासाठी सुरुवात कोण करेल हा अहंकार आडवा येता कामा नये. आपण बलाढ्य देशांच्या विस्तारवादाबद्दल बोलतो पण शेजाऱ्याचा बांध कोरायला नको असा विचार आपल्या मनात का येत नाही? समाजातील कुप्रथा कशा कमी होतील? , अंधश्रद्धांना आळा कसा बसेल? , मोफत घेण्याची प्रवृत्ती कशी नष्ट होईल? , वृद्धाश्रमांची संख्या कशी कमी होईल? नियतीच्या वेताळाने विचारलेल्या अशा प्रश्नांची उत्तरे ठाऊक असूनही न दिल्यास आपल्यातल्या विक्रमादित्याच्या डोक्याची हजार शकले होणार हे ठरलेले आहे. पण पुन्हा प्रश्न येतो, मीच का?

हो,ही संपूर्ण जबाबदारी अवघ्या समाजाची आहे. सुरुवात माझ्यापासुन करायला काय हरकत आहे?

आजकमी काम,जादा दाम हा फॉर्म्युला फार लोकप्रिय आहे.कमीत कमी श्रमात आपल्याला जास्तीत जास्त मोबदला कसा मिळतो हे अभिमानाने सांगितलं जातं. खरं तर कर्म - ही एक पुजाच आहे. ज्या क्षेत्रात आपण काम करतो त्यातील लाभार्थ्यांना, गरजूंना आपला पुरेपूर उपयोग झाला पाहिजे.प्रत्येक प्रलोभना सोबत आपल्या मनोबलाची किंमत ठरते.माझे वेतन,मिळकत हा माझा हक्क आहे.नाण्याच्या दुसऱ्या बाजूचे काय? वाकड्या मार्गाने येणाऱ्या संपत्तीचा स्वीकार हे पापच आहे.इतर कुणी काय करतात त्यांच अंधानुकरण नको.

आपण ज्या समुहात वावरतो तो आपल्याला ठरवताच येतो असे नाही. पण आयुष्य आपलं आहे,ते आपल्या तत्त्वानुसाच जगायला हवं.यासाठी संतकवी रहीम यांचा एक सुंदर दोहा आहे.

ज्यों रहीम उत्तम प्रकृती, का करी सकत कुसंग
चंदन विष व्यापत नहीं, लपटे रहत भूजंग ।।

मखभ तर दाटून आलं आहे. पण ते काही शाश्वत नाही. शाश्वत असतो तो सत्याचा विजय, प्रयत्नांती यश आणि कर्माचे फळ. कवी हिमांशू कुलकर्णी यांच्या कवितेच्या ओळी मला इथे स्मरतात,

थोडा उजेड ठेवा, अंधार फार झाला
पणती जपून ठेवा, अंधार फार झाला
!! सत्यमेव जयते !!

आनंद देशमुख,९१,दंडवतेनगर,
शिरपूर,जि.धुळे,४२५४०५
(९८६०६३०२३०)

जाणीव मातृत्वाची

आई तुझाच अंश माझ्या कुशीत वाढतो आहे
हे तुला कळल्यावर विश्वातील सगळ्यात मोठे सुख
तुझ्या झोळीत पडल्याचा आनंद तुला झाला
तेव्हापासून झपाटलेल्या वाघिणी गत
तुझ्या खुशीत सांभाळ तू माझा केला
माझ्या सुदृढ वाढीसाठी तुझ्या आवडीनिवडी
बांधून गाठोड्यात त्याचा त्याग तू केला
तू सोसून मरणप्राय वेदना तुझ्या
आर्त किंकाळीने जन्म माझा झाला
सोसताना महाभयंकर वेदना हे सगळे कळल्यावर
दूर कुठेतरी जावे असे वाटले असेल का ग तुला
तुझ्या आर्त किंकाळी नंतर
माते माझा टाहो फोडण्याचा आवाज तुला आला
क्षणभरात विसरून सर्व वेदना माझ्या
मातृत्वाचा अलंकार परिधान केला
नाजूक हृदयात ही तू मला जागा दिला
वाहू लागल्या नसानसातून अमृताच्या धारा
आई तुझी सुंदर त्यागी मूर्ती बनवताना
त्या विधात्याने विचार किती केला असेल ग माते
जन्मून तुझ्या पोटी तुझ्या त्यागाची
परतफेड जमेल का ग माते जमेल का ग माते

महानंदा पांडुरंग घोंगडे

आमच्या असंख्य ग्राहक हितचिंतक मित्र परिवार व तमाम नागरिकांना दिपावली व नुतन वर्षाच्या आभाळभर शुभेच्छा..!

शुभेच्छुक

जाधव अमृततुल्य चहा

शाखा नं-१

डॉ.भाई गणपतराव देशमुख सहकार वैभव शॉपिंग सेंटर, गाळा नं.१३ महात्मा फुले चौक, सांगोला

हॉटेल जाधव

चहा, कॉफी, चविष्ट नाष्टा मिळण्याचे एकमेव ठिकाण... इडली वडा, पुरी भाजीसाठी प्रसिध्द...

शाखा नं-२

कडलास नाका, जगताप कॉम्पलेक्स, सांगोला

हॉटेल जाधव

शाकाहारी व मांसाहारी घरगुती पध्दतीचे जेवण योग्य दरात मिळेल.

शाखा नं-३

कडलास नाका, मुजावर कॉम्पलेक्स, सांगोला

श्री. शंकर माने

जाधव कलेक्शन व लेजीड शॉपी व ब्युटी पार्लर

शाखा नं-४

कर्मवीर नगर, वासुद रोड, सांगोला

(प्रोप्रा.अंजू शंकर माने मो.९९७५१२९३०५)

जाधव खानावळ

शाखा नं-५

सांगोला महाविद्यालयासमोर, कडलास रोड, सांगोला

घरगुती पध्दतीचे रूचकर जेवण मिळेल.

प्रोप्रा : ८६००८२०२३८

प्रोप्रा : समस्त माने व जाधव बंधू, सांगोला जि.सोलापूर

आमच्या असंख्य ग्राहकांना दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा..!

ग्राहकांची पसंती व विश्वासास पात्र ठरलेले....

अन्नपुर्णा मस्तानी हाऊस

स्नॅक्स अ‍ॅण्ड आईस्क्रिम सेंटर

आमचेकडे पावभाजी, डोसा, चायनिज, कच्छी दाबेली, पिझ्झा, मस्तानी योग्य दरात मिळेल.

आमची खासियत

बाजीराव मस्तानी, अमेरिकन ड्रायफ्रुटस्, ब्लॅक फॉरेस्ट, मावा, सिताफळ, पान मसाला व इतर भरपूर फ्लेवर मस्तानीसाठी प्रसिध्द असलेले पंढरपूर मधीलएकमेव ठिकाण.

आंबा, पिस्ता, बटरस्कॉच, अमेरिकन ड्रायफ्रुटस्, राजभोग, गुलकंद, चॉकलेट, व्हॅनिला, मावा, पानमसाला, इ. विविध प्रकारचे आईस्क्रीम मिळण्याचे एकमेव ठिकाण

एकवेळ आवश्य भेट द्या..

मा.दत्ताशेठ लिमकर

आमच्याकडे स्पेशल रॉयल फालुदा मिळेल.

संपर्क : (मो.९८२२९०१२१३/९८२२४५४७६)

जतचे साने गुरूजी : डॉ. श्रीपाद जोशी

डॉ. श्रीपाद जोशी आणि आमचा स्नेह १९८५ पासूनचा आहे. त्यावेळी आम्ही माणदेशावर एक अभ्यासपूर्ण ग्रंथ संपादित करण्याच्या विचारात होतो. डॉ. श्रीपाद जोशी यांनी ग. दि. माडगूळर यांच्या साहित्यावर पीएच.डी. पदवी संपादन केली होती. म्हणून इतराबरोबर त्यांनाही निबंध पाठविण्या विषयी पत्र पाठविले. वीस एक लोकांना पत्रे पाठवुन सुध्दा त्यात फक्त डॉ. श्रीपाद जोशी व डॉ. सयाजीराजे मोकाशी या दोघांचेच लेख आले होते. इतक्या अल्प माहितीवर तो ग्रंथ संपादित करता आला नाही. नंतर मी १९८५ साली माणदेशाचा प्रकल्प हाती घेतला. जत तालुक्याची माहिती मिळविण्यासाठी त्यांनी आम्हांला अत्यंत प्रेमळपणे मौलिक सहकार्य केले. चार सहा दिवस त्यांनी आमची शाळेवर व्यवस्था केली. त्या काळात त्यांचा सहवास लाभला. स्नेह निर्माण झाला आणि वाढत गेला. आज अखेर हा स्नेह कायम आहे.

या परिचयातून माझ्या लक्षात आलेले त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे पैलू असे. शाळेचा मुख्याध्यापक / प्राचार्य मुळात शिक्षकच असतो. पण तो प्राचार्य झाल्यावर आपले शिक्षकपण विसरून अधिकारी, प्रशासक होतो. ज्ञानसाधना, अध्ययन, अध्यापन बाजूला पडते आणि तो शाळेचा सयाजीराव प्रमुख होतो. असे अनेकांच्या बाबतीत घडते. पण डॉ. श्रीपाद जोशी हे हाडाचे शिक्षक आहेत. प्राचार्य झाल्यावरही त्यांनी आपले शिक्षकपण जपले आणि वाढविले आहे. स्वतःच्या जगण्याची अर्थपूर्णता त्यांनी शिक्षकाच्या कामात शोधली आहेत. हा वारसा त्यांना साने गुरूजी आणि राष्ट्रसेवा दलाकडून मिळाला. शाळेतल्या विद्यार्थ्यांवर, शिक्षकावर मुलांसारख प्रेम करणारा, आपल्या वागण्या बोलण्याने आदर्श घालून देणारा त्यांच्यासारखाच शिक्षक विरळाच. मला ज्या थोड्या शिक्षकाबद्दल आदर वाटतो त्यात डॉ. श्रीपाद जोशी हे एक आहेत. साने गुरूजींचा वारसा सांगणारे जपणारे आणि वाढविणारे, आपल्या कृतीशील जगण्याने समाजाला दाखवून देणारे ते जतचे साने गुरूजीच आहेत.

शिक्षक हा अखंड ज्ञानाचा साधक असतो. ही ज्ञानसाधना खेडयात राहून करणे हे असिधाराव्रत असते. सभोतालचे सगळे जग पै पैशाच्या मागे लागले असताना एकाकी राहन, मोठ्या निष्ठेने, अनेक गोष्टीचा त्याग करून, ही ज्ञानसाधना करावी लागते. डॉ. श्रीपाद जोशी सरांनी सगळे व्याप सांभाळून ही ज्ञानसाधना अखंड सुरू ठेवली आहे. त्यांनी ग. दि. माडगूळकरांवर लिहिलेला प्रबंध हा पीएच. डी. चा उत्कृष्ट प्रबंध ठरला आहे. मराठी पदवीचे संशोधन किती शिस्तीने. पुराव्यासह व समग्रपणे केले जाते याचा हा प्रबंध आदर्श आहे. पीएच.डी. नंतरही त्यांनी आपले लेखन सुरूच ठेवले आहे. गदिमा वाङ्.मय दर्शन, होरपळ आणि हिरवळ, मराठी भाषा चिंतन आणि चिंता, विवेक, मुलांचे गदिमा, शिक्षण संवाद, शिक्षणः शोध आणि बोध, प्रबोधन यासारखी २५ पुस्तके त्यांनी लिहिलेली आहेत. मराठी साहित्य आणि शिक्षण या विषयावर त्यांनी सातत्याने लेखन केले आहे. त्यांचे मौलिक ग्रंथ त्यांच्या ज्ञानसाधनेची साक्षच आहेत. महाराष्ट्र राज्य मराठी माध्यमिक शिक्षक संघ यांचे ते १९९८ ते २००० पर्यंत अध्यक्ष होते. त्याच काळात त्यांनी महाराष्ट्र मराठी अध्यापक या मासिकाचे संपादन केले आहे. यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, नाशिक यांच्या शिक्षण विभागातील शिक्षक निवड श्रेणी ग्रंथाचे ते लेखक आणि प्रशिक्षक होते. कोल्हापूर सह पाच जिल्ह्याची जबाबदारी त्यांच्यावर होती. एस.एस.सी. बोर्डाच्या मराठी विषयाच्या हस्तपुस्तिका लिहिण्याचे काम त्यांनी केले आहे. महाराष्ट्र राज्याच्या आदर्श शिक्षकासह त्यांना २७ पुरस्कार मिळाले आहेत. मुख्याध्यापक, प्राचार्य या सारखी जबाबदारी सांभाळून असे लेखन करणे खरोखरीच वैशिष्ट्यपूर्ण आहे. आमच्या सारख्या मराठीच्या शिक्षकांचे ते शिक्षक आहेत आणि महानुभव संत नागदेवाचार्यासारखे ते ग्रंथकाराचे ग्रंथकार आहेत.

प्रेमळपणा हा त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा एक विलोभनीय गुण आहे. स्वतःच्या मुलावर कुणीही प्रेम करते पण शाळेत येणाऱ्या सगळ्या मुलावर व सहकार्यावर प्रेमाचा वर्षाव करण्यासाठी केवढे मोठे अंतःकरण असावे लागते. तसे अंतःकरण त्यांच्याकडे आहे. खरा तो एकची धर्म जगाला प्रेम अर्पावे हा संदेश ते प्रत्यक्ष जीवनात पाळत आले आहेत. आईचे अंतःकरण असलेल्या जोशी सरांना ज्ञानेश्वरांसारखं माउली संबोधनेच योग्य ठरेल. चंदन जसा सर्वांगाने पवित्र असतो तो आपल्या सुगंधाने परिसर गंधीत करतो. तसे डॉ. श्रीपाद जोशी सरांनी जतचे सगळे शैक्षणिक विश्व गंधित करून टाकले आहे.

डॉ. श्रीपाद जोशी हे शून्यातून विश्व निर्माण करणारे कर्तबगार शिक्षक आहेत. जत हायस्कूल, जत आणि त्यांचे कुटुंब हा त्यांचा श्वास आहे. एक निराश्रीत मुलगा, निराधारांच्या आश्रमात शिकून, आपल्या कर्तृत्वाने किती विविध क्षेत्रे उजळून टाकू शकतो. शिक्षक, मुख्याध्यापक, प्राचार्य, संपादक, लेखक, अभ्यासक, संशोधक, संघटक, शैक्षणिक कार्यकर्ता, गृहस्थ अशा अनेक रूपातील त्यांचे कार्य आपण जवळून पाहिले आणि अनुभवले आहे. ते मी सांगितले पाहिजे असे नाही. त्यांची शिस्त, प्रामाणिकपणा, संघटन कौशल्य, प्रेमळपणा, मनमिळावू स्वभाव, सर्वांना बरोबर घेउन जाण्याची वृत्ती, गोड बोलून काम करून घेण्याची हातोटी, माणसं न दुखवता तिढे सोडवण्याची क्षमता, समतोल आदर्श वागणं असे अनेक गुण त्यांच्या ठिकाणी आहेत. अशा सज्जन, सात्विक गुरूच्या सहवासात राहण्याचे भाग्य जत हायस्कूलच्या विद्यार्थी शिक्षकांना लाभले आहे. खरोखरच आपण भाग्यवान आहात. आमच्या वाट्याला त्यातले काही क्षण आले तर आम्हांला कृतार्थ झाल्यासारखे वाटते. त्यांच्या सारखा आदर्श शिक्षक पाहयला मिळणेसुध्दा आता दुर्मिळ झाले आहे.

प्राचार्य डॉ. कृष्णा इंगोले

(पूर्वप्रसिद्धी : ज्ञानयज्ञ, डॉ. श्रीपाद जोशी, सेवानिवृत्ती निमित्त गौरवग्रंथ, २००२.)

शुभदिपावली

सर्व ग्रामस्थ, शेतकरी बांधव व तमाम नागरिकांना दीपावली व नुतन वर्षानिमित्त हार्दिक शुभेच्छा !

शुभेच्छुक

ग्रामपंचायत पाचेगांव खु।।, ता.सांगोला

सरपंच : सौ. संगीता संजय भोसले

उपसरपंच : श्री. हणमंत तुकाराम मिसाळ

ग्रामपंचायत अधिकारी : सौ. मनिषा गणपत जावीर

सर्व सदस्य, ग्रामस्थ व कर्मचारी वर्ग, ग्रामपंचायत पाचेगांव खु।।, ता.सांगोला

शुभदिपावली

शुभेच्छुक

सर्व ग्रामस्थ, शेतकरी बांधव व तमाम नागरिकांना दीपावली व नुतन वर्षानिमित्त हार्दिक शुभेच्छा !

ग्रामपंचायत जुजारपूर, ता.सांगोला

सरपंच : श्री. पवन सोपान गाडे

उपसरपंच : श्री. श्रावण ईश्वर वाघमोडे

ग्रामपंचायत अधिकारी : सौ. शुभांगी मिथुन सोडळ

सर्व सदस्य ग्रामस्थ व कर्मचारी वर्ग, ग्रामपंचायत जुजारपूर, ता.सांगोला

शुभदिपावली

शुभेच्छुक

सर्व ग्रामस्थ, शेतकरी बांधव व तमाम नागरिकांना दीपावली व नुतन वर्षानिमित्त हार्दिक शुभेच्छा !

ग्रामपंचायत खिलारवाडी, ता.सांगोला

सरपंच : सौ. लक्ष्मी संजय गोडसे

उपसरपंच : श्री. विनायक अंकुश बागल

ग्रामपंचायत अधिकारी : सौ. सुवर्णा प्रल्हाद साळुंखे

सर्व सदस्य ग्रामस्थ व कर्मचारी वर्ग, ग्रामपंचायत खिलारवाडी, ता.सांगोला

कथा संघटनाची व्यथा गुरुपदाची

दि. २३ मार्च २०१० रोजी शिक्षकांचे धरणे आंदोलन ऐतिहासिक आझाद मैदान मुंबई येथे यशस्वीरित्या पार पडले. शिक्षक संघटनेच्या काही नेत्यांनी व काही लोकप्रतिनिधींनी सहानुभूती दाखवून आपली मनोगतं स्पष्ट केली. शिक्षकांच्या मागण्या पूर्ण केल्याशिवाय स्वस्थ बसायचं नाही. हाच सूर प्रत्येकानं आवळला. ३५-४० हजारांचा जनसमुदाय व त्यांना मिळणारा पाठिंबा पाहून माननीय मुख्यमंत्र्यांनी पोलिसांकरवी शिक्षक नेत्यांना पाचारण केले. त्यांच्याशी चर्चा केली व निवेदन स्वीकारले. ''तुमच्या सगळ्याच मागण्या मान्य करण्याची आमची सकारात्मक भूमिका राहील'' हे स्पष्ट केले.

एका अर्थाने शिक्षकांनी ही लढाई जिंकली. शासन नमले. त्यामुळे आमच्या गुरुजींची छाती फुगली. अर्थात नव्या पिढीतील गुरुजींची पण आमच्यासारख्या जुन्या जमान्यातील गुरुजनांना अंतर्मुख होऊन विचार करावा लागतोय. ही लढाई जिंकून आपण स्वाभिमानी गुरुजी ठरलो का ?

प्राथमिक शिक्षकांमध्ये शिक्षक संघ, दोंदे प्रणित संघटना, शिक्षक समिती, मागासवर्गीय शिक्षक संघ इ. संघटना कार्यरत आहेत. या सगळ्याच संघटना आपल्या स्वतःच्या ताकदीवर आपले म्हणणे शासन दरबारी रेटतात की, लोकप्रतिनिधीचा आधार घेऊन ? अधिक विचारांती आपल्या हे ध्यानात येईल. गावोगावी, तालुक्यात, जिल्ह्यात वा राज्यात या शिक्षक संघटना कुणाच्यातरी बोटावर नाचतात. असे ओंगळ चित्र आहे. खेडोपाडी तर हा अमक्या संघटनेचा शिक्षक ही त्याची ओळख अपुरी पडते. हा अमक्या तमक्या पुढाऱ्याचा हस्तक. ही त्याची खरी ओळख असते. तीच त्याची वैयक्तिक ताकदही असते. त्या ताकदीवर तो स्वतःमधला गुरुजी विसरतो व स्वतः पुढारी असल्याचा बहाणा करतो. म्हणजे गुरुजी या पदापेक्षा पुढारी हे पद त्याला मोठे वाटते. यातच त्याची अधोगती सामावलेली असते.

तसे पाहता राजकीय पुढाऱ्यांना गुरुजींची गरज असते. कारण गुरुजी हा समाजातील डोळस घटक आहे. तो ५-२५ आंधळ्यांना म्हणजे अशिक्षितांना आपल्या बाजूने आणू शकतो. ही त्यांची धारणा असते. पुढाऱ्यांच्या दृष्टीने यात सत्यता असेलही! पण गुरुजी तुम्ही ?

गुरुजी तुम्ही सदा-सर्वदा गुरुजीच असले पाहिजे. तुम्हाला कोणत्या पुढाऱ्याचा हस्तक म्हणून घेण्यात कमीपणा वाटला पाहिजे. आपली गादी उच्चपदस्थ आहे. आपली भूमिका गुरुपदाची. अर्थात, मार्गदर्शकाची आहे. आपण कुणाची चाकरी पत्करलेली नाही. अमक्या पुढाऱ्याचा गडी म्हणून घेण्यात काय रहस्य आहे? गुरुजी तुम्हाला पुढाऱ्याचे हे कवच असलेच पाहिजे, असे का वाटावे ?

तुम्ही कुठेतरी कमी पडत असावे? म्हणून तर तुम्हाला कुणातरी मोठ्याचा आधार हवा असतो. तुमच्या नेमक्या समस्या कोणत्या ?

१. तुम्हाला स्वतःच्या गावी नोकरी हवी असते.

२. ज्ञानदानासारख्या पवित्र कार्यात रमण्यापेक्षा तुम्हाला पुढारी म्हणून मिरवण्याची हौस असते.

३. उसना दिमाख दाखवून आपण कुणीतरी फार मोठे आहोत, हे सर्व सामान्यांना दाखवायचे असते.

४. पुढाऱ्याचा आधार असल्यावर माझ्या केसालाही धक्का लावण्याची कुणाची बिशाद नाही, ही तुमची धारणा असते.

५. असलीच तर शेतीकडेही लक्ष पुरवता येते. शेती नसलीच तर एखादी दुचाकी चारचाकी घेऊन गावात वजन वाढवता येते. पण गुरुजी! हे सर्व उपभोगता आले तरी तुमच्यातला गुरुजी संपलेला असतो. हे तुमच्या ध्यानात येत नाही. तुम्ही उरता फक्त गुरुजी नावाचे बुजगावणे !

आमच्यासारखे जुन्या जमान्यातील गुरुजी कमी पगारात, पण योग्य पेहरावात आणि आपल्या ज्ञानदानाच्या पवित्र कार्यात मग्न असत. शाळेच्या वेळा व्यतिरिक्त जादा तास घेऊन आपले विद्यार्थी अधिक तयार करण्यात आपला जीव ओतीत असत. त्यांना कुण्या पुढाऱ्यांना नमस्कार करण्याची गरज व वेळही नव्हती. पण त्योची जनमाणसातील प्रतिमा प्रतिष्ठा गुरुपदाला योग्य अशीच होती. लोकप्रतिनिधीना वा एकूण नागरिकांना गुरुजी या व्यक्तिबद्दल व त्या गादीबद्दल नितांत आदर असायचा, गेले ते दिवस !

त्यावेळी दोन अंकी वा तीन अंकी पगारावर आम्ही खूप समाधानी होतो. आज चार अंकी, पाच अंगी पगार घेऊनही आपल्याला मानसिक स्वास्थ्य नाही, असेच दिसते. शासनही उदासीन आहे. एवढा मोठा पगार देऊन गुरुजींकडून विद्यार्थी, उत्तम विद्यार्थी, देशाचा भक्कम भावी आधारस्तंभ देशाचा आदर्श नागरिक बनावा. त्या दृष्टीने त्यांना कामाला लावावे हे सोडून गुरुजींना शाळाबाह्य कामाला जुंपले जाते व विद्यार्थ्यांच्या ज्ञानदानावर दुर्लक्ष केले जाते. सगळाच खेळ खंडोबा चालू आहे. याला कुठेतरी जाणीवपूर्वक आवर घातला पाहिजे. केंद्राप्रमाणे वेतन भत्ते घरभाडे मागणे हा आपला हक्क आहे. त्याबरोबर आपल्या कर्तव्यातही कसूर नसावी.

या धरणे आंदोलनात शासकीय बदल्याला विरोध नोंदवलाय. मात्र याला शासनाचे प्रतिनिधीच सहकार्य करताहेत, हा विरोधाभास आहे. शिक्षकांच्या नियमाने होणाऱ्या बदल्यांचे आमदारासारख्या लोकप्रतिनिधीला का दुःख व्हावे? या सगळ्या वातावरणाचा शैक्षणिक गुणवत्तेवर दूरगामी परिणाम होतोय. हे नाकारता येणार नाही. यासाठी शिक्षण खाते स्थानिक स्वराज्य संस्थेकडे (जि. प.) असले तरी शासकीय नियम काटेकोरपणे पाळले जावेत. शिक्षकांना शिक्षणा व्यतिरिक्त कामे अजिबात देऊ नयेत. मात्र विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावाढीकडे दुर्लक्ष करणाऱ्या

आमचे असंख्य मित्र परिवार, हितचिंतक व तमाम नागरिकांना
दीपावली व नूतन वर्षानिमित्त हार्दिक शुभेच्छा....!

श्री. अनुप जावळे
उपअधीक्षक, भूमी अभिलेख, सांगोला

श्री.अनुप जावळे
उपअधीक्षक, भूमी अभिलेख, सांगोला
सर्व अधिकारी व कर्मचारी वर्ग

भूमी अभिलेख कार्यालय सांगोला

शुभ दिपावली

सर्व ग्रामस्थ, शेतकरी बांधव व तमाम नागरिकांना दीपावली व
नुतन वर्षानिमित्त हार्दिक शुभेच्छा !

शुभेच्छुक

ग्रामपंचायत महिम, ता.सांगोला

श्री.आण्णासाहेब बसवेश्वर कोळेकर
सरपंच
उपसरपंच, ग्रामपंचायत अधिकारी

सर्व सदस्य, ग्रामस्थ व कर्मचारी वर्ग, ग्रामपंचायत महिम, ता.सांगोला

कर्मचाऱ्याची गय करू नये. यासाठी पुढाऱ्यांनी आपली मानसिकता बदलणेची काळानुरूप गरज आहे. शिक्षक दुखावला तर माझे मतदान घटेल, असे न मानता शिक्षकांकडून उत्तम प्रतीचे ज्ञानदानाचे कार्य कसे होईल, हे पाहवे यातच नेत्याच्या नैतिकतेची कसोटी आहे. त्यासाठी ठोस पावले उचलण्याची गरज आहे. यासाठी काही कसोट्या–

१. प्रा. शिक्षकांना मूळ नेमणूक देताना त्यांच्या स्वतःच्या तालुक्यात देऊ नयेत.

२. बदली ३ ते ५ वर्षाच्या कालावधीत व्हावी.

३. बदली तालुक्यात केली तरी बदलीचे गाव त्याच्या जि.प. गटातील नसावे.

४. बदलीचे गावी शिक्षकांनी मुक्काम करून राहावे तरच तो घरभाडे घ्यायला पात्र समजावा.

५

. शिक्षकाची बदली शासकीय पातळीवर नियमाप्रमाणे व्हावी. पुढाऱ्याचा हस्तक्षेप नसावा.

६. बदलीच्या धोरणात वा अंमलबजावणीत दोष आढळल्यास अधिकाऱ्यांना दोषी धरावे.

७. शिक्षकांचे पगार व बिले बिनचूक व वेळेत मिळावे.

८. पूर्ण प्राथमिक शाळेला १ ते ७ एक लिपीक नेमावा. (काही अंशी बेकारी कमी हाईल.)

९. वयोमर्यादा ५८ वरून ५५ वर आणावी. (सुशिक्षित बेकारांना काम मिळेल.)

१०. विद्यार्थ्यांच्या ज्ञानदानाशिवाय दुसरे कसलेही अवांतर काम शिक्षकांना देऊ नये. त्यासाठी शासनाने सुशिक्षित बेकारांचा वापर करावा.

यामुळे परिणाम असा होईल. सध्या शिक्षक व पुढारी यांच्यामध्ये असणारे स्वार्थी मनोमिलनाचे नाते संपुष्टात येईल व शिक्षक स्वावलंबी व स्वाभिमानी बनेल. तरच त्यांच्याकडून भावी पिढी स्वाभिमानी बनेल. पर्यायाने पुढाऱ्यानीच शिक्षकांना आदराने नमस्कार करावा, असे प्रेममय वातावरण निर्माण होईल व गुरुपदाची उंची वाढेल.

११. शिक्षणविस्तार अधिकारी व गटशिक्षणाधिकारी ही पदे शिक्षकातून पदोन्नतीने भरावीत त्यांच्या बदलीचे निकष शिक्षकाप्रमाणे असावेत.

१२. शिक्षकांना देण्यात येणारे पुरस्कार वा बढत्या कामाच्या निकषावर तसेच सेवा ज्येष्ठतेनुसार असावे. यात पुढाऱ्यांचा हस्तक्षेप नसावा.

एका जुन्या जमान्यातील गुरुजीचे मनोगत शिक्षक व शासन यांना प्रेरणादायी ठरो हिच अपेक्षा व तळमळ.

पुनर्जन्मावर माझा विश्वास नाही. असेलच तर पुढच्याही जन्मी मला गुरुपद मिळावे ही नियतीकडे विनम्र प्रार्थना.

समाजभूषण साबळे गुरुजी
सांगोला.

शुभदीपावली

आमचे सभासद, असंख्य
हितचिंतक, शेतकरी बांधव
व तमाम नागरिकांना
दीपावली व नुतन वर्षानिमित्त
हार्दिक शुभेच्छा!

चेअरमन

मा.आमदार धनाजीराव साठे

संचालक

गणपत उर्फ दादासाहेब साठे

शुभेच्छुक

श्री संत कुर्मदास सहकारी साखर कारखाना लि. पडसाळी

स. म. गणपतराव साठे नगर, पडसाळी ता. माढा जि. सोलापूर

श्री. डी. बी. पवार — प्र. कार्यकारी संचालक

श्री. सुधीर पां. पाटील — व्हा. चेअरमन

ॲड. श्री. धनाजीराव साठे — मा. आमदार, चेअरमन

संचालक मंडळ

श्री. गणपत धनाजीराव साठे	श्री. भालचंद्र देविदास पाटील	श्री. विठ्ठल रामलिंग शिंदे
श्री. शशिकांत रामचंद्र देशमुख	श्री. हरिदास पांडुरंग खताळ	श्री. विजयसिंह शिरीषकुमार पाटील
श्री. राहूल विश्वासराव पाटील	श्री. मधुकर विठ्ठल चव्हाण	श्री. बाळासाहेब रंगनाथ पाटील
श्री. सयाजी माणिकराव पाटील	श्री. सिराज महिबूब शेख	श्री. नारायण जोतिराम गायकवाड
श्री. शंकर अरुण नाईकवाडे	सौ. शालिनी रोहिदास कदम	सौ. संध्याराणी धनाजी खरात

सर्व सभासद व, अधिकारी व कर्मचारी वर्ग

मायेची ओवाळणी

पद्माकर कुलकर्णी
मोबा. ९९२२४२४५३७

संध्याकाळची वेळ होती. लक्ष्मीपूजन होऊन गेलेले, घरात पणत्यांची मंद, सोनेरी रोषणाई पसरली होती. दुसऱ्या दिवशी पाडवा होता. मंदा.... आपल्या जुन्या ट्रंकजवळ बसली होती. तिचे डोळे एका विशिष्ट पाकिटाकडे लागले होते, जे तिने अनेक वर्षांपासून काळजीपूर्वक जपून ठेवले होते. ते पाकीट म्हणजे तिचा संसार.

मंदा आणि केशव यांचं लग्न होऊन पंचवीस वर्षं झाली होती. केशव एका छोट्या कारखान्यात फोरमन म्हणून काम करायचा. संसार तसा जेमतेमच होता, पण दोघांचं एकमेकांवरील प्रेम अमाप. केशवची आई म्हणजेच सासूबाई मागील वर्षी देवाघरी गेल्या होत्या, त्यामुळे घरात पाडव्याची ओवाळणी आता मंदाला एकटीलाच करायची होती... केशव स्वभावाने मितभाषी, पण कर्तव्यनिष्ठ, नवरा म्हणून तो कधीच खूप बोलका नव्हता, पण त्याची प्रत्येक कृती मंदासाठी आधारस्तंभ होती.

मंदाने ट्रंकेतून ते पाकीट काढले. आत होत्या, दोन फाटलेल्या शंभर रुपयांच्या नोटा. कथा पंचवीस वर्षांपूर्वीची आहे. तेव्हा त्या दोघांचं नुकतंच लग्न झालं होतं. पहिली दिवाळी. पहिल्या पाडव्याला सासूबाईंनी मंदाला विचारलं होतं, बाळे, तुझ्या पतीला काय ओवाळणी म्हणून द्यायचं ठरवलंय? मंदाला माहीत होतं, केशवच्या कारखान्यात काही आर्थिक अडचणीमुळे पगार वेळेवर झाला नव्हता. घरात नवीन वस्तू घेणं तर दूरच, पण साधा फराळही तिने सासूबाईंनी दिलेल्या पैशातून बनवला होता. ओवाळणीसाठी नवीन साडी किंवा मोठी भेटवस्तू घेण्याची तिची ऐपत नव्हती. मंदाचे डोळे भरून आले. तिने सासूबाईंना हळूच विचारलं, आई. माझ्याकडे फक्त जुने १०० रुपये आहेत... ओवाळणीला हे चालतील का?

सासूबाईंनी मंदाचा हात हातात घेतला आणि हसून म्हणाल्या, पैसा नाही गं महत्त्वाचा, भाव महत्त्वाचा! मनातलं प्रेम आणि त्याला दीर्घायुष्य लाभावं ही इच्छा... हीच खरी ओवाळणी. तू तेच दे त्याला. त्या रात्री मंदाला ओवाळणी झाल्यावर केशवने आपल्या खिशातून फक्त शंभर रुपये काढले आणि मंदाच्या हातात ठेवले.

तो म्हणाला, हे घे, तुझी ओवाळणी, हेच माझे पहिले पाकीट आहे.

माझा पहिला पगार जेव्हा येईल ना, तेव्हा मी तुला सोन्याची नथ घेईन.

मंदाला आठवण झाली... केशवचा तो पहिला पगार कधीच आला नाही. काही दिवसांतच कारखान्यात संप झाला आणि केशवची नोकरी गेली. नवीन नोकरी मिळेपर्यंत दोघांनी खूप कष्ट केले, पण तो पहिला पाडवा आणि ते शंभर रुपये मात्र त्यांच्यासाठी एक अतूट आठवण बनले. केशवने दिलेले शंभर रुपये आणि तिने दिलेले जुने १०० रुपये, तिने एकाच पाकिटात जपून ठेवले होते.

आज, पंचवीस वर्षांनंतर केशव चांगला फोरमन होता. आर्थिक स्थिती सुधारली होती. आजच्या पाडव्यासाठी तो मंदासाठी नवी महागाची साडी आणि सोन्याची नथही घेऊन आला होता.

केशव पाटावर बसला. मंदाने त्याला ओवाळले. दिव्यांची ज्योत आणि तिच्या डोळ्यांतील पाणी, केशवने पाहिले. केशवने खिशातून नवीन, चकचकीत नोटा काढल्या आणि म्हणाला, हे थे मंदा, यंदाची ओवाळणी आणि ही घे तुझ्यासाठी सोन्याची नथ. तेव्हा नाही जमलं, पण आता घे. मंदा हसली, पण तिचे डोळे भरून आले होते. तिने हळूच ती नवी नथ आणि नोटा केशवच्या हातात परत ठेवल्या.

माझी ओवाळणी... ती तर पंचवीस वर्षांपूर्वीच पूर्ण झालीये. असे बोलून तिने ट्रंकेतून ते जुने, फाटलेले शंभर रुपयांचे पाकीट काढले आणि केशवच्या हातात ठेवले. हे तुमचे पाकीट आणि हे माझे. हीच माझी खरी

कमाई, हीच माझी खरी ओवाळणी! ज्या शंभर रुपयांत आपण संसार सुरू केला, तेच प्रेम मला आजही कायम हवंय.

केशवने त्या फाटलेल्या नोटा आणि जुनं पाकीट हातात घेतलं, त्याच्या डोळ्यांतून अश्रू ओघळले. त्याला पंचवीस वर्षांपूर्वीचा आपला संघर्ष, आपल्या पत्नीचा त्याग आणि तिच्या निष्पाप प्रेमाची आठवण झाली. त्या नव्या नोटांपेक्षा या जुन्या १०० रुपयांमध्ये त्याला आनंद आणि समृद्धी जाणवली. त्याने पाकीट छातीजवळ धरले आणि मंदाला जवळ घेतले. हो मंदा, हीच खरी दिवाळी. जिथे नात्यातील मायेची ओवाळणी पैशांपेक्षा कितीतरी मोठी असते. त्यांच्या घराच्या दारात, पणत्यांची ज्योत शांतपणे जळत होती, त्या जुन्या शंभर रुपयांच्या पाकिटातील अनमोल प्रेमाची आणि त्यागाची साक्ष देत. इडा, पीडा टळो, बळीचं राज्य येवो!

आपल्या आरोग्याची दिवाळी नेहमीच आनंदी राहो, आपले हृदय मजबूत राहो, शरीर निरोगी राहो, आणि जीवन प्रकाशमय व समाधानपूर्ण राहो!

दारी दिव्यांची आरास,
अंगणी फुललेला सडा रांगोळीचा खास,
आनंद बहरलेला सर्वत्र,
आणि हर्षलेले मन,
आला आला दिवाळी सण,
करा प्रेमाची उधळण..

आमचे असंख्य मित्र परिवार, हितचिंतक व नागरिकांना दीपोत्सवाच्या हार्दिक शुभेच्छा..!

लवकरच नवीन जागेत सुसज्ज हॉस्पिटल सुरू होणार...
अलराईन नगर, हॉटेल मोहर समोर,
सांगोला, जि.सोलापूर

डॉ.देवकते
मातोश्री पद्मिनी हॉस्पिटल

डॉ.भगवान उमाजी देवकते
(B.D.S.)
दंत रोग तज्ञ

डॉ.संदिप भगवान देवकते
M.B.B.S., M.D. (Paediatrics)
नवजात शिशू व बालरोगतज्ञ
तालुका आरोग्य अधिकारी, पं.स.सांगोला

डॉ.मेघना संदिप देवकते
M.B.B.S., M.S. (Obs/Gyn)
प्रसुति व स्त्रीरोग तज्ञ

एस.टी.स्टँड समोर, भोपळे रोड, महात्मा फुले चौक, सांगोला, जि.सोलापूर ४१३३०७
संपर्क : ०२१८७-२२०५८८ मो. ७०५८३४८३७०

देवकते परिवार, सांगोला, जि.सोलापूर

शांता मावशी .... समईतील एक ज्योत

लहानपणापासून या शांता मावशीनी माझ्या मनात घर केले. दोघी बहिणी कर्नाटकातल्या आमच्या शेजारी रहायच्या जुळ्या बहिणीसारख्या. आजोबा मी सहावीला असतानाच गेले. आठवतात काठी घेऊन दारात बसायचे. पूर्वी सगळ्यांची शेतीच तर शांता मावशींना त्यांच्या बहिणीने एक खोली रहायला दिली होती. तिथ भांडी कुंडी छोटासा संसार अधूनमधून रहायच्या. त्या काळात कोण कशा गावी जात असतील व येत असेल देव जाणे.

गोऱ्या पान नाकीडोळी नीटस, सडपातळ बांधा, काळेभोर केस अंबाडा नसायचा तर वेण्या घालून केस बांधायचे त्याला चकर म्हणायचे ते असायच. नऊवारी साडी दोन्ही खांद्यावर पूर्ण हात झाकेपर्यंत पदर, पांढरेच ब्लाऊस, काठा पदराची साडी बहुधा नसायची, छापील साड्या नुकत्याच निघाल्या होत्या झुळझुळीत साड्या. साधीच पण स्वच्छ नेटकी राहणी, तोंड भरून गोड बोलणं, हळदी कुंकवाला जाणं, क्वचित दुपारी दारात पायऱ्यावर बसून गप्पा मारणे.

संध्याकाळी ५.५० ला देवळात जाणं शेजारी एक छोटस रामाच देऊळ तिथ मात्र नियमीत जायच्या. हातात फुलपात्र त्यात एखाद दुसर फुल, साखर वा तांदूळ, हळद, कुंकू बस. रामाचा दर्शन १५-२० मिनीटे बसणे घरी येणे कपाळावर कुंकाची चिरी, नवरा असेपर्यंत मंगळसूत्र, पाटल्या, बांगडया बहुधा असाव्यात ही माझी त्यांची अनेक वर्षांची ओळख.

जशी मोठी व्हायला लागले तसे शांता मावशी बद्दल माहिती कळत गेली. आमच्या शेजारी रहायच्यापण त्यांचे जीवन कळायला २३ साल उजाडल की. फलटणला चांगल्या ऑफीसात त्यांचे पति ऑफीसर. पण दुर्दैव हे की लग्नात देण्याघेण्यावरून वा मानपानावरून वाद झाला. इकडच्या किंवा तिकडच्या कोणत्याच मोठ्या अर्थात पुरूष माणसाला मिटवावासा वाटला नाही किंवा जमले नाही जे असेल ते आणि एक चांगली

कापराची ज्योत कायम जळत राहिली शेवटपर्यंत. शांतपणे, सहजपणे, सुहास्यवदने. कारण मी त्यांना कधीच दुःखी पाहिल नाही.

त्या काळाप्रमाणे बहुधा दुसरे चांगल स्थळ मिळून गेले आणि अगदी सहज नवरोजी चतुर्भुज झाले बहुधा, मोठा वाडा असावा कारण कसे माहित नाही पण त्या थोर माणसाने आपल्या घराची दारे बंद केली नव्हती, कसे माहित नाही पण शांता मावशी त्यांच्या घरात जायच्या यायच्या, रहायच्या. आश्चर्य वाटलं ना?

कशासाठी तर कामासाठी, बाळंतपण, आजारपण असली की बाई कामावर हजर. त्या काळात फोन, मोबाईल नव्हतेच. १० पैशाच पोस्टकार्ड हाच सांगावा. माझा आपला अंदाज ही बाई भल्या पहाटे उठून कामाला लागायची. शेक-शेगडी, खाणपिणं सगळीच काम करत रहायच्या. महिना १॥ महिना त्या काळात आबादी आबाद अशा किती फेऱ्या झाल्या देव जाणे. त्या मुली मोठ्या झाल्या. मुलींची मुलांची लग्ने झाली. शांता मावशीच्या फेऱ्या चालूच. आज या जगात त्या नाहीत पण त्यांची ती तेजःपूज मूर्ती माझ्या नजरेसमोरून हलत नाही. आजची २३ सालची नवतरूणी आमच्या शांतामावशींना नक्कीच वेड्यात काढेल. काढू द्या.

पण शांताबाई वेड्या नव्हत्या, निर्धन नव्हत्या. मूर्ख तर नव्हत्याच नव्हत्या, आमच्या पाठ्यपुस्तकातील ओळी आठवताहेत.

की घेतले न व्रत हे आम्ही अंधतेने
बुध्द्याची वाण धरीले करी हे सतीचे.

ना त्या नवऱ्याशी बोलणं, ना आक्रस्थाळेपणा. प्राप्त परिस्थितीचा सहज स्विकार. मधमाशीसारखे सतत कामात व्यग्र राहणे, जगंनियंत्यावर नितांत श्रध्दा पण वेड नाही, जे त्यांच्या हातात होतं ते त्यानीं भरभरून दिलं.

मला कळलेल्या शांतामावशी एवढयाच. त्यांना भाऊ होता नव्हता माहित नाही. या बहिणीच्या आधाराने तिच्याही संसारात कष्ट करत शांतपणे ही देवघरातली समईची ज्योत तेवत राहिली ते असेपर्यंत. श्वास असे पर्यंत मला माहीत नाही, त्यांच मिलन झालं होत की नाही, पण आमची भारतीय संस्कृती, हिंदू धर्म इनका उच्च की हजारो वर्ष परकीय आक्रमणे झाली पण तसूभरही डंख लागला नाही.

शांतामावशी तुम्ही कुठल्या शाळेत शिकला माहित नाही ना तुम्हाला घडविणारे आईवडिल. पण मला कळलेल्या शांताबाईंच्या मावशींच्या बलिदानाला तोड नाही.

आमचा सैनिक जसा सिमेवर लढताना तिरंग्यात लपेटून देशासाठी प्राणार्पण करतो तशाच। शांतामावशी शांतपणे लढत लढत प्राणांची आहुती दिली.

शांतामावशी ग्रेट ! ग्रेट ! ग्रेट ! आम्हा सर्व महिलांचा तुम्हाला कडक सॅल्युट !

श्यामला तांबोळी
पुणे ९७६३८ ३०३७९

दिपावली व नूतन वर्षाच्या सर्व नागरिकांना..
तसेच शेतकरी बांधव व व्यापारी वर्गास
हार्दिक शुभेच्छा

राजमाता ई सेवा केंद्र

- सर्व प्रकारचे दस्त टायपिंग करून मिळेल.
- आमच्याकडे सर्व प्रकारचे खरेदी खत, मॉरगेज, बक्षीसपत्र, वाटणीपत्र
- हक्कसोड पत्र, करारनामा तयार करून मिळेल.
- खरेदी दस्तासाठी बारकोड, डाटा एन्ट्री व ऑनलाईन स्टँपचे
- सर्व चलन काढून मिळतील.
- खरेदी खतासाठीची सर्व अचूक व योग्य माहिती मिळेल.

श्री.संपत माने

: संपर्क :

श्री.संपत माने
(9764353192)

पत्ता : १) तहसील कार्यालयासमोर सांगोला
२) नवीन दुय्यम निबंधक कार्यालयासमोर, सादिगले कॉम्प्लेक्स, सांगोला

मला गुरुजी व्हायचं आहे.

मला गुरुजी व्हायचं आहे, राष्ट्रहित जपायचं आहे.
अध्यापनकला अवगत आहे मला
आदर्श पिढी घडवायची आहे मला
देशहिताचा ध्यास सदैव मनाला
ज्ञानदान आवडीनं करायचं आहे
मला गुरुजी व्हायचं आहे ।।१।।

संपवायचा आहे मला मटका अन् जुगार
या देशातला भ्रष्टाचार अन् काळाबाजार
बाहेर काढा म्यानातून तळपती तलवार
नव्या पिढीला सांगायचं आहे.
मला गुरुजी व्हायचं आहे ।।२।।

टिळक, गांधी, नेहरू आम्हीच घडवले
सावरकरांना राष्ट्रप्रेमाचे बाळकडू पाजले
महाज्ञानी आंबेडकरांचे नाव विश्वात गाजले
ते गुरुगादीचं महात्म्य जपायचं आहे.
मला गुरुजी व्हायचं आहे ।।३।।

आरोग्य जपण्या राहू निर्व्यसनी
नैतिकतेचा आदर्श ठेवूया
जनी अंगिकारू साधी राहणी उच्च विचारसरणी
साबळे गुरुजींचे ऐकायचं आहे.
मला गुरुजी व्हायचं आहे ।।४।।

समाजभूषण साबळे गुरुजी
सांगोला.

दीपोत्सव

लक्ष लक्ष दीप उजळुनी
अंधार तमाचा दूर सारूनी
हासत आली घरा दिवाळी
मनामनात मोद मरूनी....
विजयोत्सव हा सत्याचा
करूनी शिरच्छेद असत्याचा
प्रकाशमान झाली सृष्टी
पराजय झाला अन्यायाचा....
पृथ्वीवर जणू चांदणे फुलले
घराघरात चांदोबा डोलले
अमावास्येचा काळोख सारूनी
आरोग्य, सुख, समृद्धी नांदले......
नात्यांच्या रांगोळीत चला
जिव्हाळा, आपुलकीचे रंग भरू या
पणतीत तेल स्नेहाचे ओतुनी
वात माणुसकीची पेटवू या.....
लोभ, मोह, मत्सराची करूनी स्वच्छता
बंधुता, एकात्मतेचे तोरण बांधू
परिश्रम, ज्ञानाच्या प्रकाशात
लाडूचा गोडवा हृदयात साठवू......
सण हा दिवाळी दिव्यांचा खऱ्या अर्थाने साजरा करू
अंधकार अंधश्रद्धा, अज्ञानाचा
ज्ञानाच्या तेजाने दूर सारू...

डॉ. प्रिया मदनकर
मोबा. ९७६७७६००७०

शुभ दीपावली

फुका अभिलाषा, फुकाचा मत्सर
दीपावली पर्वावर शुभ लाभाचे संवत्सर
किटाळ अमंगल्याचे जाऊदे दूर
हरेकाच्या अंतरी मांगल्य समृद्धीचा येऊ दे पूर
करुणा, एकतेचा आसमंती घुमू दे सूर
सत्यम् शिवम् सुंदरम् तेवू दे काळजात मंद पणती
जिव्हाळा, प्रेम, मायेची मजबूत होऊ दे सारी नाती
अमृतसिंचन करीत मना मनात पोहोचावी आपुलकीची किरणे
होऊ दे आत्मनिर्भर जीव सारे पसायदानाचे फिटू दे पारणे
अवघाची संसार सुखाचा करीन आनंदे भरीन तिन्ही लोक
ओठी असू दे हरेकाच्या हेच गाणे
माझ्या काव्यदीपावलीमध्ये गवसावा नवा सूर ताल
कायमची नांदू दे दिवाळी मनात जनात
जो जे वांछील तो ते लाहो समर्थ प्रेरणा करी बहाल

देवेंद्र औटी
मोबा. ९८८१४८२९२४

॥ शुभ दीपावली ॥

आमचे हितचिंतक, मित्रपरिवार, शेतकरी
बांधव तमाम नागरिकांना दीपावली व
नुतन वर्षानिमित्त
हार्दिक शुभेच्छा !



मा.श्री.सुरेश गायकवाड

शुभेच्छुक

भगवती ट्रान्सपोर्ट कंपनी

भगवती फ्रुट कंपनी

मार्केट यार्ड सांगोला, जि.सोलापूर

डेली सर्व्हिस दिल्ली, पंजाब, कोलकाता, पटना

अभिजीत सुरेश गायकवाड
(मो.9850313444)

हॉटेल स्वराज्य

व्हेज-नॉन व्हेज फॅमिली रेस्टॉरंट
एस.टी.स्टँड समोर, सांगोला
(मो.9518774848)

गायकवाड परिवार, सांगोला

पोशिंदाच दुधाच्या शोधात...

• आनंद घोडके, सोलापूर
७३९७८१३२३६

प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वतयारीमुळे त्या दिवशी शाळेतून घरी परत निघायला उशीर झाला. उशीर म्हणजे काय, दिवेलागणीची वेळही टळून गेली होती. शाळा सोडून पाच-दहा मिनिटे झाली असतील. दोन-चार कि.मी. ओलांडल्यावर रस्त्यावर डावीकडे चौथीतली राधिका उभारलेली दिसली. सर... सर... म्हणून हाक मारली. आवाजाकडे वळून आम्ही थांबलोच. आम्ही थांबलेलं पाहून ती पळतच आली. बाबांनी तुम्हाला वस्तीवर बोलवलंय आताच... राधिकाचं बोलावणं ऐकून मी मनातल्या मनात पुटपुटलो, आधीच उशीर झालेला. आता हे काय पुन्हा नवीन? पण नाईलाज होता, कारण छोटी राधिका खूपच आग्रहाने बोलवत होती त्यामुळे आम्ही जवळच असलेल्या तिच्या वस्तीवर पोहोचलो.

वस्तीच्या जवळ गेल्यावर तिथला कुत्रा थोडा जास्तच भुंकू लागला पण सत्या... राधिकाच्या या आवाजाने तो गप्पगार झाला. मी सहज म्हटलं, सत्या, तुमचा कुत्रा आहे का? हो सर राधिका बोलली. आमच्या सहकाऱ्यांनी लगेच दुसरा प्रश्न केला, सत्याला सोडून अजून कोण कोण आहेत? राधिका उत्तरली, आई, बाबा, मोठा भाऊ, लहान भाऊ, मंगला, गोदा, सख्या-तुक्या! आमच्या सहकाऱ्यांनी अवाक् होऊन विचारले, मंगला, गोदा, सख्या-तुक्या ही काय चुलत्याची मुले आहेत का? राधिका लगेच सांगू लागली, नाही ओ सर! मंगला आमची म्हैस आहे. गोदा गाय आणि सख्या-तुक्या ही बैलजोडी आहे. आम्ही दोघेही आश्चर्यचकित होत तिच्या वस्तीवर पोहोचलो. राधिकाचे वडील वस्तीच्या बाहेरच थांबले होते. त्यांनी हसतमुखाने स्वागत केले व बसायला आम्हाला बाज टाकली. बाजेवर बसून आमच्या गप्पाटप्पा सुरू झाल्या.

राधिका पाण्याचे दोन ग्लास घेऊन आली. पाणी पिऊन झाल्यावर राधिकाचे वडील म्हटले, गुरुजी, रात्र झाली आता शहरात जायला खूप उशीर होईल. दोन घास खाऊन इथंच आराम करा. आमच्या सहकाऱ्यांनी लगेच तोंड उघडले, खूप कामं आहेत. जावं लागेल. राहून कसं चालेल? आमचा नकार ठरलेला पाहून राधिकाच्या वडिलांनी आग्रह थांबवला. बरं, सावकाश जा. घाई करू नका.. अगं, स्वयंपाक आपल्या पुरताच कर. दोन कप चहा वाढव. आईनं चुलीवर चहा ठेवल्याबरोबर राधिका बाहेर आली. बाबांच्या कानात काहीतरी पुटपुटली. बाबांनी हातवारे करत काहीतरी सांगितले. मग राधिका आमच्या समोरूनच हाकेच्या अंतरावरील दोन-चार घरी जाऊन आली. पुन्हा बाबांच्या कानात काहीतरी पुटपुटली.

बरं, जा आता. आहे तसा घेऊन ये. असे नाराजीच्या स्वरात बाबांचे बोलणे ऐकून राधिका आत गेली व एका घंगाळात (जर्मनच्या ताटात) चहाचे तीन वेगवेगळ्या रंगांचे कप घेऊन आली. तिने आधी मलाच चहा दिला. डिकासीन (काळा चहा) पाहून थोडंसं कसंसच झालं, पण नाईलाज होता. आमच्या सहकाऱ्याचाही चेहरा बघण्यासारखा झाला होता. राधिकाच्या घंगाळातील तिसरा कप उचलून बाबा बोलू लागले, गुरुजी, माफी करा बरं का! काळा चहाच द्यावा लागलं आम्हाला. दुधाचं लईच वांदे झालेत अलीकडं. गोदा दूध देईना झाली महिन्यापासून आणि मंगलाबी सकाळीच दूध देती. गवळी अप्पा सगळंच दूध घेऊन जातो. शेजाऱ्यापाजाऱ्यांकडं ही दूध नाही, म्हणून माफी असावी. दुधात लिंबू पिळलंय मालकिणीनं. थोडं झणझण होईल. आम्ही चहा प्यायला घेतला. पहिल्या घोटालाच अंगावर शहारे आले. आणि पूर्ण चहा संपवला तेव्हा ते डिकासीन (म्हणजे शहरातील लेमन टी) पिऊन सकाळपासूनचा शिणवटाच निघून गेला राव !

चहा झाल्यावर पुन्हा मी दुधाच्या तुटवड्याचा विषय छेडला. राधिकाच्या बाबांनी सांगितले, इथे प्रत्येकाच्या वस्तीवर दोन-चार जनावरं आहेतच. परंतु, गवळीअप्पा सकाळी सकाळी प्रत्येकाच्या वस्तीवर हजर होतो आणि सगळंच दूध शहराकडे घेऊन जातो. लिटरमागे एकवीस रुपये देतो आणि दरमहा एक तारखेला एकरकमी देत असल्याने आम्हाला परवडते.

बाजाराचा खर्च निघून जातो. त्यामुळे दुधाची अशी पंचाईत होते.

पोशिंद्याकडून एकवीस बावीस रुपये लिटर दूध घेणारे गवळी अप्पा मात्र शहरात पन्नास रुपये लिटर दूध विकतात आणि आपण निमूटपणे विकत घेतो. याहून कहर म्हणजे ज्याच्या घरी दूध उत्पादन होते, तो पोशिंदा मात्र कमी दरात दूध देऊन स्वतःच दुधाच्या शोधात फिरतो, हेच मनाला पटत नाही...

शुभदिपावली

सर्व ग्रामस्थ, शेतकरी बांधव व तमाम नागरिकांना दीपावली व नुतन वर्षानिमित्त हार्दिक शुभेच्छा !

शुभेच्छुक

ग्रामपंचायत बामणी, ता.सांगोला

सौ. सारिका विजय माने
सरपंच

ग्रामपंचायत अधिकारी : श्री. विजय परशुराम कांबळे

सर्व सदस्य, ग्रामस्थ व कर्मचारी वर्ग, ग्रामपंचायत बामणी, ता.सांगोला

आमचे असंख्य हितचिंतक, ग्राहक, व तमाम नागरिकांना दीपावली निमित्त हार्दिक शुभेच्छा!

अन्नपुर्णा स्वीटहोम ॲण्ड बेकर्स

जयभवानी चौक, आण्णाभाऊ साठे पुतळ्या समोर, सांगोला

आमचेकडे सर्व प्रकारची मिठाई योग्य दरात मिळेल.

एक वेळ अवश्य भेट द्याच...

प्रोप्रा.सचिन भारत ढोले (मो.९२७१५९५१११)
संतोष भारत ढोले (मो.९४२३३३३०५०)

आमचे असंख्य हितचिंतक, ग्राहक, व तमाम नागरिकांना दीपावली निमित्त हार्दिक शुभेच्छा!

हॉटेल ए-वन
परमिट रूम ॲण्ड बिअर बार

नगरपलिके जवळ, नेहरू चौक, सांगोला जि. सोलापूर

प्रोप्रा. सावता फुले

फुले परिवार, सांगोला

आमचे असंख्य मित्र परिवार, हितचिंतक,
तमाम नागरिकांना दीपावली व
नूतन वर्षानिमित्त हार्दिक शुभेच्छा...!

मा.श्री. विनोद प्रभू घुगे
पोलीस निरीक्षक, सांगोला पोलीस स्टेशन
शुभेच्छुक : सर्व पोलीस अधिकारी व कर्मचारी वर्ग
सांगोला पोलीस स्टेशन सांगोला,जि.सोलापूर

सर्व ग्रामस्थ, हितचिंतक, मित्रपरिवार व तमाम नागरिकांना
दीपावली व नुतन वर्षानिमित्त हार्दिक शुभेच्छा !

शुभेच्छुक
शासनाच्या विविध विकासाच्या योजना राबविणारी ग्रामपंचायत

ग्रामपंचायत डिकसळ,
ता.सांगोला,

सरपंच : सौ.जिजाबाई दत्तात्रय करांडे
उपसरपंच : श्री. मिलींद बळवंत कुलकर्णी
ग्रामपंचायत अधिकारी : श्री. सुनिल सुभाष साळुंखे
सर्व सदस्य, ग्रामपंचायत कर्मचारी वर्ग व ग्रामस्थ
ग्रामपंचायत डिकसळ, ता.सांगोला,

आमचे असंख्य ग्राहक व तमाम नागरिकांना दीपावली व नुतन वर्षानिमित्त हार्दिक शुभेच्छा

शुभेच्छुक

शारदा एन्टरप्रायझेस

डॉ. भोसेकर कॉम्पलेक्स, स्टेशन रोड, सांगोला जि. सोलापूर ४१३३०७

- प्लायवुड
- लॅमिनेटस्
- हार्डवेअर
- विनेर

प्रसाद जाधव
(B.E. Civil)

जाधव परिवार,
सांगोला

दत्तात्रय जाधव
Mo. 9423065575

आमचे असंख्य हितचिंतक, ग्रामस्थ, शेतकरी बांधव व
तमाम नागरिकांना दीपावली निमित्त हार्दिक शुभेच्छा!

शुभेच्छुक

ग्रामपंचायत चिंचोली, ता.सांगोला

सरपंच : श्री. दत्तात्रय (नाना) बेहरे

उपसरपंच : श्री.अंकुश महादेव खांडेकर

ग्रामपंचायत अधिकारी : श्री.नितीन महादेव गडदे

सर्व सदस्य, कर्मचारी वर्ग व ग्रामस्थ

ग्रामपंचायत चिंचोली, ता.सांगोला

आमचे असंख्य हितचिंतक, ग्रामस्थ, शेतकरी बांधव व
तमाम नागरिकांना दीपावली निमित्त हार्दिक शुभेच्छा!

शुभेच्छुक

ग्रामपंचायत अजनाळे, ता.सांगोला

सरपंच : सौ.दिपाली बाळासाहेब लाडे

उपसरपंच : श्री. संतोष पांडुरंग शिंदे

ग्रामपंचायत अधिकारी : श्री.संदिप महादेव सरगर

सर्व सदस्य, कर्मचारी वर्ग व ग्रामस्थ

ग्रामपंचायत अजनाळे, ता.सांगोला

झुलवा..

● खाजाभाई बागवान, सोलापूर

राधा अक्का ही गाव जोगतीन होती. तिला दोन मुल आणि एक मुलगी होती. राधा अक्का ही जोगतीन असल्यामुळे तिच्या मुलांना कधीच बाप दिसला नाही. राधा अक्काचा झुलवा लागला होता गावच्या पाटलासोबत ती त्याच्याबरोबरच रहायची आणि त्याच्याकडूनच ही तीन मुले झाली होती. राधा अक्का ही जोगतीन असल्यामुळे पाटलाने कधी मुलांना स्वतःचे नाव दिले नाही मग संपत्तीतर दूरचीच गोष्ट होती.राधा अक्काने आपल्या मुलांना जोगवा मागवून वाढवले दोन मुले होती त्यांना पाटलाने त्याच्या शेतात चाकरीला घेऊन गेला. आता राधा अक्का,लहान सुलभा व राधाअक्काचा गुरु परशुराम बा हे तिघे रहात होते. सुलभा रोज शाळेत जायची. शाळेत गुरुजींनी सांगितलेला अभ्यास ती नित्य करायची. न चुकता शाळेत जाणे अभ्यास करणे हे तिचे नित्य काम होते. राधाअक्का व परशुराम दोघ गावभर गाणी गावून, यल्लमा देवीच्या नावाने जोगवा गोळा करून आणायचे. सुलभा नऊ वर्षाची होती म्हणून तिला जोगवा मागणे व गाणी म्हणायला राधा अक्का घेवून जात नसायची पण परशुराम तिला रोज भुणभुण करत होता. जोगत्याची पोरं हाय तिलापण जोगवा मागायला शिकव राधे नायतर अवघड होऊन बसायचं समध असे परशुराम बोलताच. ''अरे परशुबा लहान हाय ती शिकवते तिला मोठी झाल्यावर तोवर जगू दे कि जग तिला''असे राधा बोलून परशुरामला टाळायची.

सुलभा नुकतीच शाळेतून घरी आली होती आणि पाटील त्यांच्या घरात आलेला होता. सुलभाला बघून तो राधाला म्हणाला,''राधाबाई पोरं मोठी झालीय करा तिचे कारण उशीर करू नका नाहीतर पळून जायची रेखासारखी ''

'नाय मालक अजून पोरं लहान हाय तिला अजून शिकायचं हाय''राधा अशी बोलताच पाटील आपला राक्षसी हसायला लागला आणि म्हणाला,''राधे कोणत्या जगात जगतीय तू जोगतीनीची पोरं आहे ती माझी जरी असली तरी काय झालं शेवटी पाटलाची ठेवलेली बाईच होणार ह्या गावात असो कि दुसऱ्या कुण्या गावात मंग शिकून काय उपेग? करा करा तुला जे काय करायच ते करा ज्या दिवशी मुलीला पदर येईल त्यादिवसापासून तेरा दिवसाच्या आत कारन करून टाकायचं नाय केलं तर याद राखा आमच्या इज्जतीचा सवाल हाय''

राधा ह्या गोष्टीला नकार देत होती तेवढ्यात परशुराम बोलतो, ''तू गप गं राधे माझ्या घरात राहतेय तू जोगत्याच्या मालक जस सांगतील तसंच होणार, हो मालक करू आम्ही थोडं पैक दिल तर बरं होईल पोटापाण्याचं बघता येईल ''

पाटील काही रुपये परशुरामच्या हातात देतो आणि तिथून निघून जातो.

ह्याचे सर्वांचे संभाषण सुलभा गप्प एका कोपऱ्याला बसून ऐकत होती. पाटील जाताच ती राधाला येऊन बोलते, ''आय मला जोगतीन व्हायचं नाय मी शिकणार मला डॉक्टर व्हायचं आहे डॉक्टर दीदी सारखं''

सुलभाचे हे बोलणे ऐकून, राधाच्या डोळ्यात पाणी येते. ती म्हणाली, ''सुलभे तुला डाक्टर व्हायचं न मंग चल जोगवा मागायला उद्या पासून जे पैक मिळतील ते तू ठेवून घे तुला शिकायला कामी येतील.''

परशुराम माय लेकीचं हे बोलण ऐकून खूप खुश झाला आणि म्हणाला, '' हे कसं बरोबर पत्ताच बोलली राधे तू मुलीला जोगवा मागायला शिकव आता तेव्हाच थांबेल ओघ आणि लोभ ''

ह्यावर राधा काहीच बोलत नाही.

दुसऱ्या दिवशी राधा सुलभाला साडी घालून जोगव्यासाठी तयार करते. साडीमध्ये सुलभा नव्या नवरीसारखी दृष्ट लागावी अशी दिसत होती. राधा डोक्यावर यल्लमा देवीचा जग घेते आणि परशुराम सुती चवंडक घेवून निघाले जोगवा मागायला. गावाच्या वेशीवर आल्यावर राधा गाणं म्हणू लागली परशुराम सुती चवंडकवाजवू लागला आणि सुलभाला नाचण्यास सांगितले सुलभाने ताल धरला तिथे काही तरुण उनाड मूल बसली होती. ती सुलभाला नाचताना पाहून मनाला येईल ते बोलून सुलभाची छेड कढू लागले सुलभावर पैसे उधळून लागले. सुलभावर होणारी पैश्याची उधळण बघून परशुराम आणि राधा अक्का गप्प आपले वाजवणे व गाणं म्हनने सुरु ठेवले त्यांना कसेच रोखले नाही पण ह्यात सुलभाचे जीव गुदमरत होते.

घरी येताच सुलभा चिडली म्हणाली, '' मी नाही येणार जोगवा मागायला''

''अगं लोक असाच करत्यात तू सुंदर हाय नव्ह म्हणून त्याच्या लक्ष नग देवू पैक बघ पैक किती गोळा झालंय आम्ही दोघ रोज जेवढं आणत होतं त्याच्या दहापट पैक आलेत महिनाभराची कमाई आली आहे.''राधा सुलभाला समजावू लागली.

''आय आपण मजुरी करूयात नको गं हे जोगवा वगैरे मागणं ''सुलभा म्हणाली.

यावर परशुराम चिडला आणि म्हणाला,''ये रांड, जोगत्याच्या घरात राहून मजुरी करती व्हय गं सटवे बट्टा लाव आमच्या जातीला, झुलवा कसं लागलं गं तुझ''

''परशुबा शांत हो तिला नाही कळत रे अजून लहान हाय ती''राधा म्हणाली.

''लग्न करून दिल तर दोन मुलं होतील घोडीला तू लहान म्हणती व्हय गं'' चिडून परशुराम राधाला बोलला.राधा काहीच न बोलता शांत बसली.

त्यांचे नित्यक्रम सुरु झाले रोज सुलभा शाळेतून येताच तिला घेवून जोगवा मागायला जायचे.

अशीच दोन ते तीन महिने गेले सुलभा आता दहावीत आली होती.ती रोज शाळेतून येताच अभ्यासाला बसायची ह्यामुळे जोगव्याला जायचा खोळंबा व्हायचा. परशुराम रागाला येऊन एकदा सुलभाला मारायला लागला राधा आडवायचा प्रयत्न करते तरी तो काही ऐकत नाही. सुलभाला घाबरून पदर येतो.

राधा परशुरामला थांबवते म्हणते, ''थांब बा बघ मुलालीची हालत काय झालीय? गप बस मुलीला कुठं घेवून नाही जावू शकत आता''

परशुराम थांबतो म्हणतो, ''ये राधे बाया बघ लवकरच आता कारन करावं लागेल मालकाने सांगितल्यासारखं ''

'' परशुबा मी आजवर सहन केले रे कसे तरी हे जोगतपणा माझ्या मुलीला नको रे नको सांगू मालकाला. तू हवं ते घे पण माझ्या मुलीला नको रे ह्यात ओढू मी तुझ्या पाया पडते. माझ्या मुलीला शिकायचे हाय रे '' राधा गयावया करू लागली.

''ये बये असे काय बी बोलू नग, मला माझं गावातल हुक्का पाणी बंद करून घ्यायचा नाय. चल तिकडं आली मोठी शाळा शाळा करणारी''असे म्हणून परशुरामाने तिला ढकलून तिथून निघून गेला.

राधा सुलभाला उचलते तिला अंघोळ घालून कोपऱ्यात बसायला सांगते. राधाच्या मनात धडकी भरलेली होती कि काय होईल? परशुराम जाऊन पाटलाला सांगेल का? ह्या सर्व प्रश्नाच्या गराड्यात तिला रात्रभर डोळ्याला डोळा लागत नाही.

सकाळ होतच परशुराम बाहेर झोपलेला असतो त्याला बघून मनात खूप प्रश्न निर्माण होतात. राधा परशुरामला उठवते. तो उठताच राधाला म्हणतो,''राधे सुलभा मोठी झालेली गोष्ट मी पाठलाला सांगत नाय तर मला तू जमा करून ठेवलेले सारे पैसे देणार का? मगच मी शांत बसतो ''

''घे गं घे सारे पैसे घे पण ही गोष्ट कोणाला सांगू नको तुझ्या पाया पडते''राधा परशुरामला सारे पैसे देताना असे बोलते.

असेच दहा पंधरा दिवस जातात. सुलभाच्या मनात जोगवा न मागण्याची आणि जोगतीन न होण्याचा विद्रोह तसाच जिवंत होता. शाळेतून घरी येताना सुलभा देशमुखच्या मळ्याकडे मजुरीचे विचारण्यासाठी जाते. तिला तिथून येताना पाटील पाहतो आणि त्याच्या मनात वेगवेगळे व वाईट विचार येतात.

सुलभा घरी पोहचायच्या आधी पाटील येऊन तिथे बसलेला असतो. राधा-परशुराम व पाटील यांच्यात वाद चालेल होता. पाटील राधा आणि परशुरामला घाण शिव्या देत ऐकवत होता.

सुलभा घरी येताच परशुराम तिला तिची वेणी पकडून वाकवून विचारु लागतो,''काय गं कुठं गेली होतीस? शाळा सुटून किती येळ झालं? मालक जे सांगतेत ते खरं हाय का? देशमुखाच्या मळ्यात का

सर्व ग्रामस्थ, शेतकरी बांधव व तमाम नागरिकांना दीपावली व नुतन वर्षानिमित्त हार्दिक शुभेच्छा !

शुभेच्छुक

ग्रामपंचायत लक्ष्मीनगर, ता.सांगोला

सरपंच : सौ. राणीताई दिपक बाड

उपसरपंच : श्री. धर्मराज प्रकाश ऐवळे

ग्रामपंचायत अधिकारी : श्री.दिपक कुंडलिक गोरे

सर्व सदस्य, ग्रामस्थ व कर्मचारी वर्ग, ग्रामपंचायत लक्ष्मीनगर, ता.सांगोला

